**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**मुंबईच्या परिवर्तनाबाबत मॅकेंझी कंपनीचा अहवाल**

**(1) * 13299 श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्यासाठी मेकेंझी या खाजगी संस्थेने बॉम्बे फर्स्ट या नावाच्या शासनाकडे सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने व मुंबई विकासाची दिशा ठरविण्यासाठी शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कार्यबलाने शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(2) असल्यास, दोन्ही अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व यासाठी लागणारा निधी कोणकोणत्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येणार आहे,

(3) असल्यास, यात केंद्र शासनाच्या आर्थिक सहाय्याचाही सहभाग राहणार आहे काय,

(4) असल्यास, केंद्र शासनाकडे तसा प्रस्ताव शासनाने पाठविला आहे काय व त्याची फल:निष्पती काय आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) होय.

(2) मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यबलाने प्रामुख्याने मुंबई शहरासाठी पायाभूत सुविधा, गृहनिर्माण, प्रशासकीय सुधारणा, आर्थिक विकास व वित्तीय संस्थात्मक बाबींसंदर्भात शिफारशी केलेल्या आहेत.

पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर मुंबई विकास निधी स्थापनेबाबत कार्यवाही सुरु आहे. या व्यतिरिक्त केंद्र शासनाने नव्याने जाहिर केलेल्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत आर्थिक मदत प्राप्त करण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून निधी उपलबध करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या बरोबरच खाजगी गुंतवणूकदार जागतिक बँक व तत्सम संस्थाकडून अर्थसहाय्य मिळविण्यात येणार आहे.

(3) होय.

(4) जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियानाखाली आतापर्यंत सुमारे रुपये 11 हजार कोटीचे 7 प्रकल्प केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले आहेत.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निमाण अभियान योजनेखाली आतापर्यंत केंद्रशासनाकडे जे 7 प्रकल्प शासनाकडून सादर करण्यात आले आहेत त्यासंदर्भात केंद्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली ? तसेच या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करण्याबाबत आतापर्यंत किती खाजगी गुंतवणूकदारांकडून व संस्थांकडून अर्थसहाय्य मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A-2

PFK/ MHM/ KGS/ 11:00

ता. प्र. क्र. 13299..........

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निमाण अभियान अंतर्गत केंद्रशासनाकडे एकूण सात प्रकल्प पाठविण्यात आले असून त्यामध्ये मुंबई मलनि:सारण प्रकल्प स्टेज-1, मध्य वैतरणा पाणीपुरवठा प्रकल्प, मुंबई मलनि:सारण योजना स्टेज-2, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि मिठी नदी विकास प्राधिकरण असे हे प्रकल्प पाठविण्यात आले आहेत आणि त्याबाबत अद्याप कुठलेही उत्तर केंद्राकडून आलेले नाही. हे प्रकल्प साधारणपणे 11 हजार कोटींचे असून खाजगी गुंतवणूकदारांच्या दृष्टीने तसेच बी.ओ.टी. तत्वावर जे प्रकल्प आहेत तेवढेच फक्त होणार आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, केंद्रशासनाचा यामध्ये अर्थसहाय्यासाठी सहभाग राहणार आहे काय, या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिलेले आहे. तो सहभाग या योजनेमध्ये किती राहणार आहे ? आणि त्यासंदर्भात केंद्रशासनाकडून आतापर्यंत किती निधी प्राप्त झालेला आहे ? हा निधी कुठल्या प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे ? आणि यापुढे किती निधी प्राप्त होणार आहे ?

श्री. राजेश टोपे : महोदय, जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निमाण अभियानाच्या माध्यमातून जे स्ट्रक्चर आहे त्यामध्ये 35 टक्के निधी केंद्रशासनाकडून मिळणार, 15 टक्के राज्यशासनाकडून आणि उर्वरित 50 टक्के निधी महापालिका आणि बी.ओ.टी. तत्वावर उभा करावा लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निमाण अभियानाच्या हद्दीपर्यंत अद्याप आपल्याला पैसे मिळालेले नाहीत परंतु एमयुटीपी चे 4500 कोटी रुपयांचे प्रकल्प जे आहेत त्यापैकी 1100 कोटी रुपये आतापर्यंत खर्च झालेले असून त्यात 50:50 अक्के अशा पध्दती केंद्रशासन आणि राज्यशासनाच्या माध्यमातून हा निधी मिळत आहे. जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निमाण अभियान योजनेसाठी अद्याप आपल्याला निधी मिळालेला नाही.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) B1

BGO/ KGS/ MHM/ खर्चे.. 11:05

ता.प्र.क्र.13299...

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियानाखाली सुमारे रुपये 11 हजार कोटीचे 7 प्रकल्प केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. ते केव्हा पूर्ण होतील व त्याचा पाठपुरावा केव्हा होईल ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत निधी मिळण्यासाठी सेक्रेटरी (स्पेशल प्रोजेक्ट) म्हणून नेमलेले आहेत. त्याच बरोबर पंतप्रधान कार्यालयाचे मंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे माननीय पंतप्रधानांच्यावतीने या प्रकल्पासाठी समन्वयक म्हणून काम पहात आहेत. या प्रकल्पामध्ये माननीय पंतप्रधानांनी स्वत: जातीने लक्ष घातलेले आहे. त्यामुळे लवकरात लवकर प्रकल्पांना मान्यता मिळण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करण्यात येत आहेत.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी राज्याच्या रोजगार हमी योजनेच्या धर्तीवर मुंबई विकास निधी स्थापनेबाबतची कार्यवाही सुरू आहे. याद्वारे राज्याला किती निधी उपलब्ध होणार आहे ? आज मुंबईतील वरळी व हाजी अली येथील समुद्र किनाऱ्याची धूप होऊन फार मोठया प्रमाणावर समुद्र किनाऱ्याची हानी झालेली आहे. या कामांचा समावेश या पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मुंबई विकास निधी अंतर्गत अंदाजे 40 हजार कोटी रुपये 10 वर्षात जमवून पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करावयाचा आहे. यासाठी विधी व न्याय विभागा, वित्त व नियोजन विभाग यांची परवानगी घेण्यात आली आहे. लवकरात लवकर हा विषय मंत्रिमंडळासमोर नेऊन यासंबंधीचा अधिनियम किंवा अध्यादेश काढण्यात येईल. राज्याच्या हिश्श्यातून सदर प्रकल्प पूर्ण करता येणे शक्य आहे. मुंबई विकास निधीतून पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई शहरातील प्रॉपर्टीच्या किंमतीमध्ये वाढ होणार आहे. म्हणूनच इम्पॅक्ट फीच्या माध्यमातून निधी मिळविण्याची तरतूद करण्यात येणार आहे. स्टॅम्प डयुटीच्या माध्यमातून आपल्याला निधी मिळणार आहे. रोजगार हमी योजनेसाठी प्रोफेशनल टॅक्सच्या माध्यमातून निधी जमविला जातो. त्यामुळे एनॅब्लिंग क्लॉज टाकून स्टॅम्प फीच्या ..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

माध्यमातून, लीज होल्ड टू फ्री होल्डच्या माध्यमातून प्रीमियम गोळा करून निधी जमाविण्यात येईल. तसेच अन्य वेगवेगळया प्रकारे निधी गोळा करण्यासाठी नोटिफिकेशन काढून निधी गोळा करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे मुंबई विकास निधी गोळा करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, जवाहन नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत केंद्र शासन राज्य शासनाला अर्थसहाय्य करणार आहे ते अनुदानाच्या स्वरूपात आहे की कर्जाच्या स्वरूपात ? या प्रकल्पासाठी राज्य शासन आपला वाटा देणार आहे तो अनुदानाच्या स्वरूपात देणार आहे की कर्जाच्या स्वरूपात देणार आहे ? माझ्या माहितीप्रमाणे राज्य शासन आपला वाटा हा कर्जाच्या स्वरूपात देणार आहे हे खरे आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अनुदानाच्या माध्यमातून निधी देण्यात येणार आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांचे या प्रकल्पाकडे लक्ष आहे, ही अभिनंदनाची गोष्ट आहे. सुमारे रुपये 11 हजार कोटीचे 7 प्रकल्प केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी साधनसामुगी उभी करावी लागणार आहे. या प्रकल्पासाठी मुंबईमधील रस्त्याच्या रुंदीकरणाची कामे व अन्य पायाभूत सुविधा याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. तसेच जे काही भूखंड उपलब्ध होतील त्याची देखील शासनाला काळजी घ्यावी लागेल. तशी काळजी शासन घेणार आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13299....

श्री.मधुकर चव्हाण....

परंतु विकासासाठी जे भूखंड लागणार आहेत ते तर अगोदरच झोपडपट्टयांनी व्यापलेले आहेत. ुढील 25 वर्षांमध्ये मुंबई कशी असणार हे नजरेसमोर ठेऊन जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियान तयार करण्यात आले आहे. परंतु त्यामध्ये पुढील 25 वर्षानंतर मुंबईतील लोकसंख्या किती असेल हे गृहीत धरले आहे काय ? तसेच मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी डेव्हलपमेंटच्या दृष्टीकोनातून सिटी प्लॅन माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केला आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "जरी कितीही इच्छाशक्ती असली तरी जमीन जोपर्यंत उपलब्ध होत नाही, तोपर्यंत हाऊसिंग स्कीम आम्ही अंमलात आणू शकणार नाही." त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या योजना यशस्वी झाल्यानंतर नागरिकांना सुखसोयी मिळण्याच्या दृष्टीकोनातून मुंबईमध्ये जे लोंढे येत आहेत ते रोखण्यासाठी शासनाने काही नियोजन केले आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, वास्तविक पाहता लोकसंख्या वाढ लक्षात घेऊनच प्लॅन तयार केले जातात. आज मुंबईमध्ये 10-20 टक्के लोकसंख्या वाढीचा दर आहे. त्यामुळे ही वाढ गृहीत धरुनच हे अभियान तयार करण्यात आले आहे. या अभियानाच्या प्रकल्पातून ज्या ज्या ठिकाणी बाधित गाळे किंवा इतर काही गोष्टी आहेत त्यांना पर्यायी जागा किंवा त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाकडून नियोजन करण्यात आलेले आहे. मुंबईच्या बाहेर जमिनी घेऊन, प्लॉटस्च्या माध्यमातून पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करीत आहोत. तसेच मुंबईमध्ये जे लोंढे येत आहेत ते थांबविण्यासाठी निश्चितप्रकारे शासन जागृत आहे.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 11:10

**ठाणे जिल्ह्यातील मच्छिमारांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत**

**(२) * १५२४९ श्री. अनंत तरे , श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विकास पॅकेज कार्यक्रमांतर्गत मुंबई व ठाणे जिल्ह्यातील मच्छिमारांना सानुग्रह अनुदान देण्याची योजना राबविण्यासाठी अतिरिक्त नियतव्यय व निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ**, **श्री.अनिस अहमद यांच्याकरिता** : (१) होय.

(२) व (३) सदर बाब अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, कोकणाला 720 कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला आहे. या किनारपट्टीवर ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग असे पाच सागरी जिल्हे येतात. परंतु काही ठिकाणच्या मच्छिमारांना सबसिडी मिळत नाही. जी मिळते ती देखील सहा-सहा महिन्यांनी मिळते. या पाचही जिल्हयांमध्ये मच्छीचा दुष्काळ असताना शासनाने अन्यायकारक असा निर्णय घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीनच जिल्हयांतील मच्छिमारांना सानुग्रह अनुदान देण्याचे मान्य केले. हा प्रश्न गेल्या वेळी विधानसभेत उपस्थित केला गेला होता. त्या ठिकाणी जशी उत्तरे देण्यात आली होती, तशीच उत्तरे याही ठिकाणी देण्यात आली आहेत. वास्तविक पाहता एखाद्या भागात दुष्काळ पडला की, सर्वांनाच मदत करण्याची भूमिका शासनाकडून स्वीकारली जाते. त्यामुळे माझा नेमका प्रश्न असा आहे की, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयांतील मच्छिमारांना जसे सानुग्रह अनुदान दिले गेले तसेच ठाणे आणि मुंबईतील मच्छिमारांना का दिले गेले नाही ? उत्तरामध्ये शासनाने असे म्हटले आहे की, "सदर बाब अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे" त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात शासनाचा विचार झाला आहे काय ? तसेच माझा तिसरा प्रश्न असा आहे की, रायगड, रत्नागिरी आाि सिंधुदुर्ग या जिल्हयांना जिल्हानिहाय किती सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15249....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबई आणि ठाणे या जिल्हयांसाठी 6 कोटी 3 लाख रुपये मंत्रिमंडळाने "विशेष पॅकेज" म्हणून मंजूर केले आहेत. नियोजन आणि वित्त विभागाकडून लवकरात लवकर तरतूद करुन हे अनुदान वितरित करणार आहोत. तसेच रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयांमध्ये 10 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. 44287 मच्छिमार लाभार्थ्यांना हे अनुदान वितरित करण्यात आले आहे. एक-दोन सिलेंडर नौका, तीन-सहा सिलेंडर नौकांना हे अनुदान वितरित करण्यात आले आहे. तसेच एक हजार रुपये लाभार्थ्यांना दिले आहेत. जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून हे वाटप करण्यात आले आहे. सहाय्यक संचालक कृती समितीतील मच्छिमार प्रतिनिधीं आणि त्यांच्या कमिटीने हे लाभार्थी निवडले होते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.15249 ....**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्राला 720 कि.मी. चा समुद्रकिनारा लाभला असताना देखील मच्छीचा खूप दुष्काळ पडलेला आहे आणि या गोष्टीला रासायनिक कारखाने हे प्रमुख कारण आहे. या रासायनिक कारखान्यांमुळे जवळ असलेली मच्छी फार दूर होत चालली आहे. त्यामुळे छोटे मच्छीमार अडचणीत आले आहेत. तरी, माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, मच्छीमारी स्वयंपूर्ण होण्यासाठी तसेच मत्स्य उत्पादन जास्त होण्याच्या दृष्टीने या रासायनिक कारखान्यांवर शासन काही कारवाई करणार आहे का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, पूर्वी मिळत असलेली मच्छी आज मिळत नाही आणि याचे प्रमुख कारण म्हणजे रासायनिक कारखाने वेस्ट वॉटर समुद्राच्या पाण्यात सोडतात. त्यामुळे मासे दूर निघून जातात. तरी, माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, या संदर्भात मत्स्यालयाकडून काही अभ्यास केला जाणार आहे का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा सानुग्रहासंबंधीचा प्रश्न आहे.

**सभापती** : हा प्रश्न जरी सानुग्रहासंबंधीचा असला तरी मच्छीमारांच्या दृष्टीने संभाव्य परिस्थितीसंबंधीचा हा प्रश्न आहे. तरी, यासंबंधी विभागाने अभ्यास करावा. समुद्रात सोडलेल्या दुषित पाण्यामुळे किंवा अन्य गोष्टींमुळे माशांवर परिणाम होणार नाही हे पहावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंबंधी अभ्यास करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांच्या प्रश्नाला उत्तर देत असताना, माननीय मंत्री महोदयांनी या पॅकेजअंतर्गत किती रुपयांचे वाटप केले ? किती जिल्ह्यांना केले ? याबाबत सांगितले. सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सुधारणा करणे आवश्यक होती. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, " पॅकेज जाहीर करुन पैसे देण्यात येणार आहेत " आणि प्रश्न क्रमांक 2 व 3 च्या लेखी उत्तरामध्ये असे सांगण्यात आले आहे की, " सदर बाब अद्यापही शासनाच्या विचाराधीन आहे. " सभापती महोदय, या ठिकाणी तर अंमलबजावणी झाली असल्याचे उत्तर मिळत आहे. माझा यासंबंधी आक्षेप आहे. मला माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, कोकणामध्ये मुंबई व ठाणे हे जिल्हे आहेत की नाहीत ? आणि त्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

..2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.15249 ....**

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी दोन्ही प्रश्नांना यापूर्वीच उत्तरे दिलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी विचारले की, मुंबई व ठाणे जिल्ह्यांसाठी किती विशेष निधी दिला जाणार आहे ? त्या प्रश्नाला मी असे उत्तर दिले आहे की, " अद्यापपर्यंत पैसे दिलेले नाहीत. 6 कोटी 3 लाख रुपये देण्याचे मंत्रिमंडळाने मंजूर केलेले आहे, त्यानुसार तरतूद करुन निधी उपलब्ध करुन दिला जाईल. " सभापती महोदय, रायगड व रत्नागिरी या जिल्ह्यांत या संदर्भात कशारितीने पैशांचे वाटप केले आहे, यासंबंधीही मी उत्तर दिले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या पॅकेजअंतर्गत पैसे वाटप झाले असल्याचे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबई व ठाणे या जिल्ह्यांसाठी 6 कोटी 3 लाख रुपये मंजूर केलेले आहेत, परंतु अजुन ते पैसे दिलेले नाहीत. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना पैसे दिलेले आहेत.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितले की, किनारपट्टीवर मच्छींच्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. आपणही या संदर्भात निर्देश दिले आहेत. सभापती महोदय, त्या ठिकाणी पारंपारिक पध्दतीने मच्छीमारी करणारे अनेक मच्छिमार आहेत. सभापती महोदय, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या ठिकाणच्या पाचशे गावांमध्ये मच्छिमारी करणे हा पारंपारिक व्यवसाय होता. आज तेथे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. पर्सनेटधारक जाळी टाकतात व जे जीव जीवंत आहेत ते देखील खरवडून काढले जातात, अशाप्रकारे तेथे काम सुरु आहे. सभापती महोदय, मत्स्य बीज नष्ट करण्याचेच ते काम करत आहेत. तरी, याची देखील आपण माहिती घ्यावी. माझा माननीय मंत्री महोदयांना यासंबंधी असा प्रश्न आहे की, यासंबंधी आपण तपासणी करणार आहात का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या संदर्भात केंद्र सरकारने निर्णय घेतलेला आहे की, बोटीने टाकण्यात येणारे पर्सनेट रोखले जावे. त्याप्रमाणे गुजरात व गोवा या राज्यांमध्ये ते रोखत आहेत. सभापती महोदय, बोटींप्रमाणे माणसांचीही संख्या आज वाढत आहे परंतु समुद्राचा किनारा आहे तेवढाच आहे.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**घोडबंदर (जि.ठाणे) येथे बिबट्याच्या हल्ल्यात मुलीचा झालेला मृत्यु**

**(३) * १३५१७ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाकर गणगणे :**
सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) येथे दिनांक १९ डिसेंबर, २००५ रोजी वा त्यादरम्यान एका मजुराच्या चार वर्षे वयाच्या मुलीला बिबट्याने ठार मारल्याची घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या मुलीच्या कुंटूंबाला कोणती आर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच आर्थिक मदत देण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) होय.

(२) होय.

(३) वन विभागाने केलेल्या चौकशीमध्ये सदरची मुलगी कुमारी पुजा भिमा पवार बिबट्या वाघाने केलेल्या हल्ल्यात वनहद्दीबाहेर मृत पावली त्यामुळे तीच्या वडिलांना रु. २,००,०००/- आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, बिबटया वाघाने केलेल्या हल्ल्यामध्ये कुमारी पुजा भिमा पवार ही मुलगी मृत पावलेली आहे, सदर मुलीला आर्थिक मदत दिलेली आहे, हा निर्णय शासनाने चांगला घेतलेला आहे. मृत मुलीच्या वडिलांना सदर मदत कोणत्या तारखेला दिलेली आहे ? तसेच वनहद्दीबाहेर अशा घटना पुढे घडू नयेत यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सदर मुलगी रुग्णालयामध्ये असतांना वनविभागामार्फत तिची चौकशी करण्यात आलेली आहे, त्यानंतर लगेच मृत मुलीच्या वडिलांना मदत देण्यात आलेली आहे. ही चौकशी करतांना श्वान दंशामुळे तिचा मृत्यू झालेला आहे काय याबाबत सुध्दा चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी झाल्यानंतर लगेच त्याबाबत मदतीचा धनादेश देण्यात आलेला आहे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मुंबई आणि मुंबई परिसरामध्ये व राज्यामध्ये सातत्याने हिंस्त्र जनावरांनी हल्ले केल्याच्या घटना घडत आहेत, म्हणून यावर कायमस्वरुपी उपाययोजना वन खात्याकडून करण्यात येणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, याबाबत वन विभागाने उपाययोजना करण्याचे काम सुरु केलेले आहे, ती सर्व जबाबदारी वन विभागाची आहे. वनांतील हिंस्त्र पशू बाहेर जाऊ नयेत म्हणून वनांमध्येच त्यांना खाद्य मिळावे अशी व्यवस्था वन विभागामार्फत करण्यात आलेली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते...

आहे. विशेषत: संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे लोकांनी जाऊ नये, तेथे अतिक्रमण होऊ नये म्हणून तेथे भिंत बांधण्याचे काम पूर्ण करण्यात येत आहे, अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येत आहे.

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, वनांमधील व जंगलातील जनावरे बाहेर येऊन मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, नुकतीच 4 वर्षाच्या मुलीची वनांच्या हद्दीबाहेर मृत्यू झालेला आहे. त्याचप्रमाणे रोही व डुक्करे ही जनावरे वनांच्या बाहेर येऊन मोठया प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान करीत आहेत. ही जंगलाच्या बाहेर येऊ नयेत म्हणून जंगलाच्या जवळ जेथे मनुष्यवस्ती आहे त्या ठिकाणी खंदक खोदून किंवा उंचवटे तयार करुन त्यांना आळा घालण्यात येईल अशा प्रकारचा निर्णय झालेला होता. परंतु अजूनही अशा प्रकारची व्यवस्था कोठेही केल्याचे दिसून येत नाही. म्हणून ज्या ठिकाणी मनुष्यवस्ती आहे त्या ठिकाणी वरीलप्रमाणे उपाययोजना शासनाकडून लवकरात लवकर करण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, रोही व डुक्करे या जनावरांच्या संदर्भात वन विभागाने त्यांची शिकार करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर प्राण्यांची शिकार झाल्यानंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना कळवावे. ही जनावरे जंगलाच्या बाहेर येऊ नयेत म्हणून वन विभागाने उपाययोजना केलेल्या आहेत, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे खंदक खोदणे ब-याच ठिकाणी अडचणीचे आहे, याबाबत दुसऱ्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, प्रत्येक वर्षी हया घटना घडत आहेत यासाठी यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी वन विभागातर्फे तातडीने कार्यवाही करण्यात येणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, प्राणी व मनुष्य हे दोघेही जगणे आवश्यक आहे, त्यासाठी माणसांनी जंगलावर अतिक्रमण करु नये, माणसांनी जंगलामध्ये अतिक्रमण केल्यामुळे अशा प्रकारच्या घटना जास्त प्रमाणात घडत आहेत. माणसांनी अतिक्रमण केले नाही तर हया घटना बऱ्याच प्रमाणात कमी होतील. तरी याबाबत वन विभागाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.

यानंतर श्री. सुंबरे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13527 ...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, येऊरच्या परिसरामध्ये ही घटना घडलेली आहे. आम्ही एक प्रस्ताव दिलेला आहे की, येउरच्या परिसरामध्ये वनसौंदर्य मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा लाभ घेऊन मुंबई जवळच ते एक पर्यटन स्थळ केले जावे आणि इको-टूरिझमची योजना तेथे घेण्यात यावी. तर त्याबाबतीत काही अंतिम निर्णय आपण घेणार आहात काय ? म्हणजे तेथील या सगळ्या प्रकारांना देखील पायबंद बसून जनता आणि वनातील प्राणी या सगळ्यांचाच फायदा होऊ शकेल.

श्री. बबनराव पाचपुते : सजेशन फार ॲक्शन.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या ठिकाणी ठाणे जिल्ह्यात अशा बऱ्याच घटना घडलेल्या आहेत. तेव्हा ठाणे जिल्ह्यात वर्षभरामध्ये अशा किती घटना घडल्या आहेत आणि त्या सर्व प्रकरणात अशाच प्रकारे मदत आपण केलेली आहे काय ? दुसरे म्हणजे हा बिबट्या जंगलाच्या बाहेर येण्याचे मुख्य कारण म्हणजे त्या जंगलामध्ये तलावाची म्हणजेच पर्यायाने पाण्याची सोय नाही त्यामुळे त्या जंगल परिसरामध्ये अशा प्रकारे तलाव आपण खणणार आहात की नाही ? जेणे करून हे वन्य प्राणी पाण्याच्या शोधात जंगलाबाहेर येणार नाहीत.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, अशा प्रकारच्या 92 घटना घडलेल्या आहेत आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ असल्याने त्या परिसरात पाण्याचे तलाव असल्याने आणखी तलावांची गरज नाही तरीदेखील एकूणच महाराष्ट्रासाठी आपण निर्णय घेतला आहे की, अशा वनांच्या परिसरामध्ये वनतळी केली जावीत. आणि म्हणून मोठ्या प्रमाणत वनतळी, पाझर तलाव इ. सर्व वनामध्ये घेण्याच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारने मान्यता दिलेली आहे आणि त्या दृष्टीने आपण काम सुरू केले आहे. गेल्या वर्षी सव्वाशे कोटीची कामे आपण घेतली आहेत आणि या वर्षी ही कामे करण्याचा आमचा मानस आहे.

****

.... एफ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खराब खाद्य पदार्थांचा 1 कोटी 75 लाख रुपयांचा साठा जप्त केल्याबाबत**

**(4) * 14985 श्री. जयंत पाटील, प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 9617 ला दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न व औषधी द्रव्ये प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे कार्यालयाने दिनांक 1 ऑक्टोंबर, 2005 रोजी केलेल्या कारवाईत सुमारे 1 कोटी 75 लाख रुपये किंमतीचा साठा भेसळीच्या संशयावरुन जप्त केला असून 8 नमुन्यांचा अहवाल अप्रमाणित आला आहे हा माल नष्ट करण्यासाठी न्यायालयाकडे करण्यात आलेल्या अर्जावर कोणता हुकूम झालेला आहे,
(2) सदर प्रकरणी चालू असलेला तपास पूर्ण झाला आहे काय,
(3) असल्यास, तपासात काय आढळून आले, ह्या प्रकरणाचा तपास कोणत्या विभागामार्फत चालू आहे,
(4) या प्रकरणी ज्या व्यक्तिकडे हा अप्रमाणित साठा आढळून आला त्या संबंधित व्यक्तिवर कोणती कारवाई करण्यात आली ?

**श्री. बाबा सिद्दीकी, श्री. मनोहर नाईक यांच्याकरिता** : (1) सदर प्रकरणी न्यायालयात एकूण 5 किरकोळ अर्ज दाखल करण्यात आले होते. त्यापैकी 2 अर्जावर अन्न पदार्थांचा साठा प्रत्यक्ष खाण्याकरीता विकला जाणार नाही या हमीपत्रावर तसेच एका प्रकरणात अन्न पदार्थ प्रक्रिया करुन विकण्याच्या हमीपत्रावर सदर साठा संबंधितांना परत करण्याचे आदेश दिले असून 2 प्रकरणे प्रलंबित आहेत.
(2) होय.
(3) विनापरवाना भेसळयुक्त अन्न पदार्थांची विक्रीसाठी साठवणूक करुन त्याची विक्री करण्यात येत असल्याचे तपासात आढळून आले आहे. सदर प्रकरणाचा तपास अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे येथील कार्यालयामार्फत चालू आहे.
(4) संबंधित व्यक्तीविरुध्द अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा 1954 व त्याखालील नियमांतर्गत न्यायालयात 9 खटले दाखल करण्यात आले आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या प्रकरणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कारवाई झालेली आहे काय ? तसेच यामध्ये ज्या 9 व्यक्तींवर खटले दाखल केलेले आहेत त्या व्यक्ती कोण आहेत ? त्या खटल्यांचे स्वरूप काय आहे ?

श्री. बाबा सिद्दिकी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगू इच्छितो की, त्याप्रमाणे कारवाई झालेली आहे. तसेच यामध्ये 'पारस वनस्पती' बाबतीत सेक्शन 2(ia)(a)(m) 7(iii) r/w rule 50 of PFA rules 1955 खाली खटला दाखल

..... एफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिद्दिकी (पुढे चालू...) ता.प्र.क्र.14985 ...

केला असून त्यामध्ये 1) श्री.शिवाजी तानाजी देसाई, 2) श्री. पिंटू बलराम घोष, 3) श्री.व्ही.के.गुप्ता, 4) श्री. मनिष अग्निहोत्री, 5) मे.तीज इम्पॅक्स प्रा.लि., यांच्यावर दावा टाकण्यात आला असून 'जीरा' प्रकरणी 1) श्री.गोपी व्यंकटेश घाटगे, 2) श्रीमती विमल थापा, 3) श्री.अनुज थापा, 4) मे.ग्लोबल एक्पोर्टर्स. यांच्यावर दावा दाखल केलेला आहे. ..

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, साबणासाठी वापरावयाचे तेल खाण्यासाठी वापरात आणण्याचा हा प्रकार चालू होता हे यातून दिसते आहे. याची गंभीरता लक्षात घेऊन हे आयातीत तेल होते काय ? तसेच ते कोठून आले होते ? आणि हा एवढा मोठा साठा असल्याने विक्री कर खात्याने याबाबत काही कारवाई केलेली आहे काय ? तसेच त्याचा सोर्स काय होता ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, जैसा कि सम्माननीय सदस्य ने पूछा है, उस बारे में मैं बताना चाहता हूं कि कोर्ट के आदेशानुसार तेल कंपनी को यह दिया गया है.

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी हे लक्षात घ्यावे की, सन्माननीय सदस्यांनी आपल्याला असे विचारले आहे की, हे आयातीत तेल होते काय ? असल्यास, ते कोठून आले होते ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, यह जो एक्सपोर्ट के लिए मंगाया जाता है, इसका जो प्रोसेस होता है, उसकी डिग्री कम होती है. कोर्ट के आदेश के अनुसार तेल कंपनी को यह दिया गया है.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हा माल इम्पोर्टचा आहे, एक्पोर्टचा नाही. भारत सरकारने सार्क देशांशी करार केला त्यामुळे नेपाळ आणि श्रीलंका येथून हा डालडा आपल्याकडे स्वस्त दरामध्ये येतो. भारतातील डालडा हा महाग आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात त्याचे इम्पोर्ट सुरू आहे. त्यामुळे भारतातील हा उद्योग आता संपला आहे. हा सगळा माल कमी प्रतीचा आहे. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) G 1

DGS/ MHM/ KGS/ 11:30

ता.प्र.क्र. 14985...

श्री. नितीन गडकरी...

माझा प्रश्न असा आहे की, हा माल मोठया प्रमाणामध्ये नेपाळमधून येत असला पाहिजे. आणि जर येत असेल तर महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणामध्ये हा माल येत असल्यामुळे आपल्या फूड अँड ड्रग्ज डिपार्टमेंटकडून त्यासाठी लायसन्स घ्यावे लागते काय? त्याचे काही नियम आहेत काय? फूड अँड ड्रग्ज डिपार्टमेंटने त्या वनस्पती तूपाचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत काय? आयात होणाऱ्या मालावर विक्रीकर लागत नाही, त्यामध्ये त्यांना माफी दिली जाते. याबाबत वस्तुस्थिती काय आहे? आयात होणाऱ्या मालाच्या बाबतीत टॅक्सेशनचा फॉर्म्युला काय आहे?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री.गडकरी जी ने जो बताया है वह सही है. जो इम्पोर्ट होता है उसमें कम टॅक्सेशन होता है. इस बारे में संबंधित विभाग से जानकारी लेकर पटल पर रखेंगे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये फार मोठे रॅकेट गुंतले आहे. सार्क देशांबरोबर भारत सरकारच्या विदेशी मंत्रालयाने नेपाळ, भूतान या देशांबरोबर केलेला हा करार चांगल्या भावनेने केला आहे याबाबत आमची शंका नाही. परंतु त्याचा फायदा मोठया प्रमाणात सार्क देशांना होत आहे, त्यांना करामध्ये सवलत दिली आहे. यामुळे या राज्यातील वनस्पती तूप निर्माण करणाऱ्या उद्योगांवर याचा परिणाम झाला आहे. आयात होणाऱ्या खराब मालाला सुध्दा कुणाच्या तरी दबावाखाली फूड अँड ड्रग्ज डिपार्टमेंटकडून लायसन्स दिले जात असेल तर त्याची माननीय मुख्यमंत्र्यांनी दखल घेणे आवश्यक आहे. कारण या मालाचे दर फार कमी असल्यामुळे त्यामध्ये भ्रष्टाचाराला वाव आहे. तेव्हा हा खराब माल परदेशामधून येऊ नये यासाठी आपल्या फूड अँड ड्रग्ज डिपार्टमेंटमार्फत त्या मालाची तपासणी करण्यासाठी कोणती उपाय योजना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे यामुळे आपल्या राज्यातील वनस्पती तूप निर्माण करणाऱ्या उद्योगावर परिणाम झ ाला आहे त्याबाबत आपण केंद्र सरकारला कळविणार काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, परदेशामधून आयात होणाऱ्या मालावर राज्य सरकारचे डायरेक्ट नियंत्रण नाही. हा माल केंद्र सरकारच्या माध्यमातून आयात केला जातो. परंतु आयात होणाऱ्या मालामुळे आपल्या स्थानिक उद्योगावर परिणाम होणार असेल तर या मालावर आयात कर वाढविण्याची व्यवस्था केंद्र सरकारकडे आहे. शेवटी माल आयात करीत असतांना त्यामध्ये आपल्या देशाचे हीत आपण बघितले पाहिजे. या आयात होणाऱ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 14985...

श्री. विलासराव देशमुख....

मालावर फूड अँड ड्रग्ज डिपार्टमेंटमार्फत काही नियंत्रण आणता येईल काय? असा माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. या सर्व प्रश्नांची व्याप्ती फार मोठी आहे. कारण सार्क देशांबरोबर करार झ ाालेला असल्यामुळे त्या देशामधील माल आपल्या देशामध्ये आल्यानंतर त्यावर कोणत्या प्रकारची बंधने घातली जाऊ शकतात ही बाब तपासून घेऊ. आणि हा निकृष्ट प्रतीचा, खाण्यास अयोग्य असलेला माल असेल तर त्याबाबत कारवाई करण्याचे अधिकार फूड अँड ड्रग्ज डिपार्टमेंटला आहे. परदेशामधून तो माल आयात करण्यासाठी जरी परवानगी असली तरी तो माल खराब असेल तर त्याचे नमुने तपासण्याचे काम फूड अँड ड्रग्ज डिपार्टमेंटमार्फत करता येण्यासारखे आहे. हे सरकार या प्रश्नाची निश्चितपणे नोंद घेईल आणि स्थानिक उद्योगावर याचा परिणाम होणार नाही यादृष्टीने त्यामध्ये लक्ष घालण्यात येईल एवढे आश्वासन देतो.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर "होय" असे देण्यात आले आहे. आणि तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "विनापरवाना भेसळयुक्त अन्न पदार्थांची विक्रीसाठी साठवणूक करुन त्याची विक्री करण्यात येत असल्याचे तपासात आढळून आले आहे. सदर प्रकरणाचा तपास अन्न व औषध प्रशासनाच्या ठाणे येथील कार्यालयामार्फत चालू आहे" असे म्हटले आहे. या दोन्ही उत्तरांमध्ये विसंगती दिसून येते. प्रश्न असा आहे की, सदर प्रकरणाचा तपास करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, 12 सॅम्पल्स फूड अँड ड्रग्स विभाग ने अपने हाथ में लिए थे. उसमें से 8 सॅम्पल्स सब स्टँडर्ड के निकले और 4 सॅम्पल्स स्टँडर्ड क्वॉलिटी के निकले. (व्यवधान)

सभापती महोदय, पारस वनस्पती, मेसर्स केदारनाथ वेअरहाऊस या कंपनीचे मालक श्री.शिवाजी तानाजी देसाई, श्री. पिंटू बाळाराम घोष, डायरेक्टर, श्री. व्ही. के. गुप्ता, डायरेक्टर, श्री. मनिष अग्निहोत्री, डायरेक्टर. दुसरे खुशबू वनस्पती, मेसर्स एव्हरेस्ट एक्झिम एंटरप्राईझेस या कंपनीचे मालक श्री. सुशील प्रभाकर बोरकर....

**सभापती** : माननीय राज्यमंत्र्यांनी ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 11:35

ता.प्र.क्र.14985 (पुढे सुरु...

**सभापती** : मंत्री महोदय, आपण ही माहिती पटलावर ठेवावी. 12 नमुने घेतलेले आहेत त्यापैकी 8 नमुने सब स्टॅन्डर्ड होते आणि चार नमुने स्टॅन्डर्ड होते, असे आपण सांगितले. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, एकाच मालाचे नमुने घेतलेले होते, की वेगवेगळ्या मालांचे नमुने घेतलेले होते ?

श्री.बाबा सिध्दीकी : वेगवेगळ्या मालाचे नमुने घेतलेले होते.

---

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

**शिर्डी येथील साईबाबा संस्थान परिसरातील प्रस्तावित कामांबाबत**

**(5) * 13961 श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. राजेंद्र जैन, श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण , डॉ. वसंत पवार : तारांकित प्रश्न क्रमांक 11770 ला दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिर्डी येथील साईबाबांच्या दर्शनासाठी संस्थान परिसरामध्ये दिवसेंदिवस भक्तांच्या वाढत असलेला गर्दीचा विचार करता नगरपंचायत हद्दीतील कोणती महत्वाची कामे चालू आहेत व इतर कोणती प्रस्तावित कामे शासन मान्यतेसाठी विचाराधीन आहेत व त्यावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(2) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण व्हावी यासाठी कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ श्री. विलासराव देशमुख यांच्या करिता** : (1) **1) शिर्डी नगरपंचायत हद्दीत संस्थानतर्फे चालू असलेली कामे** :-

अ) नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे.

ब) शिर्डी-नांदुर्खी रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे.

क) रथ-पालखी रस्ता रुंदीकरण व काँक्रीटीकरण करणे.

ड) जि.प. प्राथमिक शाळा बांधकाम करणे.

**2) शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विचाराधीन असलेली प्रस्तावित कामे** :-

i) नगर-मनमाड रस्ता व जुना पिंपळवाडी रस्ता रेलींगसह सुशोभिकरण करणे.

ii) नगरपंचायतीसमोर नगर-मनमाड रस्त्यालगत सुशोभित कारंजा तयार करणे.

iii) शिर्डी रुई रस्ता काँक्रीट करणे (पिंपळवाडी ते निमगांव शिव रस्ता)

iv) शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विविध रस्ते विकसित करणे.

v) शेती महामंडळाकडून घेतलेल्या जमीनीसाठी रस्ते विकसित करणे.

vi) शिर्डी -कनकुरी-डोऱ्हाळे रस्ता विकसित करणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13961 (पुढे सुरु....

vii) शिर्डी -शनीशिंगणापूर रस्ता विकसित करण्याकरिता आर्थिक सहाय्य करणे.

viii) शिर्डी ते साकुरी रस्त्याचे डांबरीकरण करणे.

ix) कोपरगाव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे खडीकरण व डांबरीकरण करणे.

x) शिर्डी येथे पोलिस विश्रामगृहाची दुरुस्ती व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नव्याने कक्ष/हॉल बांधणे.

xi) शिर्डी परिसरातील पिंपळवाडी व कोहकी येथील साठवण बंधारे बांधणेसाठी आर्थिक सहाय्य करणे.

(2) व (3) प्राप्त प्रस्तावांची छाननी / कार्यवाही चालू आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, तिरुपती येथील श्रीमंत देवस्थानानंतर श्रीमंत देवस्थान शिर्डी येथील साईबाबा देवस्थान आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, जी काही प्रस्तावित केलेली कामे आहेत, त्यामधील महत्वाचे काम म्हणजे मुंबई किंवा देशातून अन्य ठिकाणावरुन साईभक्त त्या ठिकाणी जात-येत असतात. दर्शनासाठी जात असतांना रस्त्यावरील अपघातामुळे अनेक साईभक्तांचे निधन होते. सिन्नर ते शिर्डीला जाणारा अरुंद रस्ता आहे, त्यामुळे मोठयाप्रमाणात त्या ठिकाणी अपघात होऊन साईभक्त मृत्युमुखी पडतात. माझी अशी माहिती आहे की, शिर्डी देवस्थान ट्रस्ट आणि शासन यांच्यामध्ये एक बैठक झालेली आहे. मुंबई ते शिर्डी हायवे जॉईन्ट करावयाचा आहे, या रस्त्याला "साई वे" असे नाव देण्याचा विचार केलेला आहे. शिर्डी संस्थानमध्ये येणारे पैसे रस्त्यांच्या कामासाठी घेण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, प्रश्न हा शिर्डी नगरपंचायत हद्दीमध्ये संस्थानतर्फे कामे चालू आहेत, काही प्रस्तावित कामे आहेत, त्याबाबत विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य नाशिक शिर्डी, मुंबई रस्त्याच्या संबंधात विचारत आहेत. त्याचा या प्रश्नाशी काही संबंध नाही. त्यांनी तसा वेगळा प्रश्न विचारला तर त्याबाबत निश्चित माहिती देण्यात येईल.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, शिर्डी येथील साईबाबा संस्थानमध्ये देशभरातील भाविक दर्शनासाठी जात असतात. परंतु या शिर्डी शहरामध्ये रस्ते आणि स्वच्छतेच्याबाबतीत पाहिजे तेवढे लक्ष दिले गेलेले नाही. मी बऱ्याचवेळा त्या ठिकाणी जाऊन आलेलो आहे या कामासाठी शिर्डी येथे वेगळी यंत्रणा निर्माण करुन त्या भागाचा मास्टर प्लॅन



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

श्री.कन्हैयालाल गिडवाणी (पुढे सुरु...

तयार करण्याचा शासनाचा विचार आहे काय ? आज शिर्डी संस्थानकडे मागच्या वर्षाचा किती निधी उपलब्ध आहे ? त्या निधीमधून मास्टर प्लॅन करुन त्या ठिकाणची कामे करण्यात येणार आहेत काय ?

श्री.हसन मुश्रीफ : तिरुपती नंतर साईबाबा संस्थान हे श्रीमंत आहे, ही वस्तुस्थिती आहे. शिर्डी हे ठिकाण चकाचक करण्याचे शासनाचे धोरण आहे. तसा मास्टर प्लॅन तयार केलेला आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आताच सन्माननीय मंत्री महोदयांनी शिर्डी चकाचक करण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगितले. शिर्डी चकाचक करण्याबरोबरच त्या ठिकाणी भक्तगण येतात, त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी जो प्रश्न उपस्थित केला, त्याप्रमाणे त्या भागात जाणाऱ्या रस्त्यांची सुधारणा करणे आवश्यक आहे. हा प्रश्न नगरपंचायत, शिर्डीपुरता मर्यादित असला तरी या संदर्भात खास करुन सर्वात जास्त अवघड नासिक-शिर्डी विस्तारित फाटयावर गाड्यांचे अपघात होतात. आपण मुंबई ते शिर्डी हा इगतपुरी येथील घोटीवरुन जाणारा रस्ता लवकर होण्याच्या दृष्टीने काय करणार आहात ? नगरपंचायतीच्या बाहेर जाऊन साई भक्तांचा हा प्रश्न तातडीने सोडविणार आहात काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, शिर्डी संस्थानमध्ये मोठया संख्येने भाविक येत असतात. त्या संदर्भात एरिया डेव्हलपमेंट करण्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम प्लॅन स्थानिक समितीच्यावतीने तयार करण्यात आलेला आहे. त्या प्लॅनप्रमाणे अंमलबजावणी सुरु झालेली आहे. मधल्या काळामध्ये नवीन कायदा केला.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13961 .... श्री. विलासराव देशमुख ....

मधल्या काळात आपण नवीन कायदा केला. मधल्या काळात खूप चर्चा झाली. काही प्रकरणे कोर्टात गेली. कोणती कामे घ्यावयाची, कोणती कामे घ्यावयाची नाहीत यासंदर्भात खूप चर्चा झाली. कोर्टाने सुध्दा यासंदर्भात काही डायरेक्शन्स दिलेल्या आहेत. त्या डायरेक्शन्सच्या आधारावर आता आपण नवीन कायदा केलेला आहे. त्या कायद्याप्रमाणे ही समिती नियुक्त केलेली आहे. पहिल्यांदा फक्त पंचायतीच्या अंतर्गत असलेली कामे घ्यावयाची आहेत. सुशोभिकरण करणे वगैरे कामे त्यात आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गिडवाणी यांनी सांगितले की, ते ठिकाण सुंदर दिसले पाहिजे, भाविक आकर्षित होऊ शकतील असे शहर दिसले पाहिजे. यासंदर्भात जेवढा खर्च करणे आवश्यक आहे तेवढा खर्च करण्याच्या बाबतीत मर्यादा आहेत. मुंबईवरुन जावयाचे असेल किंवा अन्य भागातून येणारे मार्ग आहेत त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या कामांसठी बांधकाम खाते असेल किंवा केंद्र सरकारच्या अनेक योजना असतील तेथून ते पैसे आले पाहिजेत. देवस्थानमध्ये येणारे जे पैसे आहेत त्या पैशातून तेथे येणाऱ्या भाविकांसाठी अधिक चांगल्या सोयी कशा करता येतील याबाबत लक्ष केंद्रित केले पाहिजे. म्हणून यासंदर्भात मर्यादा आहेत आणि त्या मर्यादेमध्ये राहूनच आम्हाला खर्च करता येतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितली ती बाब खरी आहे की, त्यामध्ये मर्यादा आहेत. मी बांधकाम मंत्री असताना तेथील ट्रस्टच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेतली होती. शिर्डी हे श्रीमंत संस्थान आहे. शिर्डीच्या सौंदर्यीकरणामध्ये, विकासामध्ये त्यांनी योगदान करावे अशी मी त्यांना विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी पैसे देण्याची तयारी दाखवली होती. आपण आय.आर.डी.पी. अंतर्गत योजना तयार करतो. तसेच एमएसआरडीसी आहे. शिर्डीच्या विकासासाठी 60-70 कोटी रुपयांची योजना तयार करता येईल. विदेशामध्ये तीर्थस्थानी येणाऱ्या प्रत्येक गाडीकडून टोल घेतला जातो. अशी योजना आपण केली पाहिजे. शासनाकडे पैशाच्या बाबतीत मर्यादा आहे. आपण ही तीनही इन्स्ट्रुमेंट्स एकत्र केले तर दोन तीन वर्षात 60-70 कोटी रुपयांची कामे होतील. यासाठी सरकारचे कमी पैसे लागतील. अशा पध्दतीने काम केले तर या सगळ्या गोष्टी चांगल्या पध्दतीने होतील. या गोष्टी करण्यासाठी शासनाकडे पैसे कमी आहेत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13961.... श्री. नितीन गडकरी ....

या गोष्टी करण्याचा आपण विचार केला तर दोन वर्षात कामे होतील आणि तेथील प्रश्न सुटतील तसेच अपघात होणार नाहीत. याबाबतीत शासन विचार करणार काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सूचना अतिशय चांगली आहे परंतु आज देवस्थानचे जे उत्पन्न आहे त्या उत्पन्नातून त्या परिसरात सुविधा निर्माण करण्याच्या संदर्भात कोणतेही बंधन नाही. ते आपल्याला करता येऊ शकते. परंतु मुंबईवरुन शिर्डीला जोडणारा रस्ता असेल किंवा इतर कामे असतील ती कामे बी.ओ.टी. वर घेता येऊ शकतात. मुंबई-नाशिक या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या संदर्भातील प्रस्ताव अंतिम टप्प्यामध्ये आहे. इतर जे अनेक रस्ते आहेत ते जोडण्याचे काम किंवा त्या ठिकाणी डायरेक्ट फ्लाईट येणार आहेत त्यासाठी एअरपोर्ट करण्याचे काम, त्याला जमीन देणे, याबाबतीत देवस्थानला पैसे गुंतवण्याच्या संदर्भात अधिकार दिलेले आहेत. अनाठायी खर्च होऊ नये म्हणून उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणांची छाननी करण्यासाठी समिती नेमण्याची बाब अंतिम टप्प्यामध्ये आहे. उलट आता पंढरपूरसारखे देवस्थान त्यांच्याकडे पैसे मागतात. कारण पंढरपूर हे गरिबांचे देवस्थान आहे. तसेच तुळजाभवनाची मंदिर आहे. त्या ठिकाणी गरीब लोक दर्शनासाठी येतात. त्याचप्रमाणे शेगावचे देवस्थान आहे. त्यांच्याकडेही तेवढे उत्पन्न नाही. म्हणून शिर्डीच्या साईबाबा देवस्थानाकडे बाकीच्या देवस्थानांची मागणी आहे. सिध्दिविनायक मंदिर आहे. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पैसे आहेत. परंतु हे पैसे वैयक्तिक संस्थेला जाऊ नयेत. मधल्या काळात काही प्रकरणे समोर आली आणि कोर्टाने हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे. त्यामुळे याबाबतीत अधिक मर्यादा आणि नियंत्रण आलेले आहे. हे नियंत्रण आल्यानंतर आपल्या या मागण्या आलेल्या आहेत. म्हणून त्या मर्यादेत राहूनच आपल्याला विकास करावयाचा आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी जे भाविक येतात त्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. आज त्या ठिकाणी साई संस्थानमध्ये मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होतो. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भाविक येतात. तिरुपती देवस्थानाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उत्पन्न आहे. त्या

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13961.... श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

ठिकाणी मेडिकल कॉलेज, टेक्निकल कॉलेजसाठी सुध्दा ते खर्च करतत. कोणत्याही देवस्थानाचे रजिस्ट्रेशन ट्रस्ट ॲक्टच्या अंतर्गत केले जाते. कोणतेही संस्थान असेल त्याचे रजिस्ट्रेशन पब्लिक ट्रस्ट ॲक्टच्या अंतर्गत केले पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 13961.... (श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

पब्लिक ट्रस्टचा नियम असा आहे की जास्तीत जास्त 80 टक्के उत्पन्न हे ऑब्जेक्टवर खर्च झाले पाहिजे आणि 20 टक्के उत्पन्न सेव्हिंग झाले पाहिजे. तेव्हा भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत तसेच मेडिकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजेस काढण्याच्या बाबतीत शासन शिर्डी संस्थानाला मदत करणार आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : तेथील विश्वस्त मंडळाने कोणकोणती कामे करावयाची हे ठरविले तर सरकार त्यांना त्याबाबतीत सहकार्य करु शकेल. परंतु त्यांना अमूक अमूक कामे करावीत असे शासन त्यांना आदेश देऊ शकत नाही. विश्वस्त मंडळाने मेडिकल अथवा इंजिनिअरिंग कॉलेजेसचा प्रस्ताव शासनाला सादरा केला तर शासन त्याबाबतीत जरुर विचार करील.

श्री. जितेंद्र आव्हाड : नगरपंचायत हद्दीतील कोणती महत्वाची कामे चालू आहेत व इतर कोणती प्रस्तावित कामे शासन मान्यतेसाठी विचाराधीन आहेत, अशा प्रकारचा स्पेसिफिक प्रश्न मी विचारलेला आहे. मध्यंतरीच्या काळात एमएसएसआरडीसी आणि शिर्डी संस्थानाची एक बैठक झालेली होती. त्या बैठकीमध्ये शिर्डी संस्थानाने एमएसएसआरडीसीकडे काही प्रस्ताव सादर केलेले आहेत काय ?

श्री. अनिल देशमुख : शिर्डी संस्थानाच्या पदाधिका-यांसोबत बैठक झालेली असून त्यांनी रस्ता मोठा करणे, चौक सुशोभित करणे, भाविकांसाठी पालखी रस्ता तयार करणे यासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. परंतु त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण असून ते अतिक्रमण काढण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर सोपविलेली आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर आयआरडीपीच्या माध्यमातून चांगले काम करता येईल. मुंबई ते शिर्डी असा 12 फुटाचा पालखी रस्ता तयार करणे, भाविकांसाठी निवासाची तसेच अन्य सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे यासंदर्भात शिर्डी संस्थानाबरोबर चर्चा चालू आहे.

श्री. श्रीकांत जोशी : माननीय सदय श्री. नितीन गडकरी हे बांधकाम मंत्री असताना त्यांनी संभाजीनगर ते शिर्डी रस्त्याचे काम सुरु केले होते. एमएसएसआरडीसी ते काम अद्याप पूर्ण करु शकले नाही. हा रस्ता किती कालावधीत पूर्ण केला जाईल. ? औरंगाबाद एअरपोर्ट शिर्डीला निअरेस्ट आहे...

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 13961...)

**सभापती** : या प्रश्नाची व्याप्ती मर्यादित आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात शासन काय काय करु शकते हे सांगितलेले आहे.

---

...3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नगरपरिषद नरखेड येथील नगरसेवकांनी आपल्या पदाचा केलेला दुरुपयोग**

**(६) * १४१९२ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री. जगदिश गुप्ता :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि. नागपूर) येथील न.प. मधील प्रभाग क्र. ४ चे नगरसेवक श्री. शेख इकबाल शेख हतम व श्री. शंकर बागडे या दोन्हीही नगरसेवकांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन अवैध बिना परवानगी घराचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत माजी नगराध्यक्ष, न.प. तसेच मा. लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जानेवारी, २००६ रोजी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे चौकशीची मागणी केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार दोषी व्यक्तिविरुध्द काय कारवाई केली ?

(४) अद्यापपावेतो कोणतीही कारवाई केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) श्री. शंकर गुलाबराव बागडे यांनी अवैध बांधकाम केलेले नाही. तथापि, श्री.शेख इकबाल शेख हतम यांनी अवैध बांधकाम केले आहे.

(२) होय, दिनांक २३ नोव्हेंबर, २००५ व दिनांक १२ जानेवारी, २००६ च्या निवेदनाद्वारे चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निदेशानुसार चौकशी करण्यात आली आहे. या संदर्भात श्री. शेख इकबाल शेख हतम यांनी केलेल्या अवैध बांधकामाबाबत त्यांना दिनांक १५ फेब्रुवारी, २००६ रोजी अवैध बांधकाम काढण्याबाबत ३० दिवसाची नोटीस देण्यात आली आहे. तसेच दोषी व्यक्तींविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ता.प्र.क्र. १४१९२.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये मी आपल्या अनुमतीने सुधारणा करु इच्छितो. उत्तराच्या भाग 1 मध्ये "श्री. शंकर गुलाबराव बागडे यांनी अवैध बांधकाम केले नाही" या मजकुराऐवजी "श्री. शंकर गुलाबराव बागडे यांनी अवैध बांधकाम केलेले होते. ते त्यांनी काढून टाकले आहे." असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही फार गंभीर घटना आहे. त्या ठिकाणी श्री. शंकर गुलाबराव बागडे यांनी अवैध बांधकाम केल्याचे सिध्द झालेले आहे. त्यांनी ते अवैध बांधकाम नंतर काढून टाकले असे माननीय राज्यमंत्र्यांनी आता सांगितले. जर विरोधी पक्षाचे नगरसेवक असते तर शासनाने त्याबाबतीत तडकाफडकी कारवाई केली असती. याप्रकरणी श्री. शंकर गुलाबराव बागडे व श्री. शेख इकबाल शेख हतम यांनी अवैध बांधकाम केल्याचे सिध्द

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झालेले आहे.माझा प्रश्न असा आहे की. सहायक संचालक नगर रचना यांनी दिनांक 4.4.2006 रोजी ही दोन्ही बांधकामे अवैध असल्याचा अहवाल दिलेला आहे काय ? असल्यास, या नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द करण्याची कारवाई अद्यापपर्यन्त का झालेली नाही ? ही कारवाई न करण्यामागे कोणाचे प्रेशर आहे. ?

...नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. एम.एस.शिगम 11:50

ता. प्र. क्र. 14192...........

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सहाय्यक संचालक, नगररचना यांनी दिनांक 4.4.2006 रोजी दिलेल्या अहवालानुसार दोन ठिकाणी अनधिकृत बांधकाम झाले असल्याचे कळविले आहे. यासंदर्भात दोन कारवाया अभिप्रेत असतात त्यात एक म्हणजे एमआरटीपी ॲक्टच्या कलम 44 (ई) च्या माध्यमातून सदस्यांना अनर्ह ठरविण्याबाबतची कारवाई जिल्हाधिकाऱ्यांनी करावयाची असते. त्या अनुषंगाने आज दुपारी 12.00 वाजता बैठक लावण्यात आली असून ही एक वैधानिक पध्दती आहे. त्यामुळे या बैठकीत सहाय्यक संचालकांनी दिलेल्या अहवालाच्या योग्य त्या गुणवत्तेवर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून तसा निर्णय घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी स्वत: जिल्हाधिकाऱ्यांकडे याबाबत पत्र पाठविलेले आहे. त्या ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक होते त्यांना मात्र इतक्या तडकाफडकी डिस्क्वॉलिफाय करण्यात आले आणि हे दोन नगरसेवक मात्र आपल्या पक्षाचे निघाले म्हणून जिल्हाधिकारी त्यासंदर्भातील सुनावणीच घेत नाहीत. अशा प्रकारे कॉसी ज्युडिशिअरी पॉवर्सचा मिसयुज होत आहे. रात्री 11 वाजता नगरपालिकेमध्ये बैठकघेऊन फॅक्स पाठविला जातो व अशा प्रकारे या हिअरींगची ऐशी की तैशी करण्याचे प्रयत्न होतात. या दोन्ही नगरसेवकांच्या बाबतीत कारवाई करण्याची सुबुध्दी जिल्हाधिकाऱ्यांना झाल्याने आज त्यांनी हिअरींग घेतले. वास्तविक आजपर्यंत हिअरींग घेतले नाही ते कोणाच्या दबावाखाली या नगरसेवकांना संरक्षण देण्याचा प्रयत्न होत आहे ? म्हणून जिल्हाधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करणार आणि किती दिवसांत ही कारवाई करणार ? कारण यापुढे आपण स्टे देण्यासाठी मोकळे आहात. म्हणून आजच्या आज त्या नगरसेवकांना डिस्क्वॉलिफाय करण्याबाबतची कारवाई करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी ज्या सूचना केल्या त्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील व ताबडतोबीने निर्णय घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : महोदय, जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय दिल्यानंतर त्यावर शासनाकडून माझ्या माहितीनुसार स्टे मिळणारच आहे, अशा प्रकारे कोर्टाच्या कारवाईवर स्टे देण्यात येतो. माजी राज्यमंत्री यांच्या नांवाची तर नोंद व्हायला पाहिजे, एवढे स्टे देण्याचे प्रकार त्यांच्या काळात झ ााले आहेत. म्हणून याप्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे. नाही तर राज्याचे प्रमूख म्हणून आपल्याविरुध्द कोर्टाचा अवमान केल्याबद्दल ताशेरे ओढले जाण्याची शक्यता आहे.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) K-2

**मुंबईतील संक्रमण शिबीरात 20 वर्षाहून अधिक काळ राहणाऱ्या भाडेकरुंबाबत**

**(7) * 14896 श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक 9572 ला दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील संक्रमण शिबीरात राहणाऱ्या भाडेकरुंची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे व जुन्या इमारतींची पुनर्बांधणी लवकर होत नसल्यामुळे शासनाने जून 2005 पासून एक खिडकी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या एक खिडकी योजनेचे स्वरुप काय आहे,

(3) बांधण्यात यावयाच्या इमारतींसाठी भूसंपादन, जुन्या चाळीतील भाडेकरुंसाठी संक्रमण शिबीरात जागा देणे, त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणे इत्यादी कामे एकाच ठिकाणाहून होण्याची कार्यवाही सुरु झाली आहे काय,

(4) असल्यास, यानुसार आतापर्यंत कोणकोणत्या बिल्डिंगमधील रहिवाशांना या योजनेअंतर्गत न्याय मिळाला आहे ?

**श्री. दयानंद मस्के, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1), (2) व (3) दुरुस्ती पुनर्रचना कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या दुरुस्तीचे, पुनर्रचनेचे किंवा पूनर्विकासाचे प्रस्तावाच्या अनुषंगाने एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या परवानग्या मिळाव्यात यासाठी एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय 1 जून, 2005 मध्ये घेण्यात आला आहे.

भूसंपादन, जुन्या चाळीतील भाडेकरुंसाठी संक्रमण शिबिरात जागा देणे, त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणे याचा एक खिडकी योजनेत अंतर्भात नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी मुंबईतील संक्रमण शिबीरात राहणाऱ्या भाडेकरुंच्या संख्येमध्ये वाढ होण्यासंबंधीचा प्रश्न दि. 14 डिसेंबर, 2005 रोजी देखील विचारला होता त्यावेळी त्या प्रश्नाला उत्तरदेतांना असे सांगितले होते की, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरात 3967 भाडेकरु 20 वर्षापासून अधिक काळ वास्तव्य करणारे आहेत. त्यांच्या 295 चाळींची पुनर्बांधणी होणे प्रलंबित आहे. आता हया संक्रमण शिबीरांमध्ये जे भाडेकरु राहतात त्याला 20 वर्षापेक्षा जास्त काळ लोटलेला आहे. म्हणून मी प्रश्न विचारला होता त्याला समाधानकारक उत्तर मिळालेले नाही. एक खिडकी योजनेचा निर्णय शासनाच्या वतीने आता घेण्यात आला असून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली की नाही याचेही उत्तर येथे दिलेले नाही. या संक्रमण शिबीरातून 20 वर्षापेक्षा जास्त काळ लोक राहत असतांना अजूनपर्यंत त्यांच्यासाठी निश्चित प्लॅन अथवा नियोजन करण्यात आलेले नाही.

यानंतर श्री. भारवि .......

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MAP/ KGS/ KGS/ MHM/ खर्चे.. 11:55

ता.प्र.क्र.14896....

श्री.पांडुरंग फुंडकर...

येथे लेखी उत्तर असे देण्यात आले आहे की, भूसंपादन, जुन्या चाळीतील भाडेकरूंसाठी संक्रमण शिबिरात जागा देणे, त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणे याचा एक खिडकी योजनेत अंतर्भाव नाही. तेव्हा एक खिडकी योजनेमध्ये कोणत्या गोष्टींचा समावेश आहे ? संक्रमण शिबिरात जवळ जवळ तीन हजार लोक गेल्या 20 वर्षांपासून राहत आहेत. त्यांच्या कायमस्वरूपी निवासाची व्यवस्था शासन किती कालावधीमध्ये करणार आहे ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, मुंबईतील संक्रमण शिबिरात 20 वर्षाहून अधिक काळापासून भाडेकरू राहत आहेत ही वस्तुस्थिती खरी आहे. या लोकांसाठी लवकरात लवकर गाळे उपलब्ध व्हावे म्हणून दिनांक 1 जून 2005 रोजी एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला......

श्री.पांडुरंग फुंडकर : ....सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे एक खिडकी योजना सुरू झाली आहे काय ?. याचे कारण असे की, भूसंपादन, जुन्या चाळीतील भाडेकरूंसाठी संक्रमण शिबिरात जागा देणे, त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणे याचा एक खिडकी योजनेत अंतर्भाव नाही असे नमूद केलेले आहे.

श्री.दयानंद म्हस्के : सभापती महोदय, एक खिडकी योजनेचा निर्णय दिनांक 1 जून 2005 रोजी घेण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अनेक बैठका वेगवेगळया स्तरावरील अधिकाऱ्यां सोबत बैठका देखील झालेल्या आहेत. एक खिडकी योजने अंतर्गत जवळ जवळ 35 प्रमाणपत्र तपासली जाणार आहेत. उपकरासंबंधीचे प्रमाणपत्र, म्हाडा दुरूस्तीचे प्रमाणपत्र, नकाशा मंजुरी प्रमाणपत्र, सांडपाणी प्रमाणपत्र इत्यादींचा समावेश आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जवळ जवळ 20 वर्षापासून संक्रमण शिबिरात लोक राहत आहेत. या लोकांना स्वत:च्या इमारतीमध्ये जाण्यास अजून किती कालावधी लागणार आहे ? एका पिढीला संक्रमण शिबिरातच रहावे लागणार आहे. तेव्हा या विस्थापितांना प्रस्थापित करण्यासंबंधी शासनाने योजना आखली आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, एक खिडकी योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यां समवेत बैठक झालेली आहे. सदर योजना थोडया दिवसातच अंमलात येणार आहे. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14896 ...

श्री.दयानंद मस्के .......

सदर योजना सुरू झाल्यानंतर बांधकामास सुरूवात होईल. तद्नंतर लोकांची गैरसोय दूर होईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी लेखी उत्तरात म्हटले आहे की, भूसंपादन, जुन्या चाळीतील भाडेकरूंसाठी संक्रमण शिबिरात जागा देणे, त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करणे याचा एक खिडकी योजनेत अंतर्भाव नाही. वास्तवित पाहता एक खिडकी योजनेचा निर्णय 1 जून 2005 रोजी झालेला आहे. दुरुस्ती पुनर्रचना कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या दुरूस्तीचे, पुनर्रचनेचे किंवा पुनर्विकासाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या परवानगी मिळाल्यावत यासाठी एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय 1 जून 2005 मध्ये घेण्यात आला. पण आज वस्तुस्थिती अशी आहे की, खिडकी अजूनही उघडण्यात आलेली नाही. ती कायमची बंद असते. तेव्हा यास जो कोणी संबंधित अधिकारी जबाबदार असेल त्याच्या विरूद्ध शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, जे 20 वर्षापासून संक्रमण शिबिरात रहात आहे, त्यांना स्वत:च्या मालकीच्या घरामध्ये जाता येत नाही, इमारत बांधकामास खूप दिरंगाई होते ती होऊ नये म्हणून एक खिडकी योजना सुरू केली आहे. सगळया आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची एनओसी एकाच ठिकाणी देऊन कामाला गती मिळावी म्हणून दिनांक 1 जून 2005 रोजी एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी, येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी, कामाला प्रत्यक्षपणे सुरूवात करण्यासाठी काही कालावधी गेलेला आहे. विलंब झ ालेला हे मला मान्य करावेच लागेल. भविष्यामध्ये एकाच ठिकाणी सर्व व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सक्षम अधिकारी नेमावा लागेल. खिडकी बंद असेल तर सगळेच बंद होणार आहे. त्यामुळे आता या संर्दभातील खिडकी उघडी राहण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. तसेच येथे काम करणाऱ्या अधिकाऱ्याला सर्व अधिकार देऊन खिडकी उघडी ठेवण्याची काळजी घेतली जाईल. हा प्रश्न गंभीर आहे, जटिल आहे, याची मला जाणीव आहे म्हणून आता एक खिडकी योजनेद्वारे त्यास चालना मिळेल.

यानंतर श्री.बोर्डे....

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जे उत्तर दिले ते समाधानकारक असले तरी रहिवाशी गेल्या 20 वर्षांपासून संक्रमण शिबिरामध्ये राहतात ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, कोणत्या इमारती अशा आहेत की, ज्यांची पुनर्रचना आणि पुनर्बांधणी करावयाची आहे ? त्यापैकी किती इमारतींचे प्रस्ताव गेल्या जून महिन्यापासून आतापर्यंत मंजूर झाले आणि त्यांचे काम केव्हापर्यंत सुरु होईल ?

श्री.दयानंद मस्के : महोदय, हा प्रश्न वेगळया स्वरुपाचा असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी निराळया माध्यमातून हा प्रश्न विचारावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 285 इमारतींमध्ये 3900 भाडेकरी राहतात असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले. मला वाटते अजून 20 वर्षे तरी ही मंडळी पुनर्रचित इमारतींमध्ये जाऊ शकणार नाहीत. त्यामुळे या 285 इमारतींचा स्वतंत्र गृप करुन, रहिवाशांसाठी वेगळा भूखंड शोधून, त्यांच्यासाठी वेगळी इमारती बांधण्यात येईल काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, हे खरे आहे की, ते भूखंड विकसित करण्याच्या स्थितीत नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा गांभीर्याने विचार करुन, त्या इमारतीतील रहिवाशांसाठी पर्यायी भूखंड शोधून त्या ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करण्याचा निश्चितप्रकारे प्रयत्न केला जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 12:00

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे मी पुढील माहिती शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी श्री.राहूल साहेबराव वानखेडे, रा.दाभडा, ता.धामणगांव, जि.अमरावती, श्री.सुखदेव बाबूराव शिंदे, रा.निपाणी टाकळी, ता.माजलगांव, जि.बीड या दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. तसेच दिनांक 11 एप्रिल, 2006 रोजी श्री.पुरुषोत्तम परसराम वैद्य, रा.बेलघाट, ता.समुद्रपूर, जि.वर्धा, श्री.अनिल किसनराव कातडे, रा.साहुर, ता.जि.वर्धा, श्री.शांताराम रामचंद्र भोगड, रा.पातुर्डा, जि.बुलढाणा आणि श्री.पांडुरंग नागो कदम, रा.सोमठाण, ता.येवला, जि.नाशिक या चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एकूण आत्महत्यांची संख्या 445 झाली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते दररोज सभागृहामध्ये राज्यात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावे वाचून दाखवितात. परंतु शासनाकडून याबाबत काहीही विचार केला जात नाही. त्यामुळे शासन या संदर्भात गंभीरपणे विचार करणार आहे काय ?

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना एखदा औचित्याचा मुद्दा मांडण्यास ज्यावेळी मी परवानगी देतो, त्याचा अर्थ असा होतो की, शासनाने त्या मुद्याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची गांभीर्याने नोंद घेतली जाईल.

-----

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला आणि बुलढाणा जिल्हयामध्ये चिकन गुनिया या रोगाची साथ दिवसेंदिवस वाढत आहे. सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांच्या अकोला जिल्हयातील शिरसोली गावामध्ये 250-300 लोकांना या रोगाची लागण झाली आहे. तसेच बुलढाणा जिल्हयातील माटरगांव येथील 1000 लोकांना या रोगाची लागण झाली आहे. परंतु ज्या ठिकाणी ही लागण झालेली आहे त्या ठिकाणी शासनाकडून कसल्याही प्रकारचा औषध पुरवठा करण्यात आलेला नाही. तसेच त्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी सुध्दा पोहोचलेले नाही. त्यामुळे दोन ते अडीच हजार रुग्ण आज औषधाविना आहेत. शासनाकडून औषध पुरवठा केला

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

जात नाही. तसेच या रोगाचे निदान होत नाही. त्या परिसरातील लोकांमध्ये एकप्रकारे भितीचे वातावरण पसरलेले आहे. त्यामुळे या औचित्त्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो की, या विषयाबाबतचे निवेदन माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी करावे.

**सभापती** : चिकन गुनिया रोगाच्या साथीबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो औचित्त्याचा मुद्दा उपस्थित केला त्याबाबत शासनाने निवेदन करावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : होय.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ॲडव्होकेट जनरल यांचे मत अद्यापपर्यंत न आल्याबाबत.**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी 20 दिवसांपूर्वी सभागृहामध्ये विनंती केली होती की, ॲडव्होकेट जनरल यांना सभागृहात बोलाविण्यात यावे. परंतु आपण माझी विनंती अमान्य करुन, असे निदेश दिले होते की, मी मांडलेल्या विषयाबाबत ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेण्यात येईल. वास्तविक पाहता आतापर्यंत आपल्या विभागाने ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागवावयास हवे होते. विधी व न्याय तसेच सांस्कृतिक विभागाकडून हे मत मागविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत त्यांचे ओपिनियन आलेले नाही. जे ओपिनियन एका तासामध्ये येऊ शकते, ते ओपिनियन 20 दिवस उलटून सुध्दा आलेले नाही. त्यामुळे उद्यापर्यंत जर ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन आले नाही तर, परवापासून मी सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेणार नाही. येथेच एकही शब्द न बोलता खाली बसून राहीन.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

कारण हे गंभीर आहे. तुम्ही अनुशेष भरुन देत नाही, अनुपालन अहवाल देत नाही. यासंबंधी उत्तर द्यायलाही टाळाटाळ करता, माननीय राज्यपालांचे ऐकत नाही, माननीय मुख्यमंत्र्यांचे ऐकत नाही, घटनेचे ऐकत नाही, विधिमंडळाचे ऐकत नाही आणि यासंबंधी ॲडव्होकेट जनरल यांचे मत देखील देत नाही. सभापती महोदय, यासंबंधी माझा आरोप आहे. ॲडव्होकेट जनरल यांचे मत देण्याबाबत काही राजकीय दबाव आहे, अशी माझी माहिती आहे. सभापती महोदय, ही गोष्ट विधिमंडळाच्या लौकिकास शोभणारी नाही. या संदर्भात आपण हस्तक्षेप केला पाहिजे. आपण यासंबंधी ॲडव्होकेट जनरल यांचे उद्या मत मागविले पाहिजे नाही तर आम्हास परवापासून असहकाराची भूमिका घ्यावी लागेल. सभापती महोदय, सहन करण्यासही काही मर्यादा असतात. या ठिकाणी आपल्या अधिकारांचीदेखील अवहेलना झालेली आहे. आपण सुसंस्कृत आहात, म्हणून आपण हे सहन करत आहात. सभापती महोदय, आम्हाला या संदर्भात ॲडव्होकेट जनरलचे मत मिळाले पाहिजे.

**सभापती** : ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय मागविण्याबाबत विधिमंडळामार्फत प्रयत्न केले जात आहेत. यासंबंधी संसदीय कार्य विभागालाही सूचना देण्यात आलेल्या आहेत. संसदीय कार्य मंत्र्यांनी 20 दिवसांपूर्वी ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय देतो असे सांगितले होते. तरी, या विषयी ॲडव्होकेट जनरल यांचे अभिप्राय कसे तातडीने मिळतील या दृष्टीने प्रयत्न करावेत. विधिमंडळामार्फत देखील प्रयत्न केले जातील.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे, या संदर्भात ॲडव्होकेट जनरल यांचे मत मागविण्यासंदर्भातील प्रस्ताव दिलेला आहे. आपले सर्व मुद्दे इनकार्पोरेट करुन अभिप्राय मागविला आहे. या संदर्भात लवकरात लवकर अभिप्राय देण्यासंदर्भात सांगण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरलचे मत मागविले पाहिजे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, तीन वर्षे गळा घोटला आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण त्या पत्रामध्ये अनेक मुद्दे उपस्थित केले होते. म्हणून सदनाच्या भावना लक्षात घेऊन मी " लवकरात लवकर " असे शब्द वापरले. सभापती महोदय, या संदर्भात लवकरात लवकर अभिप्राय प्राप्त होऊन निवेदन करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : लवकरात लवकर म्हणजे आपण कधी निवेदन करणार आहात ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

( गोंधळ )

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही लाजिरवाणी गोष्ट आहे, अयोग्य गोष्ट आहे. जखमा करण्याच्याही काही मर्यादा असतात. आपण अजून सुध्दा " अधिवेशन संपण्यापूर्वी " असे म्हणत आहात ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी सांगितले की, निवेदन " लवकरात लवकर " करण्यात येईल. लवकर म्हणजे कधी ? असे सन्माननीय सदस्यांनी विचारल्यानंतर मी " अधिवेशन संपण्यापूर्वी " असे सांगितले. यामध्ये माझा काय दोष आहे ? ॲडव्होकेट जनरल यांना आपण आज विनंती करणार आहोत की, या संदर्भात लवकर अभिप्राय द्यावेत.

( गोंधळ )

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण घटनेचे ऐकत नाही, माननीय राज्यपालांचे निदेशही ऐकत नाही आणि " अधिवेशन संपण्यापूर्वी " असे म्हणता, हे काही बरोबर नाही. सभापती महोदय, This is unfair behaviour. You are behaving extremely.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख म्हणाले की, You are not behaving properly, हे चूक आहे. मी सांगितले की, निवेदन लवकर करण्यात येईल. आपण लवकर म्हणजे कधी ? असे विचारल्यानंतर मी सांगितले की, अधिवेशन संपण्यापूर्वी.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी This is unfair behaviour असे म्हणालो आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे एका तासाचे काम आहे.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरल यांच्या ओपिनिअनशिवाय मी काहीही मांडू शकत नाही. त्यांच्याकडून ओपिनिअन येणार आहे. मी आपल्याला पुन्हा एकदा सांगतो की, हे निवेदन लवकरात लवकर करण्यात येईल.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 12:10

**सभापती** : ॲडव्होकेट जनरलचे मत मागविण्यात येत आहे. संसदीय कामकाज मंत्री यांनी येत्या दोन दिवसांमध्ये ॲडव्होकेट जनरलचे मत प्राप्त करुन घ्यावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मला बोलण्यासाठी संरक्षण द्यावे, आपण दोन दिवसांची मुदत दिलेली आहे त्यानुसार उद्या सायंकाळी सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत ॲडव्होकेट जनरलचे मत प्राप्त करुन निवेदन करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्यानंतर तीन दिवस सुट्टी असल्यामुळे जर उद्या निवेदन करता आले नाही तर ते सोमवारी करण्यात येईल.

---------

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2004-2005 चा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

......3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 4 एप्रिल, 2006 रोजी आर्णी पोलीस व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे केळघरा, जि. यवतमाळ येथे इसा मोहमद इकबाल मालानी यांच्या घरी रात्रीच्या सुमारात घातलेली धाड." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे, हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. श्रीकांत जोशी,वि.प.स. यांनी " बीड जिल्हयातील केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील दादाराव एकनाथ गालफाडे या शेतकऱ्याचा दिनांक 6 एप्रिल, 2006 रोजी मृतदेह बैलगाडीत आढळून येणे, औरंगाबाद शेवगा येथील श्री. संतोष हिरेकर या शेतकऱ्याने सावकाराच्या तगाद्यास, दिनांक 11 एप्रिल, 2006 रोजी निपाणी टाकळी (ता. माजलगांव, जि. बीड) या वयोवृध्द शेतकऱ्याने केलेली आत्महत्या." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर डॉ. नीलम गोऱ्हे व इतर वि.प.स. यांनी "अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) माची, सागरगड, पोवळेवाडी, सागाव, वाडगाव या परिसरातील आदिवासी कातकरींना कोळसा भट्टी मालकाने किमान वेतन नाकारुन बेकायदेशीरपणे कोळसा भट्टीवर काम करण्यास लावणे व त्यांना मजुरी न देणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी "दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी लासलगांव (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात पांडुरंग नामू कदम या शेतकऱ्याने कांद्याला कमी भाव मिळत असल्यामुळे विषारी औषघ घेऊन केलेली आत्महत्या." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

......4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण दिनांक 17 व 18 रोजी दोन दिवसात निवेदन करावे, 4 दिवसांत निवेदन करावे अशा सूचना शासनाला दिलेल्या आहेत. अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात नियम 93 च्या सूचना मांडलेल्या आहेत, त्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावर आहेत, त्यासंदर्भातील निवेदन अजूनही सभागृहात सादर करण्यात आलेले नाहीत, याबाबत माननीय सभापती महोदयांनी लक्ष द्यावे अशी माझी नम्र विनंती आहे.

**सभापती** : प्रत्येक दिवशी 6 ते 7 निवेदन सभागृहात सादर होत आहेत, आपण जी माहिती दिली त्याबाबत नक्की नोंद घेण्यात आलेली आहे. अशी काही निवेदने राहिली असतील तर ती लवकरच सभागृहात सादर करण्यात येतील.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मोखाडा तालुका, जिल्हा ठाणे येथील आदिवासी भागातील बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू

**मु.शी.**: मोखाडा तालुका, जिल्हा ठाणे येथील आदिवासी भागातील बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू याबाबत श्री. अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, श्री. अनंत तरे, श्री. विलास अवचट, ॲड. अनिल परब, श्री. सुरेश जेथलिया, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हर्षवर्धन पाटील (महिला व बालकल्याण मंत्री) : सभापती महोदय, श्री. अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, श्री. अनंत तरे, श्री. विलास अवचट, ॲड. अनिल परब, श्री. सुरेश जेथलिया, विधानपरिषद सदस्य यांनी "मोखाडा तालुका, जिल्हा ठाणे येथील आदिवासी भागातील बालकांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. सुंबरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( महिला व बाल विकास मंत्र्यांच्या नियम 93 अन्वयेच्या निवेदनानंतर ... )

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, गेल्या 5-6 महिन्यांमध्ये हे बालमृत्यू झालेले आहेत आणि माझ्या माहितीप्रमाणे जवळपास 27 बालमृत्यू झालेले आहेत. सभापती महोदय, मोखाडा तालुक्यातील या आदिवासींची अवस्था इतकी वाईट आहे आणि त्या सगळ्याचे मूळ कारण डायरिया हे आहे. त्याचे कारण पुन्हा पाणी हेच आहे. दुसऱ्या बाजूला त्यांना रोजगार उपलब्ध नाही त्यामुळे अनेक आदिवासी स्थलांतरित होत आहेत. त्यामुळे मृत्यूचे प्रमाण वाढण्याची भीती तेथील अंगणवाडी सेविकांनी देखील व्यक्त केलेली आहे. म्हणून आता या संबंधात आपल्याकडे जी माहिती आहे त्यानुसार या मोखाडा तालुक्यातून मोठ्या प्रमाणात आदिवासी स्थलांतरित होत आहेत हे खरे आहे का ? आणि तेथील प्राथमिक आरोग्य केंद्रांकडून, त्यातही आसेगाव येथील पूर्ण माहिती आपल्याला मिळालेली नाही असे असले तरी एकंदर जी माहिती घेतली आहे त्यानुसार गेल्या 6 महिन्यात किती बालमृत्यू या भागामध्ये झालेले आहेत ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न येथे उपस्थित केला आहे त्याप्रमाणे काही प्रमाणात वस्तुस्थिती आहे हे मी मान्य करतो. तेथे काही प्रमाणात आदिवासी स्थलांतरित होत आहेत हे खरे आहे. त्याची अनेक कारणे आहेत, पैकी महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना तेथे रोजगार उपलब्ध होत नाही हेही एक आहे. म्हणूनच त्यांना तेथे जवळच रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने रोजगार हमी योजनेची कामे सर्व नियम शिथिल करून दोन कि.मी.च्या अंतरामध्ये त्यांना कामे उपलब्ध करून देण्याची तातडीने व्यवस्था केली जाईल. सभापती महोदय, कुपोषणाच्या बाबतीतील आकडेवारी पाहता माझ्याकडे जानेवारी ते मार्च या तीन महिन्यातील आकडेवारी आहे त्यानुसार जानेवारीमध्ये 212, फेब्रुवारीमध्ये 211 आणि मार्च मध्ये 222 अशी साधारणपणे कुपोषित बालकांची आकडेवारी आहे. त्यासंबंधात देखील अनेक कारणे आहेत. परंतु हा प्रश्न अतिशय गंभीर होत चालला आहे आणि म्हणूनच याबाबत व्यापक स्वरूपात मोहीम हाती घेऊन, हा कुपोषित बालकांचा प्रश्न प्रॉयॉरिटीने आपल्याला सोडवावा लागणार आहे आणि त्यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे एवढेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, या ठिकाणी सर्व यंत्रणा राबवून देखील बालमृत्यूंचे प्रमाण वाढत आहे. तेव्हा याला कारणे काय आहेत ? त्याबाबत आपण काय कारवाई करणार आहात वा केली आहे ? मोखाड्यामध्ये 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांना पूरक पोषण आहार

...... पी 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अवचट ....

मिळत नसल्यामुळे त्या संदर्भात आपण काय केलेले आहे ? या ठिकाणी आपण म्हटले आहे की, किडणी, आतड्याचे आजार वगैरे कारणांमुळे हे मृत्यू झाले आहत पण त्यांचे देखील मूळ कारण हेच आहे की, त्यांना पूरक पोषण आहार मिळाला नाही म्हणूनच हे आजार झाले आणि त्यात त्यांचा मृत्यू झालेला आहे. तेव्हा या बाबतीत आणखी काही उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे त्यादृष्टीने आपण काय करणार आहात ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या बालमृत्यूंची साधारणपणे कारणे समजून घ्यायची म्हटले तर आमच्याकडे जी माहिती येथे आहे त्यानुसार त्यांचे आई-वडीलच मूलत: कुपोषित झालेले आहेत. दुसरे म्हणजे काही परिस्थितीमध्ये दोन मुलांच्या मधले अंतरदेखील महत्त्वाचे आहे. तिसरा मुद्दा म्हणजे पोषण आहाराच्या बाबतचा आहे. आता त्यासाठी 1 रूपया 48 पैसे प्रमाणे आपण अनुदान देत होतो. पण आता माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहकार्याने, मान्यतेने हे अनुदान वाढवून देण्याचा प्रयत्न आपण करीत असून त्यानुसार साधारणत: 2 रूपयांपर्यंत हे अनुदान वाढवून या कुपोषित बालकांसाठी जो आहार द्यावयाचा त्याच्या रेसिपी बाबत देखील आपण लक्ष देत आहोत. जिल्हाधिकारी, सीईओ आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांचेकडून ही रेसिपी निश्चित करण्यात येऊन यातील ठेकेदारी पद्धत तर आपण पूर्णपणे बंद केलेली असून आता महिलांच्या बचतगटांकडे हे काम आपण देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर आदिवासी विभागामध्ये 3200 अंगणवाड्यांना मान्यता दिल्या असून तेथील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस असे मिशन तयार केलेले आहे. त्यांच्या मार्फत हे काम तेथे सुरू झालेले आहे. या प्रकारे एक व्यापक मोहीम घेऊन वर्षभरामध्ये 100 बालकांना कुपोषणातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल. आपण सर्वांनीच एकत्रितपणे हा प्रश्न सोडविण्याची आवश्यकता आहे तेव्हा याबाबतीत आपल्या सूचना आल्यास त्यांचा स्वीकार राज्य सरकार जरूर करील असेही मी सांगू इच्छितो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे मी एका गोष्टीबाबत स्वागत करतो की, त्यांनी या संबंधात तातडीने उपाय योजना केलेली आहे. मी स्वत: मोखाडा तालुक्यामध्ये गेलो होतो, तेथील एकूण परिस्थिती मी पाहिलेली आहे. तेथील सर्व अंगणवाड्यांना

...... पी 3 ..



KBS/MAP/KGS. श्री. वि. खर्चे नंतर --- 12:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

आम्ही गॅस शेगड्या आणि गॅस सिलिंडर्स दिले आहेत, तेथील प्रदूषण कमी व्हावे या हेतूने, हे आपण देखील पाहिले असेल. तेव्हा यामध्ये देखील निरीक्षण करणारी आपली यंत्रणा असली पाहिजे असे मला वाटते. आज तुम्ही महिलांच्या बचतगटांकडे हे काम दिले आहे. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... क्यू 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

बचत गटातील महिलांकडून देखील या बालकांपर्यंत पुरेसा आहार पोहोचविला जातो की नाही हा प्रश्न आहे. आज मुरबाडचे प्रकरण माझ्याकडे आहे. त्या ठिकाणी मुलांना फक्त भात उकडून दिला जातो. आणि आपण त्या मुलांना प्रोटोव्हिटा देणार आहात. परंतु हे सर्व त्या बालकांपर्यंत पोहोचते की नाही हे सुध्दा आपण पाहिले पाहिजे. दुसरे असे की, आपण आदिवासी भागामध्ये पामतेल, शेंगदाणा अणि गूळ देता परंतु आदिवासी लोक ते विकून टाकतात. त्यामुळे तो आहार त्या मुलांना मिळत नाही. या गोष्टीला आळा घालण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा असली पाहिजे. आपल्याकडे डॉ. अभय बंग यांचा अहवाल आहे. त्या अहवालामध्ये अनेक महत्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत. तेव्हा हे जे प्रकार सुरु आहेत त्यांना आळा घालण्यासाठी सरप्राईज व्हिजिट देण्यासाठी आपण यंत्रणा निर्माण करणार आहात काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली सूचना निश्चितपणे चांगली असून आदिवासी विभागामध्ये तशाप्रकारचे एक फ्लाईंग स्क्वॅड माझ्या विभागामार्फत निर्माण केले जाईल. त्याचप्रमाणे उद्याच माझ्या विभागाच्या सचिवांना या संदर्भात तात्काळ दौरा करावयास सांगितले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कशाप्रकारची सुधारणा करता येईल, पोषण आहाराचे वाटप योग्य पध्दतीने होते की नाही हे पहाण्यासाठी निश्चित असे धोरण स्वीकारण्यात येईल. विशेषत: आदिवासी भागामध्ये कुपोषित बालकांचा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे पोषण आहाराचे वाटप योग्य प्रकारे होण्यासाठी निश्चितपणे खबरदारी घेण्यात येईल.

**(सभापतीस्थानी मा.उपसभापती)**

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, कुपोषणामुळे बालमृत्यू होण्यामागील मुख्य कारण बालविवाह हे आहे. आदिवासी विभागामध्ये बालविवाह जास्त प्रमाणात होतात. त्यावर कायद्याने बंदी असली तरी त्याबाबत शासनाने कडक कारवाई केली पाहिजे. दुसरा प्रश्न असा आहे की, स्तनदा आणि गर्भवती मातांना पोषण आहार दिला जातो.परंतु हा आहार घेण्यासाठी स्तनदा अणि गर्भवती माता अंगणवाडीमध्ये जात नाहीत. त्यामुळे त्यांना आहार मिळत नाही. विशेषकरुन आदिवासी भागामध्ये स्तनदा आणि गर्भवती मातांना पोषण आहार सक्तीचा करण्यासाठी आपण उपाय योजना करणार काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, बालविवाहाला कायद्याने बंदी असून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण यंत्रणा राबवीत आहोत. ग्रामीण स्तरावर ग्रामसेवक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Q 2

DGS/ MAP/ KGS/ 12:20

श्री. हर्षवर्धन पाटील...

आणि नगरपालिकेच्या हद्दीमध्ये चिफ ऑफिसर यांना एफ.आय.आर. लॉंज करण्याचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे गेल्या दोन वर्षामध्ये अनेक जिल्हयामध्ये अशाप्रकारचे गुन्हे दाखल होत आहेत. विशेषकरुन आदिवासी विभागामध्ये सामुदायिक विवाहामध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक आढळले असल्यामुळे अशाप्रकारचे एफ.आय.आर. लॉंज करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत माझ्या विभागामार्फत जरुर ती खबरदारी घेतली जाईल.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, शहरी विभागामध्ये अंगणवाडया सुरु करण्याच्या प्रस्तावाला शासनाने मंजूरी दिलेली नाही. तसेच, अंगणवाडया मंजूर केल्यानंतर त्या ठिकाणी अंगणवाडी सेविकांची वेळेवर नियुक्ती केली जात नाही. एकदा शासनाने अंगणवाडी मंजूर केल्यानंतर एक महिन्याच्या आतमध्ये त्याठिकाणी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासन निश्चितपणे धोरण राबविणार आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यावर्षी नागरी व ग्रामीण विभागामध्ये 12864 अंगणवाडयांना मान्यता दिली आहे. त्यासाठी विभागाच्या वतीने कार्यक्रम तयार केला आहे. राज्यामध्ये अंगणवाडया सुरु करण्यासाठी या महिन्याच्या 15 तारखेला वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाईल. जाहिरातीमध्ये अर्ज सादर करण्यासाठी 15 दिवसांची मुदत दिली जाईल. त्यानंतर 5 मे पासून 20 मेपर्यंत मुलाखती घेऊन नेमणूक केली जाईल. तसेच, उमेदवारांच्या मुलाखती घेण्याकरीता शासन निर्णयाव्दारे निवड समितीचे अध्यक्ष म्हणून आमदारांची नियुक्ती केली आहे. 5 मे ते 20 मे पर्यंत सर्व आमदार आपापल्या मतदारसंघातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांची जी मंजूर पदे असतील त्यांच्या मुलाखती घेतील. आणि त्याच दिवशी संध्याकाळी निवड झालेल्या उमेदवारांच्या याद्या त्या ठिकाणी जाहीर केल्या जातील. आणि 1 जून 2006 पासून 12864 ठिकाणी अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना या योजनेमध्ये सामावून घेण्यात येईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई शहरात शालेय विद्यार्थीनीवर झालेला सामुहिक बलात्कार.

**मु.शी.** :मुंबई शहरात शालेय विद्यार्थीनीवर झालेला सामुहिक बलात्कार याबाबत सर्वश्री विनोद तावडे,नितीन गडकरी,मधुकर चव्हाण, डॉ.अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे, डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे,नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, डॉ.अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे, डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी "मुंबई शहरात शालेय विद्यार्थीनीवर झालेला सामुहिक बलात्कार", या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गुन्हेगारांना पकडले. ते अल्पवयीन असल्यामुळे त्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार बाल सुधारगृहात पाठविण्यात आल्याचे म्हटलेले आहे. गेल्या वर्ष-दोन वर्षामध्ये एकही दिवस असा गेला नाही की, अल्पवयीन मुली आणि महिलांवर बलात्कार झाल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये आलेली नाही.. त्यामध्ये अल्पवयीन मुलींवर अत्याचार करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. मानसिक विकृती, वासना लहान वयामध्ये जागृत करणारे दृश्य झोपडपट्यांमधील व्हीडीओ पार्लरमधून दाखविले जाते. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे, हे बाल वयाममध्ये बिंबवले जाते, याचा विचार केला जात नाही. हा प्रकार झाल्यानंतर त्यांना पकडले गेले आणि अल्पवयीन मुलांना बाल सुधारगृहात पाठविले जाते. परंतु त्यांच्यामध्ये काही सुधारणा होत नाही. त्या मुलांची विकृती वाढविणारी घाणेरडी दृश्ये व्हीडीओ पार्लरमध्ये दाखविली जातात. त्यांच्या मनात पाप जागृत करतात, त्यांच्यावर कडक कारवाई करणार आहात काय ? एक वर्षापूर्वी श्री. मोरे नावाच्या पोलीस कॉन्स्टेबलने बलात्कार केल्यानंतर शासनाने निर्णय घेतला की, बलात्काराचे खटले त्वरित निकाली काढण्यासाठी आणि आरोपीला शिक्षा करण्यासाठी केवळ बलात्काराचे खटले चालविण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करुन महिला न्यायाधिशाची नियुक्त करणार. त्याची अंमलबजावणी झालेली आहे काय ? ती झाली नसल्यास, केव्हा होणार आहे ? तिसरा प्रश्न असा आहे की, महिलांच्या अत्याचारामध्ये वाढ होत असल्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिलांसाठी समुपदेशन कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत काय ?

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी अश्लील व्हीडीओ चित्रण दाखविले जाते, त्यमुळे मुलांच्या मनावर परिणाम होत असल्याचे सांगितले. ज्या ज्या ठिकाणी अशाप्रकारच्या तक्रारी येतात किंवा सो-मोटो पोलिसांनी देखील अशा व्हीडिओ पार्लरवर कारवाई केलेली आहे. त्यांचे व्हीडीओ पार्लरचे लायसन्स रद्द केलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी अश्लील पोस्टर्स लावले जातात,त्यावर बंदी करण्याच्या संबंधात मुद्दा उपस्थित केला. ज्या महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये पोस्टर्स लावली जातात ती महानगरपालिका, नगरपालिका यांची परवानगी घेऊनच लावता येतात. कर्नाटक सरकारने याबाबतचा कायदा केलेला आहे. पोस्टर्स सेन्सॉर केल्याचे प्रमाणपत्र असल्याशिवाय पोस्टर्स लावता येत नाहीत. त्याप्रमाणे आपल्याकडेही तसे करता येईल काय ? ही बाब विचाराधीन आहे. तसे आपल्याकडेही करता येण्यासारखे आहे. तसे करण्यात येईल. बलात्काराच्या केसेस निकाली काढण्यासाठी जलद न्यायालये 12 ठिकाणी स्थापन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (पुढे सुरु....

करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये अमरावती, अकोला, बुलढाणा,जळगाव, नागपूर, यवतमाळ,पुणे, कोल्हापूर इ. ठिकाणी न्यायालये स्थापन करुन न्यायाधिशांचीही नेमणूक केलेली आहे. तसेच समुपदेशन कक्ष स्थापन करण्याचीही कार्यवाही चालू आहे.

श्रीमती कांता नलावडे : त्या ठिकाणी ती सीडी कोठून आणली त्या विक्रेत्यावर कारवाई केलेली आहे काय, त्याबाबतचा निवेदनामध्ये उल्लेख नाही. तेव्हा त्या सीडी विक्रेत्याला पकडले आहे काय, त्याच्यावर काय कारवाई केली, केली नसेल तर का केली नाही ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे: सीडी मुलांनी कोठून आणली, याबाबत त्या मुलांकडे विचारणा केली असता त्यांनी काही माहिती दिली नाही. तरीसुध्दा सन्माननीय सांगितल्याप्रमाणे त्याच्या खोलात जाऊन ती सीडी कोणाकडून आणली असेल किंवा घरातील माणसांनीच ती ठेवली असेल तर त्याबाबत कारवाई केली जाईल.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना रुपये 20 ऐवजी 50 रुपये मानधन देण्याच्या बाबतीत अंमलबजावणी न होणे.

**मु. शी.** : घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना रुपये 20 ऐवजी 50 रुपये मानधन देण्याच्या बाबतीत अंमलबजावणी न होणे याबाबत श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक व श्री. प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक व श्री. प्रतापराव सोनवणे यांनी घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना रुपये 20 ऐवजी 50 रुपये मानधन देण्याच्या बाबतीत अंमलबजावणी न होणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, या ठिकाणी जे निवेदन देण्यात आलेले आहे ते या सभागृहाची तसेच सर्व सन्माननीय सदस्यांची दिशाभूल करणारे आहे. या निवेदनाच्या संदर्भात मी आपले संरक्षण मागतो. वेगवेगळ्या क्षेत्रातील शिक्षकांना पाचवा वेतन आयोग लागू झाला. सुधारित वेतनश्रेणी लागू झाली. परंतु यांना मात्र 20 रुपयेच मिळतात. त्यामध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. यासंदर्भात अनेकवेळा या सभागृहामध्ये चर्चा झाली. दिनांक 16 जुलै, 2003 ला सभागृहात जी चर्चा झाली होती त्यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले होते ते मी वाचून दाखवतो. 20 रुपयांएवेजी 50 रुपये देण्याच्या संदर्भातील प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, "हमारे माननीय मुख्य मंत्री जी ने इस राशि को बढ़ाकर 50 रुपए करने के लिए मंजूरी दे दी है. जो शिक्षक घंटे के हिसाब से काम करते हैं, उन्हें जल्दी से जल्दी 50 रुपए मानधन दिया जाएगा. शिक्षकों को 50 रुपए देने की वजह से सरकार की तिजोरी पर 2 करोड़ 52 लाख 72 हजार रुपए का कार्यभार पड़ेगा." हा सगळा हिशेब झालेला आहे. शासनाने मान्य केलेले आहे. तथापि, गेल्या तीन वर्षामध्ये यासंदर्भातील आदेश निघालेले नाहीत. त्याच दिवशी आदरणीय मंत्रिमहोदय श्री. शिंगणे यांनी असे उत्तर दिलेले आहे की, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी हा निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे प्रशिक्षित शिक्षकांना 50 रुपये आणि अप्रशिक्षित शिक्षकांना 40 रुपये देण्याचा आपण निर्णय घेतला आहे. याचा अर्थ निर्णय झालेला आहे. किती खर्च येणार याचा हिशेबही त्यांनी सांगितलेला आहे. परंतु या ठिकाणी देण्यात आलेल्या निवेदनामध्ये अद्यापही याचा विचार चालू आहे असे म्हटले आहे. मंत्रिमंडळाची बैठक झाली तसेच याबाबत विचार करण्याचे शासनाचे धोरण आहे अशा पध्दतीचे उत्तर निवेदनामध्ये दिले आहे. म्हणून या निवेदनाच्या संदर्भात मला आपले संरक्षण पाहिजे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंदर्भातील अंमलबजावणी होणारे परिपत्रक किंवा जी.आर. शासन काढणार काय ? यामध्ये दुसरा प्रश्न विना अनुदानित कालावधीतील सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या संदर्भात आहेत. याबाबतीत या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. यासंदर्भात 9 डिसेंबरला चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय सभापतींनी असे आदेश दिले होते की, उच्च न्यायालयाने दिलेल्या

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. रामनाथ मोते ....

निर्णयाची पूर्णत: अंमलबजवणी येत्या एक महिन्याच्या आत करावी असे मी शासनाला निदेश देतो. माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशाबाबत कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. या निवेदनामध्ये ज्या ज्या बाबींचा उल्लेख केलेला आहे त्या सगळ्या बाबतीत निर्णय झालेला आहे. परंतु अद्यापही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. या ठिकाणी निवेदनामध्ये देण्यात आलेले उत्तर दिशाभूल करणारे आहे. हे निवेदन माननीय सभापतींचा तसेच या सभागृहाचा अवमान करणारे आहे. जे जे निर्णय झालेले आहेत, जे सभागृहामध्ये मान्य केलेले आहे त्यासंदर्भात अंमलबजावणी करण्याबाबतचा जी.आर. हे अधिवेशन संपण्यापूर्वी संबंधित खात्याकडून काढण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, घड्याळी तासावर काम करणाऱ्या शिक्षकांना 20 रुपयांऐवजी 50 रुपये मानधन देण्याचे शिक्षण खात्याने मान्य केले होते. ज्यावेळी मंत्रिमंडळासमोर हा विषय गेला त्यवेळी मंत्रिमंडळाने सांगितले की, सामाजिक न्याय विभागाच्या, आदिवासी विकास विभागाच्या शाळा आहेत, आश्रमशाळा आहेत, ज्या ज्या ठिकाणी घड्याळी तासावर विषय शिक्षक आहेत त्या सगळयांच्या बाबतीत एकत्रित विषय आणावा. त्यामुळे हा विषय लांबला. 20 रुपयांऐवजी 50 रुपये देण्याच्या ऐवजी उच्च न्यायालयाने 72 रुपये प्रति तास द्यावे असे सांगितले आहे. तसा निर्णय लवकरात लवकर घेऊन शासन त्याची अंमलबजावणी करील. दुसरा प्रश्न विना अनुदानित कालावधीतील सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्यासंबंधीचा आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे तो मत्रिमंडळाने मान्य केलेला आहे. परंतु जे अर्जदार कोर्टात गेले होते त्यांच्यापुरतेच ते करावे असा निर्णय असल्यामुळे त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

**तालिका सभापती** : एक महिन्याच्या आत त्याची अंमलबजावणी व्हावी असे आदेश माननीय सभापतींनी दिलेले होते. त्यासंदर्भात शासनाने काय केलेले आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : ही बाब आम्ही पुन्हा मंत्रिमंडळासमोर घेऊन जाऊ.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी जे आश्वासन दिले ते आश्वासन देत असताना माननीय मुख्यमंत्र्यांशी यावर चर्चा झालेली आहे असे सांगून त्यांनी आश्वासन दिले.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 12:35

(श्री. नितीन गडकरी ...)

माननीय मुख्यमंत्री त्यावेळी सभागृहामध्ये हजर होते. एक महिन्याच्या आत हे करा असे माननीय सभापतींनी दुस-यांदा आदेश दिले. तालिका सभापती महोदया, या सभागृहामध्ये गेल्या दोन-चार वर्षापासून काय घडत आहे हे काही मला कळत नाही. माननीय सभापतींनी आदेश दिल्यानंतर देखील सरकार ते बेजबाबदारपणे ऐकत नाही. ही पध्दत लोकशाही परंपरेला सुदृढ करणारी नाही. माननीय सभापतींच्या आदेशांचा अवमान हा या सभागृहाचा अवमान आहे. माननीय सभापतींनी आदेश दिल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी त्यावेळी होय म्हणायचे आणि नंतर त्या आदेशांचे पालन करावयाचे नाही, अशा प्रकारचा घटना वारंवार घडत आहेत. अशा प्रकारच्या घटना घडता कामा नयेत. माननीय सभापतींच्या आदेशांची अवहेलना होता कामा नये, त्यांच्या आदेशांना मंत्री महोदयांना केराची टोपेली दाखवता कामा नये, म्हणून माझी नम्र विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या आत माननीय सभापतींनी दिलेल्या आदेशाचे मंत्री महोदयांनी पालन करावे असे आदेश आपण द्यावेत, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. हसन मुश्रीफ : तालिका सभापती महोदया, आम्ही उच्च परंपरांना मानणारी माणसे आहोत. हे खरे आहे की, तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी हे सांगितलेले होते. अशा प्रकारचे शिक्षक आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग, आश्रमशाळा अशा सर्व विभागात आहेत. या सर्व शिक्षकांच्या बाबतीत एकत्रित प्रस्ताव आणावयाचा आहे. आम्ही ताबडतोबीने मंत्री मंडळापुढे हा विषय नेण्याचा प्रयत्न करुन....

श्रीमती संजीवनी रायकर : शासन एक महिन्याच्या आत उत्तर देणार होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा विषय केव्हा आणलात ? या प्रश्नाला तीन वर्षे होऊन गेली. सगळया विभागातील शिक्षक एकत्र करण्याची गरज नाही. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतीत निर्णय झाला पाहिजे. ज्यांनी अर्ज केलेला आहे त्यांना कोर्टात जावे लागणार आहे. याचा अर्थ सगळया हजार-बाराशे शिक्षकांनी अर्ज करुन कोर्टात जावे असे शासनाला सांगावयाचे आहे काय ? याबाबतीत शासन निर्णय घ्यायला सक्षम नाही, हे मंत्री महोदय मान्य करतील काय ?

श्री. नितीन गडकरी : तालिका सभापती महोदया, माझ्या हरकतीच्या मुद्यावर आपण निर्णय द्यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

प्रा. बी.टी.देशमुख : तालिका सभापती महोदया, माझाही हरकतीचा मुद्दा आहे. आपण शासनाला दोन मुद्यांची सरमिसळ करण्याची परवानगी देऊन नये. तासिकेचा प्रश्न हा महत्वाचा असून तो वेगळा प्रश्न आहे. विनाअनुदान काळातील सेवा धरण्याच्या बाबतीतील प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा झाली होती. त्यामुळे त्या प्रश्नाचे स्टेटस वेगळे आहे. ही गोष्ट आम्ही मान्य करतो असे शासनाच्यावतीने अनेकदा सांगण्यात आलेले आहे. परंतु नंतर शासनाची नियत बदलली. या सभागृहामध्ये ज्येष्ठ कॅनिनेट मंत्री असे म्हणाले की, हायकोर्ट हे थोडेच फायनल आहे काय ? या देशात सुप्रीम कोर्ट आहे. आम्ही सुप्रीम कोर्टात जाऊ. माझ्या जवळ जजमेंटची प्रत आहे. सुप्रीम कोर्टात जाण्याची मुदत केव्हाच निघून गेली होती. या प्रश्नाच्या बाबतीत सभागृहाची बैठक अर्धा-तास तहकूब झाली होती. या प्रश्नाच्या संदर्भातील जजमेंट आणि अन्य सर्व कागदपत्रे माननीय सभापतींना त्यावेळी दाखविण्यात आली. हा प्रश्न दिनांक 9.12.2005 रोजी सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेला होता.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ...

सभापती महोदया, या विषयाच्या संदर्भात दि. 9.12.2005 रोजी माननीय सभापतींनी सरकारला जे निदेश दिले ते मी वाचून दाखवितो. माननीय सभापती असे म्हणाले की, "मी माझे रुलींग देत आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे. सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. यापूर्वी या विषयावर 2-3 वेळा चर्चा होऊन सुध्दा दुर्देवाने प्रश्नाची उकल होऊ शकलेली नाही अशी परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी,बी.टी.देशमुख,जोगेंद्र कवाडे,रामनाथ मोते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, घटनेप्रमाणे उच्च न्यायालयाने,सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे हे राज्य सरकारवर बंधनकारक असते. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयात अपील केलेले नाही हे मागच्या वेळी देखील सांगितले आहे. आजही तीच परिस्थिती आहे. सरकारला याबाबतीत अन्य कोणता कायदेशीर सल्ला घ्यायचा असेल तो त्यांनी घ्यावा. परंतु, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णतः अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा मी शासनाला निदेश देतो".

सभापती महोदय, शासन माननीय सभापतींनी दिलेले निदेश ऐकत नाही. हायकोर्टाने निर्णय दिला त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की शासन निर्णयात अशी व्यवस्था नाही त्यामुळे ती सेवा धरलेली नाही. येथे विलंब लावण्याची नीती अवलंबिल्यामुळे 7 लोक कोर्टात गेले हे बरोबर नाही. छळ किती करावयाचा याला सुध्दा काही मर्यादा आहेत. मंत्रिमंडळासमोर बाजू मांडता आली नाही याची शिक्षा लोकांना का ? माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे. याबाबतीत शासनाने हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेऊन तो सभागृहाच्या पटलावर ठेवावा. तसे झ ााले तर ते सभ्यतेला आणि संस्कृतीला धरुन होईल. माननीय सभापतींनी सरकारला निदेश देऊन सुध्दा जर त्याचे पालन होत नसेल तर त्यातून माननीय सभापतींची बेअब्रू होईल.

श्री. हसन मुश्रीफ : माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. या विषयाच्या बाबतीत एक महिन्यात आत मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणून निर्णय घेतला जाईल आणि प्रस्ताव मंजूर करुन त्याची अंमलबजावणी केली जाईल एवढे आश्वासन मी या निमित्ताने सभागृहाला देतो.

....2

**तालिका सभापती** ( श्रीमती सुधा जोशी ) : 9 डिसेंबर,2005 रोजी माननीय सभापतींनी निदेश देताना सरकारला निर्णय घेण्यासाठी एक महिन्याची मुदत घालून दिली होती. ती मुदत संपून आता बरेच महिने झालेले आहेत. आता पुन्हा यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळापुढे जाण्याची काय आवश्यकता आहे ? हायकोर्टाने निर्णय दिलेला असून सुध्दा मंत्रिमंडळापुढे जाण्याची आवश्यकता आहे असे मंत्रीमहोदय आपण सांगत आहात. हे अधिवेशन संपण्याच्या आत हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सरकार करील असा निर्णय आपण का घेऊ शकत नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, विना अनुदानित शाळातील शिक्षक उच्च न्यायालयात गेले होते त्यानंतर कोर्टाने निर्णय दिला. हा विषय मंत्रिमंडळासमोर यापूर्वी आला होता त्यावेळी मंत्रिमंडळाने सांगितले की ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे लोक असतील त्या सर्वांची माहिती गोळा करा. त्यामुळे आता हा विषय पुन्हा मंत्रिमंडळासमोर ठेवू......

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शासनाने एखादा निर्णय घेतल्यानंतर जेव्हा कोणी हायकोर्टात जाते त्यावेळी हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी शासनाने करावयाची असते. हायकोर्ट सुप्रीम आहे. हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही म्हणून जेव्हा काही लोक न्यायालयाचा अवमान झाला म्हणून कोर्टात गेले होते त्यावेळी माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सांगितले की सरकार सुप्रीम कोर्टात जाईल. परंतु सरकार सुप्रीम कोर्टात गेले नाही. हायकोर्टाने दिलेल्या निर्णयानंतर सरकारला कॅबिनेटपुढे जाण्याची गरज नाही. असे कधी होत नाही. हायकोर्टाच्या निर्णयाचे विश्लेषण मंत्रिमंडळात होऊ शकत नाही. सरकारला तसा अधिकार नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, जी व्यक्ती कोर्टात गेली होती त्यासंदर्भात विधि आणि न्याय विभागाचे मत शासनाने घेतले होते. हायकोर्टाने निर्णय दिला त्याबद्दल काही चर्चा झाली नाही. ही चर्चा त्या व्यक्तीपुरती मर्यादित होती.

यानंतर श्री. खर्चे पी.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय मंत्री महोदय म्हणतात की, चुकीचे रेकॉर्डवर राहू नये. परंतु मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, या सभागृहात दिनांक 11 जून, 2004 रोजी तारांकित प्रश्न क्र. 36739 च्या अनुषंगाने वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने 24 सप्टेबर, 2000 रोजी याचिका क्र.4346/2000 च्या अनुषंगाने दिला होता हे खरे आहे काय ? असे विचारले असता त्याला उत्तर "होय" असे दिलेले आहे. मग आता मंत्री महोदय म्हणतात की, एका याचिकाकर्त्यापुरता हा निर्णय मर्यादित होता, अशा वेळी चुकीचे रेकॉर्डवर राहू नये म्हणून मंत्री महोदय आग्रह धरतात तो त्यांचा आग्रह कितपत योग्य आहे ? तसेच सर्वोच्च न्यायालयात अपिल करण्याची वेळ निघून गेलेली आहे, हे मंत्री महोदय विसरुन गेलेले दिसतात. केवळ आता मंत्रिमंडळात आपल्याला आपला विषय मांडता आला नाही म्हणून हे नवीन प्रकारचे भजन आपण येथे सुरु केले आहे. आपल्याला विचारले आहे की, ही सर्व कागदपत्रे तपासून माननीय सभापतीनी त्यावेळी जो निर्णय दिला तो म्हणजे सुप्रिम कोर्टात जाण्याची वेळ आता निघून गेली आहे. म्हणून एक महिन्याच्या आत कोर्टाच्या निर्णयानुसार शासनाने अंमलबजावणी करावी परंतु दुर्देवाने शासनाला तसे करता आले नाही, ही गोष्ट मोठी संकोचाची आहे. निदान आता तरी शासनाने सांगावे की, यासंबंधीचे आदेश सोमवारला सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. आणि तसे सांगितले नाही तर आमची माननीय सभापतींना विनंती आहे की, आपण शासनाला निदान मंगळवारला तरी हे आदेश पटलावर ठेवण्याबाबतचे आदेश द्यावेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, आता सर्व गोष्टी पटलावर आलेल्या आहेत. आपण दिलेले निदेश पटलावर आहेत, उच्च न्यायालयाचा निर्णय पटलावर आलेला आहे, सुप्रिम कोर्टात जाण्याची मुदत संपली असल्याचा मुद्दाही पटलावर ठेवलेला आहे. एवढेच नव्हे तर हा निर्णय शासनाला घ्यावा लागणार असल्याचेही पटलावर आले आहे व त्यासंबंधी दिलेले उत्तरही पटलावर आले आहे. तरी देखील आता वरुन पुन्हा अशा प्रकारचा प्रयत्न करण्यात येत आहे. आता प्रश्न असा आहे की, हे शिक्षक, हायकोर्ट, कॅबिनेट आणि माननीय सभापती यांचे सर्व मुद्दे पटलावर असतांनाही शासन निर्णय घेत नाही म्हणून मला आता केवळ शिक्षकांचीच चिंता राहिली नाही तर या सभागृहातील सर्वोच्च स्थानी असलेल्या सभापतींची. कारण सभापतीस्थानावरुन

.......2

श्री. नितीन गडकरी ......

दिलेले निदेश देखील लाईटली घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. माझी विनंती आहे की, आपण दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी शासन करीत नाही, म्हणून आपण एकदा सांगून टाका की, यानंतर या स्थानावरुन निदेश दिले जाणार नाहीत, आता निदेश दिल्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करते. खालच्या सभागृहात असा प्रकार घडला आहे. म्हणून आपल्या पदाचा सन्मान रहावा म्हणून आपण काही तरी भावना व्यक्त करणार आहात की नाही, अशा प्रकारे या सर्वोच्च स्थानाचे अवमूल्यन होत असेल तर ते कसे योग्य होणार आहे ? म्हणून यासंबंधात Nothing doing, आता काहीच नको तर बरोबर सोमवारी सर्व आदेश काढून ते टेबल करावेत असे कडक शब्दात निदेश शासनाला द्यावेत, अन्यथा या सभागृहाच्या नियमात अडथळा येईल.

( **सभापतीस्थानी माननीय उपसभापती** )

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सभापतींचे स्थान सर्वोच्च असे मानणाऱ्यांपैकी मी आहे. आपल्या आदेशांचे पालन करणे हे आमचे काम आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मंत्रिमंडळासमोर हा विषय कशा पध्दतीने आला हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे.......(अडथळा)..........

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, माझे प्रथम ऐकून घ्यावे, अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय उत्तर देत आहेत. त्यांचे उत्तर आपण शांतपणे ऐकून घ्यावी. आपण सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांना टार्गेट करीत आहात हे बरोबर नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय, उच्च न्यायालय, विधानपरिषदेचे सभागृह, माननीय सभापती यांना टार्गेट करीत आहेत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मंत्रिमंडळासमोर जाऊन एक महिन्यामध्ये निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल असे आश्वासन मी सभागृहाला दिलेले आहे. यात न्यायालयाचा अवमान होत नाही. शिक्षकांना निवडश्रेणी देणे गरजेचे आहे हे मला देखील मान्य आहे. त्यामुळे सदर विषय मंत्रिमंडळापुढे वकिली पध्दतीने पटवून देण्यात येऊन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभातपी महोदय, आपण दिलेले निदेश देखील शासन पाळत नाही. त्यामुळे "मी दिलेले निदेश शासन पाळत नाही, गांभीर्याने घेत नाही" असे आपण म्हणावे....

**उपसभापती** : निवेदनावर चर्चा किती वेळ करायची ?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आताच आपण सभागृहामध्ये आला आहात. येथे निवेदनावर किती वेळ चर्चा करायची हा मुद्दा नाही. दिनांक 14.9.2000 रोजी हायकोर्टाने निर्णय दिला आहे. विना अनुदान काळातील सेवा ग्राहय धरण्यात यावी असा धोरणात्मक निर्णय दिला आहे हे खरे आहे काय ? त्याला शासनातर्फे 'होय' असे उत्तर देण्यात आले आहे. दिनांक 11 जून 2004 रोजी या सभागृहात तारांकित प्रश्न क्र.36739 विचारला असता, त्यास शासनाने असे उत्तर दिले आहे की, "वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी विना अनुदानित शाळांतील सेवाकाळ अनुज्ञेय न धरण्याची कृती ही नियमबाहय आहे असा धोरणात्मक निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक 14 सप्टेंबर 2000 रोजी याचिका क्रमांक 4346/2000 च्या अनुषंगाने दिला होता हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला असता त्यास 'होय' असे उत्तर देण्यात आले. त्यानंतर मग अनेकदा 15 दिवसात करू, एक महिन्यामध्ये करू असे सांगण्यात आले. मंत्रिमहोदय माननीय सभापतींची दिशाभूल करीत आहेत. तेव्हा आपण माझे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून घ्यावे. ज्यावेळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

या प्रश्नासंबंधी सभागृहात चर्चा झाली त्यावेळी मंत्रिमहोदयांनी सांगितले की, शासन सुप्रीम कोर्टात जाऊ शकते. पण आता सुप्रीम कोर्टात जाण्याची मुदत ही केव्हाच संपलेली आहे. या प्रश्नासाठी त्यावेळी सभागृहाची बैठक अर्धातास स्थगित करण्यात आली होती. यासंबंधी माननीय सभापतींच्या दालनात संबंधित विभागांच्या सचिवांबरोबर चर्चा देखील झाली होती. त्यावेळी न्यायालयाच्या निर्णयाची प्रत पाहिल्यानंतर माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिला होता. येथे लक्षात घेतले पाहिजे की, सुप्रीम कोर्टामध्ये अपील करण्याची मुदत ही केव्हाच निघून गेली आहे. हायकोर्टाने 7 प्रकरणांसंबंधी निर्णय दिला होता. पण आता शासनाची दोन-चार महिन्यात भाषा बदलली आहे. शासनाचे म्हणणे आहे की, जे कोर्टात गेले आहेत, तेवढयांनाच फायदा मिळेल. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची पूर्णत: अंमलबजावणी येत्या एक महिन्यात करावी असा निदेश दिनांक 9 डिसेंबर 2005 रोजी माननीय सभापती महोदयांनी शासनाला दिला होता. पण सभापती महोदयांच्या निदेशावर उद्धटपणाने येथे मंत्रिमहोदयांनी खुलासा केलेला आहे. मंत्रिमहोदय येथे तळमळीने सांगत आहेत की, एक महिन्यामध्ये निर्णय घेण्यात येईल. माननीय सभापतींनी निदेश दिल्यानंतर देखील शासन त्याची अंमलबजावणी करीत नसल्यामुळे यासंबंधीचा निर्णय घेऊन येत्या सोमवार पर्यंत यासंबंधीचे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

नाही तर आपण स्वत:हून असे आदेश द्या की, हे निर्देश मंगळवारी सभागृहापुढे ठेवावेत. महोदय, जर असे केले नाही तर या सभागृहाची प्रतिष्ठा वाचविण्याचा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध नाही.

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, केवळ मी सांगितल्याने हा प्रश्न सुटणारा नाही. हा विषय मंत्रिमंडळासमोर आणावा लागेल. त्याची पूर्वपीठीका लक्षात घेणे आवश्यक आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्या. मी असे सांगत आहे की,.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हे सभागृह लोकशाहीने प्रस्थापित केलेल्या घटनेच्या नियमाप्रमाणे चालणार आहे की नाही ? हाच माझा हरकतीचा मुद्दा आहे. महोदय, ज्यावर आज चर्चा सुरु आहे ते सभागृहामध्ये तीन-चार वेळा मान्य करण्यात आले. या विषयी हाय-कोर्टाचा निर्णय मान्य करण्यात आला. तसेच विधी व न्याय विभागाचे मत मागितले गेले आणि अमूक-अमूक करण्यात येईल असे मान्य करण्यात आले. एका ज्येष्ठ मंत्र्यानी तर हाय कोर्टाच्या विरुध्द अपील करु शकतो असे सांगितले. परंतु नंतर पुन्हा असे सांगण्यात आले की, सुप्रीम कोर्टामध्ये ज्या मुदतीत जावयास हवे होते ती मुदत संपली आहे. परंतु या विषयी ज्यावेळी सभागृहात गोंधळ झाला त्यावेळी सभापती म्हणून आपण निदेश दिले होते. आपण निदेश देऊनही जर तो विषय कॅबिनेटसमोर ठेवला जात असेल तर काय करावे ? महोदय, मला तर वाटते की, सभापतींनी दिलेले निदेश मंत्रिमंडळाच्या बैठकीत तपासण्यात येतील असा एकदाचा कायदाच करुन टाका. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी जे बोलत आहेत तो एक प्रकारे आपला अपमान आहे. माननीय सभापतींचे निदेश, हाय-कोर्टाचा निर्णय इतकेच नव्हे तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आश्वासनही पूर्ण केले जात नाहीत. उलट सभापती या नात्याने आपण ज्या विषयी निदेश दिले होते, तो विषय कॅबिनेटसमोर सादर करण्याबाबत माननीय मंत्री महोदय सांगत आहेत. महोदय, संविधानिक पध्दतीमध्ये, नियमाप्रमाणे सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून निदेश देणे हा आपला अधिकार आहे. सभापती म्हणून अधिकाराने दिलेल्या निदेशाला जर कॅबिनेटमध्ये चर्चा होऊन जर ते निदेश नाकारले जाणार असतील तर तो एक प्रकारे आपला अपमान आहे, त्यामुळे या संदर्भात आपण काही प्रतिक्रिया देणार आहात की नाही ? श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय...

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : मी माननीय मंत्री महोदयांना हात जोडून विनंती करतो की, कृपया आपण खाली बसा. नियमांची धज्जी उडविण्यासारखे जे वक्तव्य आपण केले आहे त्याबद्दल माझी मान शरमेने खाली जात आहे. मी माननीय मंत्री महोदयांची माफी मागून सांगू इच्छितो की, ते जे काही बोलत आहात ते कानाला ऐकावेसे वाटत नाही.

महोदय, सभापती म्हणून शासनाला निदेश द्यावयाचे नाहीत असा एकदाचा आपण निर्णय घेऊन टाका. विधानसभेमध्ये माननीय अध्यक्षांचे निदेश पाळले गेले नाही तेव्हा माननीय अध्यक्षांनी सांगितले होते की, मी सभागृहाचे कामकाज करीत नाही. या सभागृहाच्या आणि सभापती म्हणून आपल्या प्रतिष्ठेकरिता माननीय मंत्री महोदयांना या संदर्भात सांगणे हा आपला अधिकार आहे. पुढच्या सोमवारपर्यंत मला चर्चा करावयाची नाही. त्यामुळे या विषयी काढलेले निर्देश शासनाने पटलावर ठेवावे. हे केवळ आपल्या प्रतिष्ठेकरिता मी सांगत आहे. परंतु हे जर रेकॉर्ड होणार असेल तर महाराष्ट्राच्या इतिहासात असे नोंदविले जाईल की, सभापतींनी दिलेले निदेश कॅबिनेटमध्ये मान्यतेसाठी जातात. महोदय, असा अपमान आम्ही सहन करणार काय ? त्यामुळे या संदर्भात आपण निदेश द्यावेत एवढीच मी विनंती करीत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याला जोडून मी घटनात्मक मुद्दा उपस्थित करु इच्छितो. महोदय, हाय-कोर्टाच्या न्यायाधीशांनी दिलेल्या निर्णयाबाबत आपल्याला या ठिकाणी चर्चा करता येत नाही. पाच-दहा वर्षांपूर्वी अशी चर्चा होती की, गणपती उत्सवात न्यायाधीशांनी भाषण केले असेल तर त्यांच्यावर टीका करता येईल की नाही ? हाय-कोर्टाच्या न्यायाधीशांनी जे जजमेंट दिले त्याचा, त्यांच्या वर्तनाबाबत, आचरणाबाबत आपण या ठिकाणी चर्चा करु शकत नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ....

सभापती महोदय, हा धोरणात्मक निर्णय असल्याबाबत त्यांनी सभागृहात कबूल केले आहे. यासंबंधी फुलप्रूफ उत्तर पाहिजे. आपण आम्हास या संदर्भात संरक्षण दिले पाहिजे नाही तर असे होईल की, या सभागृहात हायकोर्टाने दिलेले निर्णय हे धोरणात्मक निर्णय आहेत असे उघडउघडपणे, राजरोसपणे सांगून त्या निर्णयांना डांबर फासण्याचे काम केले जाईल. सभापती महोदय, आपणही या संदर्भात आदेश दिला आहे. या संदर्भात सभागृहाची प्रतिष्ठा राहिली पाहिजे. यासंबंधी एका महिन्यात निर्णय करण्यासंदर्भात दिनांक 9 डिसेंबर, 2005 रोजी आपण सांगितले होते. परंतु दुर्दैवाने त्यांनी तसे केले नाही. तरी, सभापती महोदय, आपण या संदर्भात सोमवार किंवा मंगळवारपर्यंत निर्णय देण्याबाबत त्यांना आदेश द्यावेत.

( गोंधळ )

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माझे देखील म्हणणे ऐकून घ्यावे. त्यांचा हरकतीचा मुद्दा व त्यावरील माझे उत्तर हे दोन्ही पाहून आपण निर्णय द्यावा.

**उपसभापती** : आपण माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर ऐकून घेऊ या आणि त्यानंतर या संदर्भात निर्णय दिला जाईल.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व प्रा. बी.टी.देशमुख यांनी अतिशय तळमळीने हा विषय मांडला आहे. माझ्या भावी जीवनात देखील अशाप्रकारे आदर्श घेण्याची आवश्यकता आहे. निवेदनाच्या उत्तरामधील पृष्ठ क्रमांक 2 मध्ये असे लिहिण्यात आले आहे की, " विनाअनुदानित काळातील सेवा वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या दृष्टीने मंत्रिमंळासमोर सादर केला असता मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे.

1) मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक : 4346 / 2000 मध्ये दिनांक 14.9.2000 रोजी दिलेल्या निर्णयाचा लाभ केवळ अर्जदारांना देण्यात यावा. "

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात. )

सभापती महोदय, माझे देखील ऐकून घ्यावे. त्यानंतर आपण द्याल ते निदेश मला मान्य आहेत. सभापती महोदय, आपले स्थान अबाधित आहे. आपण यासंबंधी कोणताही निर्णय द्या. परंतु माझे म्हणणे ऐकून घ्यावे. ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, असत्य माहिती देण्याचा त्यांना अधिकार नाही.

**उपसभापती** : आपल्याला माझे निर्देश ऐकावयाचे असतील तर मला माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे ऐकून घ्यायला पाहिजे. कोण सत्य आणि कोण असत्य हे या ठिकाणी बसल्यानंतर मला माहिती असते. मी आपल्याला एवढीच विनंती करतो की, त्यांचे म्हणणे आपण ऐकून घ्यावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांच्या उत्तराने आपला अपमान होणार आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपला अपमान होऊ दिला जाणार नाही. आपण आम्हाला हृदयस्थानी आहात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ते निर्णयाला डांबर लावत आहेत. सभापती महोदय, आपण सुप्रीम आहात.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण एका महिन्यात निर्णय का घेतला नाही ? याबाबत सांगावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघापासून यांचे कौतुक करत होतो.

( गोंधळ )

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, It is a total ignorance of the House. It is a total ignorance to the Hon. Chair.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व प्रा. बी.टी.देशमुख यांनी त्यांचे मुद्दे गेली अर्धा तास मांडले आहेत. ते मुद्दे मांडत असताना, माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या भाषणामध्ये कोणत्याही प्रकारे अडथळा आणला नाही. त्यांचे म्हणणे पूर्णपणे ऐकून घेतले. तरी, सन्माननीय सदस्यांनी देखील माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर ऐकून घेतले पाहिजे. त्यानंतर सभापती महोदय आदेश देतीलच. सभापती महोदय, हे बरोबर नाही. माननीय मंत्रिमहोदयांना म्हणणे मांडू दिलेले नाही. आम्ही म्हणू तेच झाले पाहिजे, ही प्रवृत्ती बरोबर नाही.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मला माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे ऐकूण घेऊ द्या त्यानंतर मी निर्देश देतो.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासन निर्णय दिनांक 13 सप्टेंबर, 1990 ला जोडलेल्या परिशिष्टातील कलम 2-क अशा रीतीने दुरुस्त करण्यात यावे की, वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ देण्याकरिता परिगणना करण्यात येणारी अर्हताकारी सेवा ही शाळा प्रथम अनुदानावर आल्याच्या प्रथम वर्षापासून ( 25 टक्के/20 टक्के ) ग्राहय धरण्यात यावी. या निर्णयाबाबत विधी व न्याय विभागाचे मत मागितले असता न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होत नाही, असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत. तथापि याबाबत सकारात्मक दृष्टीने विचार करुन हा प्रस्ताव मान्य केल्याने येणारा आर्थिक भार तपासून हा प्रस्ताव पुन्हा मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. याबाबत एक महिन्याच्या आत शासनातर्फे युक्तीवाद केला जाईल व त्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. याबाबत सभापती महोदय जे निर्देश देतील ते आम्हाला मान्य आहेत.

**उपसभापती** : यासंदर्भातील निर्णय माननीय सभापती यांनी डिसेंबर महिन्यात दिलेले होते. त्या निर्देशात अशा स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, हा निर्णय एक महिन्यामध्ये ताबडतोबीने घेण्यात यावा. परंतु आता दोन-तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेलेला आहे. या निर्णयामध्ये आर्थिक बाब असल्यामुळे येत्या आठवडयात जी मंत्रिमंडळाची बैठक होईल त्यामध्ये निर्णय घेऊन अधिवेशन संपण्याच्या आत निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्देश दिल्यानंतर मंत्रिमंडळापुढे जाण्याची गरज नाही. मंत्रिमंडळाने जर हा निर्णय फेटाळला तर ते योग्य होणार नाही. मंत्रिमंडळापेक्षाही आपण सुप्रिम आहात, आपण दिलेले निदेश तपासण्याची गरज नाही. आपणास वाटले तर याबाबत ॲडव्होकेट जनरलचे मत घ्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2....

**उपसभापती** : यामध्ये आर्थिक बाबींचा संबंध येत असल्यामुळे हा विषय मंत्रिमंडळापुढे जाणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी निर्देशाचे पालन करण्याचे मान्य केलेले आहे. जे निर्देश दिलेले आहेत त्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला होता. आता त्यास तीन महिने झालेले असल्यामुळे त्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रिमंडळापुढे जाणे गरजेचे आहे. माननीय सभापती यांनी 5 डिसेंबर, 2005 रोजी हे निर्देश दिलेले आहेत त्या निर्देशांची अंमलबजावणी हे अधिवेशन संपण्याच्या आत ताबडतोबीने करावी. मंत्री महोदयांनी हा प्रस्ताव येणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवावा व त्यानंतर तसे निवेदन सभागृहात करावे, अशा प्रकारच्या सूचना मी देत आहे.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VVK/ MHM/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 13:05

**पृ.शी.**: "राज्यामध्ये वाढत चाललेले सेक्स स्कॅण्डलचे प्रकार"

**मु.शी.**: "राज्यामध्ये वाढत चाललेले सेक्स स्कॅण्डलचे प्रकार" याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, ॲड, अनिल परब, श्री. अनंत तरे, श्री. अरविंद सावंत, श्री. नितीन गडकरी, श्रीमती संजीवनी रायकर, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, ॲड, अनिल परब, श्री. अनंत तरे, श्री. अरविंद सावंत, श्री. नितीन गडकरी, श्रीमती संजीवनी रायकर, श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी "राज्यामध्ये वाढत चाललेले सेक्स स्कॅण्डलचे प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : सोबतचे निवेदन येथे छापावे )

.......4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नगर जिल्हयामध्ये ही दुसरी घटना घडलेली आहे. कायद्यानुसार या ठिकाणी वेगवेगळया घटना नोंदविलेल्या आहेत.  अहमदनगर, जालना, नागपूर अशा ठिकाणी घटना घडत आहेत. नागपूर येथील पोलिसांनी जर त्या मुलीला हटकले नसते तर दिल्ली येथील "गंगा-जमुना" हया वेश्या वस्तीमध्ये त्या मुलीची विक्री करण्यात आली असती. मुंबई पुणे ही दोन शहरे सोडली तर ज्युवेनाईल ॲक्ट आणि ज्युवेनाईल प्रोटेक्ट युनिट इतर जिल्हयामध्ये अस्तित्वात नाही.  म्हणून हे युनिट सर्व महाराष्ट्रामध्ये कायद्यानुसार करण्यात येईल काय ?  माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हया अशा सगळया केसमध्ये अटकपूर्व जामीन देण्यात येतो म्हणून ते आरोपी लगेच सुटतात. तसेच अनेक वेळा यासंदर्भात तक्रारीसुध्दा नोंदविण्यात येत नाहीत.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

म्हणून या दुसऱ्या प्रकरणामध्ये आणि पहिल्या प्रकरणामध्ये देखील योग्य प्रकारे तपासामध्ये पोलिसांना सहकार्य होणे आवश्यक आहे तसेच या मुलींना ंन्याय मिळण्याच्या दृष्टीने, ज्याप्रकारे सुनील मोरेच्या प्रकरणामध्ये आपण ॲड.उज्ज्वल निकम यांना सरकारी वकील म्हणून नियुक्त केले होते त्याप्रमाणे नगरमध्ये वारंवार घडलेल्या या घटना पाहता ॲड. उज्ज्वल निकम यांचीच सरकारी वकील म्हणून नियुक्ती आपण कराल काय ? तसेच मुंबई व्यतिरिक्त राज्याच्या इतर सर्वच जिल्ह्यांमध्ये जेथे 'जापु' युनिट स्थापन झालेली नाही तेथे ताबडतोबीने ती स्थापन कराल का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मुंबई सोडून सध्या कोठेच 'जापु' युनिट नाही हे जे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते बरोबर आहे. अशा प्रकरणांच्या संदर्भात असे युनिट असणे गरजेचे आहे ही आपली सूचना चांगली आहे आणि त्याप्रमाणे सर्व जिल्ह्यांमध्ये हे युनिट देण्याचा विचार निश्चितपणे करण्यात येईल ...

डॉ. नीलम गोऱ्हे : पण आपल्याला हे युनिट सर्व जिल्ह्यांमध्ये देणे कायद्यानेच बंधनकारक आहे तेव्हा महिन्याच्या आत सर्वच जिल्ह्यांमध्ये हे युनिट आपण ताबडतोबीने स्थापन कराल का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, म्हणूनच मी सांगतो आहे की, लौकरात लौकर म्हणजे जेवढे शक्य होईल तेवढ्या लौकर हे जापु युनिट देण्याच्याबाबतीत निर्णय घेण्यात येईल. तसेच अशा सर्व प्रकरणांमध्ये ॲड. उज्ज्वल निकम यांच्या सारखे दर्जेदार वकील नियुक्त करण्यासंबंधात निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, नगरच्या या पहिल्या घटनेतील मुख्य आरोपी तर अजूनही सापडलेला नाही, तो फरारीच आहे. तेथे सुप्रीम कोर्टामध्ये हे मॅटर उद्या येणार आहे आणि या प्रकरणातील सदर आरोपी फरार घोषित करावयाचा व या प्रकरणी अजामीनपात्र गुन्हा दाखल करावयाचा आहे. तेव्हा शासन याबाबतीत अजून गंभीर आहे की नाही याची मला कल्पना नाही. मात्र 'जापु' युनिट केवळ नगर मध्येच नाही तर पूर्ण महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यात असणे आवश्यक आहे. सन्माननीय श्री.भुजबळ हे गृहमंत्री असताना त्यांनी याबाबत आदेश दिले होते की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये 'जापु' युनिट स्थापन झाले पाहिजे. पण अजूनही तसे ते स्थापन झालेले नाही. तेव्हा आता तरी आपण त्वरित ते सर्व जिल्ह्यांमध्ये स्थापन कराल का ? तसेच ॲण्टी ट्राफिकिंग कमिटी केली गेली पाजि जेणे करून बाल अत्याचार होतात त्याला प्रतिबंध होईल. दुसरा प्रश्न

..... एए 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नलावडे ....

असा आहे की, या दुसऱ्या घटनेमध्ये ज्या मुलीवर बलात्कार झालेला आहे ती मुलगी निराधार आहे, तिला वडील नाहीत. तेव्हा त्या मुलीला व तिच्या कुटुंबाला तसेच पहिल्या घटनेमध्ये देखील ज्या दोन मुली आहेत त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना शासन संरक्षण देणार आहे का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले होते की, या केसेसमध्ये ॲड.उज्ज्वल निकम यांचे सारखे नामांकित, हुशार वकील नेमले जातील. त्याप्रमाण या प्रकरणामध्ये ॲड.विजय सामंत यांची शासनाकडून नियुक्ती झालेली आहे व तसे पत्र देखील त्यांना दिलेले आहे. दुसरे जे सांगितले आहे त्याप्रमाणे लौकरात लौकर कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : त्या प्रकरणामधील डीवायएसपी श्री.जावळे यांची आपण नगरच्या बाहेर बदली केली आहे काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : होय. त्यांची बदली दुसऱ्याच दिवशी नगर जिल्ह्याच्या बाहेर आपण केलेली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : पण ते 30 एप्रिल रोजी निवृत्त होत आहेत. ... ही माहिती माननीय राज्यमंत्र्यांनी या निवेदनामध्ये सांगितलेली नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. आता या निवेदनावरील चर्चा आपण येथे थांबवू या. यानंतर दुसरे निवेदन, निवेदक क्र. 5 होईल. त्या पूर्वी मला आपणा सर्वांनाच विनंती करावयाची आहे की, नियम 93 खाली होणाऱ्या या निवेदनांवर एकच प्रश्न विचारावयास परवानगी द्यावी असा निर्णय यापूर्वी आपण घेतलेला आहे आणि अपवादात्मक प्रसंगी दोन वा तीन प्रश्न विचारण्यास मुभा द्यावी असेही आपण ठरविले होते. प्रत्येक निवेदन महत्त्वाचे असते हे बरोबर आहे, पण अशा प्रकारे प्रत्येक निवेदनावर अनेक प्रश्न होत असतील तर आपल्याला अन्य कामच करता येणार नाही. खालच्या सभागृहामध्ये अशा निवेदनांवर प्रश्नच होत नाहीत. आपल्या कामकाज सल्लागार समितीमध्येच आपण याबाबत निर्णय घेतलेला आहे त्याप्रमाणे निवेदनावर यापुढे एकच प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण सरकारला आणि मंत्र्यांना संरक्षण देत आहात असे वाटू लागले आहे ....

( यानंतर श्री. सरफरे .... बीबी 1 ..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आपण कामकाज सल्लागार समितीचे सदस्य आहात...

श्री. विनायकराव मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. संरक्षणाच्या नावाखाली माननीय सदस्यांनी काहीही बोलणे बरोबर नाही...

(गोंधळ)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, "वाह्यातपणा" हा शब्द असंसदीय आहे काय?

**उपसभापती** : मी तपासून पाहीन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय,आपले म्हणणे मला मान्य आहे. प्रत्येक निवेदनावर किती प्रश्न विचारावेत याला सुध्दा मर्यादा असली पाहिजे या मताशी आम्ही सहमत आहोत. परंतु बहुतांशी निवेदनामधील मूळ उद्देश अधिकाऱ्यांनी लपविलेला असतो. याबाबत मी मंत्र्यांना किंवा शासनाला दोष देणार नाही. मंत्रिमहोदयांना नोकरशाही मिसगाईड करीत आहे. अशा परिस्थितीत या सदनाच्या माध्यमातून एखाद्या महत्वाच्या विषयाला न्याय मिळवून देण्याची सभापती महोदय आपली जबाबदारी आहे. यामधील काही निवेदने बूमरँग करणारी आहेत. त्यामधील मूळ उद्देश बाजूला ठेवला जात आहे. आणि तो उद्देश गाठण्यासाठी आम्हाला अधिकचे एक-दोन प्रश्न विचारावे लागतात. निवेदनावरील प्रश्नोत्तरे लवकर आवरावीत अशी आमचीही इच्छा आहे, आपण दिलेला आदेश आम्हाला मान्य आहे. परंतु शासनाच्या निवेदनामध्ये मूळ उद्देश बाजूला ठेवला जात असेल तर तो हुडकून काढण्यासाठी अधिकचे प्रश्न विचारण्याची सवलत आपल्यामार्फत आम्हाला उपलब्ध व्हावी अशी माझी आपणास कळकळीची विनंती आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बीड जिल्हयातील चौसाळा येथे एका महिलेला विवस्त्र करुन तिची धिंड काढणे.

मु.शी. : बीड जिल्हयातील चौसाळा येथे एका महिलेला विवस्त्र करुन तिची धिंड काढणे याबाबत श्री. जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. श्रीकांत जोशी, सर्वश्रीमती कांता नलावडे, संजीवनी रायकर, सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, अशोक मोडक, विलास अवचट यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. जयंत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. श्रीकांत जोशी, सर्वश्रीमती कांता नलावडे, संजीवनी रायकर, सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, अशोक मोडक, विलास अवचट यांनी "बीड जिल्हयातील चौसाळा येथे एका महिलेला विवस्त्र करुन तिची धिंड काढणे."या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्रभाकर पाटील : सभापती महोदय, बीड जिल्हयातील चौसाळा येथे एका महिलेला विवस्त्र करुन तिची धिंड काढण्यात आली. यामध्ये 7 पैकी 4 आरोपींना पकडण्यात आले. उर्वरीत 3 आरोपींना किती दिवसात अटक करणार? या प्रकरणी चौसाळयाच्या सरपंचानी प्रोत्साहन दिले असल्यामुळे त्यांच्यावर आपण काय कारवाई केली? त्यांना अटकपूर्व जामीन देऊन आपण त्यांची सुटका केली आहे काय? याची उच्च पातळीवर शासन चौकशी करणार आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, यामध्ये एकूण 11 आरोपी असून त्यापैकी 9 आरोपींना अटक केली आहे. त्यामध्ये सरपंचाना देखील अटक केली आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी स्वत: घटनास्थळी भेट दिली असून मला मिळालेली माहिती धक्कादायक आहे. ज्या महिलेवर धोंडे मारण्यात आले त्या महिलेवरच पोलीस स्टेशनने पहिल्यांदा गुन्हा रजिस्टर केला. या प्रकरणातील आरोपींचे दारुचे दुकान व बीअर बार आहेत. त्यांचे स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये हितसंबंध असल्यामुळे गावामध्ये त्यांची प्रचंड दहशत आहे. हा प्रकार ज्यावेळी घडला त्यावेळी संपूर्ण गाव धृतराष्ट्रासारखा पहात राहिला, कुणीही मदत करण्यासाठी पुढे आले नाही. त्या महिलेच्या भावाला कुणी व्हेहिकल, मोटर सायकल सुध्दा द्यायला तयार नाही. त्या आरोपींनी दारुच्या दुकानांच्या बळावर, परमिट रुमच्या बळावर हे कृत्य केले आहे. त्यांचे परमिट आपण रद्द करणार काय? ज्या पोलीस इन्सपेक्टरने त्या महिलेवर गुन्हा दाखल केला त्याबाबत घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी मी त्या पोलीस स्टेशनला फोन केला आणि विचारले की, या महिलेला आपण कोणत्या प्रकारची मदत केली? त्यावेळी पी.एस.आय. श्री. बारकोल हे असे म्हणाले की, शेंडगे साहेब तुम्ही यामध्ये पडू नका त्या बाईचे चारित्र्य चांगले नाही. अशाप्रकारचे बेताल वक्तव्य करणाऱ्या श्री.बारकोल या पी.एस.आय. ला आपण सस्पेंड करणार काय? तिसरा प्रश्न असा की, कोर्टाने 12 वाजता आरोपींना सजा जाहीर केली असतांनाही संध्याकाळी साडे आठ वाजेपर्यंत आरोपी जेलमध्ये गेले नव्हते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 13:20

श्री.प्रकाश शेंडगे (पुढे सुरु...

तिसरा प्रश्न असा आहे की, कोर्टाने दुपारी बारा-साडेबारा वाजता निर्णय दिला. संध्याकाळी 8-00 वाजेपर्यन्त आरोपींना जेलमध्ये टाकलेले नव्हते. पत्रकाराने एका बारमध्ये आरोपी आणि फौजदार हे दारुची पार्टी करत असल्याचे पोलीस स्टेशनच्या निदर्शनास आणून दिले. परंतु त्या फौजदारावर कारवाई झाली नाही. त्याची फक्त बदली केलेली आहे. तेव्हा या दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांना सस्पेंड करणार आहात काय ? त्या महिलेला आर्थिक मदत देऊन तिचे पुनर्वसन करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी वाईन शॉपचा जो मालक आहे त्याने दबाव आणून हा प्रकार घडवून आणला असल्याचे सांगितले. तशी सन्माननीय सदस्यांनी माहिती द्यावी त्याबाबत योग्य ती कारवाई करण्याच्या संबंधात विभागाला सूचना देण्यात येतील. त्या आरोपींना मॅजिस्ट्रेट कस्टडी झाल्यानंतर त्या आरोपीला संध्याकाळपर्यन्त कोठडीमध्ये टाकले नाही, त्याच्या सोबत पोलिसांनी जेवण केले. त्या संदर्भात संबंधित उपनिरीक्षक श्री.रणदिवे यांना निलंबित करण्यात आलेले आहे. त्या पीडित महिलेच्या विरोधामध्ये 912 कलमाखाली गुन्हा दाखल केला त्याबाबत संबंधित अधिकाऱ्याची बदली केलेली आहे.. ज्यांच्या सांगण्यावरुन खोटे गुन्हा दाखल केला, त्या धनदांडग्या पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**उपसभापती** : आता निवेदन सहावे घेण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, त्या महिलेवर अत्याचार झालेला आहे त्या अधिकाऱ्याला सस्पेंड केले जात नाही. शासन त्याकडे गांभीर्याने पहात नाही.

..(अडथळा)....

श्री.दिवाकर रावते : लोकप्रतिनिधींनी फोन केल्यानंतर देखील तुम्ही यामध्ये लक्ष घालू नका असे त्या पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. या संदर्भात त्यांना निलंबित करुन सत्य काय आहे, ते पडताळणी करुन योग्य ती कारवाई करा. फक्त त्यांची बदली करुन काही उपयोग नाही. त्याला तोपर्यन्त निलंबित करणार आहात काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : श्री. बारकोल यांची बदली केलेली आहे आणि श्री.रणदिवे यांना निलंबित केलेले आहे.

श्री.विनोद तावडे : त्यांची फक्त बदली केली. त्यांना निलंबित का केले नाही ?

...(अडथळा)...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : पोलीस अधिक्षक काय करतात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ज्यावेळेला धटना धडली, त्यावेळेला तेथील सरपंचांनी अशी, अशी धटना धडलेली आहे, असे पोलीस स्टेशनला कळविले. त्यानंतर श्री.बारकोल हे त्या गावामध्ये चौकशी करण्यासाठी गेले असता, त्यांच्या समोर 30 लोक येऊन असे असे या गावामध्ये घडलेले आहे, असे सांगितले. परंतु प्रत्यक्षात व्यवस्थित पडताळणी केली नाही, म्हणून त्यांची बदली करण्यात आलेली आहे.

श्री.विनोद तावडे : त्यांची बदली करणे ही शिक्षा आहे काय ? त्यांना तात्काळ निलंबित करावे.

श्री.दिवाकर रावते : त्या ठिकाणच्या आमदांराना पोलीस अधिकाऱ्याने तुम्ही यामध्ये पडू नका, असे सांगितले असूनही त्याच्यावर कारवाई करणार नसाल तर ते योग्य नाही. त्यांना निलंबित करणार आहात काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : श्री.रणदिवे यांना निलंबित केलेले आहे.

श्री.विनोद तावडे : श्री.बारकोल यांना निलंबित करणार आहे की नाही ? त्याला आपल्याला संरक्षण द्यायचे आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : श्री.रणदिवे यांना सस्पेंड केलेले आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : श्री.बारकोल यांना निलंबित करण्याची कारवाई केली पाहिजे.

**उपसभापती** : पी.एस. आय. श्री.बारकोल यांनी काय केले नाही, ते मंत्री महोदयांनी सांगावे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, घटना घडल्यानंतर सुरुवातीला श्री. बारकोल हे त्या गावात माहिती घेण्यासाठी, तक्रार घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथील संबंधित लोक पुढे आले. त्यांच्याकडे खोट्या तक्रारी आल्या. त्या बाईने घरात येऊन चोरी केली वगैरे तक्रारी केल्या. त्या ठिकाणी गावातील जमाव जमला होता. त्यांनी त्यांच्याकडून नोंदवून घेतले. त्यानंतर असे लक्षात आले की, हे चुकीचे नोंदलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगण्याच्या अगोदरच विभागाने त्यांच्यावर कारवाई केली आहे. त्यांची बदली केलेली आहे. ज्या लोकांनी खोट्या तक्रारी केलेल्या होत्या त्या पाच लोकांवर गुन्हा दाखल केलेला आहे.

श्री. विनायक मेटे : त्या ठिकाणी त्या महिलेच्या संदर्भात तिला नग्न करणे वगैरे अतिशय वाईट घटना घडलेली आहे. तेथील उपसरपंच श्री. थोरात हे सूत्रधार आहेत. त्याला अटक केली. कोर्टात जाऊन नंतर कोर्टातून परत येत असताना दारुची पार्टी झाली. पोलीस मुख्यालयासमोर पार्टी झाली ही वस्तुस्थिती आहे. पोलिसांनी कारवाई केली असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. एकावर कारवाई केली आहे. बाकीच्यांवर कारवाई झालेली नाही. कारवाई करीत असताना जे जे लोक त्यामध्ये आहेत त्यांना निलंबित करुन त्यांना सजा झाली पाहिजे. तशी सजा शासन करणार काय ? या सजेच्या नावाखाली अनेक गावकऱ्यांना त्रास सुरु झालेला आहे तो त्रास थांबवणार काय ? बाकीच्या लोकांना सस्पेंड करणार कय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी आरोपीबरोबर जाऊन पार्टी केली. पी.एस.आय. श्री. रणदिवे यांना निलंबित करण्यात आले आहे.

श्री. श्रीकांत जोशी : श्री. बारकोल यांना संरक्षण का देत आहात ?

श्री. प्रकाश शेंडगे : त्या बिअरबारचे लायसन्स रद्द करा.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मी याबाबतीत उत्तर दिलेले आहे. श्री. बारकोल यांची बदली केलेली आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : त्या ठिकाणी खोट्या तक्रारी नोंदविलेल्या आहेत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या बाबी सांगितलेल्या आहेत त्या लक्षात घेऊन श्री. बारकोल यांची चौकशी करावी आणि त्या चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल ते सोमवारी किंवा मंगळवारी सभागृहासमोर ठेवावे. त्यानंतर काय निर्णय घ्यावयाचा तो घेऊ.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण हे निवेदन राखून ठेवलेले आहे काय ?

**उपसभापती** : नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : हे जे आरोपी आहेत त्यांनी कोणत्या राजकीय पक्षाकडून दबाव आणला होता काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ते मला माहीत नाही.

-------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले, देवगड, मालवण तालुक्यातील मच्छिमारांचे केंड माशांच्या धाडीने झालेले नुकसान.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले, देवगड, मालवण तालुक्यातील मच्छिमारांचे केंड माशांच्या धाडीने झालेले नुकसान याबाबत श्री. अनंत तरे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले, देवगड, मालवण तालुक्यातील मच्छिमारांचे केंड माशांच्या धाडीने झालेले नुकसान या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, वेंगुर्ले, देवगड, सावंतवाडी या सर्व तालुक्यांमध्ये किनारपट्टीवर केंड माशांमुळे मच्छिमार बांधवांवर संकट आलेले आहे. माशांचा दुष्काळ तसेच वाढता खर्च अशा परिस्थितीत केंड माशांमुळे त्या ठिकाणी मच्छिमारांच्या जाळ्यांचे नुकसान झालेले आहे. त्याचबरोबर सर्व मासे पळून जातात. या ठिकाणी देण्यात आलेल्या निवेदनामध्ये दिशाभूल करण्याचा प्रयत्न झालेला आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अनंत तरे पुढे सुरु...)

एका बाजूला मच्छिमारांचे नुकसान झाल्याचे शासनाने कबूल केलेले आहे आणि दुस-या बाजूला नुकसान भरपाई देण्याचे शासनाचे काम नाही असे शासन सांगते हे योग्य नाही. दोन वर्षापूर्वी समुद्रातील मच्छी गायब झाल्यानंतर, मच्छीचा दुष्काळ पडल्यानंतर शासनाने नुकसान भरपाईपोटी 5 कोटी रु.चे वाटप केलेले आहे. आता फक्त 80लाख रु.चे नुकसान झालेले आहे. याबाबतीत मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिका-यांनी चौकशी करुन 35 लाख रु.चे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केलेला आहे. 15 वर्षापूर्वी जेंव्हा केंड माशांच्या धाडीमुळे मच्छिमारांचे नुकसान झाले होते त्यावेळी शासनाने मच्छिमारांना नुकसान भरपाई दिलेली होती. आता जून पर्यन्त चालणारी मच्छिमारी थांबलेली असून मच्छिमार बांधवांचे पुनर्वसन होण्याची आवश्यकता आहे. मत्स्यव्यवसाय विभागाने झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतलेला आहे. तेव्हा मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : हे खरे आहे की, केंड माशांच्या थव्याने समुद्र किना-यावर हैदोस घातलेला आहे. या माशांचे दात करवतीसारखे असतात. ते थव्याने येतात आणि जाळी कुरतडून जाळयांचे नुकसान करतात. अशा प्रकारे नुकसान झाल्याबद्दल 1100 मच्छिमारांचे अर्ज आलेले आहेत. 46 लाख रु.चे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. केंड माशांचा प्रादुर्भाव ही नैसर्गिक आपत्ती असल्यामुळे मत्स्यव्यवसाय विभागामार्फत नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात कोणतीही योजना राबविली जात नाही. अशा प्रकारे नुकसान झाले तर जाळी खरेदीवर 50 टक्के अनुदान दिले जाते. तेव्हा ज्या मच्छिमार बांधवांच्या जाळयांचे नुकसान झालेले आहे त्यांना जाळी घेण्यासाठी 50 टक्के अनुदान दिले जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : शेती पिकाबाबत, तसेच आंबा, संत्री, द्राक्षे अशा फळपिकांबाबत नुकसान भरपाई दिली जाते. अशा प्रकारे नुकसान झाले तर नुकसान भरपाई देण्याचा प्रस्ताव शासनाने स्वीकारलेला असल्यामुळे याप्रकरणी शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : मी मघाशी सांगितल्या प्रमाणे ज्यांची जाळी फाटलेली असतील त्यांना जाळी घेण्यासाठी अग्रक्रमाने 50 टक्के अनुदान देण्यात येईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : यामध्ये 70 लाखापेक्षा अधिक नुकसान झालेले आहे. 15 वर्षापूर्वी शासनाने विशेष बाब म्हणून नुकसान भरपाई दिली होती. तशा प्रकारे आता देखील विशेष बाब म्हणून शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : हे तपासून पाहून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. अनंत तरे : मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे त्यांचा व्यवसाय बंद पडलेला आहे. त्यांना नुकसान भरपाई दिली नाही तर ते आपला व्यवसाय करु शकणार नाहीत. केवळ 80 लाखाचा प्रश्न आहे. तेव्हा याबाबतीत शासन तातडीने मदत करील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : मी अगोदर सांगितल्या प्रमाणे ही बाब आम्ही तपासून पाहतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93च्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "डॉ. दत्ता सामंत यांच्या हत्येबाबत" या विषयावरील सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत दिनांक 15 एप्रिल 2005 रोजी केलेल्या निवेदनाच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी.)

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलण्याबाबत**

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर पाहिल्या क्रमांकावर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना ही नगरविकास खात्याशी संबंधित असल्यामुळे माननीय महसूल मंत्र्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात उत्तर देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. तेव्हा ही लक्षवेधी आता नगरविकास विभागाकडे पाठविण्यात येईल आणि ती पुढच्या आठवड्यात घेण्यात येईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचनेचा नगरविकास आणि महसूल या दोन्ही विभागाशी संबंधित आहे. दोन्ही विभागांनी संयुक्तपणे उत्तर दिले पाहिजे.

---

...नंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 13:35

**उपसभापती** : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी जे पत्र दिले आहे त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, " या लक्षवेधीमधील विषय नगर विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे मी या लक्षवेधी सूचनेवर निवेदन करु शकत नाही ". माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी म्हटल्याप्रमाणे नगरविकास विभाग आणि महसूल विभाग अशा दोन विभागांचा या लक्षवेधी सूचनेशी संबंध येतो. ही लक्षवेधी सूचना आता पुढील आठवडयात मंगळवारी किंवा बुधवारी सभागृहामध्ये चर्चेला घेण्यात येईल. यावेळी कोणत्याही प्रकारची सबब चालणार नाही. दोन्ही विभागांचा या लक्षवेधी सूचनेशी संबंध असल्यामुळे दोन्ही विभागाच्या मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित रहावे आणि उत्तर द्यावे.

-------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वाढोना,ता.परतूर,जि.जालना येथे अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार.

**मु.शी.**: वाढोना,ता.परतूर,जि.जालना येथे अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार यासंबंधी प्रा.फौजिया खान,सर्वश्री जितेंद्र आव्हाड सदाशिवराव पोळ,विनायकराव मेटे,जगन्नाथ शेवाळे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे,अशी विनंती करते.

"वाढोना,ता.परतूर,जि.जालना येथील शेख मदिना पि.शेख लालमियाँ यांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिला विहिरीत ढकलून तिची केलेली हत्या,सदर प्रकरण दडपण्यासाठी आरोपी,डॉक्टर आणि पोलिसांचे झालेले संगनमत,या संदर्भात गृह राज्यमंत्र्यांनी चौकशी दिलेले आश्वासन,मुलीच्या वडिलांची इच्छा असल्यास दफन केलेल्या बॉडीचे पुन्हा पोस्टमार्टेम केले जाणे,या सर्व घटनेचा रिपोर्ट एस.पी.यांनी दिलेला नसणे,याबद्दल चौकशी करुन जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे नमूद करणे,याप्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी केली जाईल असे मंत्रिमहोदयांनी आश्वासन देवूनही या संदर्भात अद्याप कुठलीच कार्यवाही न होणे,बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर फौजदार मदान यांची करण्यात आलेली बदली,या प्रकरणातील जबाबदार फौजदार अद्याप शासकीय सेवेत कार्यरत असणे, फौजदार,डॉक्टर आणि एस.पी.विरुध्द कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी,याबाबत लोकांमध्ये पसरलेली चिडीची भावना,यासंदर्भात वेळीच कार्यवाही न झाल्यास असंतोषाचा भडका उडण्याची निर्माण झालेली शक्यता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. ) ...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : माननीय अध्यक्ष महोदय, यह लक्षवेधी दूसरी बार इस सभागृह में मैंने उपस्थित की है. इस लक्षवेधी सूचना के माध्यम से एक गरीब लड़की को मैं न्याय दिलाना चाहती हूं, जिस पर उस गांव के 4 पावरफुल गुंडों ने सामुहिक बलात्कार किया था और उसके बाद उसका खून किया गया. मैं यहां पर उस केस का पूरा घटनाक्रम बताना चाहती हूं आपसे विनती है कि मुझे अपनी पूरी बात यहां पर प्रस्तुत करने की अनुमति दी जाये. मैं बताना चाहती हूं कि इस घटना के बाद मैं खुद उस गांव में गयी थी. वहां पर मुझे देखने को मिला कि वहां पर बहुत ही दबाव का वातावरण है. घटना इस तरह की है कि उस लड़की के मां - बाप दूसरे गांव में गए हुए थे. उनकी अनुपस्थिति में उस लड़की को एक औरत ने बुलाया और उस लड़की को जबरदस्ती दो तीन घंटे तक एक कमरे में बंद रखा. उस सात साल की लड़की ने मुझे पूरी कहानी बतायी है. उसने बताया कि उसके मा- बाप के आने के बाद उनको मिसगाइड किया गया और कहा गया कि वह लड़की दूसरी जगह पर है. बाद में कमरे का दरवाजा खोला गया. लड़की डर की वजह से वहां से भागी तो उसके पीछे चार गुंडे भी सुनसान खेत में भागते रहे और दूसरे दिन उस लड़की की लाश एक बावड़ी में मिली. उस कमरे में लड़की की टूटी हुई चूडियां मिलीं. पोस्टमार्टम नजदीक के अस्पताल में होने के बजाय दूर के अस्पताल में किया गया. डाक्टर भी उसी गांव का होने की वजह से सारे प्रकरण में हमने संशय व्यक्त किया था. पिता दस दिन तक पुलिस स्टेशन में जाता रहा लेकिन उसकी कंप्लेंट नहीं ली गयी और यहां पर यह दिशाभूल की गयी कि शासन वहां पर कंप्लेंट लेने गया लेकिन उसके माता - पिता टालमटोल करते रहे. पिछली लक्षवेधी के समय यहां पर सी. आय. डी. चौकशी करने का आश्वासन दिया था. लेकिन वह चौकशी भी नहीं की गयी. इस बार जब यह लक्षवेधी यहां पर मंजूर हुई तो उस गांव में दो दिन से पुलिस की गाड़ी जा रही है. उस लड़की के पिता पर दबाव डाला जा रहा है कि एक कागज पर हस्ताक्षर कर दो. इसलिए मेरा कहना है कि सिर्फ उस अधिकारी की बदली कर देने से ही कुछ नहीं होगा. हमारा कहना है कि उस अधिकारी को निलंबित किया जाना चाहिए. इसके अलावा जिस तरह से संजय मोरे को दो लाख रुपए दिए गए उसी तरह से इस लड़की के माता पिता को भी आर्थिक मदद दी जानी चाहिए. सिर्फ चौकशी करने से ही वहां काम नहीं चलेगा.

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MHM/ DD/ पूर्वी श्री. कानडे..... 13:40

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, ही लक्षवेधी सूचना या सभागृहात दुसऱ्यांदा चर्चेला आलेली आहे. नागपूर अधिवेशनात प्रथम ही लक्षवेधी सूचना चर्चेला आली असता त्यावेळी सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या प्रकरणाचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांची तेथून बदली केली असून दुसऱ्या डिवीजनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत ही चौकशी सुरु केली व त्यामध्ये आणखी कलम 304 व कलम 307 अूड करण्यात आले आहे. अजूनही विभागीय चौकशी चालूच आहे, या चौकशीमध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल आणि मयत मुलीच्या नातेवाईकांना शासनाकडून नियमानुसार शक्य तेवढी जास्तीत जास्त मदत देण्यात येईल.

श्रीमती फौजिया खान : अध्यक्ष महोदय, हमें यहां पर न्याय नहीं मिल रहा है. इसलिए हमने यहां पर फिर से यह लक्षवेधी उपस्थित की है. यहां पर यह कहना गलत है कि मेरी भावना की वजह से यहां पर यह कलम लगायी गयी हैं. मेरी भावना की वजह से किसी पर कलम नहीं लगायी जा सकती है. आप यहां पर बोल रहे हैं कि विभागीय चौकशी पुलिस अधिकारी की कर रहे हैं. हमारा कहना है कि उस पुलिस अधिकारी को सस्पेंड करना चाहिए. इसके अलावा मेरा एक प्रश्न यह है कि आप उस लड़की को कितनी आर्थिक मदद देंगे. नियम के अुनसार कितनी मदद आप दे सकते हैं, वह मुझे मालूम नहीं. इसलिए मुझे पूछना है कि आप उस को कितनी आर्थिक मदद देंगे ?

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, या प्रकरणामध्ये पाच आरोपिंची नांवे सुध्दा आलेली आहेत, त्यांच्या संदर्भात काहीच सांगितलेले नाही. आणि आपण आम्हाला बोलू देत नाहीत.......

**उपसभापती** : मी आपल्याला नेहमीच बोलण्याची संधी देतो तेंव्हा अशा प्रकारचा आरोप करणे चूकीचे आहे. कृपया आपले शब्द आपण मागे घ्यावेत.

श्री.श्रीकांत जोशी : महोदय, मी माझे शब्द मागे घेतो. कृपया मला एक प्रश्न विचारण्याची संधी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, यासंदर्भात अजून चौकशी चालू आहे, त्या चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी मागणी केल्याप्रमाणे केवळ निलंबितच नव्हे तर गरज पडल्यास दोषी अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात येईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी लक्षात घ्यावे की, एवढी गंभीर घटना घडलेली असतांना लोकप्रतिनिधीं एक कर्तव्याचा भाग म्हणून, अशी घटना घडल्याचे समजल्यानंतर ज्यावेळी घटनास्थळी जाऊन भेट देतात आणि सभागृहात तशी वस्तुस्थिती सांगतात त्यानंतर देखील संबंधित अधिकाऱ्यांचे असेच वर्तन राहिले तर लोकप्रतिनिधींचा सन्मान कसा राहणार आहे ? असेच होत राहिले तर यापुढे कोणीही लोकप्रतिनिधींची किंमत करणार नाही म्हणून केवळ चौकशीचा फार्स न करता संबंधित अधिकारी जे कोणी असतील त्यांना ताबडतोबीने निलंबित करावे व नंतर पुढील कारवाई करावी. कारण सर्वच अधिकारी यापुढे अशीच भूमिका लोकप्रतिनिधींच्या बाबतीत घ्यायला लागले तर मग त्यांनी कुठेच जायला नको. अशा अधिकाऱ्यांकडे एखादा लोकप्रतिनिधी गेल्यानंतर ते "कोण तूम्ही" असा प्रश्न विचारतात. परंतु असे विचारण्यापूर्वी प्रथम नमस्कार करण्याचेही सौजन्य ते अधिकारी दाखवित नाहीत. अशा घटना झाल्यानंतर आणि या अधिकाऱ्यांना अशा प्रकारे अभय मिळत राहिले तर ते लोकप्रतिनिधींना ते काहीच मानणार नाहीत. म्हणून केवळ चौकशीच नव्हे तर त्या अधिकाऱ्यांना ताबडतोब निलंबित करावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, ठीक आहे, या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मागील अधिवेशनात ज्यावेळी ही लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती त्यावेळी याप्रकरणी माननीय मंत्री महोदयांनी सी.आय.डी. मार्फत चौकशी मान्य करण्याचे मान्य करुन देखील ती अद्यापही का करण्यात आली नाही ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, या प्रकरणाची चौकशी लवकर होण्याच्या दृष्टीने दुसऱ्या डिवीजनमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत ही चौकशी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात आली नाही.

**उपसभापती** : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन याप्रकरणी सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात यावी, असा मी निदेश देत आहे.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील जुहू ताज सहकारी गृहनिर्माण संस्था पुनवर्सन योजनते झालेला गैरप्रकार.

**मु.शी.**: मुंबईतील जुहू ताज सहकारी गृहनिर्माण संस्था पुनवर्सन योजनते झालेला गैरप्रकार यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे श्रीमती कांता नलावडे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारीसंस्था) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मुंबईतील जुहू येथील गरीब मजदूर संघ नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे जुहू ताज सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्वसन योजना असे नामकरण करण्यात आलेली झोपडपट्टी असणे, खेळाचे मैदान व महानगरपालिका प्राथमिक शाळेसाठी अपेक्षित असणाऱ्या जागेवर या 133 झोपड्या असणे, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झरीन खान, सुनिता नंदा, दिवाण नंदा, रानिता नंदा, कॅप्टन ससारीया अशा काही नामवंतांनी सन 1994 पूर्वी झोपडी विकत घेतली असल्याचे पर्चेस ॲफिडेव्हीट पुराव्यावर दाखविल्यावर अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांनी पर्यायी जागा मिळण्यासाठी या नामावंतांना पात्र ठरविणे, या नियमबाह्य व भ्रष्टरितीने पात्र ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणतीही कारवाई न करणे या विरुद्ध जनतेच्या मनात निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हे गंभीर प्रकरण आहे. माझी हात जोडून नम्र विनंती आहे की, या प्रकरण ठोस निर्णय होणे आवश्यक आहे. जे करोडो रूपये कमवितात त्यांची मुलगी, पत्नी ही झोपडपट्टीमध्ये रहात असल्याचे दाखविण्यात आले आहे. प्रसिद्ध अभिनेता श्री.संजय खान यांची पत्नी झरीन खान, त्यांची मुलगी फराह, टॉप सिक्युरिटीचे श्री. राहुल नंदा यांची पत्नी सौ.सुनीता नंदा, मुलगा दिवाण नंदा आणि मुलगी राणीता नंदा हे सर्वजण झ ाोपडपट्टीमध्ये राहत असल्याचे दाखविण्यात आले आहे. आपल्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, "...दिनांक 1.1.1995 पवूीच्या हस्तांतरण पुराव्याच्या आधारे पात्र ठरविण्यात आले आहे." म्हणजे हया सर्वांना ते झोपडपट्टीमध्ये राहत असल्याचे दाखविण्यात आले आहे. एसआरएची योजना कार्यान्वित होताना तेथे राहत असलेल्या झोपडीधारकारचे पुरावे बघितले जातात. जानेवारी 1995 च्या मतदार यादीत त्यांचे नाव आहे का हे बघितले जाते. मूळात येथे 57 झोपडया होत्या. त्या 193 दाखविण्यात आल्या आहेत. एवढेच नव्हे तर एका कुटुंबामध्ये दहा-दहा माणसे दाखविली आहेत. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्री.संजय खान यांच्या पत्नी झरीन खान, मुलगी फराह, टॉप सिक्युरिटीचे श्री.राहुल नंदा यांच्या पत्नी सौ.सुनीता नंदा, मुलगा दिवाण नंदा, मुलगी राणीता नंदा हे सर्वजण या झोपडपट्टीमध्ये राहत असल्याचे दाखविण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब म्हणाले ते खरे आहे. अधिकारी हे किनारी लावतील हे सांगता येत नाही. त्यामुळे म्हाडाच्या अधिकाऱ्यांच्या बाजूला उभे राहू नये. म्हाडाच्या अधिकाऱ्यांमार्फत आज नीच व निंद्य प्रकार चालू आहेत. लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "विषयांकित म्हाडाच्या जागेवरील झोपडपट्टी जुहू ताज सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक व मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या स्तरावर चौकशी करण्यात येत आहे." मी दिनांक 22 तारखेला प्रश्न विचारला होता. त्यास शासनातर्फे 'होय' असे उत्तर देण्यात आले होते. दुसऱ्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, "सदरहू व्यक्तिंनी पर्यायी जागा मिळण्यासाठी मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण मंडळ यांनी पात्र ठरविले असल्याचे आढळून आले आहे. प्रस्तुत प्रकरणी चौकशी सुरू आहे." तेव्हा यासंबंधी फौजदारी गुन्हा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ...

दाखल करण्यात आला आहे काय ? सन 1995 मध्ये श्री.संजय खान हे या झोपडपट्टीमध्ये राहत होते काय ? त्यांचे तेथील मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट आहे काय ? तसेच काँग्रेसचे कार्यकर्ते श्री.चंडोकसिंग हे देखील या झोपडपट्टीमध्ये राहतात असे दाखविले आहे. सुरूवातीला 57 झोपडया होत्या, पण आता 193 झापेडया असल्याचे दाखविण्यात आले. हे जे प्रतिष्ठित लोक आहेत, त्यांनी आपल्या सदनिका विकून टाकल्या आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

या गंभीर प्रश्नासंबंधी माझी अशी मागणी आहे की, ज्या नामवंतांना या योजनेतून सदनिका दिल्या आहेत त्यांच्याकडून त्या परत घेणार आहात काय ? तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ? त्याचप्रमाणे ज्या अधिकाऱ्यांनी खोटया कागदपत्रांच्या आधारे या नामवंतांना पात्र ठरविले त्यांना सस्पेंड करुन, त्यांच्यावरही फौजदारी गुन्हे दाखल करणार आहात काय ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, एस.आर.ए.योजनेंतर्गत मोफत घरे मिळत असल्यामुळे ज्या व्यक्ती या योजनेमध्ये बसत नाहीत त्यांनी सुध्दा गैरफायदा घेतलेला आहे. एस.आर.ए.योजनेमध्ये असे प्रकार होऊ नयेत, ही दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अत्यंत महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, या योजनेमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांना पात्र ठरविले नाही, तर मुंबई मंडळाच्या अधिकाऱ्यांना त्यांना पात्र ठरविले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या योजनेमध्ये लाभार्थ्यांना पात्र ठरविण्याचे काम सी.ओ. करीत नाही. तर पात्र ठरविण्याचे काम उपजिल्हाधिकारी करतात. त्यांनी लाभार्थ्यांना पात्र ठरविल्यानंतर ती यादी सी.ओ. यांचेकडे स्वाक्षरीसाठी जाते.

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, ही म्हाडाची जागा असल्यामुळे लाभार्थ्यांना पात्र ठरविण्याबाबत उपजिल्हाधिकाऱ्यांचा संबंध आलेला नाही. मुंबई मंडळाने त्यांना पात्र ठरविले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी या लाभार्थ्यांना पात्र ठरविले आहे त्यातील श्री.श्रीवर्धनकर मयत झाले आहेत. तसेच दुसरे एक अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणे शक्य नाही. सन्माननीय सदस्यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली आहे तिचा पुन्हा तपास करण्यात येईल आणि तसा तपास करण्याचा अधिकार एस.आर.ए. योजनेला आहे.

श्री.मधुकर चव्हाण : महोदय, जी गोष्ट शासनाने मान्य केली आहे त्याची अजून काय तपासणी करावयाची आहे ? एखाद्या ठिकाणी खोटया कागदपत्रांच्या आधारावर घटना घडली तर ताबडतोब आपण संबंधितांना अटक करुन, 15 दिवस त्याची नो-बेल अटक करता. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, एस.आर.ए. योजनेचा फायदा घेणाऱ्या संजय खान, कॅप्टन ससारीया किंवा अन्य नामवंतांना आपण अटक करणार आहात काय ? महोदय, आज म्हाडा हे नरक झाले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दयानंद मस्के : महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्या अनुषंगाने या संपूर्ण प्रकरणाची पुन्हा तपासणी करण्यात येईल. वास्तविक पाहता एस.आर.ए.योजनेंतर्गत देण्यात आलेली घरे 10 वर्षे विकता येत नाहीत. परंतु जर ही घरे 10 वर्षांपूर्वीच विकली आहेत असे आढळून आले तर, म्हाडाकडून एस.आर.ए. योजनेतील ती घरे ताब्यात घेतली जातील.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, म्हाडामध्ये आज काय प्रकार सुरु आहेत हे माननीय मंत्री महोदयांना कदाचित अवगत नसावे. एस.आर.ए. योजनेसंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, बिल्डर, झोपडपट्टीदादा एस.आर.ए.योजनेचा फायदा उठवीत आहेत. महोदय, फिल्मस्टारची पत्नी, मुले यांच्या नावे झोपडया दाखविण्यात आल्या आहेत. त्यांना एस.आर.ए. योजनेंतर्गत सदनिकांचे वाटप झालेले असताना त्यांच्यावर नेमकी काय कारवाई केली जाईल याबाबत मात्र माननीय मंत्री महोदय काहीही सांगत नाहीत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी शासन सी.आय.डी. चौकशी करणार आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : सभापती महोदय, या प्रकरणाचा पुन्हा तपास करण्यात येईल. एस.आर.ए. योजनेच्या माध्यमातून या मंडळींनी गैरफायदा घेतला आहे असे गृहीत धरुन, त्यांच्याकडून ती घरे ताब्यात घेण्यात येतील. या संदर्भात त्यांच्यावर फौजदारी गुन्हा सुध्दा दाखल करण्यात येईल.

तसेच सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन, या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, हा भूखंड म्हाडाचा असून तो महानगरपालिकेला विकास करण्याकरिता दिला होता. या भूखंडाला आरक्षण होते. महानगरपालिकेची शाळा आणि मैदान हे त्या भूखंडावर होणार होते. तरी, माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, झोपडपट्टी पुनर्वसन करताना महानगरपालिकेचे " ना हरकत प्रमाणपत्र " घेण्यात आले होते का ? या ठिकाणी लक्षवेधीच्या रुपाने सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांची गाथा मांडली आहे आणि माननीय मंत्रिमहोदय एका वाक्यात " चौकशी करण्यात येईल " असे उत्तर देत आहेत. या प्रश्नाच्या माध्यमातून काही उत्तर दिलेले नाही. झोपडपट्टी योजनेच्या अंतर्गत आम्ही काय करतो, एवढेच त्यांनी सांगितलेले आहे. सभापती महोदय, प्रकरणाची चौकशी करत असताना संबंधित अधिकाऱ्याला तेथे ठेवले जात नसते. त्यामुळे माझी माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, आपण संबंधित अधिकाऱ्यांना सस्पेंड करुन चौकशी करणार आहात का ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, आपण ज्या दोन अधिकाऱ्यांसंदर्भात बोलत आहात, ते दोघेही निवृत्त झालेले आहेत. या संदर्भात सी.आय.डी. चौकशी करण्यात येईल असे मी सांगितले आहे. या संदर्भात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येऊन जरुर कारवाई करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, ही 8 मजली इमारत बेकायदेशीररित्या बांधली आहे. 1 लाख 64 फूटांचे बांधकाम बेकायदेशीररित्या केलेले आहे. तरी, या संदर्भात आपण सी.आय.डी. चौकशी करणार का ? व सदर गोष्टीची एका महिन्यात चौकशी करुन या संदर्भात आपण फौजदारी कारवाई करणार आहात का ? असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, मी अगोदरच या संदर्भात फौजदारी कारवाई करण्यात येईल असे सांगितले होते. सभापती महोदय, या प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी केली जाईल.

----

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पैठण तालुक्यामध्ये बालानगर येथे विचित्र आजाराने झालेला मृत्यू

**मु.शी.** : पैठण तालुक्यामध्ये बालानगर येथे विचित्र आजाराने झालेला मृत्यू यासंबंधी डॉ. एम.ए.अझिज, श्री. नतिकोद्दीन खतिब, प्रा. फौजिया खान, श्री. मुझफ्फर हुसेन, प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. एम.ए.अझिज ( नामनियुक्त ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील बालानगर येथे दिनांक १८ मार्च, २००६ ला आप्पासाहेब गल्हाटे वय २३ वर्ष, फौजिया अफसर वय ७ वर्ष, अकबर इसहाक वय २२ वर्ष हे व इतर अचानक आजारी पडणे, त्यापैकी अकबर इसहाक यांचा औरंगाबाद वैद्यकीय रुग्णालयात झालेला मृत्यू व इतर दोन जणांचा दुसऱ्या दिवशी झालेला मृत्यू, याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राकडे विचारणा केली असता डेंग्यू तापाने मृत्यू झाला असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याने बेजबाबदारपणाने दिलेले उत्तर, या प्रकरणात संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होत असल्याची जनतेत होत असलेली चर्चा, या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करुन मृत्यू झालेल्या व्यक्तींना द्यावयाची आर्थिक मदत व युद्ध पातळीवर संपूर्ण शहरात रोगप्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. "

डॉ. विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए.अझिज : सभापती महोदय, औरंगाबादपासून 11 कि.मी.वर बाळानगर नावाचे एक गाव आहे. सभापती महोदय गेल्या, 27 मार्च, 28 मार्चपर्यंत त्या ठिकाणी 4 लोक मृत्यूमुखी पडले. त्यातील पुजाराम, वय वर्षे 65, फौजीया अफसर, वय वर्षे 7, अकबर इसहाक, वय वर्षे 22 हे तीनही लोक 24 तासांमध्ये मरण पावले आहेत. त्यातील अकबर इसहाक नावाचा गृहस्थाला औरंगाबाद मधील मेडिकल कॉलेजमध्ये पाठविण्यात आला होता. त्यावेळी तेथे त्याला हिवताप आजार दाखवून 10 दिवस आय.सी.यू. मध्ये ठेवण्यात आले होते. सभापती महोदय , तो गृहस्थ 10 दिवसांनंतर मरण पावला. त्याचे नंतर काय झाले ? बाकी 3 लोक मृत्युमूखी पडले. लक्षवेधीच्या उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे की, त्याला व्हायरल ईन्सेफेलाटीस झाले होते. सभापती महोदय, त्याला हे कशावरुन झाले ? यावर काय उपचार करण्यात आला ? या सर्व गोष्टींचा माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या ठिकाणी अकबर इसहाक नावाच्या गृहस्थाबद्दल सांगण्यात आले आहे. सभापती महोदय, त्या व्यक्तींचे रक्ताचे नमुने दिले असता, त्याधून हिवतापाचा रिझल्टही निगेटिव्ह आला, डेंग्यूचा रिझल्ट देखील निगेटिव्ह आला. सभापती महोदय, त्या गृहस्थाचे वैद्यकीय महाविद्यालयात संपूर्ण उपचार झाले होते. नंतरच त्याला व्हाईरल ईन्सेफेलाटीस आहे असे डायग्नोसिस मेडिकल कॉलेजमधून देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, हे सस्पेक्ट म्हणून सर्टिफाय केले होते. त्यांच्यावर व्यवस्थित उपचार करण्यात अलाला होता. यामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा झालेला नाही.

डॉ. एम.ए.अझिज : सभापती महोदय, व्हाईरल ईन्सेफेलाटीस म्हणून का गेस करण्यात आले ? हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, व्हायरल ईन्सेफेलाटीसची टेस्ट नव्हती. ज्या टेस्ट झाल्या, त्या टेस्टच्या रिपोर्ट्स संदर्भात मी आपल्याला सांगितले आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एम.ए.अझिज : सभापती महोदय, "व्हायरल ईन्सेफेलाटीस" मुळेच हे चारही मृत्यू झ ााले नाहीत. फौजिया अफसर या मुलीचा मृत्यू कसा काय झालेला आहे, तसेच श्री अप्पासाहेब एकनाथ गलांडे हे खाजगी रुग्णालयात मृत्यू पावलेले आहे. सगळे रुग्ण "व्हायरल ईन्सेफेलाटीस" मुळे मृत्यूमुखी पडलेले आहेत असा चुकीचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या सगळया केसेसच्या संदर्भात तपासण्या करण्यात आलेल्या आहेत, मराठवाडा विभागात मी स्वत: बैठका धेतलेल्या आहेत. श्री. अप्पासाहेब गलांडे हे खाजगी रुग्णालयात दाखल झालेले होते, त्यांनी खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतलेला आहे. तेथील संपूर्ण गावामध्ये पूर्ण काळजी घेण्याच्या सूचना आरोग्य विभागामार्फत देण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारे व्हायरल ईन्सेफेलाटीस होऊ नये म्हणून सर्व काळजी घेण्यात येत आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मराठवाडयामध्ये डेंग्युतापामुळे मृत्यू पावलेल्यांची संख्या 50 इतकी झालेली आहे. आणि या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये फक्त 2 लोक मृत्यूमुखी पडल्याचे शासनाकडून सांगण्यात येत आहे. हा सर्व प्रकार थांबविण्यासाठी यावर आपण अधिक खर्च करणार आहात काय ? माझा प्रश्न असा आहे की, ग्रामीण भागामध्ये डॉक्टर मोठया प्रमाणात रुग्णांची फसवणूक करीत आहेत. डेंग्युताप या रोगाचा प्रसार थांबविण्यासाठी सरकारने काही विशेष काळजी घेतली आहे काय ? यासाठी सर्व औषधे उपलब्ध करुन देणार आहात काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मराठवाडयातील सर्वच जिल्हयामध्ये आरोग्य सेविकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. चिकन गुनिया या रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे लक्षात आल्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांची टीम तयार करुन पाठविण्यात आलेली आहे. यासाठी 540 कर्मचारी हे प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेले आहेत. डेंग्युताप व चिकन गुनिया यांच्यामुळे पेशंटला डिहायड्रेशनचा त्रास होतो. यासंदर्भातील सर्व सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.सपूर्ण मराठवाडा परिसरामध्ये मी स्वत: व आरोग्य सचिव यांनी बैठका घेऊन आजार नियंत्रणात आणण्यासाठी कार्यवाही केलेली आहे. तसेच गावपातळीवर आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका यांच्याकडून डोअर टू डोअर सर्व्हे करण्यात आलेला आहे. आणि गावांमध्ये दंवडी देऊन पाण्याचे साठे स्वच्छ करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहे. एका ठराविक तारखेला घरातील पाण्याचे साठे पूर्ण कोरडे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सर्व प्रकारच्या आवश्यक त्या

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औषधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत, माझ्याकडे औषधांची यादी आहे त्यामध्ये Ceptron, Tetracycline, B Complex, IB Fluid, Zentamycin, Paracetamol, Ampicillin, इत्यांदि सर्व औषधे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. यानंतर सुध्दा काही औषधांची गरज भासल्यास ती उपलब्ध करुन देण्यात येतील. औरंगाबाद जिल्हयातील पैठण तालुक्यात बालाजीगनर प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. परंतु औरंगाबाद येथील साई हॉस्पीटल हया खाजगी रुग्णालयात श्री. अप्पासाहेब गलांडे यांचा मृत्यू झालेला आहे. तेथील खाजगी डॉक्टरांनी हजगर्जीपणा केलेला असेल तर त्याची चौकशी करुन त्यांच्यावर योग्य कारवाई करण्यात येईल. तेथील लोकप्रतिनिधी यांनी सहकार्य केल्यास प्रत्येक जिल्हयामध्ये बैठका घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सगळया प्रकारची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्यामुळे मराठवाडा विभागात जी परिस्थिती उद्‌भवली आहे ती पूर्णपणे नियंत्रणात आणण्यात शासनाला यश आलेले आहे.

--------

**<u>लक्षवेधी क्रमांक 5 बाबत</u>**

**उपसभापती** : लक्षवेधी क्रमांक 5 पुढे ढकलण्यात आलेली आहे.

श्री. व्ही. यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, ही लक्षवेधी अत्यंत महत्वाची आहे, यासाठी अनेक शिक्षक कर्मचारी उपोषणाला बसलेले आहेत.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ही लक्षवेधी सूचना 3-4 विभागांशी संबंधित असल्याने त्याचे एकत्रित उत्तर द्यावयाचे असल्याने मंत्री महोदयांनी पुढील आठवड्यात ही लक्षवेधी सूचना घेण्याची विनंती माननीय सभापतींना केली असून माननीय सभापतींनी ती मान्य केली आहे. तेव्हा ही लक्षवेधी सूचना पुढील आठवड्यात घेण्यात येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, निदान सोमवारी तरी ही लक्षवेधी सूचना घ्यावी. ही लक्षवेधी सूचना तातडीने घेण्याचा आग्रह मी यासाठी धरीत आहे की, हे उपोषणकर्ते आमरण उपोषणाला बसले आहेत. तेव्हा आता आपण ही लक्षवेधी सूचना पुढील आठवड्यापर्यंत पुढे ढकलली आहे तर निदान त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी मंत्री महोदयांकडून कोणी त्यांना भेटण्यास गेले तर ...

**उपसभापती** : त्यांनी उपोषण सोडावे म्हणून मी स्वत: सन्माननीय सदस्यांबरोबर त्यांच्याकडे येतो ...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हे उपोषणकर्ते गडचिरोली येथे आमरण उपोषणास बसले आहेत. तेव्हा निदान मंत्री महोदयांच्या वतीने त्यांची कोणी भेट घेऊन त्यांना हे सांगितले की, त्यांच्याबाबतचा विषय पुढील आठवड्यात विधी मंडळामध्ये घेण्यात येणार आहे ...

**उपसभापती** : ठीक आहे. मी गडचिरोली जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देतो की, त्यांनी उपोषणकर्त्यांची तातडीने भेट घेऊन त्यांना त्यांच्याबाबतची लक्षवेधी सूचना पुढील आठवड्यात विधान परिषदेमध्ये चर्चेला ठेवण्यात आलेली आहे तरी कृपया आपण उपोषण मागे घ्यावे अशी विनंती करावी. याबाबत उपस्थित मंत्र्यांनी नोंद घेऊन संबंधितांना कळवावे.

डॉ. विजयकुमार गावित : ठीक आहे.

****

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : मुंबईत इंडियन एअरलाईन्स विमान सेवेबद्दलची माहिती मराठी भाषेतून दिली जात नसणे.

**मु. शी.** : मुंबईत इंडियन एअरलाईन्स विमान सेवेबद्दलची माहिती मराठी भाषेतून दिली जात नसणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते. -

" मुंबई शहरामध्ये विविध विमानसेवांची माहिती देणारी यंत्रणा कार्यरत आहे. त्यामध्ये इंडियन एअरलाईन्सच्या विमान सेवेबद्दलची माहिती घेण्यासाठी महानगर टेलिफोन निगम किंवा भारत संचार निगमच्या फोनवरून टोल फ्री असलेल्या क्रमांकात आता बदल करून तो 1800 ने सुरू करण्यात आल्याचे इंडियन एअरलाईन्सच्या प्रसिद्धी पत्रकात प्रसिद्ध झालेले आहे. इंडियन एअरलाईन्सच्या विमान सेवांची माहिती देणाऱ्या या क्रमांकावरून 10 प्रादेषिक भाषंमध्ये माहिती पुरविली जाते. दिल्लीच्या प्रवाशांसाठी इंग्रजी, हिंदी आणि पंजाबी तर बंगलोर येथील प्रवाशांना कन्नड किंवा तामिळ मधून, चेनई येथील प्रवाशाला तामिळ आणि मल्याळम् तर कोलकाता येथील प्रवाशांना बांगला किंवा आसामी भाषेत माहिती दिली जाणार आहे. परंतु मुंबईत मात्र कोणत्या भाषेत माहिती देण्यात येईल हे इंडियन एअरलाईन्सने सांगितलेले नाही. या संबंधात दैनिक लोकसत्ता या दैनिक वृत्तपत्रामध्ये तपशीलवार माहिती प्रसिद्द झालेली आहे. विशेष म्हणजे इंडियन एअरलाईन्सच्या विमानसेवांबाबतची माहिती महाराष्ट्रामध्ये आणि त्यातही मुंबईमध्ये त्यांच्या टोल फ्री क्रमांकावरून मराठी भाषेतून दिली जात नाही ही मोठी दुर्दैवाची बाब आहे. इतर एकंदर 10 प्रादेशिक भाषांमधून ही माहिती त्या त्या प्रवाशांना मिळू शकते केवळ मराठी भाषेतूनच मिळत नाही. म्हणून याकडे सभागृहाचे आणि शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे. या निमित्ताने मी शासनाला विनंती करीन की, देशांतर्गत असलेल्या सर्व विमानसेवांची मग ती कोणत्याही कंपनीची असो, त्याची माहिती मराठीतून मराठी भाषिकांना मिळाली पाहिजे या दृष्टीने शासनाने संबंधित कंपन्यांना सांगावे."

***

..... एलएल 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 1997 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत गैरमार्गाने तीन लोहार बंधुंच्या पोलीस अधीक्षक पदावर झालेल्या निवड प्रकरणी तपासाचे काम देण्यात निर्माण झालेला वाद.

**मु. शी.** : 1997 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत गैरमार्गाने तीन लोहार बंधुंच्या पोलीस अधीक्षक पदावर झालेल्या निवड प्रकरणी तपासाचे काम देण्यात निर्माण झालेला वाद याबाबत श्री.नितीन गडकरी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. -

" महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन 1997 मध्ये घेतलेल्या परीक्षेत अनेक गैरप्रकार झाले. त्यापैकी एक प्रकरण, पोलीस उपअधीक्षक पदावर निवड करून घेतल्याच्या आरोपावर तीन लोहार बंधूंना बडतर्फ केले आहे व आयोगाने नोंदविलेल्या नव्या फिर्यादीच्या तपासाचे काम श्री.शिंदे यांच्या कडे सोपविले आहे. परंतु या आधीच्या प्रकरणांचा तपास श्री. पुजारी करीत आहेत व श्री. शिंदे यांना आवश्यक असणारी कागदपत्रे श्री.पुजारी उपलब्ध करून देत नाहीत अशी तक्रार आहे. त्यासाठी श्री. पुजारी यांच्या कार्यालयाची झडती घेण्याचे वॉरंट मिळावे यासाठी श्री.शिंदे यांनी विशेष न्यायालयाकडे अर्ज केला आहे. वास्तविक या प्रकरणामध्ये दोन अभियंत्यांना तपास करण्याची जबाबदारी दिली असल्याने व यदाकदाचित या दोन अधिकाऱ्यांचा लोहार बंधुंशी थोडा फार संबंध असण्याची शक्यता असल्याने या दोन अधिकाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला असावा. शासन स्तरावर याबाबतीत सूचना देऊन संपूर्ण प्रकरणाचा तपास लवकर संबंधितांना देण्यात याव्यात. सदर महत्त्वाचा विषय मी आज सभागृहात "विशेष उल्लेख" द्वारा उपस्थित करू इच्छितो, कृपया परवानगी द्यावी."

सभापती महोदय, विशेष उल्लेखावर बोलण्यासाठी मी आज प्रथमच उभा आहे. हा विशेष उल्लेख करण्याचे कारण असे आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या बाबतीत 1997 साली जे

...... एलएल 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गैरप्रकार झाले त्यामध्ये लोहार बंधूंचे प्रकरण पुढे आले आणि त्याची कायदेशीर चौकशी जी काही व्हायची आहे ती होऊ द्यात. पण या गैरप्रकाराच्या तपासाचे काम लाचलुचपत विभागाचे एसीपी श्री.शिंदे म्हणून होते त्यांच्याकडे दिले होते. त्यात अगोदर हे तपासाचे काम श्री.सुधाकर पुजारी यांचेकडे होते आणि श्री.सुधाकर पुजारी व श्री.शिंदे यांच्यातील वाद जास्त चव्हाट्यावर आला. श्री. सुधाकर पुजारी हे माननीय मुख्यमंत्र्यांच्या नाही तर न्यायालयाच्या आदेशाने तेथे काम करीत आहेत. त्याहीबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. परंतु मला एक गोष्टीची खंत आहे, दु:ख आहे. मी जेव्हा बांधकाम विभागाचा मंत्री होती त्यावेळी श्री.वाणी नावाचे बांधकाम खात्याचे सचिव होते. ते अतिशय प्रामाणिक होते, ते आयुष्यात केव्हाही भ्रष्टाचार करणार नाहीत अशी माझी स्वत:ची खात्री आहे, विश्वास आहे. पण अशा या श्री.वाणी यांना तपासी अधिकारी श्री.सुधाकर पुजारी यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक केले. पण त्यामध्ये हे श्री.वाणी केव्हाही नाहीत याबद्दल मला पूर्णपणे खात्री आहे. पण अशा या श्री.वाणी यांना श्री.सुधाकर पुजारी यांनी अटक करून त्यांचे पूर्ण जीवन उध्वस्त करून टाकले आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... एमएम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

त्यांचा मुलगा, त्यांची पत्नी मला अनेक वेळा भेटले. त्यांनी अनेक वेळा प्रयत्न करुन देखील वाणींना न्याय मिळू शकला नाही. आज मी विश्वासाने सांगतो की, वाणींच्या प्रकरणाची कोणत्याही माणसाकडून चौकशी केली तरी ते दोषी आढळणार नाहीत. श्री. सुधाकर पुजारी यांना न्यायमूर्तींच्या पाठींबा आहे त्याचा फायदा घेऊन त्यांनी वाणींचे आयुष्य उध्वस्त केले. एक चांगला अधिकारी, ज्याने कधीही कुणाचा एक पैसाही घेतला नाही, त्यांची स्वतःची काही मालमत्ता नाही. त्याचे घरदार आज उघडयावर पडले आहे. मी हे या ठिकाणी जबाबदारीने बोलत आहे. मला एका गोष्टीची खंत वाटत आहे की, एका चांगल्या प्रामाणिक अधिकाऱ्याची जी अवहेलना चालली आहे ती मी उघडया डोळयांनी पहात आहे, परंतु मी काही करु शकलो नाही. ते जळगाव जिल्हयातील आहेत.

दुसरे प्रकरण श्री. श्रीकांत बापट, माजी पोलीस आयुक्त यांचे असून त्यांचा लौकिक देशामध्ये आहे. ज्यावेळी मुंबईमध्ये दंगे घडले त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांनी पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांना सांगितले की, श्री. श्रीकांत बापट हे केंद्र सरकारच्या सेवेत आहेत ते मुंबईसाठी मला पाहिजेत. त्यावेळी श्री. नरसिंहराव असे म्हणाले की, तुम्ही योग्य माणसाची निवड केली. मी त्यांना लगेच मुंबईचे पोलीस आयुक्त म्हणून चार्ज घेण्यासाठी पाठवितो.

**उपसभापती** : माननीय सदस्यांना विनंती करु इच्छितो की, आपण उपस्थित केलेला विषय इतका संवेदनशील आहे की त्यासाठी आपण लक्षवेधी सूचना उपस्थित करावी. याचे कारण असे की, विशेष उल्लेखाव्दारे हा प्रश्न उपस्थित करुन तो मर्यादीत न ठेवता त्याची गांभीर्याने दखल सभागृहाने घेतली पाहिजे. आपण मघाशी असे वक्तव्य केले की, मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व शासन यांच्या पलिकडे जाऊन ते फक्त कोर्टाच्या आदेशाने काम करतात. हे आपले वाक्य फार महत्वाचे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे हा विषय उपस्थित होत असतांना संबंधित खात्याचे मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यामुळे या गोष्टीचे गांभीर्य फार मोठे असल्यामुळे वर्तमानपत्रामधून या गोष्टी बऱ्याच उजेडात आल्या आहेत. आणि म्हणून या बाबतीत बऱ्याच गोष्टींचा ऊहापोह या सभागृहामध्ये होणे आवश्यक आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी श्री. श्रीकांत बापट यांच्यासारखा एक कर्तबगार, कर्तव्यदक्ष, निष्कलंक चारित्र्य असलेल्या अधिकाऱ्यावर कारण नसतांना बिलामत आली तर यापुढे कोणत्याही प्रामाणिक अधिकाऱ्याला शासनामध्ये न्याय मिळणार नाही. आणि म्हणून आपण विशेष उल्लेखाव्दारे या ठिकाणी हा विषय मांडल्याबद्दल मी आपले मनःपूर्वक अभिनंदन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.उपसभापती...**

करतो. तरीपण या विषयाला न्याय मिळावा अशी आपली खरोखरच इच्छा असल्यामुळे या विषयावर लक्षवेधी सूचना देण्यात यावी. त्याचबरोबर मी विधीमंडळ सचिवालयाला असे निर्देश देतो की, सदरची लक्षवेधी सूचना येत्या सोमवारी किंवा मंगळवारी यापैकी जो दिवस आपणास हवा असेल त्या दिवशी प्राथम्याने लावण्यात यावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे. खरे म्हणजे या दोघांबद्दल या ठिकाणी बोलत असतांना माझ्या डोळयामध्ये अश्रू आले. सभापती महोदय, मी राजकारणामध्ये येण्यापूर्वी विद्यार्थी दशेमध्ये असतांना माझ्यावर मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव होता. त्यावेळी माझे विचार अतिशय आक्रमक होते, माझे वागणे अतिशय संवेदनशील होते. त्यानंतर मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये आल्यानंतर व विद्यार्थी संघटनेमध्ये काम केल्यानंतर भारतीय जनता पक्षामध्ये आलो. शेवटी मी राजकारण हे कोणतेही पद मिळावे म्हणून केले नाही. संवेदनशील राजकारण ही माझी नेहमी प्रेरणा राहिली आहे. श्री. वाणींचे सासरे ॲडव्होकेट श्री. मनोहर हे डिस्ट्रिक्ट जज्ज होते मी त्यांना ही केस घेण्यासाठी विनंती केली. त्यांनी ही केस मांडण्याचा प्रयत्न केला. आपण माझ यावर विश्वास ठेवा मी राजकारणामध्ये खोटे आश्वासन कधी कुणाला दिले नाही. बांधकाम विभागातील एका प्रामाणिक अधिकाऱ्याचे जेलमध्ये जे हाल होत आहेत म्हणून मी ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. त्यानंतर श्रीमती जोशी नावाच्या एका बाईंचा त्यावेळचे मुख्यमंत्री व राष्ट्रवादी कॉग्रेसचे अध्यक्ष माननीय श्री. शरद पवार साहेबांशी जवळचा संबंध होता. त्या बाई काय बोलल्या हे मी या सभागृहामध्ये सांगू इच्छित नाही. कारण हे सभागृह सुसंस्कृत आहे. त्यानंतर तिसरे श्री. बापट यांना मी कधीही भेटलो नाही. मी त्यांना ओळखत नाही, त्यांचा माझा संबंध नाही. श्री.बापट यांच्यासारखा प्रामाणिक अधिकाऱ्याला माजी मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांनी लोकसेवा आयोगावर पाठविले. या ठिकाणी मांडलेल्या तीनही घटना धक्कादायक आहेत. मला वाटते आपण माझ्या भावनांशी सहमत झाला आहात त्याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे.राजकारणामध्ये कोणतीही व्यक्ती ही कोणत्याही जातीची, पंथाची नसते त्यामुळे अशा व्यक्तीवर अन्याय होता कामा नये.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे.... 14.15

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु...

कधी कधी चांगले काम करणाऱ्या माणसांना सन्मान मिळत नाही, आणि वाईट काम करणाऱ्या माणसांना शिक्षा होत नाही. चांगल्या माणसांना अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी हायकोर्टामध्ये जावे लागते. या राज्यामध्ये, कोणत्याही समाजामधील,प्रामाणिकपणे काम करणाऱ्या माणसाच्या हातून काही चूका होऊ शकतात. त्या चूका या बोनाफाईड आहेत की मालाफाईड आहेत हे पाहिले जात नाही. "मालाफाईड चूक" झाली असेल तर त्याला शिक्षा झाली पाहिजे,त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. परंतु बोनाफाईड चूक झाली असेल तर त्याला माफ केले पाहिजे. सामान्य प्रशासन विभागामध्ये अनेक अधिकाऱ्यांच्या चौकशा, मी स्वत: पाहिलेल्या आहेत आणि त्या रद्दही केलेल्या आहेत. श्री.श्रीकांत बापट आणि श्री.वाणी यांची केस चालू आहे. या राज्यामध्ये निरपराध लोकांवर जर अशाप्रकारचा अन्याय होणार असेल,त्यांची अवहेलना करुन, त्यांना जेलमध्ये टाकण्याचा प्रयत्न होणार असेल, तर या सभागृहामध्ये आम्हीं कशाकरिता बसायचे ? मी विशेष उल्लेखाच्या निमित्ताने कधी बोललो नाही.हे मांडतान मला वेदना होतात. पण शेवटी विचार केला, या विषयी बोलून आवाज उठवून, ही कैफीयत सभागृहाच्या माध्यमातून, समाजापर्यन्त गेली पाहिजे म्हणून आज मी विशेष उल्लेखाच्या माध्यामातून बोलण्यासाठी उभा आहे. मला माहीत आहे की, लोकशाही ही चार खांबावर उभी आहे. चार खांबापैकी लेजिस्लेचर विंग ही एक महत्वाची विंग आहे. दुसरी विंग ही पत्रकारीतेची आहे,पत्रकारांची भूमिकाही महत्वाची आहे, तिसरी विंग ही एक्झ ीक्युटिव्हची आहे, लोकशाहीमध्ये ब्यूराक्रसी ही महत्वाची आहे, त्याचबरोबर ज्युडिशियरीही महत्वाची आहे. प्रत्येकाचे अधिकार भारतीय घटनेने डिफाईन केलेले आहेत. असे असूनही श्री.पुजारी हे मोठे हिरो ठरलेले आहेत.

सभापती महोदय, काही वर्तमानपत्रातील पत्रकार हे आम्हीं नेते बनवितो, असे सांगतात. कोणाबद्दल काय छापले जाते, त्यावर नेते घडवू शकतात असे सांगितले जाते. परंतु मी कधी याचा विचार केलेला नाही व मला चिंता करण्याचेही काही कारण नाही. आमचे जे असेल, त्याच्यावर आम्ही पुढे जाऊ. सगळयांवर आरोप करणे हे बरोबर होणार नाही. परंतु काही विशिष्ट लोक ॲरोगंटली वागत असतात. काही वेळेला ते खरेही असते. परंतु एखादा प्रामाणिक अधिकारी असतो, त्याच्या विरोधामध्ये वेगळे लिहिले जाते, त्यामुळे लोकशाहीमध्ये संघर्ष निर्माण होतो.

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु....

सभापती महोदय, न्यायालयाच्या भूमिकेच्या संबंधात देखील विस्तृत अशी चर्चा झाली पाहिजे. सभापती महोदय, मी लॉचा विद्यार्थी आहे. माझ्या हातून न्यायालयाचा अवमान होईल, अशापध्दतीने काही घडले नाही. त्याचप्रमाणे विधिमंडळ हे सार्वभौम सभागृह आहे. माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्य मंत्र्यांना विनंती आहे की, या सगळया व्यवस्थेमध्ये, लोकशाहीमध्ये अशाप्रकारचा निर्णय होणार असेल तर याबाबत सभागृहाने अशा लोकांबद्दल चिंता केली पाहिजे. श्री.वाणीं यांच्याबाबतीत मी खूप प्रयत्न केलेत. परंतु त्यांना न्याय देऊ शकलो नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की ते प्रामाणिक अधिकारी आहेत, त्यांची वाट लावलेली आहे. ते आता घरी असतात, ते बाहेर तोंड दाखवू शकत नाहीत, अशी त्यांची परिस्थिती झालेली आहे. श्री.वाणी हे माझ्या माहितीप्रमाणे मागासवर्गातील, विशेष प्रवर्गातील असावेत असे वाटते. त्यांची वाट लागलेली आहे. त्यांच्या पत्नीने माझ्या घरी येऊन अश्रु ढाळले. एक मुलगा त्यांचा लंडनला आहे,एक मुलगी डॉक्टर आहे. त्यांची अवस्था अतिशय बिकट व वाईट आहे. लोकशाहीमध्ये शरमेने मान खाली जाण्यासारखी ही गोष्ट आहे. या राज्यामध्ये असेच चालणार असेल तर त्याबाबत दु:ख होते. म्हणून मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून, सरकारने या गंभरीबाबीमध्ये लक्ष घालावे, अशी विनंती करीत आहे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सभापती महोदय, आपण मला दिलेल्या निदेशाचे मी पालन करीन. कारण आपण या सभागृहामध्ये जे निदेश देता त्याचे विरोधी पक्षाचे सदस्य असोत किंवा सत्ताधारी पक्षाचे सदस्य असोत, सर्वांनी पालन केले पाहिजे. आपला निर्णय हा अंतिम आहे. आपण संवेदनशील विचाराने निर्णय दिलेला आहे. आजच्या आज लक्षवेधी सूचना तयार करुन मी जरुर आपल्या कार्यालयाकडे देतो. त्यांना न्याय मिळाला पाहिजे एवढीच भावना मी व्यक्त करतो. आपण मला विशेष उल्लेख मांडण्यास अनुमती दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ.शी.**: जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग परंडा यांचे कार्यालयामार्फत मातीनाला बांधकामे रोहयो मार्फत न करता गुत्तेदारामार्फत करण्यात येणे.

**मु.शी.**: जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग परंडा यांचे कार्यालयामार्फत मातीनाला बांधकामे रोहयो मार्फत न करता गुत्तेदारामार्फत करण्यात येणे याबाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग परंडा, जि. धाराशीव यांचे कार्यालयामार्फत (1) सुकटा (2) भवानवाडी (3) अंतरवली (4) चिंचपूर (म) येथील गावामध्ये मातीनाला बांधकाम रोजगार हमी योजनेमार्फत न करता संबंधित अधिकारी व गुत्तेदार यांचेमार्फत केले जाते. मात्र रोजगार हमीमार्फत हे काम झाल्याचे भासवून खोटे हजेरीपट तयार करुन बोगस मजुरी लावून अधिकारी व गुत्तेदार यांच्या संगनमताने लाखो रुपयांची होत असलेली अफरातफर तसेच सदर काम हे निकृष्ट दर्जाचे असून त्या कामाची चौकशी करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभाग परंडा यांचे कार्यालयामार्फत पुढील गावांमध्ये माती नाला बांधकाम केले आहे. 1) सुकटा, 2) भवानवाडी, 3) अंतरवली व 4) चिंचपूर (म). येथील कामे ही रोजगार हमी योजनेमार्फत न करता सदर कामे संबंधित अधिकारी गुत्तेदार यांचे मार्फत केलेली आहेत. सदरील कामे ही रोजगार हमी योजनेतील असताना अधिकारी ही कामे गुत्तेदारी पध्दतीने करुन घेत आहेत. सदर कामामध्ये अधिकारी व गुत्तेदार यांच्या संगनमताने लाखो रुपयांची अफरातफर होत आहे. तसेच या कामावर खोटे हजेरीपट तयार करुन

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिवाकर रावते .....

बोगस मजुरी लावली आहे. तसेच सदरील कामावर अधिकारी व गुत्तेदार हे दोघे मिळून कामे करतात. शासनाला मात्र सर्व कामे मजुरांमार्फत व एस्टीमेट प्रमाणे झाले आहे असे दाखवतात. या कामावर लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. सदर कामाची क्वालिटी कंट्रोल कडून तपासणी करण्यात यावी व निकृष्ट झालेल्या कामाची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई व महाराष्ट्रातील प्रमुंख शहरांमध्ये दिवसेंदिवस भिकाऱ्यांची वाढत असलेली संख्या.

**मु.शी.**: मुंबई व महाराष्ट्रातील प्रमुंख शहरांमध्ये दिवसेंदिवस भिकाऱ्यांची वाढत असलेली संख्या याबाबत श्री. संजय दत्त वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" मुंबई व महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये दिवसेंदिवस भिकाऱ्यांची संख्या वाढत आहे. परप्रांतातूनही मुंबई व राज्यातील इतर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात भिकारी येत असून रस्त्यांच्या काठी, प्रार्थनास्थळे, पर्यटनस्थळे, वाहनतळ, सिग्नलच्या आसपास ही भिकाऱ्यांची संख्या फार विचित्र अवस्थेत व आपल्या गरिबीचे ओंगळ प्रदर्शन करुन भीक मागत असतात. मानवी दृष्टीकोनातून जनता त्यांना भिक्षा देत असते. त्यामुळे मुंबईत दिवसेंदिवस भिक्षा मागण्याचे प्रमाण प्रचंड वाढत आहे. रस्तोरस्ती भिकारीच भिकारी मुंबईत दिसून येत असून मुंबई नगरी ही आंतरराष्ट्रीय स्तरावर भिकाऱ्यांची नगरी म्हणून यापुढील काळात ओळखली जाईल अशी भीती निर्माण झाली आहे. परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना प्रामुख्याने या भिकाऱ्यांचा गराडा पडतो. त्यामुळे मुंबईतील पर्यटन व्यवसायावरही याचा परिणाम दिसून येत आहे. लहान अर्भकास घेऊन किंवा लहान मुलांकडून भिक्षा कमावणारा एक विशिष्ट वर्ग या मुंबईत कार्यरत आहे. लहान अर्भकास बघून दयेपोटी भिक्षा दिली जाते म्हणून लहान मुलांना या कामात जुंपण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे परप्रांतातून मोठ्या प्रमाणात लहान मुलांना भिक्षा मागण्यासाठी पळवून आणले जाते. त्यांना अपंग करण्यात येते व त्यांच्याकडून भिक्षा मागविण्यात येते. माणुसकीला काळिमा फासणारी ही बाब असून लहान अर्भकास पळविणे, एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात लहान मुलांना

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. संजय दत्त .....

पळवून त्यांना अपंग करुन त्यांच्या जीवावर जगणे हा व्यवसाय करणारी टोळी मुंबईत आहे. तरी सभापती महोदय, लहान मुलांच्या मदतीने मागणे किंवा लहान अर्भकाचे जनतेसमोर प्रदर्शन करुन भिक्षा मागणे हा गुन्हा ठरवावा. त्यामुळे लहान मुलांना पळविण्यावर पायबंद बसणार आहे. यासाठी मी विशेष उल्लेख सभागृहात मांडत आहे."

------

...6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या कामकाजासंबंधी.

**उपसभापती** : मध्यंतराची सुट्टी घेण्याच्या अगोदर सभागृहाच्या कामकाजासंबंधी मी सभागृहाची परवानगी घेतो. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर जी विधेयके दाखविण्यात आलेली आहेत त्यामध्ये एक विधेयक पुर:स्थापनार्थ आहे. ते विधेयक मध्यंतरापूर्वी इंट्रॉडयूस करुन घेऊ. त्यानंतर विचारार्थ 2 विधेयके दाखविलेली आहेत. त्यामध्ये सन 2006 चे, वि. स. वि. क्रमांक 14 हे विधेयक विधानसभेमध्ये संमत व्हावयाचे आहे त्यामुळे ते विधेयक चर्चेला घेता येणार नाही. त्यानंतर सन 2005 चे वि. स. वि. 89 हे विधेयक विधानभेने मंजूर केलेले नाही. हे विधेयक पुढच्या आठवड्यात घेण्यात येईल. मध्यंतराच्या सुट्टीपूर्वी एक बिल इंट्रॉडयूस होईल आणि मध्यंतरानंतर प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 89 च्या बाबतीत काय झाले ?

**उपसभापती** : ते विधेयक पुढच्या आठवड्यात घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुढच्या आठवड्यात ते विधेंयक खालच्या क्रमांकावर जाईल. सभापती महोदय, या सरकारच्या वागणुकीवर आमचा विश्वास नाही.

**उपसभापती** : सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 89 हे पुढच्या आठवड्यात घ्यावे असे माननीय सभापतींनी म्हटले आहे. हे विधेयक अजून विधानसभेमध्ये मंजूर झालेले नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये विधानसभेत हे विधेयक मंजूर झाले आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मघाशी सांगताना माझ्याकडून चूक झाली. हे विधेयक मागील अधिवेशनामध्ये खालच्या सभागृहामध्ये संमत झालेले आहे. हे विधेयक नंतर घ्यावे अशी माननीय मंत्री महोदयांनी विनंती केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही याबाबतीत माननीय मंत्री महोदयांशी बोललो आहे....

**उपसभापती** : आजच्या कामकाजाच्या क्रमानुसार हे विधेयक जेव्हा चर्चेसाठी येईल त्यावेळी माननीय सदस्यांनी याबाबतीत बोलावे. आता पुर:स्थापनाचे विधेयक घेण्यात येईल आणि त्यानंतर मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक तहकूब होईल.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी काल विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे.

**उपसभापती** : मध्यंतरानंतर ती घेऊ...

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक
L.C.BILL NO. XV OF 2006.
(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960).

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 15, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 15 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.27 ते 3.00 मध्यंतर)

---

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर संमत करण्यासाठी जी दोन बिले दाखविण्यात आलेली आहेत त्यातील सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 14- हे आज घेता येणार नाही. त्याचप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 89 - हे पुढील आठवडयात म्हणजे 18 एप्रिल,2006 रोजी चर्चेला घेण्यात येईल. या बदलांना माननीय सभापतींनी मान्यता दिलेली आहे. आता नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर चर्चा सुरु होईल्. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे चर्चेला सुरुवात करतील.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: देशाची आर्थिक राजधानी असलेल्या "मुंबई" शहराचा नियोजनबध्द रितीने सर्वांगीण विकास करणे.

**मु.शी.**: देशाची आर्थिक राजधानी असलेल्या "मुंबई" शहराचा नियोजनबध्द रितीने सर्वांगीण विकास करणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार,नितीन गडकरी,प्रमोद नवलकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,डॉ.दीपक सावंत,श्रीमती कांता नलावडे,श्री.विलास अवचट,श्रीमती संजीवनी रायकर,सर्वश्री अरविंद सावंत,प्रकाश शेंडगे,ॲड.अनिल परब,श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

" मुंबई शहर ही देशाची औद्योगिक व आर्थिक राजधानी समजली जाणे, तथापि या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबध्द रितीने प्रयत्न न होणे, केंद्र व राज्य शासनाचे या शहराकडे पूर्ण दुर्लक्ष होणे, केंद्र शासनाला देशातील एकूण आयकराच्या 35 टक्के आयकर मुंबईतून मिळणे, तथापि केंद्र शासनाकडून मुंबईसाठी मिळणारी केंद्रीय मदत अत्यंत अपुरी असणे, त्यामुळे मुंबईच्या विकासावर त्याचा विपरित परिणाम होणे, पदपथ-रस्ते यावरील अनधिकृत झोपडया व अतिक्रमणामुळे रस्त्याची व उड्डाण पुलांची कामे रखडल्यामुळे वाहनांची संख्या बेसुमार वाढून वाहतुकीची कोंडी होणे, वाहतुकीतील बेशिस्तीमुळे शहरात अपघातांच्या संख्येत वाढ होणे, मुंबई शहरात येणाऱ्या लोंढयामुळे स्थानिकांना मुंबई सोडून दूर जावे लागण्याची स्थिती निर्माण होणे, म्हाडाच्या भ्रष्ट व अनागोंदी कारभारामुळे व भुखंडाची आरक्षणे बदलून म्हाडाचे भुखंड कवडीमोलाने बिल्डरना विकणे, बिल्डर व विकासकांनी मुंबईचा ताबा घेणे, परिणामतः झोपडयात, चाळीत व गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या मध्यमवर्गीयांवर अन्याय होणे, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानाच्या कार्यवाहीबाबत संदिग्धता असणे, मुंबईत येणाऱ्या प्रचंड लोंढयामुळे सर्व प्रकारच्या नागरी सुविधांवर भयानक परिणाम होणे, महापालिका व शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय सुविधांचा अभाव असणे, पिण्याच्या पाण्याचा व प्रदुषणाचा गंभीर प्रश्न निर्माण होणे,

....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

कोळीवाडे व मासे विक्री करणाऱ्या कोळी बंधु-भगिनींची व्यावसायिक दुर्दशा होणे, गिरण्यांचे भुखंड विकू देण्यास परवानगी दिल्यामुळे गिरणी कामगार हद्दपार होणे, वाढते बँक दरोडे व पोलीसी अत्याचार यामुळे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, नागरिकांचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास उडावा अशी स्थिती निर्माण होणे, या सर्व परिस्थितीमुळे असुरक्षित, संभ्रमित झालेला मुंबईकर, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

सभापती महोदय, या सदनामध्ये नियम 260 अन्वये मुंबई शहराच्या विविध प्रश्नांच्या संदर्भात चर्चा उपस्थित केलेली आहे. अतिशय महत्वाची गोष्ट म्हणजे या चर्चेसाठी या राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख सभागृहामध्ये उपस्थित आहेत. ज्यावेळी ही चर्चा मागील आठवडयात कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आली होती त्यावेळी आम्ही ही चर्चा नंतर घेण्यात यावी अशी मागणी केली होती आणि असा आग्रह धरला होता की, या चर्चेच्या वेळी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक आहे. या चर्चेशी अनेक विभाग निगडीत असले तरी एकमेव मंत्री या चर्चेला उत्तर देऊ शकतो आणि ते म्हणजे सन्माननीय मुख्यमंत्री हे आम्ही निदर्शनास आणून दिले होते. त्याप्रमाणे आज ना.श्री. विलासरावजी देशमुख हे उपस्थित राहिले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन आज 46 वर्षे झाली आहेत. 1 मे,1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली पण त्यासाठी 1955-59 अशी चार वर्षे आंदोलन करावे लागले. त्यानंतर 105 हुतात्म्यांनी स्वत:चे बलिदान केले आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झ ाला. त्यावेळी जे अनेक प्रश्न निर्माण झाले होते ते आजही अनिर्णित आहेत. त्यातील एक महत्वाचा प्रश्न म्हणजे बेळगांव,कारवार आणि निपाणी या भागाचा आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये समावेश झालेला नाही. हा प्रश्न अद्यापही अनिर्णित अवस्थेत आहे. या प्रश्नासाठी राज्य शासन सर्वोच्च न्यायालयात गेलेले आहे. तेथे हे शासन कशा पध्दतीने केस लढविते आणि वकिलांना कशा प्रकारची ताकद देऊन त्यांच्या मागे उभे राहते तसेच कोणत्या प्रकारचे सामर्थ्य देते यावर या केसचा निकाल अवलंबून आहे. महाजन आयोगाच्या वेळी कर्नाटक शासनाने महाजन आयोगाला भुरळ घातली होती त्यामुळे आपल्याला अपयश आले आणि राज्यातील लोकांच्या तोंडाला पाने

....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

पुसली गेली. परिणामत: एवढा मोठा संघर्ष उभा राहिला आणि या संघर्षामध्ये 69 शिवसैनिक मारले गेले.

यानंतर श्री. खर्चे पी.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ..........

आम्हा सर्वांना या बेळगांव प्रश्नी तुरुंगवास पत्करावा लागला. संयुक्त महाराष्ट्राचा लढा सन 1955 पासून सुरु झाला आहे. नोव्हेंबर, 1955 मध्ये पहिला हुतात्मा मारला गेला तो फ्लोरा फाऊंटन, ज्याला आपण हुतात्मा चौक म्हणून संबोधतो तेथे. या ठिकाणी आमच्याच वर्गात असलेला श्री. सिताराम बनाजी पवार हा अकरावीतील मुलगा त्यावेळी पहिला हुतात्मा म्हणून मारला गेला. आमच्या वर्गातील सर्व मुले त्या ठिकाणी गेलो होतो. त्यावेळी तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री स्व. मोरारजी देसाई यांनी दिसताच क्षणी गोळया घालण्याचे आदेश दिले व परिणामी जो गोळीबार झाला त्यामध्ये हा सिताराम बनाजी पवार नांवाचा मुलगा मारला गेला व तेथपासून या संपूर्ण हुतात्म्यांची मालिका सुरु झाली. अशा प्रकारे 105 हुतात्मे झाल्यानंतर या संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. आपल्याला माहितीच आहे की, संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर या राज्याचा अमृत कलश आणण्याचे काम स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले आणि 1 मे, 1960 पासून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होऊन पहिले मुख्यमंत्री म्हणून स्व. यशवंतराव चव्हाण यांनी या राज्याचा कारभार हाती घेतला. अशा प्रकारे संयुक्त राज्यासाठी हे एक आंदोलन झाले व त्याने संपूर्ण राज्यात नवीन इतिहास घडविला. त्यावेळी विदर्भाच्या स्वतंत्र राज्याची शिफारस केली होती पण ते बाजूला राहिले आणि नागपूर करार झाला व त्या कराराप्रमाणे मध्य प्रदेशात असलेला नागपूरचा भाग हा संयुक्त महाराष्ट्राला जोडण्यात आला, त्यामुळेच वर्षातून एक अधिवेशन आपल्याला नागपूरला घ्यावे लागत आहे. जी मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली आणि पर्यायाने संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी झाली त्या मुंबई शहराकडून अनेकांच्या अनेक अपेक्षा वाढल्या. ज्यावेळी सन 1960 साली मुंबई शहर हे राज्याची राजधानी झाली त्यावेळी पुर्वीची लोकसंख्या 60 ते 62 लाख एवढीच होती. हळुहळु क्रमश: जवळजवळ सन 1963-64 सालानंतर या मुंबई शहरात झोपडया उभारायला सुरुवात झाली आणि त्यांची संख्या क्रमाक्रमाने वाढत जाऊन सन 1976 मध्ये आपल्याला या झोपडयांच्या संरक्षणासाठी स्लम ॲक्ट करावा लागला. हा कायदा केल्यानंतर आणखी झोपडयांची संख्या वाढत गेली व प्रत्येक वेळी आपण त्यासाठी डेडलाईन ठरविली की, अमुक वर्ष हे झोपडयांचे शेवटचे वर्ष, असे ठरवित गेलो. अशा प्रकारे राज्यातीलच नव्हे तर सर्व बाजूंनी मुंबई शहरात रोजगारासाठी लोक यायला लागले.

............2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .........

त्यावेळी मुंबई ही खरोखरच औद्योगिक राजधानी होती. या मुंबईत त्यावेळेस 60 गिरण्या होत्या आणि त्या गिरण्यांमधून दोन-अडीच लाख कामगार काम करीत होते. संपूर्ण महाराष्ट्र राज्य संपन्न होते. कारण अनेक प्रकारचे उद्योगधंदे केवळ मुंबईतच नव्हे तर संपूर्ण राज्यात विखुरलेले होते आणि त्यापासून राज्याला सुध्दा उत्पन्न मिळत होते. या पार्श्वभूमीवर मुंबईतून सर्व राज्याचा कारभार चालला होता. सन 1976 मध्ये हा झोपडपट्टीसंबंधीचा कायदा करण्यात आला आणि त्या वेळेपासून सर्व झोपडयांना एक प्रकारचे संरक्षण मिळाले व त्याचाच गैरफायदा घेऊन मुंबईत अशा प्रकारे झोपडयांची संख्या सातत्याने वाढत गेली, त्याला कुठलीही मर्यादा राहिली नाही. त्यानंतर सन 1980 च्या सुमारास मुंबई उपनगर जिल्हयाची निर्मिती झाली. तोपर्यंत मुंबई व मुंबई उपनगर हे दोन्ही जिल्हे एकच होते. ज्यावेळी हे दोन्ही जिल्हे एकच होते त्यावेळी मुंबईतून तडीपार केलेल्या लोकांना मुंबईच्या बाहेर माहिमच्या खाडीपलिकडे आणि या बाजूला कुर्ल्याच्या पलिकडे पाठवित होते. माहिमच्या पलिकडे, वांद्रा येथे जी वस्ती होती ती म्हणजे बेहराम पाडा. मुंबईतील तडीपार केलेल्या लोकांनी अशा प्रकारे बेहराम पाडयामध्ये मुक्काम केला व त्यामुळे त्या बेहराम पाडयाची निर्मिती झाली.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

अशाच प्रकारचे एक उदाहरण मी आपल्याला ऑस्ट्रेलियाचे देऊ इच्छितो. आज ऑस्ट्रेलिया हा जगातील सर्वात सुंदर देश आहे. इंग्लंडमधून तडीपार केलेल्यांना ऑस्ट्रेलियामध्ये पाठविले जात असे. पण त्याच तडीपार केलेल्या लोकांनी ऑस्ट्रेलियाचा चेहरामोहरा बदलला आहे. आज ऑस्ट्रेलियासारखा देश जगात कुठेही सापडणार नाही. ऑस्ट्रेलिया आज आदर्श शहर आहे. ज्या लोकांना तडीपार केले, त्याच लोकांनी आज ऑस्ट्रेलियाचा स्वर्ग बनविला आहे. ऑस्ट्रेलियातील ॲडलेड, पर्थ, मेलबोर्न ही शहरे फार सुंदर झाली आहेत. मी ऑस्ट्रेलियाला जाऊन आल्यामुळे मला त्याची पूर्ण कल्पना आहे. मुंबई शहरातून ज्यांना तडीपार केले होते, त्यांनी आमच्या वांद्रयाला येऊन बेहरामपाडा निर्माण केला. बेहरामपाडा म्हणजे गुन्हेगारांची वस्ती झाली आहे. जास्तीतजास्त गुन्हेगारांचा उगम बेहरामपाडयातून होतो. वांद्रे पश्चिम येथे श्री.बाबा सिद्धीकी यांचा मतदार संघ आहे. तिकडेसुध्दा अशाच प्रकारची परिस्थिती आहे. आमच्या तुलनने वांद्रे पश्चिम येथील गुंडाची संख्या फार कमी आहे.

आज मुंबई शहर जिल्हयाची अंदाजे लोकसंख्या 33 लाखाच्या आसपास आहे. पूर्वी मुंबई शहराच्या वाहतूक व्यवस्थेसाठी ट्राम होत्या. बसगाडया होत्या. टॅक्सी होत्या. व्हिक्टोरिया होत्या. खाजगी वाहने होती. सायकली होत्या. मोटार सायकली होत्या. अशा वाहनांतून लोक ये-जा करीत असत. त्यावेळीसुध्दा रेल्वे हे अतिशय महत्त्वाचे साधन जनतेसाठी उपलब्ध होते. मुंबई उपनगर जिल्हयामध्येसुध्दा या सर्व सोयी उपलब्ध होत्या. सन 1969 साली मुंबई उपनगरात रिक्षाची सेवा सुरू झाली. आज अशी परिस्थिती आहे की, जवळ जवळ दीड लाख रिक्षा मुंबई उपनगरांच्या रस्त्यावर धावत आहेत. त्यावेळी मुंबई उपनगराची लोकसंख्या 35 लाख होती. ती आज 1 कोटीचया घरात गेली आहे. मुंबई शहर आणि उपनगर या दोन्हींची संख्या दीड कोटीच्या आसपास आहे. आज झोपडपट्टी राहणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या आसपास आहे. मुंबई शहरामध्ये केवळ 34 लाख लोक राहतात, तर 70-80 लाख लोक हे उपनगरामध्ये झोपडपट्टयांमधून राहतात, ही वस्तुस्थिती आहे. मुंबई शहर कशा प्रकारे वाढत गेले याचे चित्र मला उभे करावयाचे आहे. माननीय मुख्यमंत्री कामाच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत असतात. त्यामुळे त्यांना मुंबईच्या समस्येची जाण आहे, माहिती आहे. त्यामुळेच त्यांनी सभागृहात उपस्थित रहावे असा मुद्दा ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

केला होता. मुंबई शहरात वाहनांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत आहे. वांद्रे ते नरीमन पॉईंट असा प्रवास वाहनाने करावयाचा झाल्यास त्यासाठी दीड तास लागतो. माहीम कॉजवे येथे भयानक परिस्थिती असते. येथे नेहमी वाहतुकीची कोंडी झालेली असते. सिद्धीविनायक मंदिर, बाबुलनाथ मंदिर, हाजीअली येथेसुध्दा वाहतुकीची कोंडी झालेली असते. आता पेडर रोड येथे उड्डाण पूल होणार आहे अशी चर्चा आहे. ज्यांनी पुलाला विरोध केला आहे, त्यांची नाराजी दूर करून, अडथळयाची शर्यत पार करून पेडर रोड येथे पूल बांधण्यासंबंधीचे वातावरण सन्माननीय श्री.अनिल देशमुख यांनी निर्माण केले आहे. ज्यावेळी आमचे शासन होते, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी 55 उड्डाण पूल मुंबई शहरात उभे केले. आज मुंबई शहराची काय स्थिती झाले आहे ? हे सन्माननीय मुख्यमंत्री जाणतात.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 15:15

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.मधुकर सरपोतदार....

या पुलांच्या मदतीने मुंबई शहरातील रहदारी काही तरी प्रमाणात चालू आहे असे मला वाटते. नाही तर काय परिस्थिती उद्‌भवली असती याचा विचार न केलेला बरा. काळबादेवी, हाजियाली, सिध्दीविनायक मंदीर, महालक्ष्मी, बाबुलनाथ, दादर, माहिम, माटुंगा, घाटकोपर, मुलुंड, जोगेश्वरी, भांडूप, गोरेगांव इ. ठिकाणी वाहतूक कोंडी होणे ही तर नित्याचीच बाब झालेली आहे. त्या भागांमध्ये रोजच संपूर्ण वाहतूक ठप्प होते असा आजचा अनुभव आहे.

महोदय, आता मी महाराष्ट्रातील पोलीस विभागाबद्दल बोलू इच्छितो. राज्यामध्ये एकूण 1,33,260 पोलीस असून, 9523 इतके पोलीस अधिकारी आहेत. मुंबई शहर आणि उपनगरामध्ये 83 पोलीस स्टेशन्स आहेत. आज मुंबई शहरामध्ये माणसे आणि वाहनांची संख्या तुडूंब भरली आहे. त्यातल्यात्यात आज मुंबईमध्ये गुन्हयांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, हे गुन्हे निरनिराळया प्रकारचे आहेत. जगामध्ये अस्तित्वात असलेला गुन्हा आपल्याकडे नाही अशी परिस्थिती आज राहिलेली नाही. चोरी, दरोडे, घरफोडी, पाकिटमारी, लूटमार, महिलांची छेडछाड, बलात्कार, अपहरण, खंडणी, मारहाण, खून इ. स्वरुपाचे गुन्हे आज मुंबईमध्ये सर्रास घडत आहेत. भिकारी, तृतीयपंथी, परदेशी नागरिक, मटका, जुगार, वेशा व्यवसाय, रेड लाईट एरिया, अवैध दारु विक्री यांचे वाढते प्रमाण आज अनुभवास येत आहेत. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर आपली भूमिका मांडणारच आहेत. इतकेच नव्हे तर, औषधांमध्ये भेसळ, दूधामध्ये भेसळ, पेट्रोल-डिझेलमध्ये भेसळ, अन्नधान्यामध्ये भेसळ होताना दिसते आहे. शिवाय पोलीस खात्यातील भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाणही आपण सर्वच पाहतो आहोत. अनेक पोलीस अधिकाऱ्यांकडे अवैध संपत्ती असल्याचे आढळून आले आहे. डान्स-बार, दारुंची सर्रास होणारी विक्री, वासनाकांडाच्या घटना या तर मुंबई शहराचे वैशिष्टय होत आहे. आज कोणीही अस्तित्वात असलेल्या कायद्यांना भीत नाही. आज गुन्हेगारांवर कसल्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यांना कोणाचीही भिती वाटत नाही. त्यांना पोलीस विभागाची, पोलीस आयुक्तांची, सरकारची वा अन्य कोणाचीही भिती वाटत नाही. देशातील किंबहुना जगातील मुंबई हे तिसऱ्या क्रमांकाचे शहर आहे असे म्हटले जाते. मुख्य शहरांमध्ये मुंबई शहर हे खरोखरच चांगले शहर आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



12-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) TT-2

श्री.मधुकर सरपोतदार....

आज मुंबईमध्ये ट्राफिकच्या संदर्भात अनेक अडचणी आहेत. परंतु यातून शक्य तेवढा मार्ग काढण्याचा ट्राफिक विभागाने प्रयत्न केला आहे. या शहरातील ट्राफिक पोलिसांच्या कामाचे खरोखरच कौतुक करावेसे वाटते. मी त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो. या शहरातील ट्राफिक व्यवस्थेची शिस्त पाहिली तर अन्य कोणत्याही शहरात अशी शिस्त असल्याचे दिसत नाही हे निर्विवाद सत्य आहे. दिल्ली, चेन्नई, कलकत्ता अशा मोठया शहरांमध्ये सुध्दा ट्राफिकच्या संदर्भात मुंबई शहरासारखी व्यवस्था नाही. हे आपल्या सर्वांनाच मान्य करावे लागेल.

महोदय, आज न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या प्रचंड आहे. दिनांक 12 मार्च, 1993 रोजी जी बॉम्बस्फोट मालिका घडली होती, त्या संदर्भातील खटले आजही प्रलंबित आहेत. परिणामी, गुन्हेगारांना अशा बॉम्बस्फोटाची काहीच काळजी वाटत नाही. आज मुंबई शहरामध्ये बॉम्बस्फोट होणार अशा बातम्या पसरविल्या जातात. सिनेमागृह-रेल्वे स्टेशन किंवा अन्य महत्वाच्या ठिकाणी बॉम्ब ठेवला आहे अशा प्रकारच्या निरनिराळया अफवा रोज पसरविल्या जातात. त्यामुळे पोलीस यंत्रणा शोधमोहिम आणि बंदोबस्तामध्ये गुंतून राहते. अशा अफवांची संख्या मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस वाढू लागली आहे.

महोदय, मुंबई शहरातील नागरिक अतिशय सोशिक आहे. ज्यावेळीदिनांक 27 जुलै, 2005 रोजी मुंबईमध्ये महापूर आला त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दोन दिवस शासकीय सुटी जाहीर केली. परंतु ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी आपली यंत्रणा झोपून होती.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, त्यावेळी पाऊस पडल्यानंतर, बाहेर पडू नका असे सांगण्यात आले होते. त्यामुळे हा सर्व विपरित परिणाम झाला. एवढा महापूर पूर्वी कधीही आला नव्हता. मुंबईमध्ये महापूर लोटला होता. सभापती महोदय, 48 तास मुंबईतील पाण्याचा निचरा झाला नव्हता. घराबाहेर पडण्याची परिस्थिती नव्हती. त्या संकटाच्या वेळी शासकीय सेवक नव्हते, अग्निशमन विभागाचे लोक नव्हते, जनतेच्या सेवेसाठी जी जी खाती निर्माण केली आहेत, त्या कोणत्याही खात्याची माणसे रस्त्यावर आढळली नाहीत. संपूर्ण मुंबई जलमय झाली होती. सभापती महोदय, असा अनुभव पूर्वी सन 1991 मध्ये देखील आला होता. परंतु इतक्या मोठ्या प्रमाणात तो महापूर नव्हता. सभापती महोदय, त्यावेळी दिनांक 8 जून, 1991 या दिवशी मी औरंगाबाद येथील संभाजीनगरला चाललो होतो. माझ्यासमवेत श्री. निलंगेकर-पाटील देखील होते. विमानतळावर धुके निर्माण झाले होते. संभाजीनगर येथील चिखलढाणा येथील विमानतळावर विमान उतरताना घसरले. ते एका बाजूला असलेल्या भिंतीवर जाऊन आदळले असते. परंतु तसे काही झाले नाही. ते विमान भिंतीवर आदळले असते तर विमानाने पेट घेतला असता. कदाचित आम्हाला त्यावेळी मोक्ष मिळाला असता. परंतु तसे काही झाले नाही. त्यानंतर योग असा आला की, श्री. निलंगेकर-पाटील हे मंत्री झाले. त्यामुळे सभापती महोदय, आयुष्यातील असे काही क्षण असतात की जे विसरता येत नाहीत. परवाही आम्ही काही क्षण अनुभवले परंतु त्यांचा मी उल्लेख करत नाही. जनतेने या संकटाला अगदी समर्थपणे तोंड दिले, हे नाकारता येणार नाही. जनतेने अधिक धैर्याने या संकटाशी मुकाबला केला. सभापती महोदय, त्यावेळी घडलेले एका मुलाचे उदाहरण मी सांगतो. झोपडपट्टीतील साईप्रसाद नावाचा तो एक मुलगा होता. त्याने बाहेरची माणसे वाहून जात असताना, पुरामध्ये उभे राहून 3-4 माणसांचा प्राण वाचविला. लोकांचे प्राण वाचविल्यानंतर तो आजारी झाला. त्याला सायन येथील टिळक रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची टेस्ट करण्यात आली असता त्याला डेंग्यू झाला असल्याचे निदान करण्यात आले. त्याला निरनिराळ्या प्रकारचे रोग झाले होते. तो एक महिना मृत्यूशी झुंजत होता. सगळ्या प्रकारच्या साहित्यांची मदत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत व अन्य सन्माननीय सदस्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

केली. त्या ठिकाणी उपचार कमी पडले नाहीत. परंतु तो मुलगा मरण पावला. तो 25-26 वर्षांचा कमावता मुलगा गरीब घरातील होता. त्याच्या कुटुंबियांना काय वाटले असेल ? दुसऱ्यांना वाचविण्यासाठी जो बाहेर पडतो तो स्वत:च मरतो. त्याने अनेक जणांचे प्राण वाचविले परंतु स्वत:चा प्राण गमाविला. सभापती महोदय, असे प्रसंग अनेकांवर येत असतात. इतरांसाठी स्वत:च्या प्राणांचे दान करणारा हा मुलगा होता. सभापती महोदय, आपण जवान मारले गेल्याच्या बातम्या ऐकतो. आपल्या देशातील जवान सीमेवर मरत आहेत. त्यांचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. देशाच्या रक्षणासाठी जे आपल्या पंचप्राणांची आहुती देतात, त्यांचा मृत्यू होत नसतो. सभापती महोदय, हे जवान सीमेवर उभे नसतील तर आपण सुरक्षित राहू शकत नाही, हे आपल्याला कधीही नाकारता येणार नाही. त्यांची स्मृती आपण कायम लक्षात ठेवली पाहिजे. पोलीस मुकाबला करता, संघर्ष करतात. परंतु त्यांच्यावरही अनेक प्रकारचे आरोप होतात. भ्रष्टाचाराचे आरोप कितीतरी पोलीस अधिकाऱ्यांवर झालेले आहेत. अनेक आरोपांमध्ये पोलीस अधिकारी तुरुंगात आहेत. स्टँप घोटाळा प्रकरणातही पुष्कळ पोलीस अधिकारी तुरुंगात गेले आहेत. काही लोकांवर केसेस देखील सुरु आहेत. मघाशी माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी दोन प्रकरणे सांगितली. मला खूप दु:ख झाले. सभापती महोदय, माजी पोलीस आयुक्त श्री. श्रीकांत बापट व पी.डब्ल्यू.डी. खात्याचे इंजिनिअर श्री. वाणी यांचे प्रकरण त्यांनी मांडले. प्रामाणिक माणसांना देखील त्रास दिला जातो, याचा उल्लेख त्यांनी केला. सभापती महोदय, प्रामाणिक माणसांच्या जीवनामध्ये असे अनेक अनुभव येत असतात, हे खेदाने मला नमुद करावेसे वाटते. तरी, याकडे माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. त्यांची ती जबाबदारी आहे. सुदैवाने आपण या ठिकाणी मुख्यमंत्री म्हणून आहात. ही जबाबदारी नेहमी मिळत नाही. आपण या जागेवर बसला आहात, ती अतिशय जबाबदारीची जागा आहे.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

श्री. मधुकर सरपोतदार....

माननीय मुख्यमंत्री महोदयांना मुंबई शहराची संपूर्ण कल्पना आहे, आमची अपेक्षा अशी आहे की, मुंबई शहर सुधारण्याची ऐतिहासिक जबाबदारी माननीय मुख्यमंत्री यांची आहे. या मुंबई शहरामध्ये नेमके काय करावयास पाहिजे यांची पूर्ण कल्पना त्यांना आहे. 1 जानेवारी, 1995 ही जी सीमारेषा आखून देण्यात आली होती त्याप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षित आहे. (सभापती बेल वाजवितात) सन्माननीय सभापती महोदय, आपणही देशमुख आहात व माननीय मुख्यमंत्री सुध्दा देशमुख आहेत, या दोन्ही देशमुखांनी आम्हाला सहकार्य करावे, अशी आमची अपेक्षा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मुंबईच्या प्रश्नावर बोलावे आपण गेल्या 25 मिनिटांपासून भाषण करीत आहात, यासाठी मी बेल वाजविली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मुबई शहराच्या बाबतीत बोलत असतांना मी आपणाला एक उदाहरण सांगतो की, न्यूयार्क शहराचे अध्यक्ष "आयसेन हॉवर" यांनी न्यूयार्क शहरातील काही इमारती पाडण्याचा निर्णय घेतला होता, त्यावेळी अनेक लोकांनी त्यांना विरोध केला, निर्णय घेतल्यानंतर जेव्हा त्यांची अंमलबजावणी केली तेव्हा जे लोक त्या निर्णयास विरोध करीत होते त्याच लोकांनी नंतर त्या निर्णयाचे स्वागत केले. मुंबई ही अतिशय चांगली कशी करता येईल हे माननीय मुख्यमंत्री महोदयांना माहिती आहे, सुदैवाने त्यांच्याकडेच नगर विकास खाते आहे, मुंबई शहराचे शांघाय किंवा सिंगापूर करु नका, मुंबईसाठी आपणास अनेक ठिकाणाहून निधी मिळत आहे, परंतु मुंबईला मुंबईच ठेवावे व ते शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनावे अशी आमची इच्छा आहे. विमानतळावरून बाहेर पडल्यानंतर हातामध्ये नाक पकडून जावे लागू नये, हया प्रकारची काळजी घ्यावी. आपण एक काम चांगले केलेले आहे की, मुंबईचे यु.पी. आणि बिहार होऊ दिलेले नाही कारण कृपाशंकरवर आपण कृपा केलेली नाही. त्याबाबत आपण काळजी घेतलेली आहे. कृपाशंकरवर कृपा झालेली नाही त्याची कारणे आम्हाला माहिती आहेत. कारण ते मध्येच या गाडीतून त्या गाडीमध्ये जातात. आपण सन्माननीय श्री. राणे यांच्याबाबत एक चांगली गोष्ट करुन ठेवली आहे. त्या बाईने एक स्टेटमेंट केल्यामुळे पुढे कोणतीही कार्यवाही करण्याची गरज आता राहिलेली नाही. तिकडे स्वाभिमान होता इकडे स्वाभिमान राहीला नाही. मी कोणाचाही उल्लेख येथे करणार नाही.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

या मुंबई शहरामध्ये आदळणाऱ्या माणसांच्या लोंढ्यामुळे झोपड्यांच्या संख्येत बेसुमार वाढ. झोपडी-दादा, शिधावाटप कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वितरित होणारे फोटोपास, मुंबई महानगरपालिकेचे दुर्लक्ष करणारे अधिकारी आणि पोलिसांची साथ या सर्वांना मिळाल्याने मुंबई शहरात प्रचंड प्रमाणावर झोपडपट्टयांची वाढ झाली. परंतु मिठी नदीच्या बाबतीत, मिठी नदीच्या काठी झालेले बेसुमार अतिक्रमण काढण्याचे काम आपण सुरू केले. आमच्या समोर जे त्या विषयीची कल्पनाचित्र आपण उभे केले आहे ते प्रत्यक्षात येवो हीच आमची मनोमन इच्छा आहे. मिठी नदी मोकळी करून, पाण्याचा मार्ग कोकळा करून तो समुदाला कसा मिळेल हे पाहण्याची जबाबदारी शेवटी मुख्यमंत्री म्हणून आपली आहे हे आपण लक्षात घ्यावे. सभापती महोदय, 20 जानेवारी 2005 ला मी तुमच्या एमएमआरडीला पत्र दिले होते आणि त्यामध्ये सांगितले होते की, या या गोष्टी तुम्ही करा. उद्या पावसाळा आल्यावर, तुम्ही अगोदर या गोष्टी केल्या नाहीत तर हा संपूर्ण भाग जलमय होईल. श्री.रमेश जोशी हे एमएमआरडीएचे प्रमुख होते त्यांना हे पत्र मी लिहिले होते. त्याची प्रत आताही माझ्याकडे आहे, मी वाटल्यास, ते पत्र आपल्याला देतो, आपण ते पाहून घ्यावे. मी जे त्यामध्ये सांगितले होते तसे सत्यामध्ये उतरलेले आहे हे आपणास समजून येईल. पण होते असे की, लोकप्रतिनिधी जेव्हा असे इशारे देतात तेव्हा त्याची आपल्या प्रशासनातील यंत्रणांकडून वेळीच नोंद घेतली जात नाही. आता मुख्यमंत्री म्हणून आपल्याला पाठविलेल्या पत्राची आम्हाला पोच-पावती तरी येते पण आपल्या इतर सहकाऱ्यांकडून मात्र आम्हाला तसा प्रतिसाद मिळत नाही. मी या बाबतीत माननीय सभापतींना देखील बोललो आहे. सभापतींनी देखील सभागृहामध्ये सांगितले आहे की, सर्व मंत्र्यांनी तसेच विभाग प्रमुखांनी देखील कोठल्याही लोकप्रतिनिधीचे पत्र आले तर त्याची पोचपावती एक महिन्यामध्ये त्यांना दिली पाहिजे. पण तेवढे सौजन्य माननीय मुख्यमंत्री महोदय, आपले सहकारी दाखवित नाहीत हे मला येथे खेदाने आपल्या निदर्शनास आणून द्यावे लागत आहे. आपण आपल्या कार्यालयामार्फत हे कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडीत आहात पण आपले सहकारी तसे का करीत नाहीत हे मी समजू शकत नाही. मंत्रिमंडळातील आपल्या सहकाऱ्यांनी आपल्याप्रमाणे आमच्या पत्रांना प्रतिसाद दिल्यास निदान आम्ही जे काही सांगतो आहोत ते तुमच्या निदर्शनास तरी आले आहे आणि त्याची दखल यथावकाश घेतली जाईल असे आम्हाला देखील वाटेल. तेव्हा या दृष्टीने या प्रश्नाकडे लक्ष द्यावे

....... 2डब्ल्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ...

असे मला अत्यंत विनम्रतेने आपल्याला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शिधापत्रिका वितरित करताना प्रत्यक्ष वास्तव्याचे ठिकाण न तपासता मंत्री किंवा काँग्रेस पक्षाचे आमदार, तत्सम पदाधिकारी यांनी फोनवर दिलेल्या माहितीच्या आधारे शिधापत्रिका देणे, परिणामी बोगस शिधापत्रिका शोधून काढण्यासाठी शासनाने हाती घेतलेला कार्यक्रम यशस्वी होऊ शकणार नाही. याबाबतीत असे होते की, हायवेवर असलेल्या पुलाच्या खाली असा पत्ता शिधापत्रिका काढताना दिला जातो पण तरीही अशा लोकांना शिधापत्रिका दिली जाते. म्हणजे हायवेवर पूल बांधला तो झोपड्या बांधण्यासाठी केला आहे का ? दुसरे असे की, आपला इन्स्पेक्टर देखील अर्जदाराच्या जागेपर्यंत गेला तर तो देखील अशा लोकांना शिधापत्रिका देणार नाही याबद्दल मला पूर्ण खात्री आहे. पण त्यासाठी शासनाचे बंधन असणे आवश्यक आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई शहराच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पात एनजीओ म्हणून स्पार्क या संस्थेकडे सर्वेक्षण करणे, कच्चे फोटोपास देणे, नोंदणी करणे आदी शासकीय अधिकार दिल्यामुळे प्रचंड प्रमाणात होणारा भ्रष्टाचार आणि घूसखोरांची सोय. सभ्ंापती महोदय, आपण आता या मुंबई शहरामध्ये मिठी नदी प्रकल्प उभा करीत आहात. एकदा अशा या लोकांना कळले की, येथे असे असे काम होत आहे, पूल होणार आहे की, ताबडतोब हे लोक तेथे झोपड्या उभ्या करतात आणि या 'स्पार्क' चे लोक त्यांना पाठीशी घालतात, त्यांना मदत करतात. मग त्या लोकांना आपल्या ट्रांझिट कॅम्पमध्ये जागा मिळते. पण अशा खोल्या देखील वेगळ्याच लोकांना दिल्या गेल्या आहेत. अनेक वर्षे झोपडीत राहणाऱ्याला तेथे जागा मिळत नाही आणि बोगस लोकांना आपल्या ट्रांझिट कॅम्पमध्ये खोली दिली जाते. तेव्हा असे होऊ नये यासाठी देखील आपण लक्ष दिले पाहिजे, आपली यंत्रणा उभी करून याबाबतची माहिती घेतली पाहिजे.

सभापती महोदय, एसआरए योजनेखाली उभ्या राहणाऱ्या झोपडपट्टीवासियांसाठीच्या गृहनिर्माण संस्थांमध्ये विकासकांनी घातलेला धुमाकूळ. सहकारी संस्थांचे उपनिबंधक, उपजिल्हाधिकारी आदी माध्यमातून दिली जाणारी बोगस प्रमाणपत्रे, परिणामी अनेक योजना न्याय प्रविष्ठ होणे. गरीब झोपडीधारकांवर कोर्टबाजी करण्याचा प्रसंग येणे आणि जे खरोखरच भूमिपुत्र आहेत, अनेक वर्षे झोपडपट्टीत जीवन कंठित आहेत अशा लोकांवर निर्दयीपणे बेघर होण्याचा प्रसंग येतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, संजयखान सारखा मनुष्य, त्याची

..... 2डब्ल्यू 3 ..



KBS/MHM/KGS. श्री. वि. खर्चे .... 15:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ...

पत्नी, मुलगा यांच्या नावावर अशा प्रकारेच एसआरए मधील जागा दिली गेली. ...

( यानंतर श्री. सरफरे .....2एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

त्यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर बरीच चर्चा झाली. आणि त्या प्रकरणाची आता सी.आय.डी.मार्फत चौकशी होणार आहे. अशी जी प्रकरणे घडत आहेत त्याकडे सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, म्हाडाकडून अनेक आरक्षित भूखंडाचे आरक्षण उठवून विकासकांच्या ताब्यात देण्यामध्ये झालेला प्रचंड प्रमाणात गैरव्यवहार, सर्वसामान्य जनतेसाठी उभारावयाच्या अल्प दरातील गृहनिर्माण योजनांकडे होत असलेले दुर्लक्ष. या शहरामध्ये असलेल्या मोकळया मैदानांचा एक कोपरा विकासकाला देऊन टाकण्याचे प्रकार मध्यंतरी झाले. त्याविरुध्द आंदोलने केली, मोर्चे काढले तरीसुध्दा मुंबईच्या पश्चिम उपनगरामध्ये अजून हे प्रकार घडत आहेत त्यांना आळा घालण्याचे, त्यांच्यावर बंधन आणण्याची आपली जबाबदारी आहे. सभापती महोदय, याठिकाणी मुंबईच्या अनेक प्रश्नांसाठी आपल्याला आंदोलने करावी लागत आहेत याकडे शासनाने लक्ष द्यावे.

दिनांक 27 जुलै, 2005 रोजी मुंबई उपनगर जिल्हा महापुराने वेढला होता. मुंबई महानगर विकास प्रदेश प्राधिकरणाला या संदर्भात 20 जून, 2005 रोजी पूर्वसूचना देऊनही पावसाळयाचे पाणी वाहून नेणारे नाले, मिठी नदी व अन्यत्र झालेले दुर्लक्ष, परिणामी जनतेचे झालेले अतोनात हाल व कोटयावधी रुपयांचे नुकसान. महापूरामुळे बाधित झालेल्या लोकांना शासनाने केरोसीन, गहू व तांदूळ वाटप करण्यासाठी कॉग्रेस पक्षाचे लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते यांच्या हाती सुपूर्द केल्यामुळे प्रचंड प्रमाणात झालेला भ्रष्टाचार व खऱ्या लाभार्थ्याकडे झालेले दुर्लक्ष, अनेक पात्र लाभार्थ्यांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे. यासंबंधी मी आपणाकडे अनेक वेळा पत्र व्यवहार केला आहे. याबाबत कोणती कारवाई करावयाची हा आपला अधिकार असल्यामुळे मी त्यावर जास्त भाष्य करीत नाही.फक्त लोकप्रतिनिधी म्हणून ही बाब आपल्या निदर्शनास आणून देणे हे माझे काम आहे. वरील विषयाबाबत माननीय मुख्यमंत्री, संबंधित विभागाचे मंत्री यांना पत्राव्दारे माहिती देऊनही तक्रारींकडे झालेले दुर्लक्ष. माननीय मुख्यमंत्र्यांचा अपवाद वगळता अन्य मंत्र्यांकडून पत्राची पोहोच देखील न मिळणे, मुंबई शहरामध्ये बोगस डॉक्टरांचे वाढत चाललेले प्रमाण, अप्रमाणित औषधांचा होत असलेला सर्रास वापर, परिणामी जनतेच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम. मुंबई शहरातील अनेक रुग्णांलयांमध्ये जनतेची होणारी गैरसोय, रुग्णांना अत्याधुनिक उपचार मिळण्यात येणाऱ्या अडचणी. विशेषत: अप्रमाणित औषधे मुंबई शहरामध्ये मोठया प्रमाणावर विकली जात असल्यामुळे त्यांचा रुग्णांना उपद्रव होत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

आहे, काही ठिकाणी तर त्यामुळे काही लोक मृत्युमुखी पडत आहेत त्यामुळे या गोष्टीकडे सुध्दा शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

माननीय मुख्यमंत्री महोदयांना मला काही सूचना करावयाच्या आहेत त्या अशा की, आपण केलेल्या घोषणांची अंमलबजावणी करावी, मुंबईचे शांघाय-सिंगापूर नको, परंतु स्वच्छ, हिरवीगार, वाहतूक व्यवस्था सुलभ, पदपथ मोकळे, आरोग्यमय अशी मुंबई अपेक्षित आहे. स्वच्छ पाणीपुरवठा, अडथळे विरहीत मलनिस्सारण व्यवस्था. शिक्षण संस्था, क्रिडांगणे, उद्याने, नदी-नाले यावरील अतिक्रमणे हटवा. लांगूलचालन न करता करभरणा करणाऱ्या नागरिकांना संरक्षण व दिलासा द्या. आपणाकडून अपेक्षा आहे की, 1 जानेवारी 1995 हीच लक्ष्मणरेषा कायम ठेवा. त्यानंतर 2000 सालापर्यंत उभ्या राहिलेल्या झोपडयांचे काय करावयाचे ते आपण नंतर ठरवा. आपणाकडून आम्ही कोणती अपेक्षा ठेवीत आहोत ते सांगतो. 1 जानेवारी 1995 या अंतिम तारखेचा संदेष देऊन नंतरच्या अतिक्रमिकांना आश्वासनाच्या हिंदोळयावर झुलवीत ठेऊ नका. नाहीतर असे होते की, लोक अपेक्षेने आपल्याकडे येतात की, 1995 पर्यंतच्या झोपडया अधिकृत झाल्या आहेत. आता 2000 सालापर्यंतच्या झोपडया अधिकृत होतील, त्यानंतर 2005 पर्यंतच्या झोपडया अधिकृत होतील. त्यामुळे मुंबईच्या झोपडपट्टी दादांना नवीन झोपडया उभारण्याचे काम मिळेल. आणि झोपडपट्टी दादांशिवाय मुंबईला पर्याय नाही अशी अवस्था निर्माण होईल. यासंबंधी आपण कोणतीही घोषणा करतांना मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांवर डोळा ठेऊन करु नका तर प्रत्यक्ष कृती करुन इच्छा शक्तीचा साक्षात्कार घडवा. आपण जे काही कराल ते सत्ता कशी मिळेल यासाठी करु नका तर मिळालेल्या सत्तेचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करा. हे मुंबई शहर स्वच्छ, सुंदर, जागतिक किर्तीचे हिरवेगार व्हावे आणि पुन्हा या शहरामध्ये महापूर येणार नाही याकरीता मिठी नदी स्वच्छ होईल यासाठी आपण प्रयत्न करावेत यासाठी मी विनंती करीत आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

त्यानंतर माझी विनंती आहे की, न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्यांकडे लक्ष द्यावे. शेवटी एकच विनंती आहे की,बेळगाव-कारवार सीमा भागाच्या प्रश्नासाठी मुंबईतील लोकांनी बलिदान दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी मुंबईतील 105 हुतात्म्यांचा बळी गेलेला आहे. बेळगाव-कारवार या विभागातील जनतेला जास्तीत जास्त न्याय देण्याचा प्रयत्न करावा. सभापती महोदय, आपण माझे भाषण शांतपणे ऐकून घेतल्याबद्दल आणि मला बोलण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन, माझे भाषण संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र.

---

प्रस्ताव प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये मुंबईच्या निरनिराळ्या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा होत आहे.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणाला सुरुवात करण्याअगोदर युती शासनाच्या वेळी जी चांगली कामे झाली त्याबद्दल मला बोलले पाहिजे. युती शासनाच्या वेळी मंत्री म्हणून काम केलेले आणि आता सदस्य म्हणून उपस्थित असलेले सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी पूल बांधण्याचे काम हाती घेतलेले होते. त्यांनी चांगल्या प्रकारची सुरुवात केली. निधी अपुरा असतांना सुध्दा बी.ओ.टी.तत्वावर कामाची सुरुवात केली. त्यामुळे तत्कालीन बांधकाम मंत्री श्री.नितीन गडकरी यांचें मी अभिनंदन करेन. सभापती महोदय, मला राजकीय विषय मांडायचा नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि श्री. नवलकर साहेब यांची क्षमा मागून मी निवेदन करतो की, युती शासनाच्या वेळेस त्यांनी मुंबईमध्ये 40 लाख लोकांना मोफत घरांचा कार्यक्रम जाहीर केलेला होता. पैसेही न घेता फुकट घरे बांधून देऊ, अशी घोषणा केली होती. त्यामुळे या देशातील सर्व लोकांना वाटले की, गरीब आहोत, कामधंदा काही नाही. बाकी काही मिळाले नाही तरी चालेल, पण मुंबई शहरामध्ये फुकटचे घर मिळेल...

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ......

त्यामुळे आज मुंबईमध्ये जे ज्वलंत प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यात खासकरुन झोपडपट्टयांचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याला विरोधी पक्षाचे लोक जबाबदार आहेत आणि काही प्रमाणात आम्हीही जबाबदार आहोत. मला आठवते की, श्री. वसंतराव नाईक हे या राज्याचे मुख्यमंत्री असताना श्री. प्रभाकर कुंटे हे गृहनिर्माण राज्यमंत्री होते. त्यावेळी 1976 साली पहिल्याप्रथम मुंबई शहरात ज्या अनधिकृत झोपड्या आहेत त्यांची शिरगणती करुन त्यांना फोटोपास देण्याचे काम श्री. प्रभाकर कुंटे हे गृहनिर्माण राज्यमंत्री असताना झाले. त्यानंतरही आमचा पक्ष सत्तेमध्ये होता. 1976 नंतर 1980 च्या निवडणुका आल्या. 1976 नंतर 1980 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देण्यात आली. त्यानंतर 1985 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देण्यात आली. त्यानंतर 1990 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देण्यात आली. त्यानंतर 1.1.1995 पर्यंतच्या झोपड्याना मान्यता देण्यात आली. शेवटी हे राजकारण आहे.1.1.95 नंतर झोपड्या वाढणार नाहीत आणि अनधिकृत झोपड्या झाल्या तर संबंधितांना जबाबदार धरु असे सांगण्यात आले. श्री. वसंतराव नाईक साहेबांनी एक फतवा काढला होता की, कोणत्याही वॉर्डमध्ये अनधिकृत झोपड्यांचे बांधकाम झाले तर त्या ठिकाणच्या वॉर्ड ऑफीसरला आणि त्या पोलीस स्टेशनच्या इन्चार्जला जबाबदार धरले जाईल. त्यावेळी श्री. वसंतराव नाईक यांनी फतवा काढल्यानंतर मुंबई शहरामध्ये झोपडपट्टया वाढल्या नाहीत. श्रीमती इंदिराजी गांधी पंतप्रधान असताना मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या लोकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाकडून 5 कोटी रुपये पाठवण्यात आले होते आणि त्यातून ज्या अनधिकृत झोपडपट्टया होत्या त्यांना पाणी आणि शौचालयाची सोय उपलब्ध करुन दिली. आज देशामध्ये उत्तरप्रदेशनंतर सर्वात जास्त लोकसंख्या महाराष्ट्रामध्ये आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीचा अहवाल माझ्या हातामध्ये आहे. सन 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील लोकसंख्या 9.69 कोटी होती आणि 1 मार्च, 2006 रोजी राज्यातील लोकसंख्या सुमारे 10 कोटी 41 लाख आहे. संपूर्ण देशाची जी लोकसंख्या आहे त्यातील जे निराधार आहेत, जे गरजू आहेत, ज्यांना कामधंदा नाही, ज्यांना घर नाही असे लोक मुंबईमध्ये येतात. महाराष्ट्रात 1991 ते 2001 या कालावधीत आलेल्या स्थलांतरितांची संख्या 32 लाख 80 हजार इतकी जास्त

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

होती. त्यामध्ये इतर राज्यांमधून आलेल्या स्थलांतरितांची संख्या 32 लाख 32 हजार होती. अधिक संख्येने स्थलांतरित झालेली जी लोकसंख्या आहे त्यामध्ये उत्तरप्रदेशातील 28.5 टक्के, कर्नाटकमधील 14.7 टक्के, मध्यप्रदेशातील 8.5 टक्के, गुजरातमधील 7.6 टक्के, बिहारमधील 7.1 टक्के आणि आंध्र प्रदेशमधील 6 टक्के अशा पध्दतीने ही 32 लाख 80 हजार लोकसंख्या त्या 10 वर्षामध्ये वाढलेली आहे. आज मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 15 लाख आहे. या मुंबई शहरामध्ये काय घडते आणि काय घडू शकते याचा विचार केला तर गेल्या 26 आणि 27 जुलैला अतिवृष्टी झाल्यानंतर मुंबईमध्ये जो हाहाकार माजला तो तुम्ही आम्ही सर्वांनी पाहिलेला आहे. त्यावेळी मी त्राग्याने असे म्हणालो होतो की, पूर्व आणि पश्चिम उपनगरे आणि मुंबई शहर ही मुंबई महानगरपालिका सांभाळू शकेल काय ? मी त्यावेळी मागणी केली होती की, या मुंबई महानगरपालिकेचे तीन भाग करा.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 15:50

(श्री. गुरुनाथ कुलकणीर्....)

त्यावेळी, मी प्रादेशिक वाद करतो, असे माझ्या बाबतीत बोलले गेले. खरे म्हणजे असा वाद निर्माण करण्याचा माझ्या मनात मुळीच हेतू नव्हता. या मुंबई महानगरपालिकेमध्ये ॲडमिनिस्ट्रेटिव्हली 227 वॉर्ड आहेत. कोणाचा कोणाला पत्ता नाही. जो धोबीतलाव भाग आहे त्याठिकाणी ना धोबी आहे ना तलाव आहे अशा प्रकारची वस्तुस्थिती आहे. माझ्या बोलण्यामध्ये त्यावेळी प्रादेशिकतेचा वाद नव्हता. आज मुंबईचे स्वरुप पाहाता या मुंबई शहराला सुरेखपणा येऊ शकेल या दृष्टीने आघाडी सरकार परिस्थिती हाताळत आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मिठी नदीला पूर येऊन जेव्हा संपूर्ण मुंबई जलमय झाली त्यावेळी मी दोन दिवस आमदार निवासामध्ये अडकून पडलो होतो. आमदार निवासातून मी माझ्या चेंबूरच्या घरी जाऊ शकलो नाही. पहिल्या दिवशी मी जेव्हा घरी जाण्याचा प्रयत्न केला त्यावेळी मी सायन पर्यन्त गेलो. तेथून पुढे जाऊ शकलो नाही. दुस-या दिवशी मी धारिष्ट्य करुन घरी जाण्याचा प्रयत्न केला आणि त्या दिवशी देखील मी सायन पर्यन्त पोहोचलो आणि पुन्हा पावणे चारच्या सुमारास माझ्या आमदार निवासातील खोलीवर परतलो. आज मिठी नदीवर खर्च केला जात आहे. त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि आघाडी सरकारचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, या मुंबईच्या संदर्भात यापूर्वी अनेक योजना आणल्या गेल्या. परंतु असलेल्या पैशाचे योग्य प्रकारे जे नियोजन करायला पाहिजे होते ते केले गेले नाही. श्री. टी.चंद्रशेखर हे जेव्हा ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त होते त्यावेळी ठाणे शहराची सुधारणा झाली. त्यानंतर त्यांची नागपूरला बदली झाली. Nagpur has become one of the international city. शासनाने जर अधिका-यांना काम करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले तर किती चांगल्या प्रकारे काम होऊ शकते हे ठाणे आणि नागपूर शहरांच्या झालेल्या सुधारणांवरुन दिसून येते. आज मुंबईमध्ये दोन प्रकल्प सुरु झालेले आहेत. आम्ही जेव्हा गाडीने मुंबईच्या रस्त्यावरुन जातो त्यावेळी हे मुंबईचेच रस्ते आहेत काय ? असा प्रश्न आमच्या मनात निर्माण होतो. उड्डाण पूल बांधण्यात आले. विकासाच्या आड येणा-या झोपडयांच्या बाबतीत एसआरअे योजनेंतर्गत मोफत घरे बांधून देण्याचे काम सुरु झाले. आज 1 लाख घरे बांधून तयार आहेत. मला हे सांगावयाचे आहे की, कोणत्याही कार्यक्रमाचे पूर्व नियोजन केले नाही तर तो कार्यक्रम यशस्वी होत नाही. या राज्यामध्ये लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आणि माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईमध्ये प्रभावीपणे

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 15:50

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी पुढे सुरु...)

विधायक कामे झालेली आहेत. पैशाचा कोठेही अनाठाई वापर केला जात नाही. योजनेंतर्गत पैसे खर्च केल्यामुळे मुंबई हे आता सुरेख शहर निर्माण हाण्याच्या मार्गावर आहे. मुंबई महानगरपालिका कोणाच्या ताब्यात आहे याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. बीएमआरडीओ, एमयूआयपी, एमयूटीपी आणि महानगरपालिका या यंत्रणा चांगल्या प्रकारे हातात हात घालून काम करीत आहेत. मघाशी माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी, एसआरओ योजनेंतर्गत कोणासाठी बांधकाम होत आहे, असा प्रश्न विचारला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, फक्त 1.1.1995 पर्यन्तच्या झोपड्पट्टीवासीयांना मोफत घरे बांधून देण्यात येणार आहेत. 2002 पर्यन्तच्या झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देण्याचा निर्णय घेतलेला नाही.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

2000 सालापर्यंतच्या झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांना फक्त सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील असा निर्णय झालेला आहे. त्यांना मोफत घरे मिळणार नाहीत. याबाबतचा अधिक खुलासा माननीय मुख्यमंत्री महोदय करतील. 1995 सालापर्यंतच्या झोपडयातील लोकांना मोफत घरे द्यावयाची आहेत असा निर्णय लोकशाही आघाडी सरकारने घेतलेला आहे. एसआरए योजनेमधून जी घरे गरीब लोकांना आणि झोपडपट्टीतील लोकांना उपलब्ध करुन दिली जात आहे त्यामध्ये नट-नटया आणि त्यांची मुले यांची नांवे येत आहेत. 200-225 चौ.फुटाची सदनिका बोगस नांवे घालून मिळवायची आणि अधिकची जागा स्वत:चे पैसे घालून विकत घ्यायची अशा प्रकारे 1000-1200 चौ.फूटाची सदनिका मिळविण्याचे काम सुरु आहे. म्हाडाकडून 200-225 चौ.फूटाची सदनिका फुकट घ्यायची आणि स्वत:चे पैसे घालून आणखी 1000 चौ.फूट अशी एकूण 1200 चौ.फूटाची जागा घेतली जात आहे त्याची चौकशी शासन करणार आहे किंवा नाही असा माझा प्रश्न आहे. आज मुंबई शहरामध्ये जवळजवळ 16000 इमारती केव्हाही पडण्याच्या स्थितीत आहेत. 20-20 वर्षे लोक संक्रमण शिबिरात रहात आहेत. त्यांच्यासाठी शासन योजना राबविणार आहे किंवा नाही ? हे सर्व नागरिक मूळ मुंबईचे असून इतर राज्यातून आलेले नागरिक नाहीत. या 16000 इमारती दुरुस्त करुन त्यामध्ये लोकांना नवीन घरे शासन देणार आहे किंवा नाही ? अशा धोकादायक इमारतीमधील लोकांना त्वरित घरे उपलब्ध करुन द्यावीत अशी मी या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो.

सभापती महोदय, मुंबईमध्ये ज्या झोपडया तयार झालेल्या आहेत त्यांचा विचार केला तर या झोपडया मुंबईच्या सेंट्रल पोस्ट ऑफीस पासून रे रोडपर्यंत गेलेल्या आहेत. या भागातून गाडी सुध्दा चालविता येत नाही. केवळ माणसे मरतील म्हणून लोक या भागातून गाडी चालवीत नाहीत. या भागातील रस्त्यांच्या दोन्ही बाजूला किडया-मुंग्यांसारखी झोपडपट्टी उभी राहिलेली आहे. याच्यावर कोणती कारवाई करणार आहात किंवा नाही असा माझा शासनाला प्रश्न आहे. आज अधिकाऱ्यांवर सुध्दा जनतेचा विश्वास राहिलेला नाही. म्हाडामध्ये काय चालले आहे हे तर सांगायला नको. मध्यंतरी म्हाडाचे एक अधिकारी श्री. कुंटे यांनी एक आदेश काढला. खालच्या अधिकाऱ्यांनी त्यामध्ये "ध" चा "मा" केला आणि जे करावयास नको होते ते केले. म्हाडामध्ये केवळ दलालांमार्फत काम चालते यामध्ये शासन सुधारणा करणार आहे किंवा नाही ? आज लोकशाही

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

आघाडी सरकारमध्ये मुख्यमंत्री कॉँग्रेस पक्षाचा आहे. याबाबतीत आम्ही एक पाऊल मागे आलो आणि चांगला प्रमुख असेल तर त्याच्याबरोबर काम करावयाचे असा निर्णय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने घेतला. जर मुंबईचे स्वरुप खरोखरच बदलायचे असेल तर काही वेळेला शासनाला कठोर भूमिका घ्यावी लागेल. आज मुंबईच्या फूटपाथवर फरशा टाकल्या जात आहेत हे एक चांगले काम होत आहे. जीपीओ पासून रे रोडपर्यंत जे झोपडीधारक आहेत त्यांच्यासाठी नवीन इमारती बांधा आणि या लोकांना घरे द्या. मुंबईमध्ये फुटपाथवर आणि इतर ठिकाणी झोपडी उभी राहणार नाही असे निर्बंध वॉर्ड ऑफीसरवर घातले पाहिजेत. मुंबईचे शांघाय आणि सिंगापूर करु नका पण मुंबई शहराला एक सुंदर शहर तरी बनवा अशी माझी शासनाला विनंती आहे. मुंबई शहराला एक विशिष्ट प्रकारचा दर्जा आहे. देशाची आर्थिक राजधानी आहे. कोकणातून मुंबईला येणारा माणूस असेल किंवा सोलापूरमधून येणार असेल किंवा नागपूरमधून येणारा असेल त्याला कमर्शिअल मुंबई नको आहे. माझ्या राज्याची राजधानी आहे हा त्याला अभिमान आहे. गावाकडून येणाऱ्या माणसाला असे वाटले पाहिजे की, ही मुंबई माझी राजधानी आहे म्हणून ती पूर्ववत करण्याचे काम शासनाने करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा उपस्थित झालेली आहे आणि या चर्चेकरिता माननीय मुख्यमंत्री देखील उपस्थित आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. कारण या सभागृहात ज्यावेळी आपण चर्चा करतो त्यावेळी ती चर्चा निर्णय घेणाऱ्या योग्य व्यक्तीच्या कानावर जाणार असेल तरच त्या चर्चेचे महत्व असते. परवा ज्यावेळी आम्ही आपल्याला विनंती केली होती की, आपण माननीय मुख्यमंत्री सभागृहात असतांना ही चर्चा ठेवावी. आपण आमची विनंती माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवली आणि ते या ठिकाणी उपस्थित आहेत, त्याबद्दल समाधान व्यक्त करुन मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, स्व. पंडित नेहरु नेहमी म्हणत होते की, India is not Nation, It is a population. त्यापलिकडे ते असेही म्हणायचे की, या देशात जेवढी माणसे आहेत तेवढेच प्रश्नही आहेत आणि हेच वाक्य मुंबईकडे बघितल्यानंतर आपल्याला आठवते. मुंबई म्हणजे समूद्र, रेल्वे, रस्ते, हवाई वाहतूक या सर्वांचे नैसर्गिकदृष्टया सेंटर असून संपूर्ण जगातील अतिशय महत्वाचे शहर आणि या देशाची खऱ्या अर्थाने आर्थिक राजधानी आहे. या शहराचा विकास झाला पाहिजे, शहर सुंदर व स्वच्छ राहिले पाहिजे, हीच भावना आपणा सर्वांच्या मनात आहे. पण गेल्या 25 वर्षात जी परिस्थिती या शहरात निर्माण झाली त्यासंबंधी सर्व राज्यकर्त्यांनी अतिशय गंभीरतेने विचार करण्याची आवश्यकता आहे. कदाचित यासाठी हा "गंभीर" शब्द देखील मला वाटते बऱ्याच वेळा घासला गेला. मला विचारले तर मी असे म्हणेन की, आज मुंबई ही डेड बेडवरवर आहे, इन्टेंसिटी केअर युनिटमध्ये आहे. या शहराची मुख्य अडचण म्हणजे तिन्ही बाजूला समूद्र असल्यामुळे आणखी वाढण्यासाठी कुठेही जागा नाही. लोकांचे लोंढेच्या लोंढे या मुंबई शहराकडे येतात व हे लोंढे हे मुंबई शहर आत्मसात करीत आहे पण शेवटी या शहराची क्षमता किती आहे याचा कुठेतरी विचार होण्याची आवश्यकता आहे. या मुंबईतील असणारी लोकसंख्या आणि वाढीव लोकसंख्या हा काही जातीयवादी अथवा धर्मवादी विषय नाही तर मुंबईत जे उपलब्ध इन्फ्रास्ट्रक्चर म्हणजेच रस्ते, पिण्याचे पाणी अथवा विजेचा पुरवठा इ. सेवा किती लोकांना आपण देऊ शकतो आण भविष्यात देऊ शकणार आहोत याला कुठेतरी मर्यादा घातली पाहिजे. गेल्या आठ दहा दिवसांपूर्वी मी माननीय मुख्यमंत्र्यांचे एक स्टेटमेंट वाचले आणि ते तसेच असेल तर ही खरोखरच समाधानाची गोष्ट आहे. यातून ते काही तरी मार्ग काढतील. कारण तसे केले नाही तर कितीही

........2
असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .........

रस्ते बांधले, कितीही पूल बनविले तरी त्याचा फायदा होणार नाही. तसे करणे म्हणजे आजचे मरण उद्यावर ढकलण्यासारखेच होणार आहे. शेवटी मुलभूत प्रश्न जो आहे तो म्हणजे या शहराची इन्फ्रास्ट्रक्चरल मर्यादा. त्या समस्येपुढे मराठी, गुजराथी, हिंदू, मुसलमान हे प्रश्न गौण आहेत. या शहराच्या मर्यादा लक्षात घेऊन या शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन त्यावर काही तरी बंधन ठरविण्यासाठी गंभीरतेने विचार करणार की नाही ? म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, यासाठी सर्वच पक्षांनी राजकारण बाजूला ठेवून विचार करण्याची आवश्यकता आहे. शेवटी शहरच जगणार नसेल, या शहराची संस्कृती जगणार नसेल, शहरच अस्तित्वात राहणार नसेल तर आपल्या राजकारणाला काहीच अर्थ राहणार नाही. म्हणून सर्वात गंभीर मुद्दा कोणता असेल तर मुंबईकडे येणाऱ्या लोकांची आकडेवारी बघितली तर ती मला वाटते 119 कोटीपर्यंत गेली, कदाचित त्यापेक्षाही जास्त असेल. 119 कोटीचे हे मुंबई शहर आणि या शहराची ताकद कोणीही सांगेन की, आता मुंबई शहर हे सर्व आता सहन करु शकत नाही.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

ठाणे जिल्हयाचीसुध्दा अवस्था विचित्र झाली आहे. मुंबई-ठाण्याचा सत्यानाश आज आपण सत्तेच्या खुर्चीवर बसून पहात आहात, तर आम्ही विरोधी पक्षाच्या खुर्चीत बसून पहात आहोत. आज मुंबई व ठाणे शहराची वाट लागत आहे. म्हणून माझी पहिली विनंती आहे की, बाहेरून येणारे जे लोंढे आहेत, मग ते कोणत्या भाषेचे आहेत, जातीचे आहेत, धर्माचे आहेत याचा विचार न करता ते रोखले पाहिजेत. मुंबईचा विचार करून, सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. आज मुंबईचे प्रश्न सोडविण्याकरिता ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. तशी इच्छा शक्ती मुख्यमंत्री महोदय आपण मागे दाखविली होती. तेव्हा आपण सभागृहामध्ये आश्वासन दिले होते की, याबाबत कठोर कायदा करण्याचा विचार करीत आहे. त्यावेळी मी उभे राहून सांगितले होते की, आम्ही संपूर्ण सहकार्य करण्यास तयार आहोत. दुर्दैवाने यासंबंधी पुढे काही होऊ शकले नाही. तेव्हा याचा अतिशय गंभीरतेने विचार केला पाहिजे. मुंबई शहर वाचविण्यासाठी ही शेवटची संधी आहे. त्यानंतर ही संधी आपल्या सर्वांच्या हातून जाणार आहे. सगळे राजकारण बाजूला ठेवून सर्व पक्षीय निर्णय घ्यावा. त्याच्या पाठिमागे उभी राहण्याची आमची तयारी आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा प्रदूषणाचा आहे. मुंबईतील 60 टक्के लोक हे झोपडपट्टीमध्ये राहतात. मुंबईत सर्वात जास्त प्रदूषण हे वाहनांमुळे होते. बेस्ट उपक्रमाने आता बसगाडया CNG वर चालविण्यास सुरूवात केली आहे. मुंबई शहरात CNG ची सेंटर्स उभारण्यात आली आहेत. तरी सुध्दा पेट्रोल आणि डिझेलच्या चोऱ्या मोठया प्रमाणावर होत आहेत. मुंबई शहरामध्ये धावणाऱ्या शासकीय व खाजगी वाहनांसंबंधी ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. शासकीय व खाजगी वाहनेसुध्दा CNG वर चालविण्याचे बंधनकारक केले पाहिजे. तसा निर्णय शासन का घेत नाही ? ज्यावेळी मी मंत्री होतो, त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व वाहने ही CNGवर चालविण्यात यावी असा निर्णय जाता जाता घेतला होता. त्यामुळे आपले 20 कोटी रुपये तर वाचतीलच शिवाय प्रदूषण देखील कमी होईल. मुंबई शहरामध्ये ट्रक, टेम्पोचा वापर मोठया प्रमाणावर होत असतो. डिझेल, पेट्रोलमध्ये लिड असते. त्यामुळे प्रदूषण होते. मी काही जास्त खोलात जात नाही. एमएमआरडीने सर्वे केला होता. त्यात नमूद केले आहे की, दरवर्षी 5800 लोक प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या श्वसनाच्या समस्यांनी आजारी होऊन इस्पिळात उपचार घेतात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

9 लक्ष 1 हजार लोकांना प्रदूषणामुळे होणारा अस्थमा होतो. 24 हजार प्रौढ आणि 2 लक्ष 20 हजार मुलांना प्रदूषणामुळे क्रॉनिक ब्राँकायटीस होतो. 3 वर्षाखालील प्रत्येक 2 मुलांपैकी एका मुलाला लिड म्हणजेच शिशाच्या प्रदूषणामुळे आजार होतो. प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या आजारांमुळे दरवर्षी मुंबईचे 2 कोटी, 2 लक्ष कामाचे दिवस वाया जातात. प्रदूषणाच्या आजारांवरील उपचारासाठी 4863 कोटी 31 लक्ष एवढा प्रचंड खर्च मुंबईत होतो. तेव्हा प्रदूषण कमी होण्याच्या दृष्टीने डिझेल-पेट्रोल वाहनांना बंदी घालावी अशी विनंती या निमित्ताने करतो. मुंबईमध्ये वाहनांची समस्या खूप मोठी आहे. मुंबईमध्ये सन 1980 मध्ये रजिस्ट्रर्ड वाहनांची संख्या 2,86132 होती. सन 1990 मध्ये 6,09,904 होती. सन 2000 मध्ये 9,10,628 होती, ती आज अकरा लाखांवर गेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 16:10

श्री.नितीन गडकरी....

सर्व वाहने रस्त्यावर उभी असतात. महोदय, सिंगापूरमध्ये अशी पध्दत आहे की, नवीन वाहने घेण्यापूर्वी प्रथम जुने वाहन सरेंडर करावे लागते. अमेरिका, युरोप, चायना या देशांमध्ये शहरांच्या बाहेर मोटारी उभ्या असतात. वास्तविक पाहता गाडया 10 वर्षे झाल्यानंतर त्या स्क्रॅप केल्या पाहिजेत. परंतु आपल्याकडे तर जुन्या गाडयांची डागडुजी करुन, रंगरंगोटी करुन त्या पुन्हा रस्त्यावर आणल्या जातात. मलबार हिलच्या परिसरामध्ये मला एक अनुभव आला होता. तेथून शासनाच्या लाल दिव्याच्या कॉन्टेसा गाडीने येत असताना गाडी आवाज करीत तो चढ चढत होती. धूर सोडत होती. सभापती महोदय, मला वाटते आपणही अशा गाडयांच्या बाबतीत काळजी घ्यावी. या गाडयांमधून धूर बाहेर येत असल्यामुळे वायू प्रदूषण होते. यामध्ये कोणावर टीका करण्याचा उद्देश नाही.

महोदय, लाल दिव्याच्या गाडीतून प्रवास करीत असताना माझा अपघात झाला. त्या गाडीच्या खालील नटबोल्ट व्यवस्थित फीट केलेले नसल्यामुळे मला चार ठिकाणी फ्रॅक्चर झाले. त्यात माझे तीन-चार वर्षे वाया गेले. त्यामुळे या गाडया देताना त्या चांगल्या दिल्या पाहिजेत. अधिकाऱ्यांनाही चांगल्या गाडया दिल्या पाहिजेत. या गाडया दिल्यानंतर अधिकाऱ्यांकडून चांगल्या कामाचा हिशेबही घेतला पाहिजे. केवळ चांगल्या गाडया देऊन उपयोग होणार नाही, तर त्या गाडयांवर चांगले ड्रायव्हर सुध्दा दिले पाहिजे. कारण आज-काल लाल दिव्याच्या गाडयांमध्ये लोकांना बसण्याची फार हौस आहे. महोदय, आज तर अशी परिस्थिती आहे की, सिव्हील सर्जन यांच्याकडून खोटे प्रमाणपत्र आणून व्यक्ती गाडीवर ड्रायव्हर म्हणून सिलेक्ट होते. मध्य प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.दिग्विजय सिंह यांचा ड्रायव्हर आंधळा असल्याचे निदर्शनास आले. इतकेच काय तर सन्माननीय श्रीमती सुषमा स्वराज यांचा ड्रायव्हर सुध्दा वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरला. मी जेव्हा सार्वजनिक बांधकाम मंत्री होतो तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व्हे केला असता 40 टक्के ड्रायव्हर वैद्यकीयदृष्टया अपात्र असल्याचे निदर्शनास आले. म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, आपण सर्व ड्रायव्हरचे मेडिकल करा. हे मेडिकल करीत असताना ते सरकारी नव्हे तर खाजगी डॉक्टरांकडून करा. सभापती महोदय, आपणही विधानमंडळाच्या ड्रायव्हरची वैद्यकीय तपासणी खाजगी डॉक्टरांकडून करुन घ्या.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 16:10

श्री.नितीन गडकरी....

महोदय, आपल्याकडे पार्किंगची महत्वाची अडचण आहे. मी आपणांस सांगू इच्छितो की, मी जेव्हा पॅरिसला गेलो होतो तेव्हा तेथील पार्किंगची व्यवस्था मी बघितली. त्या ठिकाणी वरच्या बाजूला फुटबॉलची मॅच सुरु होती आणि खाली हायवेवर वाहतूक सुरु होती. दुसऱ्या ठिकाणी वरच्या बाजूला मैदान, तर खाली पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली होती. हाँगकाँगमध्ये सुध्दा अशाच प्रकारचे पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आपल्याला सुध्दा ओव्हल मैदानाच्या खाली पाच-पन्नास वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करता येईल. टाऊन प्लॅनिंग हा विभाग कामाचा आहे की नाही याबाबत मला प्रश्न पडतो. मला वाटते 10-12 वर्षांपूर्वीच्या डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांना तर हुतात्मा चौकात फटके मारले पाहिजेत. कारण पार्किंगच्या संदर्भात ते अजूनही बाबा आजमच्या काळातील पध्दत सांगत आहेत. महोदय, ते अधिकारी पैसे घेतल्याशिवाय कोणतेही काम करीत नाहीत, फाईल वर पाठवीत नाहीत. महोदय, आपणही जर जमिनीच्या खाली पार्किंगची व्यवस्था केली तर काय बिघडेल ? आपल्याकडे रस्त्यांवर गाडया उभ्या राहता कामा नयेत. त्यामुळे पार्किंगच्या बाबतीत आपण कायद्यामध्ये दुरुस्ती करुन, बगिचे, मैदाने, यांच्या खाली पाच-सहा हजार वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला तर बरे होईल. सुरुवातीला हे काम बी.ओ.टी. वर घेता येऊ शकेल. हाच त्यामध्ये उपाय आहे. सेकंड गाडया स्वस्त मिळतात म्हणून जो तो उठतो आणि गाडया खरेदी करतो. आज बहुतांश व्यक्तींकडे चार-पाच गाडया आहेत.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

म्हणून मला भीती वाटते की, पुढेमागे 150 कोटी लोकसंख्या आणि शंभर कोटी गाड्या असे प्रमाण रस्त्यांवर दिसेल. फक्त 5 कि.मी. रस्ताच रिकामा असेल. माणसे चालल्यासारख्या गाड्या चालतील, अशी स्थिती मुंबईमध्ये सन 2010 मध्ये होईल. सभापती महोदय, आताच दोन तास ट्रॅफिकमध्ये जातात. तरी, गाड्यांच्या संख्या कमी करण्याबाबत विचार करण्याची गरज आहे. आपल्याला त्या गाड्यांची पार्किंगची व्यवस्था केली पाहिजे. त्याचप्रमाणे नगरविकासच्या कायद्यात देखील दुरुस्ती करण्यासंदर्भात गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. सभापती महोदय, दिल्ली व मुंबई येथील रेल्वे खातेही महत्वाचे आहे. " झाले बहु, होतील बहु, परि यासम हाच " अशी रेल्वेची अवस्था झालेली आहे. लालूचे राज्य येऊ द्या किंवा भाजपाचे राज्य येऊ द्या, रेल्वेसारखे थर्ड क्लास खाते कोणतेही नाही. सभापती महोदय, 16 वर्षांपूर्वी माहिमच्या उड्डान रेल्वेपूलाचे काम सुरु झाले होते. मुंबईतील फ्लायओव्हर झाले, सर्व काही झाले. परंतु त्यावेळचा रेल्वे आणि पी.डब्ल्यू.डी. चा वाद अजुनही सुरु आहे. रेल्वेच्या सेंट्रल आणि वेस्टर्न मार्गांच्या रेल्वे ब्रिजेससाठी 50 टक्के रेल्वे देते, 50 टक्के आपण देतो. आपण ते बी.ओ.टी.वर करा. सभापती महोदय, अशाप्रकारे रेल्वेच्या क्रॉसिंगसाठी 70-80 पूल बांधले जातील. त्यामुळे रेल्वेची 25 टक्के गती वाढेल, फ्रिक्वेन्सी वाढेल, रेल्वे जास्त लोकांना नेऊ शकते. तुम्ही या राज्याचे मुख्यमंत्री आहात. तुमचा मुलगा ज्यावेळी 60 वर्षांचा होईल, त्यावेळीही ही रेल्वे काही होणार नाही. कारण यामध्ये पहिला वाद असा सुरु आहे की, ब्रॉडगेज करायचे की, मिटरगेज करायचे की, स्टँडर्डगेज करायचे ? सभापती महोदय, रेल्वेच्या बाबतीमध्ये तुम्ही एम.आर.पी. करा किंवा एल.आर.पी. करा. काय करायचे असेल ते करा. सभापती महोदय, आजचा निर्णय खाली होत नाही. म्हणून माझी आपणास विनंती राहणार आहे की, या महत्वाच्या समस्येवर निर्णय घेण्यासाठी आपण आपल्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करा व त्या समितीमध्ये हे सर्व विषय ठेवा. सभापती महोदय, नलिनाक्षन म्हणून एक अधिकारी झाले, त्यांना मी " अवलक्षण " असे नाव ठेवले होते. ते उलट्या डोक्याचे होते. सभापती महोदय, आपण मंत्रालयातील अर्धे अधिकारी जरी घरी पाठविले तरी आपल्या कामाला गती प्राप्त होईल. आपण त्यांना सांगा की, आपण पगार घ्या, बोनस घ्या, परंतु



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

मंत्रालयात येऊ नका, कामावर येऊ नका. आपण आला नाहीत तर तीन पटीने काम वाढेल. सभापती महोदय, ते धावून आडवे पाडतात. माननीय मंत्रीमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्या क्नॉलेज कॉर्पोरेशनने चांगले काम केले आहे. त्याचे अध्यक्ष श्री. विवेक सावंत होते. सभापती महोदय, तेथे आय.ए.एस. अधिकाऱ्यांची लॉबी आहे. एम.एस.आर.डी.सी.चे. एम.एस. आय.ए.एस. ऑफिसर्स असतात. यांच्या सारखी जात नाही. ते दुसऱ्या कॅडरवाल्याला येऊच देत नाहीत. तरी, मी आपल्याला विनंती करतो की, रेल्वेच्या बाबतीत आपल्याला जे काही करायचे असेल ते करा, लवकर निर्णय घ्या, लोकांना बोलवा, जे व्हायचे असेल ते होऊ द्या. आज मुंबईमध्ये मास रॅपिड ट्रान्सपोर्ट रेल्वेची समस्या आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, हे काम होऊ शकेल. पण त्यासाठी आपण टाईम बाऊंड प्रोग्रॅम करावा लागेल. आपल्याला लँड ॲक्विझिशन करावे लागेल, काम सुरु करावे लागेल, वर्क ऑर्डर काढावी लागेल आणि काम करणार नाही त्याला सुट्टी द्यावी लागेल. सभापती महोदय, Do or Die. काम जरुर होईल. सभापती महोदय, या समस्या आता अधिक तीव्र होणार आहेत. ते आय.ए.एस. कॅडरचे लोक सांगतात की, हे सब ज्युडिशीअल आहे, सेंट्रलचे आहे. Sir, the matter is sub-judice. Sir, the matter is under the Central Government and we can not do anything. Sir, environmental problem is there. C.R.Z. is also a big problem and if you do this work, you will be in big trouble. ते पोपटासारखे बोलतात. ते काहीही करु देत नाहीत. सभापती महोदय, हे बीग प्रॉब्लेम्स आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

असे केले नाही तर आयुष्यात मुंबईचा विकास होणार नाही. हया सर्व गोष्टी आपण लवकरात लवकर कराव्यात. सभापती महोदय, मुंबईच्या सगळया प्रश्नांवर मुख्यमंत्री महोदयांनी दर आठवडयाला एक बैठक घेऊन, निर्णय घ्यावयास पाहिजेत. मग असे निर्णय घेतांना, त्यातील दोन-चार निर्णय चुकले तरी चालतील. I like honest people, who can take the decisions. I also like dishonest people, who can take the decisions. But I dislike honest people who do not like to take the decisions. आज अशी परिस्थिती आहे की, पैसा खा पण काम करा ? कामाचा परफार्मन्स् दाखवा ? कामे झाली पाहिजेत. मंत्रालयात जे कलरलेस लोक बसलेले आहेत, त्यांना हटविल्याशिवाय आपणास योग्य असे निर्णय घेता येणार नाहीत. मुंबई शहरामध्ये रस्त्यांच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास सायन ते पनवेल रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम माननीय श्री. अनिल देशमुख साहेबांनी सुरु केलेले आहे. परंतु हे काम कसे करणार, याबाबत मुंबई हायकोर्टात टोल वसुलीच्या संदर्भात शसनाने ॲफिडेव्हिट केलेले आहे. ॲफिडेव्हिट करीत असतांना टोल गोळा करण्याचे काम आपण सदर कंपनीला दिलेले आहे. 26 वर्षापर्यंत त्यांनी टोल गोळा करावयाचा आहे. या टोलमधून जर आपणास 5 हजार कोटी रुपये मिळाले असते तर मुंबई शहरामध्ये अनेक जंक्शनची कामे शासनाला करता आली असती. मी नागपूर जिल्हयाचा पालकमंत्री असतांना नागपूर येथे नागपूर सुधार प्रन्यासच्या अंतर्गत रत्यांमध्ये 90 चौकांची कामे आम्ही केलेली आहेत. National Road Research Development Corporation या केंद्र सरकाच्या संस्थेकडून 90 चौकांची कामे आम्ही केलेली आहेत. नागपूर येथील अजनी चौकांमध्ये मोठया प्रमाणात अपघात होत होते. त्या चौकामध्ये राजीव गांधीचा पुतळा बसविण्यात आलेला आहे. नागपूर सुधार प्रन्यासने अभ्यास करुन नागपूर शहरामध्ये 80 चौक दुरुस्त करण्यात आलेली आहेत. त्यामुळे अजनी भागातील अपघातांचे प्रमाण आता कमी झालेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी माहिम येथील चौकातील रहदारीच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. तेथे दोन पुलांची कामे वर व खाली सुरु आहेत. जेथे ही पुलांची कामे सुरु आहेत तेथे नेव्हीची जागा आहे. अंडरग्राऊंड रस्ते तयार करुन तेथील ट्रॅफिक मोठया प्रमाणात कमी करणे

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

आवश्यक आहे. ही सर्व कार्यवाही ताबडतोब होणे अत्यंत महत्वाचे आहे. हाजीअली येथील ब्रीज गेल्या 7 वर्षापासून पूर्ण होण्याच्या प्रतिक्षेत आहे, आम्ही सरकारचे स्वागत करीत आहोत परंतु गेल्या 7 वर्षापासून ब्रीज पूर्ण होत नाही. या ब्रिजच्या संदर्भात माननीय श्रीमती आशा भोसले व श्रीमती लता मंगेशकर यांच्या सोबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी बैठक घेतली त्या बैठकीला मी सुध्दा उपस्थित होतो, आशा भोसले यांना मी व्यक्तीश: भेटून विनंती केली होती, त्या बैठकीतून मार्ग सुध्दा निघाला होता. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री, श्री. विक्रमसिंह पाटणकर हे होते. तेंव्हा आम्हाला असे वाटले होते की, हा ब्रीज आता तरी पूर्ण होईल. परंतु त्या गोष्टीला आता 4 वर्षे पूर्ण झालेली आहेत, तरी देखील हे काम होणार, होणार असे सांगण्यात येते, पण कधी होणार हे कोणीही सांगत नाही ? दुसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की, वरळी-बांद्रा मार्गावर जो सागरी सेतू पूल होणार आहे तो वरळीपर्यंत येतो. येथे सुध्दा मोठया प्रमाणात ट्रॅफिकचा प्रश्न निर्माण होत आहे. वरळी-बांद्रा पूलाच्या संदर्भातील निर्णय लवकरात लवकर न घेतल्यामुळे, 420 कोटी रुपयांचे काम आता 1300 कोटी रुपयांपर्यंत पोहचलेले आहे. याचे कारण म्हणजे हा निर्णय लवकर झालेला नाही, म्हणून हा भुर्दंड बसत आहे. म्हणून माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, कोणतेही काम करतांना, टाईम बाऊंड कार्यक्रम तयार करणे आवश्यक आहे. त्याशिवाय ही कामे होऊ शकणार नाहीत.

यानंतर श्री.सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

तीच गोष्ट आहे, न्हावाशेवा ते शिवडी प्रकल्पाची. त्यासाठी कंसल्टंट मिळाला, अमुक मिळाला, तमुक मिळाला, असे सारे काही चालू आहे. पण हा प्रकल्प केव्हा सुरू होणार, कसा सुरू होणार, त्यासाठी 4 हजार कोटी रूपये कोठून येणार वगैरे सारे प्रश्न अनुत्तरित आहेत. आता माझ्या माहितीप्रमाणे यासाठी पर्यावरण विभागाचा क्लिअरन्स मिळाला असल्याने याही प्रकल्पाबाबत आपण नक्की काय ते ठरविले पाहिजे. आणखी एक रस्ता आहे, आनिक ते पांजरपोळ रस्ता. त्यामध्ये बीपीटीचा मार्ग येतो. तो शिवाजीच्या पुतळ्याजवळ, आर.के.स्टुडिओजवळ डायरेक्ट मिळतो. हा रस्ता केला तर सायन जवळ जी वाहतूक कोंडी होते ती सारी दूर होईल. सभापती महोदय, मुंबईमध्ये सांताक्रूझ आणि सहार विमानतळ यामध्ये आपण अंडरग्राऊंड टनेल करून वाहतूक सुरू केली तर काही प्रमाणात विमानतळावर जाणाऱ्या लोकांचा वाहतुकीचा त्रास कमी होऊ शकेल. सभापती महोदय, मुंबईला अतिशय जवळ समुद्र आहे त्याचा या दृष्टीने आपण काही उपयोग करून घेणार आहोत की नाही ? श्री.नितीन जोशी नावाचे एक गृहस्थ शिपिंग कार्पोरेशनमध्ये आहेत. माननीय श्री.शंकररावजी चव्हाण मुख्यमंत्री असताना या श्री.नितीन जोशी यांना सरकारने एक लायसेन्स दिले होते. हे श्री.नितीन जोशी मला देखील भेटले होते. मी त्यांना म्हटले देखील की, तुम्ही काही करीत नाही तर मग तुम्ही मला कशासाठी भेटता ? तर मला ते म्हणाले की, मी करतो आहे, मी तयार आहे. मी त्यांना म्हटले, अहो, आता आमचे केस पांढरे झाले आहेत. तुमची जी काही कार्पोरेशन आहे त्याबाबत मी जेव्हा पहिल्यांदा आमदार झालो होतो तेव्हा तुमचे ऐकत होतो,. पण त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही. सभापती महोदय, जल वाहतुकीमध्ये मोठ्या प्रमाणात, मोठ्या संख्येने आपल्याला लोकांना सामावून घेता येऊ शकेल. पण त्याचा देखील अभ्यास झाला पाहिजे. त्यात सगळ्यात मोठी अडचण अशी आहे की, मोठी हॉवरक्राफ्टस् आहेत त्याची कॅपिटल कॉस्टच एवढी जास्त आहे की, त्यामुळे तिकीटाचा दर हा शंभर रूपये येतो. बोरीवली ते नरिमन पॉईंट एवढ्या प्रवासासाठी 100 ते 125 रूपये दर ठेवावा लागतो आहे आणि या एवढे दर ठेवल्यास हा महागडा प्रवास करण्यासाठी कोणीही येणार नाही. म्हणून या संदर्भात मी एक गोष्ट सुचविली होती त्याचा आपण आज जरूर विचार करावा. एमएमआरडीएचे 10 कोटी, एमएसआरडीसीचे 10 कोटी रूपये, 10 कोटी एमआयडीसीचे, 10 कोटी सिकॉमचे घ्या, त्यात सरकारचे इक्विटीचे 10 कोटी टाका आणि तुम्ही खाजगी कंपन्यांना संयुक्त प्रकल्पामध्ये सहभागी

.......3एच 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

करून घ्या. 49 टक्के भाग तुमचे आणि 51 टक्के भाग सहयोगी कंपन्यांचे, अशा प्रकारे खाजगी कंपनींच्या सहकार्याने आपल्याला हा प्रकल्प करता येऊ शकेल. या बाबतीत मी अनेकांशी बोललो आहे. आनंद महेंद्रूशी, टाटांशी देखील मी बोललो आहे. जी हॉवरक्राफ्टस् तयार होतात त्याची इंजिन्स आपण भारतात तयार करू शकतो. त्यासाठी लागणारी सगळी टेक्नॉलॉजी आपल्याकडे चांगली आहे. तेव्हा ही हॉवरक्राफ्टस् भारतातच बांधावयाची. त्यामुळे जी 100 रूपये किंमत लागते ती 45 रूपयांवर येते. ही किंमत 50 टक्क्यांनी कमी आल्याबरोबर तुम्हाला या प्रवासासाठी ठेवावयाचे दर लोकांना परवडू शकतील असे ठेवता येतील. यासाठी तुम्ही कमी व्याजाने पैसा उपलब्ध करून दिला पाहिजे. त्यासाठी आपण जी ठिकठिकाणी स्टेशन्स बांधणार वा उभारणार आहोत त्या ठिकाणी खाजगी गुंतवणूक वगैरे करवून घेऊन, तेथे दुकाने वगैरे काढण्यास परवानगी देऊन, ती स्टेशन्स उभारावयाची. अशा प्रकारे यामध्ये आपण काम केले तर मुंबईतील वाहतुकीचा एक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने जल वाहतूक आपल्याला मोठ्या प्रमाणात सहाय्यभूत ठरेल. एकदा का ही जल वाहतूक सुरू झाली की मग लोकल ट्रेन्स वरील भार कमी होऊ शकेल. तेव्हा ही जल वाहतूक स्वस्तामध्ये कशी होईल या दृष्टीने आपण विचार केला पाहिजे. काही ठिकाणी रोप-वे बांधता येतील. कोठल्या तरी पॉवर प्लँट मध्ये अहमदनगर आणि ठाणे जिल्ह्याच्या मध्ये रोप-वे बांधण्याचा विचार होता. तेव्हा काही ठिकाणी हाही पर्याय आपल्याला स्वीकारता येईल. तेव्हा या दृष्टीने देखील आपण विचार करावा अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, सर्व मैदाने, मोकळ्या जागा यांची रिझर्वेशन्स पटापट बदलली जात आहेत. हे बदलण्याचे प्रमाण एवढ्या मोठ्या गतीने सुरू आहे की, या बाबतीत मात्र सरकारची गतिशीलता उच्च आहे हे मान्य केले पाहिजे. मग ती महानगरपालिका असो वा राज्य सरकार असो वा म्हाडा असो. सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब मुख्यमंत्री होते तेव्हा देखील त्यांनी या क्षेत्रात, रिझर्वेशन बदलवण्याच्या कामामध्ये, गतीशील काम केले आहे. आता हे कोठे तरी थांबविले पाहिजे. सभापती महोदय, मी तिसऱ्या मुंबईचा प्रस्ताव या पूर्वी देखील मांडला होता. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. रावते माझ्यावर बरेच रागावले होते. आता तुम्हाला आवडो किंवा न आवडो, आज ना उद्या या दृष्टीने देखील तुम्हाला विचार करावा लागेल. एक काळ असा होता की, 80 टक्के लोक ग्रामीण भागात रहात होते आणि

....... 3एच 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MAP. श्री. वि. खर्चे नंतर --- 16:25

20 टक्के शहरी भागामध्ये रहात होते. गांधीजी म्हणावयाचे की, हा गावातील लोकांचा देश आहे. आता परिस्थिती अशी आहे की, 40 टक्के जनता शहरी झाली आणि 50 टक्के ग्रामीण झाली. 2010 सालापर्यंत 65 टक्के शहरी राहतील आणि 35 टक्के ग्रामीण राहतील. 2020 साली 20 टक्के ग्रामीण आणि 80 टक्के शहरी राहतील. त्यामुळे तुम्हाला ग्रोथ सेंटर्स करावी लागतील आणि करावयाची नसतील तर या परिस्थितीचा सामना तुम्ही करू शकणार नाही. अर्थात त्याची वेगवेगळी कारणे आहेत. म्हणून ज्याप्रमाणे तुम्ही नवी मुंबई निर्माण केली त्याप्रमाणे आता 'नवीन ठाणे' प्लॅन केला पाहिजे. प्लॅन डेव्हलपमेंटला तुम्ही प्रोत्साहित करा. तुम्ही जी भूमिका आणली की, 100 एकराची टाऊनशीप असेल, त्याला तुम्ही जे एक्झम्प्शन दिले आहे त्याबाबत लोक भले टीका करोत पण माझ्या दृष्टीने ही स्वागतार्ह गोष्ट आहे. प्लॅन डेव्हपलमेंट असेल तर अलाऊ टू पिपल वर्क. नियोजनबद्ध विकास झाला तर भाव देखील कमी होतील, उपलब्धता राहील आणि मुख्य म्हणजे हिरव्या पट्ट्यावर अनधिकृतरित्या होणारी डेवलपमेंट देखील होणार नाही. या नियोजनबद्ध विकासातून चांगली घरे उपलब्ध झाली तर अनधिकृत घरे लोक देखील विकत घेणार नाहीत. तेव्हा या बाबतीत देखील आपण विचार केला पाहिजे. एक एक्झिबिशन्स, कन्व्हेंशन सेंटर्स, आय.टी.पार्क, डायमंड सारखी वेगळी जागा. आता गिरण्यांच्या ज्या जमिनी आहेत त्या संदर्भात मध्यंतरी माझी डायमंडवाल्यांशी चर्चा झाली. तेथे जेवढे गिरणी कामगार आहेत त्यांच्या घरातील किमान एका मुलाला त्यांनी ट्रेंड करावयाचे आणि रोजगार द्यावयाचा, यासाठी ते लोक तयार आहेत. त्यासाठी व्यापारी दरामध्ये देखील जागा घेण्यास ते तयार आहेत पण त्यांना जागा मिळाली पाहिजे. असे झाले तर येथील जी 30-40 हजार गिरणी कामगारांची मुले आहेत त्यांना या डायमंड इंडस्ट्रीमध्ये ते रोजगार देण्यास तयार आहेत. तेव्हा अशा प्रकारे एवढ्या मोठ्या गिरण्यांच्या जागांवर डायमंड झोन तयार झाला तर या गरीब कामगारांचे रोजगार कायम राहतील, तेथेच ते राहतील आणि .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे ..... 3आय 1 ..

श्री. नितीन गडकरी...

त्यांच्या घरातील एका मुलाला रोजगार मिळाला पाहिजे, अशाप्रकारची योजना आपण केली पाहिजे. पर्यटनाच्या संदर्भात आपल्याला सांगितले पाहिजे. माननीय उपमुख्यमंत्री यांची बारबालांवर नामर्जी होती. परंतु त्यांची फॅशन शोवर मर्जी आहे. एंटरटेनमेंट इंडस्ट्री, फॅशन इंडस्ट्री, गारमेंट इंडस्ट्री, टूरिझम डेव्हलपमेंट इंडस्ट्री यामध्ये रोजगाराची संधी आहे. त्यादृष्टीने आपण विचार केला पाहिजे. विशेषत: चित्रपट उद्योग आणि दूरदर्शन मालिकांचा विकास करण्याचे ठरविले पाहिजे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. मुंबईची 1960 मध्ये लोकसंख्या 41.42 लाख होती, 1971 साली ही लोकसंख्या 60 लाखावर होती. आजच्या चर्चेमध्ये मी एवढयासाठी हे सांगतो की, मुंबई शहरावर लोकसंख्येचे आक्रमण होत आहे. त्यावर आपण काहीतरी कायदेशीर मार्ग शोधून काढला पाहिजे. त्यासाठी आपण धोरण ठरविले पाहिजे. सभापती महोदय, एक चांगले तंत्रज्ञान आले आहे. प्रत्येक इमारतीमधून वाहणाऱ्या पाण्याचे रिसायकलिंग केले तर ते पाणी आपल्याला ड्रेनेजसाठी वापरता येईल. त्याचप्रमाणे प्रत्येक इमारतीमध्ये सोलर वॉटर हिटर बसविले पाहिजेत. या दोन गोष्टींचा आग्रह धरला तर पाण्याची बचत होईल. तेव्हा पिण्याच्या पाण्यासाठी नाही परंतु ड्रेनेजच्या वापरासाठी पाण्याच्या रिसायकलिंगची योजना आपण जाहीर केली पाहिजे. त्या तंत्रज्ञानाचे संशोधन झाले आहे. मी मंत्री असतांना रॉकी हिल या बंगल्यामध्ये राहात होतो. त्या विभागामध्ये 18-19 जज्जेस आणि काही मंत्री देखील राहतात. त्या विभागामधील इमारतींच्या टाक्या भरण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या टँकरमधून पाणी आणले जाते. हे कशासाठी चालले आहे? आपण त्या ठिकाणी सुध्दा वाया जाणाऱ्या पाण्याचे रिसायकलिंग केले पाहिजे. अशाप्रकारच्या दोन-तीन सूचनांचा मी या ठिकाणी ऊहापोह केलेला आहे. त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी जरुर विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रमोद नवलकर (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नेहमीप्रमाणे मी माझे वेगळया प्रकारचे भाषण करणार नाही, माझ्या भाषणामध्ये कुणाचेही पत्ते देणार नाही, कुणाचेही टेलिफोन नंबर देणार नाही. मी सुरुवातीपासून या चर्चेमध्ये भाग घेतलेल्या माननीय सदस्यांची भाषणे ऐक्ली, माहिती वाचली. त्यानंतर माझ्या मनामध्ये असा प्रश्न उभा राहतो की, आपण याठिकाणी जे काही स्वप्न रंगवितो, मुंबईसाठी जे काही अपेक्षित करतो ते नेमके कुणासाठी? या मुंबईतील मराठी माणूस ज्याला आपण मुंबईकर म्हणतो तो आज 22 टक्क्याच्या खाली घसरत चालला आहे. तो टिकवायचा कसा? तुम्ही हायवे करता, अंडरग्राऊंड रेल्वे करता हे कुणासाठी करता? जो उपेक्षित असलेला मुंबईचा मालक आहे त्याला केंद्रबिंदू मानून आपण कोणतीही योजना राबवीत नाही म्हणून माझे मन कुठेतरी अपराधी होत आहे. आपण या सर्व सुविधा निर्माण करीत आहात त्या कोणत्या पाहुण्यांसाठी करीत आहात? मुंबईतील मराठी माणसाची आपण चिंता करीत नाही ही चिंताजनक गोष्ट आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता हे आपण आवरायचे कसे? मूळचा मुंबईकर हा चाळीत राहतो, तो चाळीच्या बाहेर नाही, त्याची चाळ आपण आज विकासाच्या नावाखाली उध्वस्त करावयास निघालो आहोत. आणि त्या ठिकाणी टॉवर संस्कृती आणीत आहोत. या चाळी पाडल्या जातील परंतु त्यामधून नेमके काय उध्वस्त होणार आहे? आपण याचा अभ्यास केला नाही. मी याचा विचार केला तेव्हा लक्षात आले की, आपण चाळ उध्वस्त करीत आहात त्यावेळी मुंबईचा इतिहास उध्वस्त करीत आहात, मुंबईची संस्कृती उध्वस्त करीत आहात, मुंबईची परंपरा उध्वस्त करीत आहात. आणि थोडक्यात म्हणा हवे तर संपूर्ण मुंबई उध्वस्त करीत आहात. मी उगाच चाळीचे कौतुक करीत नाही. सर्व इतिहास, भूगोल या चाळीमध्ये सामावला आहे. तुम्ही ज्यांची नावे घेता ती सर्व मोठी माणसे चाळीत राहात होती. क्रांतिकारक असो, कलावंत असो, कुणीही असो. आज आपल्याला आश्चर्य वाटेल की, क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके हे मुंबईच्या चाळीत राहिले, हुतात्मा चाफेकर चाळीत राहिले, प्रबोधनकार ठाकरे चाळीत राहिले. सर्व कलावंत चाळीत राहिले. आणि म्हणून जी जी आंदोलने उभी राहिली ती चाळीतून उभी राहिली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे.. 16:35

श्री.प्रमोद नवलकर (पुढे सुरु...

1944 साली, 1946 साली, त्यानंतर 1950 साली, 1956 साली आंदोलने झाली. या सर्व आंदोलनामध्ये व त्यानंतरही श्री.भाऊ दाजी लाड यांनी मुंबईच्या चाळीचे महत्व जपलेले आहे. या संबंधात उदाहरणे द्यायची झाली तर अनेक देता येतील. मुंबईचे केशवजी नाईक, यांनी व त्याचबरोबर कै.प्रबोधनकार ठाकरे यांनी दादरच्या खांडके बिल्डिंगमधून संघटना उभी केली. म्हणून चाळीचा इतिहास पहिल्यांदा पाहिला पाहिजे. सभापती महोदय, 1972 साली हा विचार आला की, मुंबईतील चाळ संस्कृती, मध्यमवर्गीय टिकले पाहिजेत, म्हणून घर दुरुस्ती मंडळ निर्माण झाले. घर दुरुस्ती मंडळामध्ये फार मोठा फ्रॉड झाला त्यामुळे जनतेची फार मोठी फसवणूक झाली. यशवंतराव मोहिते यांनी कायदा करुन घरमालकांना जबाबदारीतून मुक्त केले, आता चाळीची चिंता करु नका,असे सांगून सगळी जबाबदारी घरदुरुस्ती मंडळाने घेतली. त्यानंतर घर दुरुस्त मंडळाने चाळ दुरुस्ती करण्याचे नाकारलेले अाहे. चाळीच्या ठिकाणी टावर उभे झाले. या टावरमध्ये मराठी माणूस राहू शकत नाही. कारण मराठी माणसाचे नाते हे मातीशी असल्याने, तो चाळीमध्ये रहात होता. या चाळी उद्ध्वस्त झाल्या. गिरणी कामगार देखील उद्ध्वस्त झाला, त्याला आपण वाचवू शकलो नाही. गिरणी कामगारांना संपाने देशोधडीला लावले. या चाळी वाचविल्या गेल्या नाहीत. मुंबईमध्ये वासुदेव बळवंत फडके, चाफेकर,जगन्नाथ शंकर शेठ होऊन गेले. मुंबईमध्ये झुणका भाकर योजना ही अनंत गद्रे यांनी 70 वर्षापूर्वी सुरु केली. श्री.राजेश खन्ना, श्री. जितेंद्र, लता मंगेशकर, जयश्री गडकर हे सगळे चाळीमध्ये रहात होते. कम्युनिस्ट पक्ष हा मुंबईच्या चाळीमध्येच वाढला. परळ येथील मैदानासमोरील दळवी बिल्डिंगमध्ये पक्ष वाढला. आता चाळीच्या टेरेसवरुन डोकावून पाहिले की, उंच टावर शिवाय काही दिसत नाही. चाळी पाडून आता टावर बांधलेले आहेत. या चाळी कोठे गेल्या, तेथील लोक कोठे गेले, त्याचा पत्ता नाही. चाळी पाडून बिल्डर लोकांनी गिधाडे उभी केली. वरळी नाक्याक्यावर आता मंदीराचा कळस दिसत नाही. धसवाडी येथे राम मंदिर आहे. उंच टावरमुळे ते मंदीराचा कळस दिसत नाही,. मुंबईला सांस्कृतिक केंद्र म्हटले जाते. येथे सांस्कृतिक आंदोलने होतात. येथून काही ना काही प्रोत्साहन सतत मिळत असते. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे नटवर्य प्रभाकर पणशीकर हे चाळीमध्येच रहात होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात फार मोठा सहभाग घेतलेला होता. आपण गेल्या आठवड्यामध्ये, त्यांना पुरस्कार देण्याची घोषणा केलेली होती, तसे निवेदन

SKK/ MAP/ KGS/

श्री.प्रमोद नवलकर (पुढे सुरु...

केले. या वर्षाचा महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार त्यांना द्यावयाचा होता. प्रत्यक्षात काय झाले ? तो त्यांना दिला काय ?

श्री.विलास देशमुख (बसून) : त्यांना पुरस्कार देयाची धोषणा णाली आहे. पुढचा पुरस्कार त्यांच्या नावाने देणार आहोत.

श्री.प्रमोद नवलकर : आताचे काय झाले ?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी सभागृहात यासंदर्भात जाहीर केले. बजेटच्या भाषणामध्ये पहिल्यांदा ही घोषणा करण्यात आली की, नाट्य क्षेत्रामध्ये उत्तम काम करणाऱ्या कलावंताला जीवन गौरव पुरस्कार देण्यात येईल. तो पहिला पुरस्कार श्री. प्रभाकर पणशीकर यांना देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. प्रत्यक्षात कार्यक्रम करुन तो पुरस्कार द्यावयाचा आहे. शासनाच्या वतीने त्या पुरस्काराच्या संदर्भात घोषणा केलेली आहे. मी परवा सत्काराला गेलो होतो तेव्हा मी श्री. पणशीकर यांच्यासंदर्भात असे म्हणालो की, आपल्याला हा पुरस्कार दिला जाईल आणि त्यानंतर पुढच्या वर्षी जो पुरस्कार दिला जाईल तो आपल्या नावाने दिला जाईल.

श्री. प्रमोद नवलकर : श्री. प्रभाकर पणशीकर यांना पुरस्कार केव्हा देणार ?

श्री. विलासराव देशमुख : त्याबाबतचा कार्यक्रम ठरवून शासनाच्या वतीने तो पुरस्कार द्यावा लागेल.

श्री. प्रमोद नवलकर : तो पुरस्कार श्री. प्रभाकर पणशीकर यांनी नाकारलेला आहे. माझ्या नावाने पुरस्कार देऊ नका असे त्यांनी म्हटले आहे.

श्री. विलासराव देशमुख : पुढच्या वर्षी जो पुरस्कार द्यावयाचा आहे त्याबाबत ते असे म्हणाले. मी वर्तमानपत्रात वाचले. त्यांचे असे म्हणणे आहे की, श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या नावाने पुरस्कार द्यावा.

श्री. प्रमोद नवलकर : श्री. प्रभाकर पणशीकर यांना जीवन गौरव पुरस्कार देण्याबाबतचा निर्णय कॅबिनेटमध्ये घेतला आहे काय ? तो पुरस्कार त्यांना केव्हा देणार ?

श्री. विलासराव देशमुख : मुख्यमंत्री म्हणून मी ते जाहीर केलेले आहे. त्यासाठी कॅबिनेटमध्ये जाण्याची गरज नाही. पुरस्काराला कोणते नाव द्यावयाचे हे मुख्यमंत्री आणि संबंधित विभाग ठरवणार.

श्री. प्रमोद नवलकर : श्री. प्रभाकर पणशीकर यांना जीवन गौरव पुरस्कार केव्हा देणार ?

श्री. विलासराव देशमुख : शासनाच्या वतीने तारीख ठरवली जाईल. आपल्यालाही बोलवू. सगळे मिळून पुरस्कार देऊ.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, परवा जो समारंभ झाला तो सरकारच्या वतीने झालेला नाही. तो समारंभ एका समितीने आयोजित केलेला होता. ज्योतिर्भास्कर श्री. जयंत साळगावकर हे स्वागताध्यक्ष होते. माननीय मुख्यमंत्री त्या ठिकाणी सत्कार करण्यासाठी गेले होते. सांस्कृतिक खात्यातर्फे दिला जाणारा पुरस्कार प्रत्येक वेळी शासनाच्या वतीने वेगळा समारंभ आयोजित करुन दिला जातो.

श्री. प्रमोद नवलकर : याचा अर्थ तो पुरस्कार त्यांना अद्याप दिलेला नाही. श्री. प्रभाकर पणशीकर यांना जीवन गौरव पुरस्कार देण्याचा समारंभ होणार आहे असे मी गृहीत धरतो.

श्री. विलासराव देशमुख : होय.

श्री. प्रमोद नवलकर : पण तसे आपण सांगितले नाही. तसे सांगण्याचा आपला हेतू नव्हता.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, परवा जो समारंभ झाला त्या समारंभाला मी उपस्थित होतो.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, त्या ठिकाणी श्री. जयंत साळगावकर हे स्वागताध्यक्ष होते. त्या ठिकाणी तीन दिवस श्री. प्रभाकर पणशीकर यांच्या संदर्भात वेगवेगळे कार्यक्रम सादर झाले. पहिल्या कार्यक्रमामध्ये माननीय मंत्रिमहोदय श्री. अशोक चव्हाण आणि श्री. जयंत पाटील गेले होते. शेवटच्या कार्यक्रमाला मी आणि श्री. सुशीलकुमार शिंदे गेलो होतो. त्या ठिकाणी त्या समितीच्या वतीने माझ्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. माननीय मंत्रिमहोदय श्री. अशोक चव्हाण ज्यावेळी त्या कार्यक्रमाला गेले त्यावेळी त्यांनी कार्यक्रमामध्ये ही घोषणा केली. त्यापूर्वी सभागृहामध्ये याची माहिती दिली की, यावर्षीपासून आम्ही नवीन पुरस्कार देत आहोत आणि तो पहिला पुरस्कार श्री. प्रभाकर पणशीकर यांना दिला जाईल. ही घोषणा झाली परंतु तो कार्यक्रम व्हावयाचा आहे. त्या कार्यक्रमामध्ये श्री. प्रभाकर पणशीकर यांच्याबाबतीत मी असे म्हणालो की, आपल्याला पुरस्कार दिल्यानंतर पुढच्या वर्षीपासून जे पुरस्कार दिले जातील त्याला आपले नाव दिले जाईल. अशी घोषणा त्या समारंभामध्ये केली.

श्री. प्रमोद नवलकर : याचा अर्थ असा की, तो वेगळा समारंभ होणार आहे.

श्री. विलासराव देशमुख : होय. त्या कार्यक्रमाला आपल्याला यावयाचे आहे.

...3...

RDB/ KGS/ MAP/

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी मूळ विषयाकडे येतो. आपल्या रिपेअर बोर्डाच्या बाबतीत, म्हाडाच्या बाबतीत प्रचंड फ्रॉड आहे. धडाधड चाळी पाडतात. म्हाडा आणि बिल्डर यांचे संगनमत झालेले आहे. दुरुस्त होण्यासारख्या ज्या चाळी आहेत त्या सुध्दा पाडण्याच्या नोटिसेस येत आहेत. तेथील लोकांना उपनगरामध्ये पाठवतात. त्या चाळी पाडून त्या ठिकाणी टॉवर बांधतात. यापुढे एकही चाळ पाडली जाणार नाही असा धोरणात्मक निर्णय सरकारने घ्यावा. दुरुस्तीसाठी पैसे कमी पडू दिले जाणार नाहीत असे अभिवचन 1972 साली दिले होते ते अभिवचन पूर्ण करावे. आता निधीच्या अभावी चाळी दुरुस्त करु शकत नाही. त्या चाळी पडतात. त्यामुळे मुंबईतील मराठी लोक मुंबईबाहेर जात आहेत. याबाबतीत शासनाने विचार करावा. चाळी दुरुस्त करण्यासाठी निधी अपुरा पडणार नाही असे आश्वासन आज आपण दिले तर या चाळी वाचतील. नाही तर दिवसागणिक चाळी पाडून त्या ठिकाणी टॉवर उभे राहतील. या टॉवर संस्कृतीबद्दल मी जास्त बोलणार नाही. परंतु दिवसाला, महिन्याला एक एक चाळ पाडली जात आहे. या चाळी भयग्रस्त झालेल्या आहेत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रमोद नवलकर...)

ह्या चाळी उद्ध्वस्त करण्याचे काम होत आहे. जेव्हा या चाळी उद्ध्वस्त होतात त्यावेळी एक वेगळी संस्कृती उद्ध्वस्त होते. याचे कारण असे की, जगामध्ये किती धर्म आहेत ते मला माहीत नाहीत, परंतु सगळ्यात श्रेष्ठ धर्म कोणता असेल तर तो शेजार धर्म आहे. हा शेजार धर्म फक्त चाळींमध्ये जोपासला गेला आहे. या चाळी पाडून हा धर्म उद्ध्वस्त करु नका.. ज्या ठिकाणी शासनाच्या बी.डी.डी.,बी.आय.टी.चाळी आहेत त्याठिकाणी देखील बिल्डर टॉवर्स बांधण्याच्या गोष्टी करु लागले आहेत. ही टॉवर संस्कृती कृपा करुन मुंबई शहरामध्ये वाढू देऊ नका, चाळ संस्कृतीचे रक्षण करा. आज मुंबई शहरामध्ये 70-90 वर्षाच्या जुन्या चाळी आहेत. या चाळींच्या दुरुस्तीचा खर्च जरुर आहे. पण या चाळीतील रहिवाशांकडून पूर्वी पासून दर महिन्याला भाड्यातून, जसा इन्शुरन्स घेतला जातो, तशा प्रकारचा विमा घेतला जातो. अशा प्रकारचे हप्ते भाडयातून गेली 30-40 वर्षे घेतल्यानंतर जेव्हा चाळीच्या दुरुस्तीची वेळ येते त्यावेळी निधी नाही असे सांगितले जाते. मुंबईच्या विकासाचा उपभोग जर मराठी माणसाने घ्यावा असे वाटत असेल तर चाळ सस्कृतीला जिवंत ठेवा. चाळी दुरुस्त करण्यासाठी पैसे पुरवा आणि या टॉवर संस्कृतीला कुठे तरी आळा घाला. आज मुंबई शहरामध्ये ठिकठिकाणी अशा त-हेने टॉवर्स् बांधले जात आहेत की त्याठिकाणी फायर ब्रिगेडची गाडी जाऊ शकत नाही, कोणतेही वाहन जाऊ शकत नाही. त्याठिकाणी आग लागली तर ती विझ ाविता देखील येणार नाही. त्याठिकाणी पाणी पुरवठा होत नाही. आज मुंबईमध्ये पाण्याच्या आणि वाहतुकीच्या सा-या समस्या ह्या टॉवर्स् मधून उभ्या राहिलेल्या आहेत. हे समस्यांचे टावर्स् आहेत. म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, त्यांनी मुंबईतील जनतेला आश्वासन द्यावे की, यापुढे कोणतीही चाळ पाडली जाणार नाही, चाळीच्या दुरुस्तीसाठी जरुर निधी पुरविला जाईल. मुंबईचा विकास करीत असताना, या विकासाचा उपभोग घेण्यासाठी चाळीतील मराठी माणूस या मुंबईमध्ये राहाणार नाही अशी परिस्थिती असे होऊ नये म्हणून सरकारने आजच काही तरी केले पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 16:45

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबईच्या प्रश्नासंबंधी बोलताना मी केवळ दोन-चार महत्वाच्या मुद्यांना स्पर्श करणार आहे. मुंबईच्या प्रश्नासंबंधी माननीय सदस्य माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी आपले विचार व्यक्त केले. सभापती महोदय, 50 ते 52 लाख लोकांचा म्हाडाशी संबंध आहे. या म्हाडाच्या अधिका-यांची पहिल्यांदा तेथून बदली करा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे. गेल्या दोन वर्षापासून म्हाडामध्ये फार मोठ्या प्रमाणावर निर्लज्जपणे आणि गेंड्याच्या कातडी प्रमाणे भ्रष्टचार चाललेला आहे. मुंबईतील झोपडपट्टीसंबंधात कशा प्रकारे कारभार चाललेला आहे त्यासंबंधी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि मला आलेले एक पत्र मी याठिकाणी वाचून दाखवितो. "मा.आमदार, श्री.मधुकर चव्हाण, आपण दिनांक 12/4/2006 रोजी एस.आर.ए. योजनेबाबत अत्यंत चांगले मत व्यक्त केले.

कोरब्रा मिठागर वडाळा (पूर्व) परिसरात 20 सोसायटया निर्माण झाल्या आहेत. या सर्व योजनेत गरीब झोपडपट्टी धारकांना धमकावण्यात येत आहे. "आमचे सभासद व्हा" म्हणून दमदाटी करण्यात येत आहे. अनेक सोसायटीचे मोठमोठे बोर्ड लावण्यात आले आहेत. एन.आर.ए. बिल्डर्स, स्थानिक नगरसेवक संसारे यांस हाताशी धरुन, लोकांत दहशत निर्माण करीत आहेत. त्याला एम.पी.डी.ए. केली आहे. परंतु सरकारच्या आशिर्वादाने 4 महिन्यांपासून सुट्टीवर (हा प्रथम उच्चांक) 400 ते 350 क्षेत्रफळाची खोली मिळेल. भाऊ जेलमध्ये पण तो सोसायटीचा मुख्य प्रवर्तक. दोन सहकारी एक-एक महिना ऑर्थर रोड जेल मधून आलेत ते मुख्य प्रवर्तक. 4 काँग्रेसचे स्थानिक कार्यकर्ते त्याला मदत करतात. त्यातील 2 चेअरमन लोक सैरावैरा आहेत. संसारे यांच्या अनेक महिला कार्यकर्त्या दहशत पसरवीत आहेत. त्यांची नोंद पालीस ठाण्यावर आहे. पण पोलीस कारवाई करीत नाहीत. लोकांना लुटण्याचे काम चालले आहे. बिल्डर्सची दहशत वाढत आहे. नगरसेवकांचे पोलीस काही करु शकत नाहीत.

त्यांनी तक्रार केल्यास पोलीस सस्पेंड होतात. आता पर्यंत 4 जणांना सस्पेंड केले आहे. वस्ती पूर्ण दबावाखाली आहे. 5000 च्या वर झोपडया आहेत. खोटी नावे सोसायटयात टाकण्यात येत आहेत. गरीबांवर अन्याय केला जात आहे." अशा प्रकारचे हे पत्र आहे. मी एक दोन गोष्टी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकणी यांनी सांगितले की, तुम्ही मोफत घरांच्या योजना आखल्यामुळे मुंबईतील लोंढे वाढले. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, तसे काही नाही. ...नंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

मुंबई शहरामध्ये ज्या झोपडपट्टया वाढल्या त्या 1976 पासून वाढल्या. 1948-52 या काळात सुध्दा झ ाोपडया तयार झाल्या. परंतु 1952-78 या कालावधीमध्ये झोपडपट्टया वाढल्या. 1990 पर्यंत 17 टक्के वाढ झाली आणि गेल्या काही वर्षात 2 ते 3 टक्के वाढ झालेली आहे. झोपडपट्टयाची जी वाढ झाली त्याचे प्रमुख कारण म्हणजे मुंबई शहरामध्ये आपल्याला मोफर घर मिळेल या आशेने लोकांनी झ ाोपडया बांधल्या. मी राजकीय अभिनिवेशाने बोलू इच्छित नाही. पण 1995 साली याबाबतची घोषणा झाली. मुंबईमध्ये ग्रामीण भागामध्ये रोजगार मिळत नाही म्हणून हातावर पोट घेऊन लोक आले आणि मुंबईची लोकसंख्या भरमसाठ वाढली. याचा दोष कोणत्याही राजकीय पक्षाला देण्यात काही अर्थ नाही. मुंबईतील समस्यांच्या संदर्भात मी फक्त 2/3 मुद्यांना स्पर्श करणार आहे आणि माझे भाषण संपविणार आहे. मुंबईमध्ये 5500 घरे एसआरए स्कीमखाली बांधली जाणार आहेत. परंतु त्यातील केवळ 20 टक्केच काम झालेले आहे. 1995 पासून आजपर्यंत 5500 पैकी 2500 गाळे हे विकासकाच्या ताब्यात आहेत. 1995 पासून 295 भूखंड या योजनेसाठी शोधून काढले. त्यामध्ये 112 भूखंड एफएसआय न वापरलेले होते,115 भूखंड अव्यवहार्य होते आणि 69 भूखंड वापर न केलेले होते. सभापती महोदय, 1999 च्या मार्च महिन्यात म्हाडाच्या त्यावेळच्या मुख्याधिकारी श्रीमती वंदना खुल्लर यांनी गृहनिर्माण सचिवांना एक पत्र पाठविले होते. त्यामध्ये त्यांनी लिहिले होते की शासनाने 285 प्लॉट ताब्यात घ्यावेत आणि अर्जन्सी क्लॉज लावून ताब्यात घ्यावेत व त्यावर विविध योजना राबवाव्यात. शिल्लक असलेला एफएसआय वापरावा अशी सूचना त्यांनी केली होती. परंतु 1 मार्च 1999 ते 2006 पर्यंत मुख्याधिकाऱ्यांच्या या पत्राला गृहनिर्माण विभागाने उत्तर सुध्दा दिले नाही. आजच सकाळी एक योजना शासनाने जाहीर केली आहे. धाडसी अशी ही योजना आहे. त्याचा अंमल अधिवेशन संपल्यानंतर ताबडतोब करावा अशी माझी विनंती आहे. आजची परिस्थिती पाहिली तर 5-6 हजार लोक 1976 पासून संक्रमण शिबिरात रहात आहेत. सभापती महोदय, आर्थर रोड नाक्यावर पानसरे-शिंदे नावाची चाळ आहे. या चाळीतील एका महिलेने वर्तमानपत्रामध्ये एक बातमी दिली होती. या महिलेने सांगितले की माझे लग्न संक्रमण शिबिरात झाले,मी विधवा संक्रमण शिबिरातच झाले आणि आता माझी सून देखील याच संक्रमण शिबिरात विधवा झाली. अतिशय विदारक असे हे दृश्य आहे. हे 285 भूखंड सरकारने ताब्यात घेऊन त्यावरील एफएसआय वापरला पाहिजे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी सांगितले की सेलेबल एफएसआय आहे तो वापरुन इमारती बांधल्या जातात. परंतु यामध्ये राहणारा भाडेकरु आहे त्याला 800-1000 रु. भाडे देणे शक्य होत नाही. मराठी माणूस इतके भाडे देऊ शकत नाही. त्यामुळे तो ही घरे विकून निघून जातो. 9300 गाळे अतिरिक्त आहेत. 1960 नंतर नवीन वसाहती तयार झालेल्या नाहीत. पूर्वी टागोर नगर,कन्नमवार नगर,आदर्श नगर अशा मध्यमवर्गीय लोकांसाठी म्हाडाने वसाहती तयार केल्या परंतु आता अशा वसाहती म्हाडा निर्माण करीत नाही. मोठया प्रमाणात म्हाडाकडून अशा प्रकारचे बांधकाम झालेले नाही. आता सायन येथे अशा प्रकारच्या इमारती तयार होत आहेत. परंतु गेल्या 20-25 वर्षात अशा मोठया वसाहती निर्माण झालेल्या नाहीत. गेली 30-35 वर्षे संक्रमण शिबिरामध्ये जे लोक रहात आहेत त्यांच्यासाठी घरे बांधण्यात यावीत. 55 संक्रमण शिबिरे आहेत त्यातील एफएसआय वापरावा. बहुमजली इमारतीमध्ये हा माणूस जाऊ शकत नाही. मध्यमवर्गीयांसाठी 200-225 चौ.फूटाचे गाळे देऊन उरलेला एफएसआय शिल्लक राहतो. श्रीमंतांसाठी मोठमोठे टॉवर्स उभारले जातात. मध्यमवर्गीयांना मात्र 300-400 फूटाचे घर म्हाडा देऊ शकत नाही. मध्यंतरी यासंदर्भात एक बैठक झाली होती. महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सिटी डेव्हलपमेंट प्लॅन तयार केला होता. याबाबतीत एक अहवाल सादर केलेला आहे. या अहवालानुसार मुंबईमध्ये 66 लाख माणसे झोपडपट्टीमध्ये राहतात आणि त्यातील 26 टक्के लोकांना शौचासाठी मोकळया जागेवर बसावे लागते.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .......

त्यांनी आपल्या अहवालात आकडे दिलेले आहेत की, 15 लाखाच्या वर लोक रस्त्यावर शौचालयासाठी बसतात व ही मुंबईच्या दृष्टीने खरोखरच भयानक परिस्थिती आहे. तसेच त्यात असेही सांगितले आहे की, मुंबईतील स्लम जर आपल्याला पूर्णपणे संपवावयाचे असेल तर त्यासाठी 98 हजार कोटी रुपये लागणार असल्याचेही त्यात म्हटले आहे. या अनुषंगाने मुंबई शहरासाठी किती प्राधान्याने बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे ? हा महत्वाचा प्रश्न आहे. या मुंबईतील झ ोपडयांमध्ये राहणाऱ्या 66 लाख लोकांपैकी 26 टक्के लोक ओपन संडासला बसतात आणि फक्त दीड टक्का लोक खाजगी संडासचा वापर करतात तर दोन टक्के लोक सार्वजनिक शौचालय म्हणजेच सुलभ शौचालयांचा वापर करतात. म्हणून कितीही म्हटले की, आपल्याला घटनेने हा अधिकार दिलेला आहे तरी घटनाकारांनी ज्यावेळी घटना तयार केली त्यावेळी 50 वर्षानंतर या मुंबई शहराची अवस्था काय होणार आहे याची त्यांना कल्पना नव्हती. कारण आज मुंबई शहरात दररोज 400 कुटुंबे येऊन स्थायिक होत आहेत. म्हणून सध्या जे घडत आहे की, कुणीही यावे आणि कुठेही घर बांधावे याचा कुठेतरी विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, दुसरे म्हणजे विकास आराखडयाच्या संदर्भात या अहवालामध्ये म्हटले आहे की, हा विकास आराखडा सन 1991 मध्ये आणू शकलो असतो. आता या विकास आराखडयामध्ये जे रिझर्वेशनचे प्लॉट दिलेले आहेत परंतु सध्याच्या परिस्थितीत मुंबईमध्ये रिक्रीएशन ग्राउंड, गार्डन, रस्ता रुंदीकरण, प्ले ग्राउंड यासाठी एक इंच जमिनीचा तुकडाही शिल्लक राहिलेला नाही. म्हणून माझी विनंती आहे की, म्हाडाकडे लक्ष देण्यात यावे अशी माझी कळकळीची विनंती आहे. त्याप्रमाणेच घुसखोरांच्या बाबतीत विचार केला तर आज जे घुसखोर यामध्ये घुसलेले आहेत व येत आहेत ते सर्व आपल्या अधिकाऱ्यांच्याच मर्जीने चाललेले असते. दुसरे म्हणजे शिवशाही प्रकल्पाच्या माध्यमातून ज्यावेळी आम्ही एस.आर.ए. मार्फत कोटयावधी रुपये या झोपडी पुनर्बांधणीसाठी दिले होते पण त्यातील 100 कोटी रुपये हे बिल्डर लोक वापरत आहेत, त्यांनी पुनर्वसनाची एकही इमारत आतापर्यंत बांधलेली नाही. त्याचे कारण म्हणजे आपसात भांडणे चालू असल्याचे ते सांगतात. म्हणून झोपडपट्टी आणि मुंबईतील चाळींच्या संदर्भात प्राधान्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर म्हाडामार्फत 10 हजार घरे तीन वर्षात

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .......

बांधणार असल्याचे सांगण्यात आले, ती घरे कशासाठी हे समजत नाही. आपण जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियान या योजनेखाली केवळ 1800 कोटी रुपये ठेवलेले आहेत. एका बाजूला सांगितले जाते की, या मुंबई शहरातील स्लमचा विकास व अन्य गोष्टी करावयाच्या असतील तर त्यासाठी 98 हजार कोटी रुपये लागतील पण त्यांनी एक सुंदर चित्र निर्माण केलेले आहे आणि त्यामध्ये असे म्हटले आहे की, मुंबईतील घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी 8 एवढा एफएसआय वाढवावा लागणार नाही, अन्यथा हा प्रश्न सोडवू शकणार नाही. माझी विनंती अशी आहे की, मुंर्ब शहरात 8 आणि 4 च्या वर एफएसआय वाढवून दिला तर या वाढलेल्या एफएसआयसाठी आपण पाणीपुरवठा तरी करु शकणार आहात काय ? कारण या मुंबई शहरामध्ये फक्त 26 टक्के एवढीच मलनि:सारणाची क्षमता आपण आजपर्यंत निर्माण करु शकलो आहोत. शेवटी हा खर्च मुंबईमध्ये कोणासाठी करणार आहात हा देखील प्रश्न महत्वाचा व विचार करण्यासारखा आहे. मुंबई महापालिकेच्या आयुक्तांनी एक चांगल्या प्रकारची नोट तयार केली असून त्यात मुंबई मलनि:सारण प्रकल्प स्टेज-1, मध्य वैतरणा पाणीपुरवठा प्रकल्प, मुंबई मलनि:सारण योजना स्टेज-2 हा प्रकल्प 2006 ला सुरु होऊन 2010 पर्यंत पूर्ण होणार आहे व त्यासाठी 1600 कोटीची गरज आहे. अशा प्रकारे आणखी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प आणि मिठी नदी विकास प्राधिकरण असे विविध प्रकल्प मुंबईच्या विकासासाठी राबविण्यात येत आहेत. परंतु हे सर्व करीत असतांना मुंबईतील चाळीत राहणाऱ्या लोकांच्या बाबतीत शासनाने सहानुभूतीने विचार करावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मुंबईच्या एकंदर परिस्थितीसंबंधी जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. मी अगदी थोडक्यात माझे विचार मांडणार आहे. या सभागृहामध्ये अनेकदा उल्लेख झाला आहे की, मुंबई हे बेट आहे. मुंबईला तिन्ही बाजूने समुद्राने वेढलेले आहे. बेटाची व्याख्या आहे. त्या व्याख्येनुसार किती लोकसंख्या असावी, त्यावर किती बांधकाम असावे याचे प्रमाण ठरविलेले असते. मुंबई ही आपल्या देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईवर सर्वात जास्त भार हा लोकसंख्येचा आणि वास्तूंचा आहे. अंदमान-निकोबार बेटांसंबंधीचे जे नियम आहेत, ते जर मुंबई शहराला लावले असते तर आज मुंबईचा ऱ्हास झाला नसता, पर्यावरणाचा ऱ्हास झाला नसता हे या निमित्ताने नमूद करू इच्छितो. आज पर्यावरणाची स्थिती आहे. हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत चालले आहे. खार येथील निवासी भागातील रिपोर्ट माझ्याकडे आहे. खार, दादर, कुलाबा, बोरिवली येथे नायट्रॉक्सिडचे प्रमाण 115 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. साकीनाका, चेंबूर, येथे सर्वात जास्त प्रदूषण आहे. ज्याप्रमाणे मुंबई शहरात अंतरा अंतरावर ब्युटी पार्लर आहेत, त्याप्रमाणे भविष्यामध्ये ऑक्सिजन पार्लरची आवश्यकता भासणार आहे. आज वाहतूक पोलिसांची अवस्था काय आहे ? आज किती जण अस्थमा पीडित आहेत ? डॉ.निफाडकर यांनी एक अहवाल सादर केला आहे. मुंबई वाचववायाची असेल तर 12 लाख झाडे लावली पाहिजेत असे त्यांचे म्हणणे आहे. पण एवढी झाडे लावण्यासाठी मुंबईत जागा आहे कुठे ? 12 लाख झाडे लावली तरच आपण हवेतील ऑक्सिजनचे प्रमाणे राखू शकू. एवढी झाडे लावली तरच मुंबईकर सुखाने श्वास घेऊ शकतील. आज मुंबईत प्रदूषण कशामुळे वाढत आहे. CNG मुळे किती प्रमाणत प्रदूषण कमी झाले आहे ? उलट आज या ना त्या कारणांमुळे 55 टक्क्यांनी प्रदूषणात वाढ झालेली आहे. डिसेल-पेट्रोलचा वापर मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढले आहे. यासाठी वाहने कारणीभूत आहेत. सर्वसाधारणपणे 1 लाख मोटार दरवर्षी रस्त्यावर येतात. तेव्हा यासाठी काही तरी केले पाहिजे. आज ऑटो मोबाईल कंपन्यांनी कमी दरात नवनवीन गाडया बाजारात आणण्याचा मोठया

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

प्रमाणावर

धडाका सुरू केला आहे. यासाठी बँकासुध्दा अल्पदराने कर्ज उपलब्ध करून देत आहेत. आज मुंबई शहरात 11 लाख 99 हजार 416 वाहने आहेत. म्हणजे एका किलोमीटरमध्ये 521 वाहने ओळीने उभी राहतात, एवढीच त्याची डेन्सीटी आहे.

सभापती महोदय, मुंबईतील भटक्या कुत्र्यांचा व त्या पासून होणारा उपद्रव हा विषय देखील आता महत्त्वाचा झाला आहे. यासंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. डिसेंबर ते फेब्रुवारी 2006 पर्यंत 9258 लोकांना कुत्रे चावले आहेत. यासाठी कोणतीही उपाययोजना अद्यायपर्यंत करण्यात आलेली नाही. सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांनी यासंबंधी अनेक वेळा बैठक देखील घेतल्या आहेत. पण त्यासाठी उपाय सापडत नाहीत. मुंबईत एनजीओ मार्फत कुत्र्यांची नसबंदी करण्यात येत आहे. पण शासन किती कुत्र्यांची नसबंदी करणार आहे ? दर तीन महिन्यांनी सुमारे 8 हजार कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात येते म्हणजे वर्षाला 25 हजार कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

परंतु आज आपल्याकडे व्हेटर्निटी सर्जन उपलब्ध नाहीत. रेबिजचे इंजेक्शन्स हॉस्पीटल्समध्ये उपलब्ध नाहीत. मुंबई महानगरपालिकेकडून सांगण्यात आले की, भटक्या कुत्र्यांची नसबंदी करण्यासाठी स्वतंत्र ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात येईल. परंतु हा सर्व प्रकार केवळ कागदोपत्री आहे. प्रत्यक्षात मात्र या भटक्या कुत्र्यांसबंधी काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. या कुत्र्यांमुळे आज नागरिक भयभीत झाले आहेत. या कुत्र्यांमुळे सकाळी व्यक्ती कामावर जाऊ शकत नाही, गेली तर परत येऊ शकत नाही. त्यामुळे यासंदर्भात स्वत: इनिशिएटिव्ह घेऊन नागरिकांना कुत्र्यांच्या दंशापासून वाचवावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

महोदय, मुंबईमध्ये दुसरी समस्या भिकाऱ्यांची आहे. दिवसेंदिवस भिकाऱ्यांची संख्या वाढतच आहे. ट्राफिकमध्ये जर गाडी उभी असेल तर लगेच ही भिकारी मुले गाडीभोवती वेटोळे करुन उभी राहतात. ही सर्व लहानलहान मुले असतात. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी बाल कामगार प्रथा संपुष्टात आणणार आहोत असे सांगितले. त्यासाठी 15 ऑगस्टपासून कायदा करणार आहोत असेही सांगितले. परंतु मला असे वाटते की, ही मुले भिकारी नसून, व्यवसाय म्हणून ती भीक मागत आहेत. भीक मागणे हा एक धंदाच सुरु झालेला आहे. या व्यवसायामध्ये लहानलहान मुलांना गुंतविले जात आहे. लाखो मुले या व्यवसायामध्ये गुंतले आहेत. गजरे, फुले किंवा अन्य वस्तू ही मुले गाडीभोवती वेटोळे करुन विकत असतात. वास्तविक पाहता ज्या वयात मुलांनी शाळेत जावयास हवे त्या वयात ही मुले रस्त्यांवर वस्तू विकताना दिसतात. गाडीच्या काचा वाजवितात आणि त्या वस्तू विकत घेण्याविषयी आग्रह धरतात.

महोदय, दुसरा प्रश्न हा मुंबईतील हॉस्पीटल बाबतचा आहे. सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय सुरेश शेट्टी हे दोघेही या ठिकाणी उपस्थित आहेत. मुंबईमध्ये जे.जे.हॉस्पीटल, सेंट जॉर्ज हॉस्पीटल, जी.टी.हॉस्पीटल ही मोठी हॉस्पीटल्स आहेत. जे.जे.हॉस्पीटलची अवस्था आपणा सर्वांनाच माहीत आहे. हजारो रुग्ण उपचारासाठी या रुग्णालयात येतात. असे असताना मात्र त्या रुग्णालयामध्ये सर्व साधनांचा तुटवडा आहे. जे.जे. हॉस्पीटलसाठी 18 कोटी रुपयांची गरज आहे या संदर्भात माननीय राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी मागे प्रस्ताव पाठविला होता. परंतु त्या 18 कोटी रुपयांपैकी एकाही पैशाची तरतूद राज्य सरकारने अर्थसंकल्पामध्ये केलेली नाही. तरतूद



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

न करुन, हॉस्पीटल आणि जनतेच्या तोंडाला या शासनाने एकप्रकारे पानेच पुसली आहेत. सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी मला आश्वासित केले होते की, आमदार मिळून आपण माननीय मुख्यमंत्री आणि माननीय वित्त मंत्री महोदयांकडे जाऊ आणि जे.जे.हॉस्पीटलसाठी 18 कोटी रुपये देण्याचे त्यांच्याकडून कबूल करुन घेऊ. 18 कोटी रुपये मिळण्याचा अजून तरी सुदिन आलेला नाही. कदाचित आज तो सुदिन आला असावा असे मला वाटते. आज माननीय मुख्यमंत्री महोदय जे.जे.हॉस्पीटलला 18 कोटी रुपये देतील अशी मी अपेक्षा करतो. हा केवळ तुमचा-माझा प्रश्न नसून, मुंबईमध्ये उपचारासाठी येणाऱ्या सर्वांचाच प्रश्न आहे.

महोदय, कॉर्पोरेशनच्या हॉस्पीटलची तर अतिशय भयावह स्थिती आहे. कॉर्पोरेशनच्या हॉस्पीटलमध्ये 12 हजार बेड आहेत. सिटीचा विचार केला तर लोकसंख्या आणि प्रती बेड यांची संख्या 515 इतकी आहे. इस्टर्न सबर्बनमध्ये 1820 लोकांच्यामागे 1 बेड आहे. वेस्टर्न सबर्बनचा विचार केला तर 2300 लोकांमागे एक बेड आहे. टोटल मुंबईचा विचार केला तर 1124 लोकांमागे एक बेड आहे. कॉर्पोरेशनच्या रुग्णालयांमध्ये अशी अवस्था असणे ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल. महोदय, आज मुंबईच्या मुख्य भागात, पेरिफेरीचे एकही मोठे हॉस्पीटल नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, ईस्टर्न व वेस्टर्न भागामध्ये एकही हॉस्पिटल नाही. 153 जनरल डिस्पेन्सरीज आहेत. सभापती महोदय, मुंबईमध्ये टी.बी. हॉस्पिटल एक आहे. तसेच नाक-घसा-कान याचे हॉस्पिटल देखील एकच आहे. लिप्रसीचे देखील एकच हॉस्पिटल आहे. तरी, या संख्यांमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. पेराफेरी हॉस्पिटलमध्ये उपकरणांची संख्या किती आहे हे सांगून मी आता येथेच थांबणार आहे. सभापती महोदय, तेथे 73 एक्स-रे मशिन्स आवश्यक आहेत, परंतु फक्त 5 आहेत. यू.एस.जी.च्या 17 उपकरणांची आवश्यकता आहे, परंतु फक्त 8 आहेत. बॉयल्स ॲप्रेन्डर 76 असण्याची आवश्यकता आहे, परंतु त्या ठिकाणी एकही नाही. वेन्टिलेटर्स 27 आवश्यक आहेत, परंतु फक्त 1 आहे. सभापती महोदय, 21 मायक्रोस्कोप्सची आवश्यकता असताना फक्त 2 आहेत. लॅप्रोस्कोप्सच्या 15 उपकरणांची आवश्यकता आहे, परंतु तेथे एकही नाही. 4 सी-आर्म इम.इंट. उपकरणांची आवश्यकता आहे, परंतु फक्त 3 आहेत. बी-जी ॲनॅलाईजर उपकरणांची 4 ची आवश्यकता आहे, परंतु तेथे एकही नाही. डेन्टल चेअर्स 12 आवश्यक आहेत, परंतु तेथे 1 आहे. एलिसा रिडर्सच्या 7 उपकरणांची आवश्यकता आहे, परंतु तेथे एकही नाही. सभापती महोदय, कॉर्पोरेशन व सरकारी हॉस्पिटलची ही अशी शोकांतिका आहे. सभापती महोदय, आपण जे.जे. हॉस्पिटलला 18 कोटी रुपये द्यावेत, एवढे सांगून मी माझे दोन शब्द येथेच संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, आज या ठिकाणी मुंबईच्या अनेक प्रश्नांवर चर्चा झाली आहे. तरी, त्या चर्चेत सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. सभापती महोदय, मुंबई राज्य हे देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर एक आर्थिक केंद्र म्हणून गणले जात आहे. आपण जर मुंबईचा इतिहास पाहिला तर आपल्याला दिसून येईल की, मुंबईवर सातत्याने वेगवेगळ्या प्रकारची संकटे येत असतात आणि सर्व मुंबईकर ही सर्व संकटे धाडसाने झेलत असतात. सभापती महोदय, दंगल असेल, बॉंबस्फोट असेल, वादळ असेल, अतिवृष्टी असेल, साथीचे रोग असतील, मुंबई या सर्व संकटांवर मात करुन तडफपणे उभी राहते. कदाचित मला वाटते की, मुंबई धाडसाने उभी राहते म्हणूनच की काय मुंबईवर सारखी संकटे येत आहेत. सभापती महोदय, आपण मुंबईचा इतिहास पाहिला तर आपल्याला दिसून येईल. की, मुंबईमध्ये एकूण 7 बेटे होती. त्यातील शीव-माटुंगा, परळ, माझगांव, वाळकेश्वर, डोंगरी, छोटा कुलाबा, मोठा कुलाबा, माहिम, वरळी अशाप्रकारे बेटे होती. सभापती महोदय, पोर्तुगीजांनी मुंबई काबील केली आणि मुंबईचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला. सभापती महोदय, संपूर्ण भारताची संपत्ती मुंबईत एकवटली आहे, असे वक्तव्य सन 1890 मध्ये गोपाळ गणेश आगरकर यांनी केले होते आणि ते खरोखरच यथार्थ होते असे आता वाटत आहे. त्यानंतर मुंबईतील लोकसंख्या वाढायला लागली. कोणत्या ना कोणत्या कारणांनी बरेचसे लोक मुंबईत स्थलांतरित झाले. व्यापार करण्यासाठी, नोकरीसाठी लोक मुंबईत येऊ लागले. आपल्या येथे 19 व्या शतकापर्यंत परप्रांतीय मुंबईत स्थायिक व्हावेत म्हणून प्रोत्साहन देण्यात यायचे. मुंबईची त्यावेळची लोकसंख्या पाहिली तर आपल्याला दिसेल की, सन 1861 मध्ये 10 हजार लोकसंख्या होती, सन 1886 मध्ये 60 हजार लोकसंख्या होती, सन 1880 मध्ये 1 लाख लोकसंख्या होती, सन 1914 मध्ये 1 लाख 86 हजार लोकसंख्या होती, सन 1936 मध्ये 2 लाख 36 हजार लोकसंख्या होती.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 17:15

श्रीमती कांता नलावडे...

सभापती महोदय, 1872 साली 6,44,650, 1881 मध्ये 7,73,196, 1891 मध्ये 8,21,764, 1901 मध्ये 9,27,994, 1911 मध्ये 11,48,757, 1921 मध्ये 13,80,448, 1931 मध्ये 14,97,812, 1941 मध्ये 18,01,358, 1951 मध्ये 29,94,444, 1961 मध्ये 41,52,056, 1971 मध्ये 59,72,575, 1981 मध्ये 82,43,405, 1991 मध्ये 99,25,891, सन 2001 मध्ये 1,00,40,000 इतकी लोकसंख्या होती. सन 2001 ची लोकसंख्या पाहिली तर राज्यभर बाहेरुन येणाऱ्यांचे प्रमाणे हे 50 टक्क्यांच्यावर गेलेले आहे असे आपणाला दिसून येईल. या लोकसंख्येच्या वाढीमुळे मोठया प्रमाणात रस्ते वाहतुकीची समस्या निर्माण होत आहे. आज मुंबईमध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायचे म्हटले तरी खूप वेळ लागतो. याबाबत आताच सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, मला चेंबूर येथून नरिमन पॉंईट येथे येण्यासाठी जवळपास दीड ते दोन तासांचा अवधी लागतो. मी सुध्दा चेंबूर येथेच राहत आहे. अनेक वेळा तर गर्दीमुळे व ट्राफिक जॅम मुळे मुंबईमध्ये येताच येत नाही. इतर वाहतुकीच्या दृष्टीने विचार केला तर लोकल वाहतूक सुध्दा सुखकारक राहिलेली नाही. आपण रेल्वेसाठी दोन टर्मिनस तयार केलेले आहेत एक पश्चिम रेल्वेवर बांद्रा येथे व दुसरे मध्य रेल्वेवर कुर्ला येथे उभारण्यात आलेली आहेत. ही दोन टर्मिनस उभारुन सुध्दा गर्दी कमी झालेली नाही. रेल्वे प्रवाशांना अतिशय त्रास होत आहे, याकडे सुध्दा लक्ष देण्याची नितांत गरज आहे. या दोन टर्मिनसचा जर आपण योग्य प्रकारे अभ्यास केला तर गर्दी कमी करण्याचा आपण प्रयत्न करु शकतो. मला असे वाटते याकडे सरकारने विशेष लक्ष दिले तर वाहतुकीच्या दृष्टीने बऱ्याच गोष्टी आपणाला करता येतील. शहाड-अंबिवली येथील लोकलची गर्दी आपण पाहिली तर गर्दीच्या वेळी तेथून एका गाडीमध्ये सरासरी 6112 प्रवासी प्रवास करीत असतात. हीच आकडेवारी कल्याण-डोंबिवलीमध्ये 29 हजार प्रवासी इतकी आहे, ठाणे स्टेशनमध्ये 70 हजार प्रवासी इतकी आहे, घाटकोपर स्टेशनमध्ये 90 हजार प्रवासी इतकी आहे, कुर्ला स्टेशनमध्ये 70 हजार प्रवासी इतकी आहे, अशाच प्रकारचे दहिसर येथे 45 हजार प्रवासी इतकी आहे, बोरिवली येथे 90 हजार प्रवासी इतकी आहे, अंधेरी येथे 1,36,000 प्रवासी इतकी आहे, दादर येथे 1,32,000 प्रवासी इतकी आहे, चर्चगेट येथे 90 हजार प्रवासी इतकी आहे, गर्दीच्यावेळी एवढया मोठया प्रचंड संख्येने प्रवासी स्टेशनमध्ये असतात.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

एका लोकल ट्रेनमध्ये 2000 प्रवासी वाहतूक करण्याची क्षमता असतांना प्रत्येक वेळी 3 ते 4 हजार अतिरिक्त प्रवाशांची वाहतूक होत असते. याबाबत लक्ष देणे अत्यंत जरूरीचे आहे. मुंबईतील वाहनाचा विचार केला तर रोज मुंबईमध्ये 50 ते 60 नवीन वाहनांची नोंदणी होत असते. नवीन वाहनांची भर पडत असतांना जुने वाहने काढून टाकण्यात येत नाहीत. त्यामुळे प्रचंड अशी वाहतूक कोंडी होते, सन 1990-91 मध्ये 18544 नवीन वाहनांची नोंदणी झाली होती, सन 1995-96 मध्ये 71 हजार वाहनांची नोंदणी झाली होती. आता 30 लाख दुचाकी वाहनांची नोंदणी आहे, 10 लाख खाजगी वाहनांची नोंदणी असून 3 लाख ट्रक टेम्पो व बसेस यांची नोंदणी झालेली आहे. एवढी मोठी वाहनांची संख्या असली तरी रस्ते आहे तेवढेच आहेत. फेरीवाल्यांनी मुंबईच्या रस्त्यांवर बसू नये, असा कायदा केला तरी सुध्दा रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. या दृष्टीने सुध्दा विचार करण्याची गरज आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ....

सभापती महोदय, माझ्या भाषणाचा समारोप करताना मला एकच सांगावेसे वाटते आहे, माझ्याकडे अनेक मुद्दे बोलण्यासाठी आहेत पण वेळ कमी असल्याने मी ते येथे मांडू शकत नाही. आज मुंबईचे अनेक प्रश्न आहेत. मुंबईमध्ये अतिवृष्टी झाली. त्यानंतर मुंबई त्यातूनही सावरली. मुंबईसाठी रेल्वे महामंडळ झाले. परंतु प्रत्यक्षात आपल्याला काय मिळाले आहे हे आपण पाहिले पाहिजे. मुंबईमध्ये 55 टक्के आणि उर्वरित शहरी भागामध्ये 40 टक्के लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहताहेत. त्यातही मुंबईतील झोपडीधारकाच्या समस्या गंभीर आहेत. तेथे योग्य त्या सोयी-सुविधा मिळत नाहीत. त्याकडे देखील शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. नागरीकरण अटळच आहे. त्यामुळे या नागरीकरणामध्ये जमिनीचा जो अयोग्य वापर होतो आहे तो थांबविणे गरजेचे आहे. ...

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना दिलेला वेळ संपला आहे. आता त्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. तावडे हे आता भाषण करतील.

....... 3एस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या माध्यमातून मुंबईच्या प्रश्नांसंबंधात होत असलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, ज्यावेळेस केंद्राचा योजना आयोग मुंबईमध्ये आला होता तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वित्त मंत्री यांनी आग्रहाने प्रतिपादन केले की, मुंबईतून आम्ही 40,000 कोटी रूपये कर दिल्लीला देतो परंतु दिल्ली मुंबईला काही देत नाही. मी त्याच धर्तीवर असे म्हणतो की, मुंबई महाराष्ट्राला जवळ जवळ कररूपातून 70 टक्के महसूल गोळा करून देते पण मुंबईला त्यातील दीड ते दोन टक्के देखील राज्य सरकार आपल्या बजेटमधून देत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे आपण ज्या लॉजिकने केंद्राकडे मागणी करतो आहोत त्या लॉजिकने आपण या मुंबईसाठी आपल्याकडून तरी काही देतो आहोत का याचे प्रामाणिक परीक्षण राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी करण्याची आवश्यकता आहे, नव्हे त्यांनी असे परीक्षण केले पाहिजे. शेवटी चॅरिटी बिगीन्स ॲट होम असे म्हणतात. प्रत्येक वेळी जेएनयूआरएम चा बोलबाला झाला. ती योजना काय आहे, गोंधळ काय आहे त्या चर्चेमध्ये मी आता जात नाही कारण वेळ कमी आहे. परंतु हे पैसे मुंबई खरोखरी येणार आहेत काय ? याचीच शंका निर्माण झालेली आहे. मुंबई संबंधात माननीय मुख्यमंत्र्यांना सी.पी.माथूर यांनी बैठकीमध्ये काय सांगितले ते माहीत असेलच. त्यातील पाच गोष्टी महत्त्वाच्या आहेत. यूएलसी, 20 वर्षांचा प्लॅन, यूजर्सना चार्ज लावणे, रेंट कंट्रोल ॲक्ट, रिफॉर्म स्टॅम्प ड्युटी आपण केली. यामध्ये आपण अक्सेप्टन्स मागितले. आता श्री.माथूर यांचे रेकॉर्डवर असलेले म्हणणे असे आहे की, महाराष्ट्राच्या ज्या योजना सादर झाल्या आहेत त्या केवळ कट ॲण्ड पेस्ट अशा आहेत, त्यात कोणतीही व्हिजन आहे असे वाटत नाही. सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांना राज्यांकडून येणाऱ्या योजनांचे परीक्षण करून जे सादर करतात तेच असे म्हणतात तर मग खरोखरी हा पैसा आपल्याकडे येणार आहे का ? पंतप्रधानांची घोषणा नोकरशाही हाणून पाडतात असे बोलून काही होणार नाही. 17 तारखेला जयपाल रेड्डी यांना बोलावून काही करू पाहिले पण त्यातून काही सुटेल असे मला वाटत नाही. कारण यामध्ये गांभीर्याने, ज्याप्रमाणे आंध्र प्रदेशने आणि गुजराथने केले आहे तसे आपण केले आहे काय ? याचे प्रामाणिक परीक्षण आपण केले पाहिजे. आपल्या योजनांबाबत केंद्रातील अधिकारी काय म्हणतात ? "Mere contribution to the Centre won't help. We have to see some kind of action on the ground. The Govt. of Maharashtra will have to do its homework before going to Prime Minister."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3

श्री. विनोद तावडे.....

38 हजार कोटीच्या विषयातील आहे. आता रेड्डी येतील, काही तरी घोषणा करतील, आपण त्याबाबत काही छापून आणाल. पण प्रत्यक्षात नेमके काय होईल ते नंतर कळेलच. एमयूटीपी संबंधात येणारा पैसा जागतिक बँकेने थांबविला. 15 दिवसापूर्वीच्या बुधवारी त्या संबंधात एक रिव्ह्यू बैठक बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरांची झाली. ....

....3 T 1.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

त्यांच्या मिनिट्समधील काही वाक्ये मी आपणास वाचून दाखवितो. "The Bank's team found the State Government is falling short on rehabilitation promise. It also had noted the absence of mandatory grievance addresal mechanism for the project affected people. The State machinery had not offered any alternative to a number of people being rendered jobless as they were forced to migrate, it said." दुसरा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. "The State government had appointed the MMRDA as an executing body and a nodal agency for the project. The bank, however, has observed that it "over-estimated the capacity of the MMRDA" while expressing concerns about ensuring effective implementation of the Action Plan. चंद्रशेखर यांच्या भरंवशावर आपल्याला लोकांना फसविता येणार नाही. "The planned road construction under the project will also affect large numbers of poor people and shopkeepers living along those roads, who will need to be resettled. The Panel's investigation observed that the number of complainants had specific needs like.. पाणी, स्वच्छता, स्टॉर्म वॉटर and had valid and significant concerns which required full attention." सभापती महोदय, 15 दिवसापूर्वी झालेल्या बैठकीचे मिनिट्स मुख्यमंत्री महोदयांना वाचायला मिळतील. आपण महानगरपालिका, पंचायत राज या स्वायत्त संस्था म्हणून त्यांचा गवगावा करतो.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्रीमती सुधा जोशी)**

आपण कलम 37(1) मध्ये मायनर मॉडिफिकेशन केले. डी.सी. रुलमध्ये स्पेशल टाऊनशिपचा विषय आपण घातला. आपण स्पेशल टाऊनशिपमध्ये बदल करीत आहात हे मायनर मॉडिफिकेशन आहे कां? स्पेशल टाऊनशिपमुळे 1 कोटी 20 लाख स्क्वेअर फूटाचे कंस्ट्रक्शन मुंबईमध्ये वाढणार आहे. आज मुंबईमध्ये ॲडिशनल इन्फ्रास्ट्रक्चर ॲमिनिटीज देण्याची क्षमता नसल्यामुळे सर्व झोपडया पाडल्या पाहिजेत असे आपल्याला वाटते. परंतु ज्या मुंबईमध्ये 1 कोटी 20 लाख स्क्वेअर फूटाचे कंस्ट्रक्शन होणार आहे त्यामध्ये रहाणाऱ्या लोकांना ॲमिनिटीज देण्यासाठी आपण जागेची आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

पैशाची व्यवस्था करणार आहात. आणि त्याठिकाणी येणाऱ्या सर्व लोकांना स्टँप डयुटीमध्ये 50 टक्के सूट मिळणार आहे, डेव्हलपमेंट चार्जेस माफ होणार आहेत, सिक्युरिटी चार्जेस माफ होणार आहे,त्यांना कूळ कायदा लागू होणार नाही , त्यांचा ऑक्ट्राय माफ होणार आहे, सेल्स टॅक्स माफ होणार आहे. ही रेड कार्पेट ट्रीटमेंट त्यांना कशासाठी देणार आहात? आपण एन.डी. झोनला व गावठाण डेव्हलपमेंटला स्थगिती दिली होती. त्यामागे काही लॉजिक होते. परंतु आपण नंतर एन.डी. झोनवरील स्थगिती उठविली. आणि ज्या गावठाणामध्ये आमचे कोळी बांधव राहतात त्यांची स्थगिती उठविली नाही. त्यांनी आपले राहते घर दुरुस्त करावयाचे नाही कां? जो मूळ मुंबईकर गरीब कोळीबांधव आहे, या मुबईचा खरा नागरिक आहे त्यांच्या घर दुरुस्तीला आपण स्थगिती कां दिली? दुसरे असे की,कलम 37(1) मध्ये आपण जे भूखंड राखीव ठेवले व नंतर ऑल पार्टी मिटींगमध्ये एकेक करुन ते मोकळे केले. ते करण्यापूर्वी त्यासाठी आपण मास्टर प्लॅन तयार करा. मुंबईमध्ये रिक्रिएशन ग्राऊंड आणि प्ले ग्राऊंडसाठी योजना तयार करणे मुंबई महानगरपालिकेला परवडणार नाही? ठीक आहे. परंतु आपण त्यासाठी काहीतरी मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे. या सर्व गोष्टी आपण केंद्राकडे सोपविता कामा नये. मुंबईतील राखीव भूखंडांचा आपण मास्टर प्लॅन तयार केला तर मुंबईतील काही मोकळया जागा शिल्लक राहतील. नाही तर तात्पुरत्या स्वरुपामध्ये अतिक्रमण उठवायचे आणि नंतर ते उठविणे शक्य होत नाही म्हणून ते रेगुलराईज करुन टाकायचे. आणि दुसऱ्या बाजूला 30 दिवसाच्या आत अतिक्रमण झाल्याचे कळविण्यात आले नाही तर वॉर्ड ऑफिसरना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी करावयाची.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे..... 17:30

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु...

आणि ही अतिक्रमणे थांबविण्यासाठी तशाप्रकारचा मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे.इंडस्ट्रीजचे रेसिडेन्सीयल झोनमध्ये रुपांतर करण्यासाठी डी.सी.रुलमध्ये दुरुस्ती करत आहोत. खरे म्हणजे हा अधिकार आयुक्तांना आहे. याप्रमाणे पी.जी.साठी जागा ठेवावी लागते. 10 टक्के ॲमिनिटीज त्या ठिकाणी देतो. प्रिमियम भरा आणि एफएसआय वापरुन टाका, असे सांगितले जाते, परंतु हे सांगण्याची काय गरज आहे ? हे नियमानेच झालेले आहे. त्यामध्ये हस्तक्षेप करण्याची काय गरज आहे ? केव्हा तरी सरकारला याचा विचार करावाच लागेल.

सभापती महोदय, 26 जुलै रोजी पडलेल्या अति पावसामुळे आपण बऱ्याच गोष्टी शिकलेलो आहोत. सभापती महोदय, 1961 चा टाऊन हॉल डॅटम लाईन स्पेसिफाय झालेला आहे. हाय टाईड झाले तर समुद्राचे पाणी 28 मिटर पर्यन्त येते, हे मार्क झालेले आहे. परंतु यावेळेस इमारतीच्या ग्राऊंड फ्लोअरपर्यन्त पाणी घुसले. त्याप्रमाणे आता बांधकामासाठी तसा परवाना देण्याची गरज आहे. सभापती महोदय, 70 ते 80 नाल्याची व सांडपाणी गटारांची तोंडे समुद्रात सोडलेली आहेत. नाल्याच्या झडपांवर एनक्रोचमेंटमुळे त्या तुटलेल्या आहेत. मुंबईमध्ये हाय टाईडमुळे पाणी तुंबले. त्याबाबत 70 ते 80 नाल्यांच्या झडपांच्या दुरुस्तीकडे सरकारने लक्ष घातले तर यामध्ये सुधारणा होऊ शकते.

त्यानंतर मिठी नदीतील गाळ काढून तो कांजूर येथील सॉल्ट लॅन्डवर टाकला जातो. त्यामुळे त्या ठिकाणी गारबेजचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आता गारबेज कोठे टाकायचे, हा प्रश्न निर्माण झालेला आहे. कोठेतरी इन्सेन्टीव देऊन अल्टरनेट उपाय देता आला असता. आता गारबेज कोठे टाकायचे, हा प्रश्न आहे. नागरिकही हैराण झालेले आहेत. याला कोठेतरी आळा घालण्याच्यादृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, उल्हासनगरमधील अनधिकृत बांधकामा संदर्भात विधेयकावर विचार करुन मंजूर करण्यात आले. मुंबईकडे मात्र शासनाला लक्ष देण्यासाठी वेळ मिळालेला नाही. त्यामुळे मुंबईच्या बाकीच्या विषयामध्ये शासनाचा हस्तक्षेप असतो, तसाच बदल मुंबई महानगरपालिका कायद्यामध्ये करणे जरुरीचे आहे. स्वयंसेवी संस्था कोर्टामध्ये गेल्या तर सगळा विकास थांबेल. तेव्हा या संबंधात शासनाने कोठेतरी रिव्ह्यू घेऊन त्या कायद्यामध्ये काही गोष्टींचा अंतर्भाव करणे आवश्यक आहेत. डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन ॲक्टमध्ये वारंवार बदल केला जात असतो. मात्र, मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी शासन लक्ष देत नाही. या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु....

कायद्यामध्ये दुरस्ती केली पाहिजे, तरच खाली अंमलबजाणी होऊ शकते. एस.आर.अे. योजनेबाबत भरपूर चर्चा झालेली आहे. एस.आर.अे.योजनेमध्ये लोकप्रतिनिधींचा सहभाग नसतो. स्थानिक लोकप्रतिनिधींनी या विषयी तक्रारी केलेल्या आहेत, त्या ऐकून घेतल्या जात नाहीत. काल-परवा खालच्या सभागृहामध्ये नवीन घोषणा करण्यात आली, त्याचा काय परिणाम होतो ते पाहू या.

सभापती महोदय, मुंबईमध्ये दुकाने आणि घरामये पोटमाळे रेग्युलर करण्याचा निर्णय 15 ऑगस्ट 1997 रोजी रात्री बारा वाजता स्वातंत्र्याच्या रौप्य वर्षाच्या निमित्ताने मुंबई महानगरपालिकेने घेतला. परंतु महाराष्ट्र शासनाने त्या निर्णयाला अद्याप मान्यता दिलेली नाही. मान्यता का दिली नाही, याबाबत मला काही माहीत नाही. स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने महानगरपालिका निर्णय करत असेल तर शासन त्यामध्ये का लक्ष घालत नाही ? या पोटमाळ्यामध्ये माणसे रहाताते, त्यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही काय ? मुंबईतील नाले सफाईचे काम बी.एम.सी.ने करावयाचे आहे. रेल्वेची जागा असेल त्या ठिकाणच्या नाले सफाईचे काम रेल्वेने करावे आणि रस्त्यावरील सफाईचे काम असेल असेल तर बांधकाम विभाग आणि एम.एम.आर.डी.अे.ने करायचे आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

डिफेन्सची जमीन असेल तर डिफेन्सची ती जबाबदारी आहे. एअरपोर्टची जागा असेल तर त्या ठिकाणी एअरपोर्टची जबाबदारी आहे. हे कोणतेही डिपार्टमेंट मुंबई महानगरपालिकेला भीक घालत नाहीत. ते नालेसफाई करीत नाहीत. पावसाळ्याच्या आत या गोष्ट करुन घेण्याचा अधिकार आपण मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना देणार आहात काय ? सभापती महोदया, विजेच्या बाबतीतील मुद्दा मी आता मांडत नाही. सभापती महोदया, आपण पार्ल्याला ज्या ठिकाणी राहता त्या ठिकाणी विमानाचे लँडींग सुरु केलेले आहे. याबाबत मुंबई वृत्तांतमध्ये सविस्तर माहिती आलेली आहे. त्या ठिकाणी एअरपोर्ट ॲथॉरिटीची जमीन आहे. त्या ठिकाणी कुर्ल्याच्या बाजूला जे लोक अनधिकृतपणे राहतात ते शांतपणे झोपणार परंतु जे कायदेशीररित्या टॅक्स भरुन, घर बांधून राहतात त्यांना विमानांच्या आवाजामुळे रात्री साडेअकरा वाजेपासून पहाटे साडेपाच वाजेपर्यंत जागे राहावे लागते. त्या ठिकाणचे सध्याचे लोकप्रतिनिधी सत्ताधारी पक्षाचे आहेत. त्यांचा दबाव असेल. फ्युएलचे कारण सांगितले जाते. सभापती महोदया, आपण त्या ठिकाणी राहता. दुरुस्ती वगैरे करावयाची असेल म्हणून त्या ठिकाणी 1432 क्रमांकाच्या रनवेचा वापर सुरु केला आहे. परंतु तो रनवे रोज वापरावयास लागले तर लोकांना त्रास होईल. एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या जागेवर राहणारे शांतपणे राहतील आणि जे टॅक्स भरणारे लोक आहेत त्यांना हा सर्व त्रास सहन करावा लागणार आहे. याबाबतीत शासनाने लक्ष घातले पाहिजे. मी या ठिकाणी एक एक करुन माझे मुद्दे मांडलेले आहेत. त्याबाबतीत माननीय मुख्यमंत्री ठोस उत्तर देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. विलास अवचट ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन असो किंवा अर्थसंकल्पीय अधिवेशन असो त्या प्रत्येक अधिवेशनामध्ये मुंबईचा प्रश्न चर्चेला येतो आणि सत्तारुढ पक्षाकडून त्याबाबत उत्तर मिळते. हा एक उपचार आणि सामोपचार झालेला आहे. दिनांक 15.4.2005 रोजी या सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दिले होते. उत्तर देत असताना त्यांनी जी आश्वासने दिली होती त्यातील पहिल्या आश्वासनामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, "महाराष्ट्रात आजपर्यंतचे कोणतेही बजेट काढून पहावे आणि मुंबईसाठी 1 हजार कोटी रुपयांची बजेटमध्ये तरतूद केल्याचे एखादे वर्ष आठवून सांगावे किंवा दाखवून द्यावे. परंतु हे पहिले वर्ष आहे की, बजेटमध्ये संपूर्ण मुंबईसाठी तब्बल 1 हजार कोटीची योजना केलेली आहे." मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, गेल्या वर्षी आपण 1 हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती तो खर्च आपण मुंबई शहराच्या कोणत्या विकास कामासाठी केला ? हे सांगितले तर बरे होईल. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी पुढे असेही सांगितले होते की, " केंद्र सरकारने या देशातील सहा महानगरांसाठी 5500 कोटीची तरतूद केलेली आहे. आता बाकीच्या राज्यांचे प्रस्ताव जातील. या सहा महानगरांचा त्या 5500 कोटीवर जरुर दावा होऊ शकतो. परंतु मुंबईचे प्रस्ताव केव्हाच दाखल होऊन गेले आहेत. प्रस्ताव तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे यासाठी बाकीच्यांना वेळ लागेल. यासाठी जागे राहून पहिल्याच वर्षी किमान 3000 कोटी रुपये महाराष्ट्रासाठी आणि या मुंबईसाठी खेचून आणावयाचे आणि अनेक प्रकल्प मार्गी लावावयाचे असे आमचे प्रयत्न राहतील." मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी 3000 कोटी रुपये आणण्याचे आश्वासन दिले होते त्यापैकी गेल्या आर्थिक वर्षात किती रक्कम प्राप्त झाली ? याची माहिती दिली तर बरे होईल.

सभापती महोदया, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी गेल्यावेळी दुसरे आश्वासन दिले होते की, "ज्या क्षेत्रामध्ये नव्याने झोपड्या होत आहेत त्या क्षेत्रातील नगरपालिकेचा वॉर्ड ऑफीसर, त्या क्षेत्रातील जिल्हाधिकारी आणि त्यांचे अधिकारी तसेच त्या क्षेत्रातील पोलीस अधिकाऱ्यांना सुध्दा झोपड्या नव्याने होत असताना जबाबदार धरण्याची भूमिका स्वीकारली जाईल." सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मघाशी उल्लेख केला. मी गेली तीन वर्षे सातत्याने हा विषय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. विलास अवचट ....

सभागृहात मांडत आहे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री सांगतात की, अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. गेली तीन वर्षे आपण या ठिकाणी आश्वासन देत आहात. या शहरातील किती वॉर्ड ऑफीसरवर त्यांच्या विभागामध्ये झोपड्या तयार झाल्या म्हणून जबाबदार धरुन कारवाई केली ? त्याचप्रमाणे त्या हद्दीतील पोलीस स्टेशनला जबाबदार धरुन किती वरिष्ठ पोलीस निरीक्षकांवर शासनाने कारवाई केली ? हे सांगणे आवश्यक आहे. सभापती महोदया, मुंबई शहरातील पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी तिसरे आश्वासन असे दिले होते की, " मुंबईच्या प्रामुख्याने ज्या समस्या आहेत त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या, रस्त्यांच्या समस्या, ड्रेनेजच्या समस्या, मलनि:सारणाची समस्या अशा समस्या आहेत. आज मुंबईच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आज मुंबईला एकंदरीत 4200 दशलक्ष लीटर पाणी उपलब्ध असले पाहिजे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलास अवचट पुढे सुरु...)

पण प्रत्यक्षात 3 हजार 50 दशलक्ष लिटर पाणी पुरविले जाते. म्हणजे 1100 दशलक्ष लिटरची तफावत आहे. मध्य वैतरणा प्रकल्प केला तर त्यासाठी 1800 कोटी रुपये खर्च येईल. जागतिक बँकेकडून, केंद्र सरकारकडून महानगरपालिकेला मदत करुन देण्याची भूमिका स्वीकारली गेली आहे. मला या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, शासन जरी केन्द्र सरकार किंवा जागतिक बँकेची मदत घेत असले तरी शासनाची जी थकबाकी महानगरपालिकेला द्यावयाची आहे ती जरी शासनाने दिली तरी महानगरपालिकेची बरीचशी कामे मार्गी लागतील. "महानगरपालिका मंत्रालयातील पाणी पुरवठा तोडणार" अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रातून येतात त्यावेळी मंत्रालयाचे हेड ऑफ डिपार्टमेंट म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, किमान महानगरपालिकेची थकबाकी जरी दिली गेली तरी महानगरपालिकेचे स्टॉर्म वॉटर ड्रेनचे प्रकल्प पूर्ण होतील. साडेबाराशे ते तेराशे कोटी रु.दिले गेले तरी त्यातून हे प्रकल्प मार्गी लागतील. झोपडपट्टीच्या विषयावर अनेक माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन योजना ही अधिका-यांच्या दृष्टीकोनातून झोपू योजना झालेली आहे. ही झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवित असताना माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी असे सांगितले की, "मी आज ठाम विश्वास व्यक्त करतो की, या पुढच्या काळामध्ये मुंबई शहरामध्ये एकही नवी झोपडी होता उपयोगाची नाही. या गोष्टीची शासनाच्यावतीने मी सदनामार्फत राज्यातील आणि मुंबई शहरातील तमाम जनतेला ग्वाही देतो. हे शक्य आहे. यंत्रणा नियंत्रणात ठेवल्या तर कशा काम करतात आणि ढिल्या सोडल्या तर किती मोकाट सुटतात याचा प्रदीर्घ नसला तरी थोडासा अनुभव मी घेत आहे."

सभापती महोदय, "झोपडपट्टीवासीयांची फसवणूक रोखा, खोटया सहीची तक्रार नोंदवणा-यासच अटक" अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या आहेत. सातरस्ता येथील महाराष्ट्रनगर को-ऑपरेटीव्ह सोसायटीतील रहिवाशांनी बिल्डरला दिलेल्या सहमतीपत्रावरील स्वाक्ष-या बनावट असल्याची, विकासकानेच खोट्या सह्या केल्याची तक्रार श्री. प्रकाश शेवडे यांनी पोलिसांकडे केली असता पोलिसांनी श्री. शेवडेवरच कारवाई करुन त्याला 15 दिवस पोलीस स्टेशनमध्ये डांबून ठेवले. अशा प्रकारे जर झोपडपट्टी पुनर्वसनाचा कार्यक्रम

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलास अवचट पुढे सुरु....)

राबविला जात असेल तर या कार्यक्रमाबाबत पुनर्विचार होणे आवश्यक आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांत विकासक नेमून दिलेल्या अटींची व तत्वांची पायमल्ली करीत असल्याचा आरोप मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष खासदार गुरुदास कामत यांनी मुख्यमंत्र्यांकडे केला आहे. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी असे म्हटलेले आहे की, "मुंबई शहर हे देशाच्या शीरपेचातील एक अमूल्य रत्न आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही, मुंबई हे एक जागतिक दर्जाचे शहर म्हणून गणले जावे अशी महत्वाकांक्षा बाळगून आम्ही वाटचाल सुरु केलेली आहे. मुंबईतील जनतेचा तसेच केंद्र शासनाचा यास मोठा पाठिंबा मिळत आहे ही प्रेरणादायी बात आहे." या निमित्ताने मला असे विचारावेसे वाटते की, देशाच्या एकूण कराच्या जवळपास 35 टक्के इतका कर एकट्या मुंबई शहरातून जात असताना या मुंबई शहराला केन्द्राने काय दिले ? मुंबईचा नागरिक प्रामाणिकपणे कर भरतोय, त्याला मात्र केन्द्राने अंगठा दाखविलेला आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. या मुंबई शहरातील पायाभूत सुविधांबाबत नेहमीच बोलले जाते. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरची 50वर्षे देशात आणि राज्यात कॉंग्रेसची सत्ता होती. इतकी वर्षे आपण केवळ पायाभूत सुविधांचा विचार करीत आलात. आता मुंबई शहराचा विकास हा राज्य सरकारनेच करणे आवश्यक आहे असे माननीय पंतप्रधानांनी स्पष्टपणे सांगितलेले आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी एक परिपत्रक काढलेले आहे. सारा-सहाराच्या भ्रष्टाचार प्रकरणी जे अधिकारी गुंतलेले आहेत त्यांच्यासाठी हे परिपत्रक काढलेले आहे की काय असे वाटते.

...नंतरश्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या परिपत्रकामुळे मुंबई घर दुरुस्ती मंडळ परिणामीत होणार आहे. 23.2.2006 रोजीच्या या परिपत्रकामध्ये असे म्हटले आहे की, "In case repair permissions are required to be considered keeping in view the protection of human life & avoiding loss of property, the department should approach Urban Development Department/Government of Maharashtra with proposed amendments to the relevant provisions of the MMC Act..." याचा अर्थ घरदुरुस्ती मंडळाचा कारभार महानगरपालिकेकडून नगरविकास खात्याकडे जाणार आहे. आतापर्यंतची प्रथा अशी होती की, घर दुरुस्ती मंडळाने प्रस्ताव सादर केल्यानंतर महानगरपालिका त्याला मान्यता देत होती. अशा प्रकारे जवळजवळ 35-40 आराखडे मंडळाने महानगरपालिकेला सादर केले होते आणि त्याला मान्यता दिली होती. आता नव्याने उफराटा न्याय मिळणार आहे. आता मंडळाकडील सगळे प्रस्ताव नगरविकास खात्याकडे जाणार आहेत. येऊ घातलेल्या पावसाळयाचा विचार करता घर दुरुस्ती मंडळाने फेब्रुवारी महिन्यामध्ये मुंबईतील इमारतींचा सर्व्हे केला आणि ज्या इमारती धोकादायक आहेत त्यांच्या बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. आता हे प्रस्ताव नगरविकास खात्याकडे जर जाणार असतील तर पुढच्या वर्षीच्या पावसाळयापर्यंत सुध्दा या इमारती दुरुस्त होणार नाहीत. माझी मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, महानगरपालिका आयुक्तांनी जे परिपत्रक काढले आहे त्याचा पुनर्विचार करुन ते मागे घेण्यात यावे. माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, शासनाने रंगभूमी आणि चित्रपटभूमीला भरभरुन अनुदान दिले आहे. हे अनुदान देत असताना नाटयसृष्टीतील जे कलाकार आहेत त्यांना शासन मानधन देत असते ते मानधन गेल्या दोन वर्षापासून मुंबईतील कलाकारांना मिळालेले नाही. मुंबई शहरातील हे मानधन वाटपाचे काम ठप्प झालेले आहे. सांस्कृतिक कार्य संचालक यांच्याकडे यासाठी जवळजवळ 200-250 अर्ज आले आहेत. याबाबत सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, या अर्जांची छाननी करण्यासाठी पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नियुक्त करावयाची असते त्या समितीची नियुक्ती झालेली नाही. जोपर्यंत या समितीची नियुक्ती होत नाही तोपर्यंत या अर्जांची छाननी होणार नाही आणि कलाकारांना मानधन मिळणार नाही. शासनाने रंगभूमी आणि चित्रपटभूमीला आर्थिक मदत करुन जिवदान दिले आहे. त्याचप्रमाणे नाटयसृष्टीतील कलाकारांना मानधन देण्यासाठी पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीची तात्काळ स्थापना करावी आणि या कलाकारांना मानधन द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. ........

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, भारताचे प्रवेशद्वार असलेली मुंबई ही जशी भारतातील लोकांचे आकर्षण आहे त्याचप्रमाणे परदेशी व्यक्तींचे सुध्दा एक आकर्षण आहे. आम्हांला मुंबईचा अभिमान वाटतो. माननीय पंतप्रधानांनी तर मुंबईकरांची तोंडभरुन स्तुती केली होती आणि उद्‌गार काढले होते की, " जब भी मैं इस महान शहरमें आता हूँ तो इस शहरके लोगोंके जोशो-खरोशसे चकित रह जाता हूँ ". जी ही असामान्य ऊर्जा मुंबईकरांकडे आहे ते वरदान की शाप आहे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. मुंबईकरांची कार्यशैली,अनुशासन,वेळेचे भान,शांत आणि मेहनती स्वभाव याचा आदर्श सर्व देशभरातील जनतेने घ्यावा. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 26 जुलै,2005 रोजी मुंबई शहरावर जे अस्मानी आणि सुलतानी संकट आले त्या संकटाच्या वेळी मुंबईकरांनी जो धीरोदात्तपणा दाखविला तोच आता दुर्गुण ठरणार की काय आणि इतका सोशिकपणा उपयोगाचा नाही असे आता वाटू लागले आहे. कारण मुंबईकडे कुणीही खास लक्ष देत नाही. मुंबई देशाची आद्योगिक आणि आर्थिक राजधानी म्हणून दबदबा होता. पश्चिम किनारपट्टीवरील हे एक महत्वाचे बंदर आहे. व्यापार उदीमाच्या दृष्टीने मुंबईला एक आगळ महत्व होते आणि मुंबईची विशेष लोकप्रियता होती. हे कॉस्मॉपॉलिटन शहर आहे. कोणत्याही क्षेत्रातील गुणवान आणि कर्तृत्ववान लोकांना मुंबईची मान्यता मिळाली की खरं चीज झाले असे वाटत होते. मुंबई विद्यापीठाच्या पदवीला एक आगळे महत्व आहे. पण आता हे सर्व केवळ कागदावरच राहिले आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ........

परप्रांतियांचे लोंढे, राज्यकर्त्यांची उदासीनता यामुळे मुंबई ही सोन्याचे अंडे देणारी कोंबडी असे आपण एके काळी म्हणत होतो परंतु आता हे शहर बकाल होत चालले आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. कारण या शहरात वाहतुकीपासून पाणीपुरवठयापर्यंत, राहण्याच्या जागेपासून जगण्यासाठी आवश्यक अशा सुविधापर्यत कोणत्याही सेवा-सुविधा सहजगत्या मिळत नाहीत. वाहतुकीचा प्रश्न तर बिकट आहेच. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत रेल्वे गाडयांमध्ये गर्दी कायम दिसून येते, कसे तरी लोंबकळत एका पायावर उभं राहून लोकांचा प्रवास सुरु असतो. किती अपघात होतात याची गणती नसते. एकदा कामासाठी बाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी हातीपायी धड येऊ शकेल की नाही याची खात्री नाही. अशा परिस्थितीत मेट्रो रेल्वेचा पर्याय कधी होणार ? याचा खुलासा करणे आवश्यक आहे. आपल्या मुंबईत आज परप्रांतीय लोंढे एवढया प्रमाणात येत आहेत की, कितीही उड्डाणपूल बांधले तरी अपुरेच पडतील. मुंबईत आलेल्या माणसाला उपाशी मरावं लागणार नाही, ही खात्री असल्यामुळे येथे उपजिविकेसाठी येतात, त्याचा अभिमान बाळगायचा की इथला मुंबईकर उद्ध्वस्त होत आहे याचं दु:ख करायचं ? निदान मुंबईत पाच वर्षे वास्तव्य झााल्याशिवाय नोकरी, रिक्षा अथवा टॅक्सीचे लाससेन्स द्यायचे नाही असा कायदा तरी करावा अशी माझी सूचना आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधी एक बैठक घेतली होती, त्यावेळी हा मुद्दा मी मांडला होता पण त्याबाबत अद्याप काहीही दिसत नाही. येथे येऊन एक वर्ष होत नाही ते लोक रिक्षा व टॅक्सी चालवितांना दिसतात अशा प्रकारे भ्रष्टाचाराने या मुंबईला पोखरलेले अधिकारी त्यातून पळवाटा शोधतात. अशी मुंबई आमच्या हयातीत पहायला मिळेल का ? की या शहरात विस्तीर्ण रस्ते, कडेला आलिशान दूमाली, चौकाचौकात आकर्षक कारंजी, विद्युत रोषणाई, वाहनं पादचाऱ्यांची वर्दळ पण गडबड गोंधळ नाही. भिकारी औषधालाही नाही. स्वच्छ पाण्यानी धुतलेले रस्ते, खाद्य पदार्थांचे ठराविक ठिकाणी असलेले स्टॉल्स, पदपथाचा उपयोग फेरीवाल्यांसाठी नाही तर पादचाऱ्यांसाठी. या मुंबईत 14 वर्षात झोपडपट्टया हलविण्याचा आराखडा, जो प्रश्न गत 45 वर्षांपासून सतावत आहे. लोकसंख्येत तिप्पट वाढ झाली तरीही त्याबाबत विचार झाला नाही. मुंबई व मुंबई उपनगर तसेच नवी मुंबई तरीही मुंबईचा कायापालट झाला नाही. झोपडपट्टयांना पुन्हा पुन्हा संरक्षण दिले जात आहे. उंच उंच इमारतींना परवानगी दिली जात आहे. अशा प्रकारे उंच मनोरे झाले तर मनोऱ्यातील माणसं खाली उतरतील व त्यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ........

चालण्यासाठी व वाहनांसाठी जागा तरी मिळणार आहे काय व पाण्याची सोय तरी कशी होणार आहे याचाही विचार झाला पाहिजे. मुंबईला राजकीय दर्जाचे शहर बनविण्याचा निर्धार माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून व्यक्त केला. परंतु ही मुंबई महाराष्ट्राची राजधानी आहे, हे काही दिवसांनी लोक विसरुन जाण्याची शक्यता आहे. मुंबईतला मराठी माणूस हळूहळू गायब होत चालला आहे, तीच गोष्ट मराठी शाळांची. इंग्रजी शाळांना गरज नसतांनाही शासन मान्यता देत आहे आणि गोरगरिबांना वाटते आपणही आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमात शिकवावे. मराठी माणूस, मराठी शाळा ही भविष्यात म्युझियममध्येच पहायला मिळेल की काय अशी भिती वाटायला लागली आहे. या मुंबई शहराचे शांघाय, अमेरिका अथवा आणखी काही व्हायचं ते होवो. पण सध्या हे शहर रोगग्रस्त झालेलं आहे हे तितकंच खरं आहे. तसेच मुंबईत झोपडपट्टी आहे की, झोपडपट्टीत मुंबई आहे असा प्रश्न सामान्य माणसाला आज पडतो आहे. यासंदर्भात शासनाने विचार करावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

--------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई शहरासंबंधी चर्चा करीत असतांना मुंबईच्या विविध प्रश्नांवर या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मुंबई वाढली म्हणजे तिचे प्रश्नही वाढतील हे जरी खरे असले तरी मागील दोन वर्षात शासनाने विशेषत: माननीय मुख्यमंत्र्यांनी जी भूमिका घेतली ती अभिनंदनास पात्र आहे. मुंबईसाठी केंद्रशासनाकडून विविध योजनांच्या माध्यमातून मदत मिळविणे, एमयुआयपी अथवा एमएसआरडीसीच्या माध्यमातून वेगवेगळया योजना राबविण्यासंबंधीचा निर्णय घेणे हे सर्व पाहिले तर मला खत्री आहे की, शासनाला या प्रयत्नांमध्ये यश मिळेल.....

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुझफ्फर हुसेन...

सभापती महोदय, मी एक मुद्दा येथे मांडू इच्छितो. मुंबई शहरामध्ये दररोज 15 हजार टन कचरा गोळा केला जातो. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. आज आपल्याला मुंबई शहरातील कचऱ्याची पूर्णपणे विल्हेवाट लावता येत नाही. मुंबईत गोळा होणाऱ्या कचऱ्याचा प्रश्न हा फार वर्षापासून प्रलंबित आहे. याला अनेकविध कारणे आहेत. सीआरझेडचे कारण असू शकेल. डंपिंग ग्राऊंडसाठी लोकांचा विरोध अशी अनेक कारणे असू शकतात. तरी सुध्दा मुंबईत गोळा करण्यात येणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे हे गरजेचे आहे. तेव्हा या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रीत करावे. कचऱ्यापासून खत निर्माण करण्यासाठी एखाद्या प्रकल्प उभा करणे आवश्यक आहे. माझ्या मते ऑर्गेनिक खत निर्माण करणे आवश्यक आहे. MUIP अंतर्गत रस्ते विकासाची कामे सुरू आहेत. औरंगाबाद एक्स्प्रेस-वेच्या रूंदीकरणाचे काम सुरू आहे. मीरा रोड, भाईंदर, विरार येथील लोक कामानिमित्त मुंबईसाठी येतात. या परिसराची एकूण लोकसंख्या अंदाजे 20 लाखाच्या आसपास आहे. या लोकांच्या आरोग्याच्या सोयीसाठी येथे मोठे रूग्णालय नाही. येथील लोकांना अंधेरी,विलेपार्ले व मुंबई शहरातील अन्य रूग्णालयांमध्ये धाव घ्यावी लागते. मुंबई-अहमदाबाद एक्स्प्रेस-वेचे रूंदीकरणाचे काम सुरू असल्यामुळे भाईंदर ते बोरिवलीपर्यंत येण्यासाठी तीन तास लागतात. तेव्हा याबाबीकडे देखील शासनाने लक्ष दिले पाहिजे. तेव्हा हा फ्री ट्राफिक वे राहण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत.

सभापती महोदय, मुंबईचा टरिझमच्या दृष्टीने देखील विचार करणे महत्त्वाचे आहे. चर्नीराड व जुहू येथील चौपाटीचा विकास करता येऊ शकेल. या बरोबरच मार्वे, गोराई येथीलच बीचचा टुरिझमच्या दृष्टीकोनातू विकास केला पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबईच्या गंभीर प्रश्नावर चर्चा सुरू असताना मी एका वेगळयावर माझे विचार मांडणार आहे. मी 'पाणी' या मुद्दावर विचार मांडणार आहे. मुंबईच्या पाणी पुरवठयाकडे सर्वांनी लक्ष देणे आवश्यक आहे. 25 वर्षानंतर मुंबईकरांना पाण्यासाठी कसे तोंड द्यावे लागेल याचा विचार करणे आवश्यक आहे. एक काळ असा होता की, मुंबई शहरातील रस्ते हायड्रोनमधील पाणी काढून महानगरपालिका रस्ते धुवून काढत होती. आज मुंबई शहराची अवस्था काय आहे ? आज मुंबई शहराचे गलिच्छवस्तीमध्ये रूपांतर झाले आहे. सन 1854 मध्ये मुंबईमध्ये दुष्काळ पडल्यामुळे पाण्याचा मुद्दा डोक्यावर घेतला होता. त्याचा परिणाम एवढा झाला की यात मार्ग काढण्यासाठी द्विसदस्यीय समिती नेमण्यात आली. या समितीने केलेल्या शिफारशीचा गांभीर्याने विचार करून मुंबई महापालिकेने 1856 मध्ये विहार तलाव बांधण्याचा निर्णय घेतला. तद्नंतर 1860 साली 32 इंच व्यासाची 32 दशलक्ष लिटर इतके पाणी वाहून नेण्याची क्षमता असलेली पाईप लाईन मुंबईत टाकली. यानंतर 1872 मध्ये 67 दशलक्ष लिटर इतके पाणी वाहून नेण्याची क्षमता असलेली पाईल लाईन टाकली. अशाप्रकारे तेव्हा मुंबईत पाणी पुरवठा सुरू झाला. सन 1860 साली मुंबई शहराची लोकसंख्या 7 लाख होती.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ KGS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 18:00

श्री.अरविंद सावंत....

आज ती लोकसंख्या सव्वा कोटींवर गेली आहे. परंतु ही लोकसंख्या केवळ स्थित लोकांची आहे. नवी मुंबई, पनवेल, रायगड, कल्याण येथील लोकांचा त्यामध्ये समावेश नाही. या लोकांचा विचार केला तर 2 कोटी नागरिक मुंबईतील पाण्याचा वापर करीत आहेत. 1856 साली लॉर्ड एल्फिन्सटन यांनी विहार लेक बांधला. 1872 च्या दरम्यान तुलसी तलाव झाला. 1889 मध्ये पवई तलाव, 1892 मध्ये तानसा तलाव झाला. तानसा तलावाची क्षमता 77 दशलक्ष लीटर इतकी होती. 1916 मध्ये या तलावाची क्षमता दुप्पट केली गेली आणि त्यावेळी 82 दशलक्ष लीटर पाणी पुरवठा केला जाई. 1919 मध्ये मात्र ही क्षमता तिप्पट म्हणजेच 133 दशलक्ष लीटर करण्यात आली. अशा प्रकारे दिवसेंदिवस वाढणारी पाण्याची गरज पाहता वैतरणा धरण केले गेले. आज मुंबईला 3026 दशलक्ष लीटर पाण्याची गरज असताना, प्रत्यक्षात केवळ 2474 दशलक्ष लीटर पाणी मिळते. मुंबई शहराची वाढती लोकसंख्या आणि व्याप विचारात घेता 10-20 वर्षांमध्ये 8 हजार दशलक्ष लीटर पाणी लागेल असा अंदाज आहे. यासाठी आपल्याकडे काय व्यवस्था आहे ? पाण्याच्या बाबतीत काय नियोजन आहे ? मुंबईचा विचार करीत असताना पुढील काळातील पाण्याची गरज सुध्दा आपल्याला पूर्ण करावी लागणार आहे.

पाण्याची गरज भागविण्यासाठी बारवी, मोरबे, हेटवणे प्रकल्प केले गेले. त्याच प्रमाणे पिंजाळ, मध्य वैतरणा, पिंजल, काळू, शाई ही धरणे भावी काळात पूर्ण करण्याचे निश्चित केले होते. या धरणांची कामे सुध्दा टप्प्याटप्प्याने करावी लागणार आहेत. जलाशयनिर्मिती, जलाशयस्त्रोत, पाणी पुरवठा वहनासाठी 2244 कोटी रुपयांची गरज आहे. आपण ही कामे कालबध्दपणे करणार की नाही ? श्री.माधवराव चितळे यांच्या समितीने 1994 मध्ये शासनाला अहवाल सादर केला. परंतु त्या अहवालाच्या अनुषंगाने फारशी कार्यवाही होते असे नाही. त्यांनी केलेल्या सूचनांचे पालन होताना दिसत नाही.

जोखीम व्यवस्थापन या मुद्यांतर्गत श्री.माधवराव चितळे यांनी सांगितले की, "बृहन्मुंबईच्या पाणी पुरवठा यंत्रणेमध्ये मुख्यत: मोठे संचयी जलाशय, लांब वहन नळमार्ग, पंपिंग केंद्रांसह मोठी संस्करण संयंत्रे आणि प्रचंड वाटप जाळे यांचा समावेश असून, नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा घातपाती कृत्यांमुळे या यंत्रणेला सहज धोका पोहोचू शकतो. अभूतपूर्व पूर किंवा भूकंप या स्वरुपात नैसर्गिक आपत्ती ओढवू शकतो. नळमार्ग अचानक फुटण्याची शक्यता असते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ KGS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 18:00

श्री.अरविंद सावंत....

महोदय, आपणही त्या रस्त्याने येता. तेथील नळजोडणी आपण अवश्य पहा. आपल्याला वस्तुस्थिती निदर्शनास येईल. त्या ठिकाणी जलवाहिन्यांच्या संरक्षणासाठी कसल्याही प्रकारची व्यवस्था नाही. त्या ठिकाणी जर संरक्षण व्यवस्था करण्यात आली नाही तर, भावी काळात मुंबईला एक थेंब सुध्दा पाणी मिळणार नाही अशी परिस्थिती उद्‌भवू शकेल असे मला वाटते. मुंबईच्या आजूबाजूने पाणी आहे. परंतु स्वत:चे असे जलस्त्रोत मात्र नाही. 50-100 कि.मी. अंतरावरुन पाणी वाहून आणावे लागते.

महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये अनधिकृत बांधकामाबद्दल जोरदार निदेश दिले गेले होते. मी आपल्याला भिवंडी येथील उदाहरण देऊ इच्छितो. वर्तमानपत्रामध्ये "मुंबईला पाणी पुरविणाऱ्या जलवाहिन्यांना धोका" अशा मथळयाखाली वृत्त छापून आले होते. त्यामध्ये असे म्हटले होते की, नियम धाब्यावर बसवून भिवंडीत बांधलेल्या रसायनांच्या अनधिकृत गोदामांमध्ये स्फोट होऊन अग्निकल्लोळ होत असतानाच या गोदामांमुळे आणखी एक धोका समोर आला आहे. मुंबई वासियांना पाणी पुरवठा करणाऱ्या महाकाय जलवाहिन्या या गोदाम परिसरातूनच जात असल्यामुळे वारंवार होणाऱ्या स्फोटांमुळे या जलवाहिन्या उध्वस्त होऊन मोठी आर्थिक व जीवित हानी होण्याची भिती आहे. शहापूर तालुक्यातील भातसा, तानसा, वैतरणा या धरणांतून मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या भिवंडी लगतच्या पूर्णा, दापोडा, काल्हेर, कशेळी गावच्या हद्दीतून जातात, संपूर्ण भाग गोदामपट्टी म्हणून परिचित आहे. या परिसरात अनधिकृत-अधिकृत अशी हजारो गोदामे उभी आहेत. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडून परवानगी देताना शासकीय अटी व शर्तींचे उल्लंघन करुन जलवाहिन्यांपासून 30 मीटरच्या आत ही बांधकामे करण्यात आली आहेत. या बेकायदेशीर बांधकामांकडे महसूल खाते आणि मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा खात्याने दुर्लक्ष केले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.कांबळे....

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, जलवाहिन्यालगत असलेली बेकायदेशीर बांधकामे वाढत आहेत. गेल्या काही दिवसांपासून बेकायदेशीर रसायन साठ्यांना लागणाऱ्या आगीमुळे ज्वलनशील रसायनांनी भरलेले ड्रम्स 200-250 फूट उंच उडून मोठे स्फोट होताना दिसून येत आहेत. सभापती महोदय, मी आपल्याला जी बातमी सांगत आहे, ती मार्चमध्ये आलेली बातमी आहे. या बातमीमध्ये पुढे असेही म्हटले आहे की, " गेल्या 15 दिवसांत राहनाळ येथील विशाल कम्पाऊंड तर पूर्णा येथील द्रौपदी-छाया कम्पाऊंडमधील 54 गोदामांसह 10 झोपड्या जळाल्या. या रसायनांनी भरलेल्या ड्रम्सचा स्फोट होऊन परिसरातील इमारती व घरांना तडे गेले आहेत. अशाप्रकारच्या जलवाहिन्या लगतच्या गोदामांना आगी लागल्यास मोठी होनी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. " सभापती महोदय, मुंबईसारख्या राज्यात जर अशाप्रकारे आग लागली तर किती भयावह हानी होईल, याची आपल्याला कल्पना आहे का ? दीड कोटी लोकसंख्या असलेल्या राज्यात जर असे झ ाले तर भयावह परिस्थिती निर्माण होईल. धरणांची तपासणी या आवश्यक कामासाठी धरण सुरक्षा संघटनेवर अवलंबून राहण्यापेक्षा बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपली स्वत:ची धरण सुरक्षा उप शाखा निर्माण करावी, अशी आपणास सूचना करण्यात आली होती. आपण असे केले का ? सभापती महोदय, सगळ्या जलवाहिन्या असुरक्षित आहेत, उघड्या आहेत. त्या ठिकाणी झोपडपट्टींची वसाहत आहे. त्या ठिकाणी अशा परिस्थितीमुळे कोणीही घातपात करु शकतो. सभापती महोदय, या ठिकाणी अनेक महत्वाचे मुद्दे आहेत. मुंबईची ग्रस्ट्रोची साथ येण्याचे मुख्य कारण म्हणजे सर्व नळजोडण्या उघड्या आहेत. गटारातून नळजोडण्या जात आहेत, त्या नळजोडण्या दुरुस्त झालेल्या नाहीत. मुंबई शहरामध्ये वॉटर थेफ्ट, लिकेजेस, कॉन्टामिनेशनचे प्रकार चालू आहेत. मुंबईमध्ये कॉन्टामिनेशनच्या 272 तक्रारी, इललिगल कनेक्शनच्या 372 तक्रारी, लिकेजेसच्या 2637 तक्रारी आहेत. माझ्याजवळ विभागनिहाय सर्व माहिती आहे. तरी, सभापती महोदय, आपण यासंबंधी निर्देश द्यावेत. शासन याकडे पाहणार आहे की नाही ? म्हणून मुंबईला जल व्यवस्थापनाची गरज आहे. सभापती महोदय, पाण्याचे संरक्षण करण्याबाबत काही शिफारशी आहेत, त्या म्हणजे, बाष्पीभवन नियंत्रण, जलाशयाभोवती झाडे, गळती शोध,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

औद्योगिक सांडपाण्याचे पुनर्चक्रण व फेरवापर, घरातील सांडपाण्याचे संस्करण व फेरवापर, पाणी क्षाररहित करुन त्याचा फेरवापर. तरी, सभापती महोदय, यांचा जरुर विचार केला पाहिजे तरच मुंबईतील जनतेला सुरक्षित असे पाणी मिळेल. सभापती महोदय, याकरिता वेगळी मध्यवर्ती जल व्यवस्थापन यंत्रणा उभारावी लागेल. पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी देखील या ठिकाणी पाण्याविषयीचे अनेक प्रश्न सांगितले. सभापती महोदय, पाण्याची दुरावस्था झालेली आहे. काही काळापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील सांगितले होते की, यानंतर पाण्यासाठी यादवी युध्द सुरु होईल. सभापती महोदय, एम.यु.टी.पी. व एम.एम.आर.डी.ए. या दोन संस्था विकासाचे काम करत आहेत. परंतु आज अशी परिस्थिती झालेली आहे की, सन 1995 सालच्या झोपड्यांना घरे मिळत आहेत आणि सन 2005 सालच्या झोपड्यांनाही घरे मिळत आहेत. तरी, ही कामे करत असताना या संदर्भात पाणीपुरवठा संस्था, वीज वितरण संस्था उदाहरणार्थ बेस्ट, एम.एस.ई.बी., रिलायन्स यांना विश्वासात घेण्याची गरज आहे. सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए. रस्ते खोदायला सुरुवात करते, त्यावेळी पाईप्सचे कनेक्शन तोडते, टेलिफोन केबल्स तोडते. त्यामुळे नागरिकांना त्रास होतो. तरी, या संदर्भात माझी सूचना आहे की, एस.एम.आर.डी.ए..ने सर्वांची एक मॅन्डेटरी, सामाईक बैठक घ्यायला पाहिजे. त्यांनी घेतलेले काम संबंधितांना कळविले पाहिजे. सभापती महोदय, मिठी नदीसंदर्भात देखील अनेक प्रश्न आहेत. सभापती महोदय, कुर्ल्यातील संदेश नगर, सुरेश नगर, बैलबाजार येथे वसाहत आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

कुर्ला येथे बैलबाजार ही वसाहत आहे, तेथील जनगणनेमध्ये 564 लोकांची नावे आहेत, परंतु तेथील 316 लोकांनाच फक्त पर्यायी घरे देण्यासाठी पात्र ठरविण्यात आले असून 242 लोकांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे. आपण त्यांना घराच्या बदल्यात घरच देत आहोत, हे सर्व निवासी लोक आहेत जनगणनेच्या पुरवणी यादीमध्ये त्यांची नावे आहेत, तेथील लोक 1995 च्या अगोदर पासून राहत आहेत, तेथील वस्ती ही 90 टक्के मराठी माणसांची आहे. तेथील मतदार संघातील लोकप्रतिनिधी त्यांना सांगत आहेत की, पैसा द्या आम्ही तुम्हाला पात्र करुन देतो. तेथील लोक हे मूळ झोपडपट्टी मालक आहेत, भाडेकरु आहेत, ज्यांची घरे आहेत त्यांना ती मिळाली पाहिजेत, अपात्र लोकांना घरे द्यावीत असे माझे म्हणणे नाही, 1995 नंतरच्या लोकांना आपण पात्र करु नका. व तेथील मूळ माणसांना आपण रस्त्यांवर आणू नका ? 90 टक्के ही मराठी माणसे असल्यामुळे याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----------------

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई आणि सर्व शहरामधील आमचे जे सहकारी आहेत त्यांच्याकडून काही अपेक्षा होत्या. मुंबई ही महाराष्ट्रामध्ये आहे, संपूर्ण ग्रामीण भागामध्ये 12 ते 14 तास वीज बंद असते, परंतु मुंबई शहरामध्ये जो झ ागमगाट चालू आहे, त्यामध्ये मग सांस्कृतिक कार्यक्रम असो, निरनिराळे कार्यक्रम असो तेथे विजेचा मोठया प्रमाणात झगमगाट चालू असतो. अशा ठिकाणी जास्तीत जास्त वीज वापरण्यात येते. मुंबईमध्ये जर आपण विजेचे रेशनिंग करुन वाटप केले तर वीज वाचवून आपणाला ग्रामीण भागासाठी ती देता येईल, अशी माझी सूचना आहे या सूचनेचा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विचार करावा अशी माझी विनंती आहे.

--------------

.......3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, मुंबईच्या प्रश्नावर चर्चा होत आहे, मुंबई शहर जागतिक दर्जाचे करण्याचा प्रयत्न करीत असतांना आजच्या वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आलेली आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, मुंबई शहर हे कोलंबो व ढाका शहराच्या जागतिक क्रमवारीमध्ये मागे गेलेले आहे, अशी परिस्थिती आज मुंबईची झालेली आहे. आपण मुंबई शहराचा विकास करण्यासाठी 11 हजार कोटी रुपयांची मागणी केंद्र शासनाकडे केलेली आहे. परंतु त्यातील एकही पैसा आपणास अजून मिळालेला नाही. मुंबई शहराची आज मोठी दुर्दशा झालेली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मुंबईमध्ये वाढत चाललेली लोकसंख्या हे आहे. मुंबईमध्ये शासकीय यंत्रणा कशा प्रकारे काम करीत आहे. मोठया प्रमाणात झोपडपट्टी वसविण्यात येत आहे. परवा माझ्याकडे माहिम-सायन येथील 121 प्रकल्पग्रस्त लोक आले होते, त्यांना माहिम येथून हुसकावून लावण्यात आलेले आहे. शासनाने प्रकल्पग्रस्तांना जागा दिलेल्या नाहीत. या सगळया लोकांची यादी तयार करण्यात आलेली आहे, 1994 सालापासून मतदार यादीमध्ये त्यांची नावे आहेत, आता या 121 लोकांची पुरवणी मतदार यादी तयार करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. परब ....

त्यांचे 1995 च्या मतदार यादीमध्ये नाव नव्हते. 1995 च्या जनगणनेमध्ये देखील त्यांचे नाव नव्हते. 1996 साली, 1997 साली मुंबई महापालिकेने हे प्लॉट निष्कासित केले, प्लॉटस् पूर्ण मोकळे केले, त्याचे फोटो, याद्या देखील आताही माझ्याकडे आहेत. माझ्याकडे कलेक्टरांचे, महापालिकेचे पत्र आहे की, हे पूर्ण प्लॉटस् निष्कासित केलेले आहेत. तेथे कोणतीही झोपडपट्टी नाही. परंतु तरीही 1994 च्या मतदार यादीमध्ये त्या सगळ्यांची नावे आहेत आणि 1996 साली त्या झोपड्या स्लम म्हणून जाहीर झाल्या. इतकेच नाही तर त्या सगळ्या लोकांची नावे त्यात आली. अशा प्रकारे वेगवेगळ्या पद्धतीने, पद्धतशीररित्या झोपडपट्ट्या वसविल्या जातात त्याचेच हे जीवंत उदाहरण आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या मार्गांनी शासकीय यंत्रणांना हाताशी धरून झोपडपट्टी वसविली केली आणि 21 च्या जागी 2141 लोकांची यादी तयार केली. त्यामुळे मग त्या सर्व लोकांना रेशनिंग कार्डच नव्हे तर अगदी निवडणूक कार्ड देखील मिळाले. सभापती महोदय, मुंबईमध्ये अशा प्रकारे सगळीकडे झोपडपट्ट्या वसविल्या गेल्या आहेत, जात आहेत.ण मध्यंतरी महाराष्ट्र सरकारचे 300 भूखंड महापालिकेने मोकळे केले. ते करताना 30 कोटी रूपये महापालिकेने खर्च केले. त्यामध्ये म्हाडाचे 36 भूखंड होते. त्यामध्ये जवळ जवळ 10 कोटी रूपये सुरक्षा रक्षकांवर, शस्त्रधारी आणि विनाशस्त्र असलेले सुरक्षा रक्षक देखील होते ...

( वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते. )

सभापती महोदय, मी एक नवीन सदस्य आहे शिवाय मी केव्हाही बोलत नाही. तेव्हा आपण मला या चर्चेमध्ये बोलण्यासाठी थोडा अधिक वेळ द्यावा अशी विनंती आहे, कृपया आपण मला संरक्षण द्यावे. सभापती महोदय, हे जे म्हाडाचे भूखंड होते त्यासाठी 10 कोटी 48 लाख रूपये केवळ सुरक्षा रक्षक एजन्सींना देण्यात आले आहेत. परंतु या भूखंडांवर एवढे पैसे खर्च करूनही आज त्या सर्वच भूखंडांवर अतिक्रमण झालेले आहे. म्हणजे एक प्रकारे सगळ्या बाजुंनी शासकीय यंत्रणा विकत घेऊन सगळ्या यंत्रणा पोखरून, नाही तरी आज पूर्णपणे म्हाडा दलालांच्याच ताब्यात आहे आणि 'झोपु' योजना झाली तिच्या माध्यमातून मी एकच मागणी करतो आहे की, 1995 साली जे कोणी मुंबईच्या बाहेरून या मुंबईत आले, ज्यांचा मुंबईशी संबंध नाही ती माणसे मुंबईमध्ये येतात, झोपड्या बांधतात आणि 10 वर्षामध्ये त्यांना स्वतःचे हक्काचे घर मिळते. परंतु 30-30 वर्षे शासनाची नोकरी करणारे, प्रसंगी सेवेमध्ये असताना स्वतःच्या प्राणाचे बलिदान देणारे असे जे

..... 4डी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. परब ....

आपले शासकीय सेवक आहेत, पोलीस आहेत त्यांना ते निवृत्त झाले तर मग कोठे तरी वसई, विरार, डोंबिवली, अंबरनाथ येथे निवाऱ्यासाठी जावे लागते. आज मुंबईमध्ये मोठमोठे शासकीय भूखंड आहेत, त्यावर शासकीय वसाहती आहेत आणि आता त्या पाडून पुन्हा एकदा पुनर्वसन होणार आहे असे कळते. मी या निमित्ताने विनंती करीन की, ज्या ज्या शासकीय सेवकांनी आपले सारे आयुष्य शासनाच्या सेवेत घालविले आहे, प्रामाणिकपणे शासनाची सेवा केली आहे त्यांना आपण या मुंबईत घर मिळवून दिले पाहिजे. मुंबईत 10 वर्षापूर्वी येणारा माणूस 10 वर्षानंतर किमान 225 चौ.फूटाचे घर मिळवू शकतो तर ज्यांनी 30-30 वर्षे शासनाची सेवा केला आहे ते निवृत्त होतात तेव्हा त्यांना आपण पक्के घर, शासनातर्फे फुकट दिले तरी काही हरकत नाही. कारण उपऱ्यांना जर आपण देता तर या आपल्याच माणसांना आपण का देऊ नये ? एवढे बोलून मी भाषण संपवितो. धन्यवाद.

**सभापती** : यानंतर माननीय मुख्यमंत्री उत्तराचे भाषण करतील.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, आपण मला देखील या चर्चेत भाग घेण्याची संधी द्यावी. मुंबईच्या प्रश्नांसंबंधातील या चर्चेमध्ये मुंबईतील जो मूळचा मच्छिमार समाज आहे, मुंबईतील कोळीवाडे आहेत त्या संबंधात कोणीही सदस्य बोलले नाहीत, तेव्हा मला त्यावर बोलण्याची तरी आपण संधी द्यावी ही विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला वेळेचे बंधन हे पाळले पाहिजे. आपण या अगोदरच आपले नाव द्यावयास पाहिजे होते किंवा आपले मुद्दे आपल्या सहकाऱ्यांकडे देऊन त्यांच्या मार्फत येथे विषय मांडावयास पाहिजे होता. शेवटी माझा नाईलाज आहे, मी आपल्याला बोलण्याची परवानगी वेळेअभावी देऊ शकत नाही. आपण कृपया खाली बसावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....... 4डी 3 .....

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, विरोधी पक्षनेता माननीय श्री. फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी एका अतिशय महत्त्वाच्या विषयावर या सदनामध्ये चर्चा उपस्थित केली आहे. मुंबई शहर आणि त्या शहराचे अक्राळ विक्राळ स्वरूप, त्या शहराच्या विविध समस्या आणि त्या समस्या सोडविण्यासाठी म्हणून काही उपयुक्त सूचना देखील या चर्चेतून येथे करण्यात आलेल्या आहेत. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 4इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

मला आनंद होत आहे की, या चर्चेमध्ये या सदनातील जवळपास 10 ते 12 माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपले विचार व्यक्त केले आहेत. तसेच, मर्यादीत वेळेमुळे काही माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घेण्याची इच्छा असतांनाही आपले विचार मांडता आले नाहीत त्यांनी आपल्या सूचना लेखी स्वरुपामध्ये माझ्याकडे सादर कराव्यात...

**सभापती** : या चर्चेकरीता अडीच तासाचा कालावधी असतांनाही साडे तीन तास होऊन गेले आहेत.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, कोळीवाडा आणि तेथील गावठाणाच्या प्रश्नासाठी बैठक घ्यावी अशी गेल्या दोन वर्षापासून आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी करीत आहोत.

श्री. विलासराव देशमुख : कोळीवाडयाच्या प्रश्नासंबंधी आपण मला नंतर भेटावे. सभापती महोदय, एक गोष्ट सर्वांनी मान्य केली आहे की, आज मुंबई शहराची जी अवस्था निर्माण झाली आहे ती निर्माण करण्यामध्ये कमी अधिक प्रमाणामध्ये सर्वांचा हातभार लागला आहे. त्यामध्ये आमचा हातभार अधिक असेल. परंतु आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, इथून पुढे हे शहर अधिक ओझे घेण्याच्या स्थितीमध्ये नाही. या शहराची रचना तिन्ही बाजूनी पाणी असल्यामुळे एखाद्या बेटाचे स्वरुप असलेली आहे. त्यामुळे त्याच्या अधिक विस्ताराची शक्यता नाही. आणि आता अतिक्रमण करण्यासाठी सुध्दा जागा शिल्लक राहिलेली नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे. या शहरामध्ये जिथे नजर जाईल त्या ठिकाणी झोपडया बघायला मिळत आहेत. आजची या शहराची लोकसंख्या 1 कोटी 19 लाख झाली आहे. या शहराच्या समस्येसाठी जागरुकपणे काही काम करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. जशी आज याठिकाणी पक्षभेद विसरुन सर्वांनी एकत्रितपणे चर्चा केली व काही सूचना केल्या. ही चर्चा करतांना कोणताही पक्षीय अभिनिवेश नव्हता त्या प्रमाणे एकत्रितपणे या प्रश्नासंबंधी विचार होऊन या शहराच्या विकासासाठी काही मार्ग सुचवावा अशाप्रकारची भावना मांडली गेली.

सभापती महोदय, सन 2002 मध्ये महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर समीट मुंबईमध्ये आयोजित केला होता. त्यामध्ये या शहराशी संबंधित असलेल्या काही तज्ज्ञ व्यक्तींना एकत्रितरित्या बोलाविले होते. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबई शहरातील इन्फ्रास्ट्रक्चरच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. आणि त्यामध्ये या मुंबई शहरासाठी एक एम.यू.आय.पी. चा कार्यक्रम जाहीर केला. या शहरामध्ये पायाभूत सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत. एका बाजूला जागतिक बँकेच्या सहकार्याने एम.यू.टी.पी. चा कार्यक्रम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

हातामध्ये घेतला आहे. त्याला जोडून एम.यू.आय.पी. चा कार्यक्रम हातामध्ये घेतला आहे. या कार्यक्रमामध्ये मोठया प्रमाणात रस्त्यांचे जाळे निर्माण झाले पाहिजेत, रस्ते रुंद झाले पाहिजेत, अतिक्रमणे कमी करता आली पाहिजेत, झोपडपट्टयांचा विळखा पडला आहे तो कसा कमी करता येईल यासंबंधी चर्चा केली. शासनाने या राज्यामध्ये पहिल्यांदा कायदा करतांना 1.1.1995 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देणे व त्यापुढील काळात झोपडया होणार नाहीत अशाप्रकारची काळजी घेण्यासंबंधीची भूमिका घेतली. परंतु मधल्या काळामध्ये आमच्या आघाडीच्या वतीने जाहीरनामा जाहीर प्रसिध्द करण्यात आला. त्यामध्ये सन 2000 सालापर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देण्याची भाषा नमूद करण्यात आली. त्यामुळे या कामामध्ये थोडीशी मर्यादा आली. परंतु या सर्व गोष्टी पाहिल्यानंतर असे दिसते की, सन 2000 पासून 2006 पर्यंत मुंबईमध्ये अधिक गतीने झोपडया वाढत आहेत. दररोज 300 कुटुंबे या शहरामध्ये प्रवेश करीत असल्यामुळे ही समस्या वाढत चालली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरु...

त्यामुळे ही समस्या वाढतच चाललेली आहे. म्हणून निर्णय केलेला आहे की, वॉर्ड ऑफीसर असतील, त्या ठिकाणचे पोलीस उप निरीक्षक असतील त्यांना माहिती असल्याशिवाय नव्याने झोपडी बांधली जाणे ही गोष्ट आपण मान्य करु शकत नाही. म्हणून त्यांना काही तरी माहिती असणार, त्यांचे कोठे तरी लागेबांधे असणार. हे समजून घेण्यासाठी वेगळ्या पुराव्याची आवश्यकता नाही. म्हणून आयुक्तांना आदेश दिलेले आहेत की,एखाद्या वॉर्डमध्ये नवी झोपडी बांधण्याचे काम सुरु असेल तर ती ताबडतोबीने निष्कासित केली पाहिजे आणि शेवटी वॉर्ड ऑफीसरवर ॲक्शन घेतली पाहिजे तसेच पोलीस अधिकाऱ्यावर ॲक्शन घेतली पाहिजे. नव्याने मुंबईमध्ये येणाऱ्या लोकांना थांबविणे कठीण आहे. परंतु निदान आपण कठोर हाताने अनधिकृत बांधकाम थांबवू शकलो तर खूप प्रश्न आपण सोडवू शकू, असे मला स्वत:ला वाटते. या दृष्टीने कठोर निर्णय घेण्याच्या संदर्भाची भूमिका आपण स्वीकारलेली आहे. त्या भूमिकेला आपल्याकडून साथ मिळेल, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनी खूप चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी देखील मुंबई शहराच्या दृष्टीने चांगल्या सूचना केल्या. मुंबईच्या प्रश्नाच्या संदर्भात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी कोणतेही राजकारण न आणता या शहराचे हित लक्षात घेऊन काही सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मुंबई ही आता एका ठिकाणी नसून विखुरलेली आहे. यावर मुंबई महानगरपालिका संपूर्ण नियंत्रण करु शकेल काय ? असा मुद्दा मांडला. यावर तात्काळ निर्णय घेणे शक्य नाही, परंतु चर्चेला त्यांनी विषय दिलेला आहे. तीन महानगरपालिकांमध्ये याचे विभाजन झाले पाहिजे, अशी सूचना त्यांनी आपल्या भाषणात केलेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात संपूर्ण डिबेट व्हावे, केव्हातरी या संदर्भात निर्णय व्हावा, अशाप्रकारची त्यांनी आपल्या भाषणामध्ये अपेक्षा व्यक्त केलेली आहे. त्यांनी दुसरा महत्वाचा प्रश्न मांडलेला आहे. त्या संदर्भामध्ये मी आश्वस्त करु इच्छितो की, मुंबई शहरामध्ये फूटपाथ आहेत, त्या ठिकाणी झोपडपट्ट्या व्यापलेल्या आहेत. म्हणून पहिला निर्णय घ्यावा लागेल की, 2000 पर्यन्तच्या झोपड्यांचे पुनर्वसन करावे लागेल. त्यांना बाजूला टाकून देता येणार नाही. या संदर्भात पहिला कार्यक्रम हा जेवढ्या म्हणून फूटपाथवर झोपड्या आहेत, त्या हटवून पादचारी मार्ग खुला करणे याला प्राधान्य देणे. दोन-तीन वर्षामध्ये सगळया फुथपाथवरील झोपड्यांचे पुनर्वसन करुन फूटपाथ लोकांसाठी मोकळे करण्याचे काम प्राधान्याने हातामध्ये घेतले जाईल,हे आपल्याला सांगितले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.विलासराव देशमुख (पुढे सुरु...

पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांसारखे विरोधी पक्षाचे नेते असतील तर सरकारला काम करायला सोयीचे होते. यापेक्षाही ते एक पाऊल पुढे आहेत. मी हे भीत,भीत बोलतो. असा काही निर्णय घेतला तर चर्चा होईल काय ? असा विचार आम्ही करतो त्यामुळे काहीच करत नाही, अशी अवस्था आहे. त्यांच्या सारख्यांनी आम्हाला मोठी साथ दिली तर मला वाटते की, निर्णय घेण्यासाठी खूप शक्ती मिळेल. एखाद्या गोष्टीचा निर्णय घेत असतांना विरोधी पक्षाला काय वाटेल, पत्रकारांना काय वाटेल, तिसरे कोर्टामध्ये प्रकरण गेले तर घेतलेला निर्णय टिकेल काय ?....

श्री.नितीन गडकरी (बसून) : आजच कोर्टाने एक निर्णय दिलेला आहे.

श्री.विलासराव देशमुख : मी अजून सदनाच्या बाहेर गेलेलो नाही. त्यामुळे सदनाच्या बाहेर काय घडले, याची माझ्याकडे माहिती नाही. मी सांगू इच्छितो की, कोर्टामध्ये निर्णय टिकेल काय ? याची चर्चा करण्यामध्येच पुष्कळ वेळ जातो.

यानंतर श्री.बरवड......

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ......

एखादा निर्णय घेतला तर विरोधी पक्ष काय प्रतिक्रिया देतील ? पुढे त्याचे राजकारण होईल काय ? याची काळजी असते. पत्रकार तो प्रश्न कोणत्या पध्दतीने स्वीकारतील ? अशा पध्दतीच्या प्लस मायनस गोष्टी बघून या तीन बाजूचा विचार करुन आमचे निर्णय होत असतात. मला असे वाटते की, मुंबईच्या प्रश्नांच्या संदर्भात जेवढे निर्णय आम्ही करु त्या निर्णयामध्ये विरोधी पक्ष आमच्या सोबत नक्की राहणार आहे. त्यामुळे आमच्या निर्णयप्रक्रियेला गती येईल एवढे मी सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना केल्या. विशेषत: रेल्वेचे जे ओव्हर ब्रिजेस आहेत त्याबाबतीत आपण अतिशय चांगली सूचना केलेली आहे. 30-40 ठिकाणी असे ब्रिजेस बांधले तर मुंबईच्या वाहतुकीचा वेग वाढेल. बऱ्याचवेळा कारण नसताना गेट्स बंद असतात आणि त्यामुळे लोकांची जाण्यायेण्याची व्यवस्था होत नाही तसेच रेल्वेचा मार्ग रोखला जातो. त्यामुळे ती सूचना आम्ही निश्चितपणे स्वीकारणार आहोत.

सभापती महोदय, प्रदुषणच्या संदर्भात या ठिकाणी सूचना करण्यात आली. सन्माननीय सदस्य डॉ. सावंत हे त्या विषयाचे तज्ज्ञ आहेत. त्यांनी चांगली सूचना केलेली आहे. काही दिवसानंतर मुंबईमध्ये मास्क लावून फिरावे लागेल तसेच या शहरामध्ये प्राणवायूची आवश्यकता खूप वाढणार आहे. वाहने सीएनजीवर चालविण्याच्या बाबतीत सूचना करण्यात आली. पुन्हा एकदा पेट्रोलियम खाते महाराष्ट्राकडे आलेले आहे. श्री. मुरली देवरा यांच्याशी चर्चा झालेली आहे. सीएनजी फिलींग स्टेशनसाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे आम्ही मान्य केलेले आहे. आम्ही स्वत: ज्या गाडीतून फिरतो ती गाडी सीएनजीवर करुन घेण्याची सूचना आम्ही दिलेली आहे. त्या कंपनीने सांगितले की, किमान माननीय मुख्यमंत्र्यांनी आपली गाडी सीएनजीवर चालेल अशी व्यवस्था केली तर इतरही हळूहळू त्याचे अनुकरण करतील. प्रदुषण दूर करण्यासाठी त्याचा उपयोग होईल. एमयूटीपी अंतर्गत जेवढ्या नवीन बेस्ट बसेस सुरु केलेल्या आहेत त्या बसेस सीएनजीवर आधरित असलेल्या घेतलेल्या आहेत. ज्या जुन्या बसेस आहेत त्याही क्रमाक्रमाने सीएनजीवर आणण्याच्या संदर्भामध्ये आम्ही प्रयत्न करीत आहोत. फ्लायओव्हर ब्रिजेस तसेच इतर अनेक गोष्टींची सुरुवात तुमच्या काळामध्ये झाली. परंतु माहीमचा जो प्रश्न सन्माननीय सदस्यांनी



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ......

मांडला तो योग्य आहे. त्या ठिकाणी आपल्याला काही तरी प्लॅन करावा लागेल. पेडररोडचा निर्णय झालेलाच आहे. तो निर्णय मागेच झाला होता परंतु तो विषय थोडासा थांबलेला होता. मला असे वाटते की, डिसेंबर अखेरपर्यंत आपली पूर्ण तयारी होऊन त्याचे भूमीपूजन करुन कामाला सुरुवात होईल. बरेच दिवस असलेला वाद संपला आहे. दूसऱ्या दोन तीन सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. नव्याने ज्या इमारती होणार आहेत त्या ठिकाणी रिसायकलींग करण्याची सूचना करण्यात आली. त्यामध्ये कचरा असेल किंवा सांडपाणी असेल, त्याबाबतीत इंसेंटीव द्यावा लागेल. सोलर एनर्जीचा कंपल्सरी वापर करणे यामध्ये ज्या मोठ्या इमारती बांधल्या जातात किंवा दवाखाने असतील त्या ठिकाणी वीजपुरवठा करण्यासाठी सोलर एनर्जीचा वापर मोठ्या प्रमाणवर करणे, तेथील जे सांडपाणी असेल त्याचे रिसायकलींग करुन पुन्हा ते पाणी इतर कामाकरिता वापरणे यादृष्टीने जे डेव्हलपर या कामासाठी पुढे येतील त्यांना वेगळ्या पध्दतीने इंसेंटीव देऊ शकलो तर त्यातून या चांगल्या कामाला गती मिळू शकते. मला असे वाटते की, आपल्या ज्या सूचना आहेत त्या निश्चितपणे स्वीकारण्यासारख्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर साहेबांनी सांगितले की, चाळी तोडू नका. ते कितपत शक्य होईल हे सांगता येत नाही. हेरिटेज म्हणून एखादी चाळ ठेवावी परंतु सगळ्या चाळी ठेवावयाच्या म्हटल्या तर अडचण होईल असे मला वाटते. दगडी चाळ आहेच. सभापती महोदय, केंद्र सरकारने आणि माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग साहेबांनी सुध्दा मुंबईच्या विकासाच्या संदर्भात एक वेगळी भूमिका घेतलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : दिल्लीतून पैसे मिळाले काय ?

श्री. विलासराव देशमुख : 11 हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव पाठविलेले आहेत. त्यापैकी एद्याप आपली एकही योजना मंजूर झालेली नाही.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 18:35

(श्री. विलासराव देशमुख....)

याचे कारण असे आहे की, प्रकल्प मंजूर करणारी जी समिती आहे त्या समितीला 100 कोटीचेच प्रकल्प मंजूर करण्याचे अधिकार दिलेले आहेत. 100 कोटी पेक्षा अधिक रकमेचे प्रकल्प मंजूर करण्याचे अधिकार त्या समितीला नाहीत. आपले प्रकल्प हे 500, 700 कोटीचे आहेत. म्हणून याबाबतीत एम्पॉवरड् कमिटी निर्माण करण्यासंबंधीचा प्रस्ताव तयार केलेला आहे. यासंदर्भात परवाच एक बैठक झाली. आपण सर्व प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविलेले असून ते प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या त्यांनी मान्य केलेले आहेत. समितीचे जे अधिकार आहेत त्याबाबतीत मर्यादा असल्यामुळे या प्रकल्पांना मान्यता मिळण्यास थोडा विलंब होईल एवढेच. आपण पाठविलेल्या सर्व योजना मान्य होतील आणि मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होईल याबद्दल माझ्या मनात शंका नाही. पावसाळयात झालेल्या अतिवृष्टीमुळे मुंबई शहराला मोठा फटका बसलेला आहे.. मुंबईतील मिठी रिव्हर डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आणि सिव्हरेज प्रोग्रॅम ह्या दोन योजना एनयूआरएमच्या बाहेर ठेवाव्यात अशी माननीय पंतप्रधानांना विनंती केलेली असून त्यांनी ती विनंती मान्य केलेली आहे. या योजनांसाठी 35 टक्के रक्कम केन्द्र सरकारकडून, 15 टक्के रक्कम राज्य सरकारकडून आणि 50 टक्के रक्कम महानगरपालिकेकडून मिळणार आहे. 50 टक्के रक्कम ही महानगरपालिकेला कर्जाच्या स्वरुपात किंवा इतर रिसोर्सेसमधून निर्माण करावी लागणार आहे. मुंबईसाठी आतापर्यन्त अशा प्रकारे कधीच निधी उपलब्ध झाला नाही. मुंबईसाठी 50 टक्के रक्कम उपलब्ध होणार असेल तर त्यातून अनेक योजना कार्यान्वित होतील असे मला वाटते. झोपडपट्टी आणि फूटपाथच्या संदर्भात मी बोललो आहे. मिठी नदीच्या संदर्भातील पुष्कळशी कामे प्रगतीपथावर आहेत. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत अधिक काळजीपूर्वक पाहाण्याची गरज आहे. जे प्रकल्पग्रस्त नाहीत असे लोक प्रकल्पग्रस्त म्हणून वेगवेगळया मार्गाने घुसण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यावर बंधन आणण्याच्यादृष्टीने निश्चितपणे लक्ष घातले जाईल हे मी स्वत: येथे सांगू इच्छितो. महानगरपालिका आणि एमएमआरडीओ यांच्यावतीने ही कामे हाती घेतलेली आहेत. मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामाला मार्चमध्ये सुरुवात करण्यात आली असून 1 लाख 39 हजार क्यूबिक मीटर एवढा गाळ काढण्यात आलेला आहे. त्यापैकी 84 हजार क्यूबिक मीटर गाळाचे ट्रान्सपोर्टेशन करण्यात आलेले आहे. 31 मे पर्यन्त मिठी नदीच्या पहिल्या टप्यातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलासराव देशमुख....)

काम पूर्ण होईल. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्या प्रमाणे, बीपीटी, ऐअर ऑथॉरिटी ऑफ इंडिया, रेल्वे ह्या स्वत:च प्लॅनिंग ॲथॉरिटी असल्यामुळे त्यांना महानगरपासलिकेच्या मान्यतेची गरज पडत नाही. त्यामुळे जेव्हा मिठी नदी वळवून एअर स्ट्रीप बांधण्यात आली त्यावेळी महानगरपालिकेची परवानगी घेण्यात आली नाही. तेव्हा केन्द्र शासनाच्या ज्या ज्या संस्था महानगरपालिकेमध्ये आहेत त्या संस्थांना कोणतीही विकास कामे करताना महानगरपालिकेची मान्यता घेणे बंधनकारक करण्याच्यादृष्टीने कायद्यामध्ये बदल करण्याचे ठरविलेले आहे. या मुंबई शहरामध्ये अनेक गोष्टी घडलेल्या आहेत. मिठी नदीचा प्रवाह बदलण्यात आला, काही ठिकाणी हा प्रवाह बुजवून बंद करण्यात आला. अशा प्रकारच्या गोष्टी यापुढे होऊ नयेत म्हणून अध्यादेश काढण्याचा निर्णय शासन निश्चितपणे घेईल. झोपडपट्टयामध्ये सार्वजनिक शौचालयांची व्यवस्था करण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. सर्वसाधारणपणे 2011 सालापर्यन्त 35 हजार टॉयलेट सीटस् निर्माण करण्याचा कार्यक्रम हातामध्ये घेतलेला आहे.

...नंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 18:40

श्री. विलासराव देशमुख ...

त्याठिकाणी एमयूआरएम मार्फत 480 कोटींची मागणी यासाठी केलेली आहे. मुंबई शहरामध्ये 12 लाख 94 हजार वाहने आहेत. या शहरामध्ये दररोज 300 पेक्षा अधिक वाहनांचे रजिस्ट्रेशन केले जाते. पार्किंगच्या व्यवस्थेसंदर्भात माननीय सदस्य श्री. नितीनजी गडकरी यांनी मुद्दा उपस्थित केला होता. अंडर गाऊंड पार्किंग करावे अशी सूचना केली होती. यासंदर्भात नियम 68 मधील तरतुदीनुसार वाहतूक पोलिसांच्या सहमतीने महानगरपालिकेने अंडर गाऊंड पार्किंग सुविधा देण्याचा निर्णय घेतलेला आहे. या वर्षापासून या कामाची सुरुवात करण्याचे महानगरपालिकेने ठरविलेले आहे. अशा पध्दतीने अनेक लोक पुढे आले तर पार्किंगची व्यवस्था निश्चितपणाने करता येईल. गावठाणाला वाढीव चटई क्षेत्र देण्याबाबत निर्णय घेतला. त्यासंदर्भात कोळीवाडयाला स्थगिती दिली असा माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी मुद्दा उपस्थित केला. सीआरझेडमध्ये हे क्षेत्र बाधित होत असल्यामुळे आतापर्यंत त्याला मान्यता दिली नव्हती. याबाबतीत खालच्या सभागृहात देखील चर्चा झाली होती. यासंदर्भात जनरल स्टे दिला आणि बदल मान्य केलेला आहे. जनरल स्टे बाबत ज्यावेळी माननीय सदस्यांबरोबर चर्चा होईल त्यावेळी याबाबतीत निर्णय घेतला जाईल. मुंबई शहरासाठी पाण्याची जी गरज आहे ती 4100 एमएलडी आहे. त्यापैकी 3150 एमएलडी पाणी सध्या उपलब्ध होत आहे. अजूनही 1000 एमएलडी पाण्याची जी तूट आहे ती मुंबई शहरासाठी पाणी पुरवठयाच्या ज्या योजना आहेत त्यातून भरुन काढणार आहोत. पहिल्या टप्प्यामध्ये डिसेंबर 2066 पर्यंत साधारणपणे भातसा धरणातून 355 एमएलडी पाणी मिळणार आहे. हे अतिरिक्त पाणी डिसेंबर 2006 पर्यंत मिळू शकेल. त्यानंतर मध्यवैतरणा प्रकल्प आहे त्यासाठी 1600 कोटी रुपये लागणार आहेत. एमयूआरएम ने योजना प्रस्तावित केलेली आहे आणि त्याला तत्वत: मंजुरी पर्यावरण आणि वन खात्याकडून आलेली आहे. ऑक्टोबर,2006 मध्ये या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे. 2010 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर 455 एमएलडी पाणी मुंबई शहराला उपलब्ध होऊ शकेल. या दिशेने सरकारने पावले टाकलेली आहेत.

सभापती महोदय, मुंबई शहरातील विविध समस्यांबाबत चर्चा करीत असताना म्हाडाच्या कारभारासंबंधात चर्चा झाली. अनेक माननीय सदस्यांनी म्हाडाच्या कारभारासंदर्भात नापसंती व्यक्त केलेली आहे. विशेषत: संक्रमण शिबिरामध्ये लोक वर्षानुवर्षे राहातात तरी त्यांना घरे मिळत

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.शिगम 18:40

श्री. विलासराव देशमुख .....

नाहीत. बांधकामे पूर्ण होत नाहीत. पात्र व्यक्तींना घरे मिळत नाहीत. एकूणच म्हाडाच्या कारभाराबाबत तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, म्हाडाच्या कारभारासंबंधात निश्चितपणाने आणि अतिशय गांभीर्याने लक्ष घालू आणि ज्या तक्रारी आणि सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात निश्चित लक्ष घालू.

यानंतर श्री. खर्चे पी

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .........

कारण गृहनिर्माण विभाग सुध्दा माझ्याकडेच असल्यामुळे ती जबाबदारी मला नाकारता येणार नाही म्हणून म्हाडामध्ये अनेक अधिकारी अनेक वर्षांपासून बसलेले आहेत आणि त्यांचे जे उद्योग चालू आहेत त्यासंदर्भात एक मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला असून त्याबाबत पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा प्रकारे जर चुकीच्या पध्दतीने काम चालू असेल तर ते बंद करावे लागणार व या दोन्ही गोष्टींसाठी गती द्यावी लागेल. या राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मी ज्यावेळी दुसऱ्यांदा पदभार स्वीकारला त्यावेळी अनेकांनी मला विचारले की, आपण आपल्या कारकिर्दीत कोणत्या गोष्टींना प्राधान्य देणार आहात ? त्यावेळी मी त्यांना एकच सांगितले की, या मुंबईने महाराष्ट्राला आणि देशालाही भरपूर दिलेले आहे पण मुंबईला त्यातून परत काहीच मिळालेले नाही म्हणून मी माझ्या कारकिर्दीत माझे जे वैयक्तिक व्हिजन असेल ते म्हणजे या शहराचा चेहरा-मोहरा या पाच वर्षात कसा बदलता येईल याला प्राधान्य देईल आणि एक आंतरर्राष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्याच्या दिशेने जी पावले उचलावयाची आहेत, ती उचलण्याच्या संदर्भात मी लक्ष घालणार आहे. त्यानुसार आज या मुंबईत मोठया प्रमाणात कामे चालू आहेत. तीन तीन वेगवेगळया एजन्सीजच्या माध्यमातून ही कामे चालू असून त्यात गृहनिर्माण मंडळाच्या वतीने घरबांधणी, एमएमआरडीअे, एमएसआरडीसी आणि आपली मुंबई महानगरपालिका यांच्यामार्फत ही वेगवेगळी कामे सुरु आहेत. या सर्व संस्थांमध्ये समन्वय असण्याचीही तेवढीच आवश्यकता आहे व हा समन्वय नीटपणे राखला जावा, वेळोवेळी त्यांच्या बैठका व्हाव्यात व जे गैरसमज असतील ते दूर व्हावेत. शेवटी एकमेकांवर ढकलण्याची जी स्पर्धा लागते तसे होऊ नये असा माझा प्रयत्न राहील. नुकताच 26 जुलैचा हाहा:कार आपण सर्वांनी अनुभवलेला आहे व त्याची पुनरावृत्ती दुर्देवाने भविष्यात झालीच तर पुन्हा अशी वेळ येऊ नये म्हणून आपण डिझास्टर मॅनेजमेंट सुरु केले आहे त्या माध्यमातून आगावू पूर्वसूचना व रंगीत तालीम वगैरे गोष्टी येत्या महिनाभरात करावयाच्या आहेत. यासंदर्भात लोकप्रतिनिधींच्याही सहकार्याची गरज आहे. आपल्याला जे अनुभव आले आणि त्यातून जे शिकलो त्यातून पुढच्या काळात जर अशी आपत्ती आली तर कशा प्रकारे दुरुस्ती करावयाची यासंदर्भात आम्ही सतर्क आहोत. मी या निमित्ताने आपल्याला विश्वास देऊ इच्छितो की, मुंबईच्या संदर्भात जे चित्र आहे ते योग्य रितीने साकारता यावे, योग्य पध्दतीने प्रगतीच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .......

पथावर घेऊन जाता यावे यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपूर्ण शक्ती मुंबईच्या विकासाच्या पाठीमागे लावण्याचाच आमचा प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जे.जे. हॉस्पीटलच्या संदर्भात 18 कोटी रुपये देण्याची गरज आहे, असा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, हे 18 कोटी रुपये ताबडतोब दिले जातील. ज्या ठिकाणी राज्यातून गरीब माणूस उपचारासाठी येतो त्या ठिकाणी साधनसामुग्रीबाबत ज्या अडचणी आहेत त्या दूर करण्यासाठी गरज पडल्यास एमएमआरडीअे ला देखील निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सांगण्यात येईल. शेवटी गरीब माणसाच्या हितासाठी पैशाअभावी यंत्रणा कमी पडत असेल तर त्यासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नाही व तातडीने हा पैसा उपलब्ध करुन दिला जाईल, पण या सर्व कामासाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे. शेवटी एवढया कमी वेळात आपण चर्चा करु शकलो नाही म्हणून येत्या मे महिन्यात मुंबईच्या आमदारांसह, माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना सोबत घेऊन एक बैठक घेण्यात येईल व चर्चा करण्यात येईल. तसेच शासनाने जे निर्णय घेतले त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज असेल तर निश्चितपणे ती करता येईल. शेवटी या सदनामार्फत मी मुंबईतील टॅक्स भरणाऱ्याजनतेला एक कमिटमेंट करु इच्छितो जेणे करुन मुंबईतील या टॅक्स पेअरला बरे वाटेल की आपण दिलेला पै अन् पै चा फायदा मुंबईसाठी खर्च होणार आहे. त्याचप्रमाणे अनधिकृत बांधकामच्या संदर्भात कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असल्याचेही या ठिकाणी सांगण्यात आले.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आठ दिवसांपूवी मुंबईत येणाऱ्या लोंढयासंबंधी एक स्टेटमेंट दिले होते. जातीय, भाषिक, धार्मिक दृष्टीकोन न ठेवता मुंबई शहराला वाचविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, आज मुंबईची अवस्था अतिदक्षता विभागातत मृत्युशय्येवर असलेल्या रूग्णासारखी झाली आहे, असा उल्लेख माझ्या भाषणात केला होता. त्यावेळी मुंबईला पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी आम्ही सहकार्य देऊ असेसुध्दा मी सांगितले आहे. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबईत येणाऱ्या लोंढयासंबंधी सभागृहाच्या बाहेर जो निर्णय जाहीर केला तो त्यांनी येथे रेकॉर्डवर आणला तर बरे होईल.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, घटनेच्या चौकटीत बसून जे काही बदल करावयाचे असतील ते जरूर करण्यात येतील. या संदर्भात विरोधी पक्षाच्यासुध्दा ज्या काही सूचना असतील व त्या घटनेच्या चौकटीत बसणाऱ्या असतील तर त्याचासुध्दा जरूर विचार केला जाईल. मुंबईत येणारे लोंढे कसे थांबविता येतील ? हे घटनेच्या चौकटीत राहून पहावे लागेल. मुंबईत येणारे लोंढे रोखावेत ही सर्वांचीच इच्छा आहे. आज मुंबईत येणाऱ्या माणसांसाठी जागाच शिल्लक नाही. एवढेच नव्हे तर अशा लोकांसाठी आपण वीज, पाणी इत्यादी देऊ शकत नाही. म्हणूनच घटनेच्या चौकटीत बसवून एखादा कायदा तयार करता आला तर तो सुध्दा करण्याची सरकारची तयारी आहे. लोंढे रोखण्याच्या संदर्भात घटनेच्या चौकटीमध्ये बसणारा एखादा कायदा तयार करता येईल काय ? यासंबंधीची कायदेशीर बाजू माननीय विरोधी पक्षांनी आपल्या कायदेतज्ज्ञांमार्फत देखील जाणून घ्यावी. यासंबंधी आम्ही देखील ॲडव्होकेट जनरलचे मत घेऊ.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, स्पार्कसंबंधीचा मुद्दा मी उपस्थित केला होता. स्पार्कने शिफारस केल्यामुळे काही अपात्र लोकांनासुध्दा जागा मिळालेल्या आहेत.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, स्पार्क संबंधी खूप तक्रारी येत आहेत. त्यांच्या तक्रारीची व चुकीच्या गोष्टीसंबंधी उच्चस्तरिय चौकशी करण्यात येईल. त्यांच्या चुकीच्या गोष्टीमुळे ज्यांच्यावर अन्याय झाला असेल त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करू.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, NURM अंतर्गत निधी मिळविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे......

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, आम्ही घेतलेल्या कुठल्याही निर्णयासंबंधी NURM ने अडवणूक केलेली नाही. ULC संबंधी साधारणपणे दीड वर्षामध्ये निर्णय घेऊ असे त्यांना लेखी कळविले आहे. रेंट ॲक्टसंबंधीचे प्रकरण कोर्टामध्ये आहे. त्यामुळे यासंबंधी काही बोलू शकत नाही. स्टॅम्प डयुटी मान्य केली आहे. त्यांनी ज्या अटी घातल्या होत्या त्या मान्य केल्या आहेत. यासंबंधीचे पत्र त्यांनी मान्य केले आहे. नागपूरच्या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. 2000 कोटी पैकी 50 कोटी रिलीज केले आहेत. पुण्याची योजना अंतिम टप्प्यावर आहे. मुंबई ही मेगा सिटी आहे. त्यामुळे केंद्र सरकारने कॅबिनेट नोट मुव्ह केलेली आहे. मरीन ड्राईव्ह सुशोभिकरणाचे काम सुरू केले आहे. यासाठी 130 कोटी रुपये खर्च येणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी रुपये 30 कोटी देण्यात आले आहेत. कुणाच्याही पैशाची वाट न पाहता रुपये 1100 कोटींची कामे सुरू झाली आहेत. यासाठी आपण केंद्राची वाट पाहत नाही. महाराष्ट्रामध्ये तेवढा निधी खर्च करण्याची दानत आहे. (अडथळा) सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.रेड्डी यांना दाखविल्याशिवाय काही करता येणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, शासकीय कर्मचाऱ्यांच्या वसाहतीचा प्रश्नाबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तरामध्ये उल्लेख केलेला नाही. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये आपण लोकांना घरे देतो. आज पोलिसांच्या वसाहतीचा प्रश्न आहे. त्यामुळे यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. तसेच ज्यांनी जमीन घोटाळा केला त्या अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, जी घरे बांधण्यात आलेली आहेत ती स्टाफ क्वार्टर्स आहेत. कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर शासकीय निवासस्थान सोडत नाही व निवासस्थान नावावर करुन द्यावे अशी प्रकारची मागणी आमच्याकडे सातत्याने येत असते. मला वाटते यासाठी वेगळया स्कीममधून घरे बांधून देणे आवश्यक आहे. शासकीय लोकांसाठी घरे असतील आणि त्या जमिनीवर....

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांचे म्हणणे असे आहे की, ज्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत 225 चौ.फूट क्षेत्रफळाची सदनिका शासनाकडून बांधून दिली जाते, तशाच प्रकारची सदनिका शासकीय कर्मचारी निवृत्त झाले तर त्यांना देण्यात यावी.

श्री.विलासराव देशमुख : महोदय, आज स्वत:चे घर घेण्यासाठी निरनिराळया बँकातून कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी त्यातून घरे घ्यावीत. त्यांच्या घराची व्यवस्था शासनाला एकदम करणे शक्य नाही. जर या कामी कोणी स्वत:हून पुढाकार घेतला तर त्यांना शासन निश्चितप्रकारे मदत करेल. परंतु त्यांच्या निवासस्थानाची जबाबदारी शासन घेऊ शकत नाही.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

--------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेला सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी व इतर वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये वरील प्रस्तावावर उद्या चर्चा घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या गुरुवार, दिनांक 13 एप्रिल, 2006 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 6 वाजून, 57 मिनिटांनी, गुरुवार,
दिनांक 13 एप्रिल, 2006 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही